# १

# ॥ कृष्णपंचपदी ॥

(मराठी)

**॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

**। अथ कृष्णपंचपदी प्ररभ्यते ।**

**१.**

**महाराज परेशा हरी । हरी वासुदेवा ।**
**नित्य मज घडो तुझी सेवा ॥ परेशा हरी ॥धृ०॥**
महाराज प्रणवस्वरूपा । स्वरूपा त्रिगुण रहिता । प्रकृतियुक्तत्रिगुणसहिता ।
भक्तवत्सला । वत्सला श्रुती विहिता । योगि वाणिती तुझी महिता ॥**चाल**॥
**धरी मज करी । करुणामृतवृष्टी करी । गोपिकापते श्रीहरी ॥**
**हरी कर्मठेवा ॥ नित्य मज० ॥१॥**
महाराज बहुत कष्टलें । कष्टले मायाध्वान्ती । कोठे ना मिळेचि विश्रांती ॥
काय मी करूं । करूं भवप्रांती । क्षणोक्षणीं जीवितक्रांती ॥ **चाल** ॥
**भक्तरंजना । स्वामिया दुष्टभंजना । मम नेत्रीं घालि अंजना ।**
**अंजना आत्मभावा ॥ नित्य मज० ॥२॥**
महाराज वियोगें तुझ्या । जाहली तप्त तनू । शशी मज वाटतसे भानू ॥
जाउं पाहतो । पाहतो सख्या प्राणू । शांतवी त्वरित पंचबाणू ॥ **चाल** ॥
सगुण सुंदरा । सांवळ्या हरी गिरिधरा । करि धरुनी मजला वरा ।
**वरा विश्वजीवा ॥ नित्य मज० ॥३॥**

**(य२पू.१)**

**नित्य मी गाईन गुणकीर्ती ॥ नंदनंदना । नंदना ज्ञानदीप्ती ।**
हेचि मज द्यावि सदा स्फूर्ती ॥ **चाल** ॥
**गूण गावया । होवोत जन्म साविया । हृदयीं तूं राहि स्वामिया ।**
**स्वामिया ज्ञानदेवा ॥ नित्य मज घडो तुझी सेवा ॥ परेशा हरी ॥४॥**

**२.**

**(हिंदी)**



**गोपिराज महाराज । प्रभुजी गोपिराज महाराज ॥धृ०॥**
**सुरबिनती सुन कमलापति तुम । सगुण भयो यदुराज ॥ प्रभुजी० ॥१॥**
**गोकुल म्याने खेल खेलके मुक्त किये तरुराज ॥ प्रभुजी०॥२॥**
**वृन्दावनके कुंजगलिन में । लिइ गोपिनकी लाज ॥ प्रभुजी० ॥३॥**
**गोपिनाथ प्रभु तात हमारे । तिन पग शीस नमाज ॥ प्रभुजी० ॥४॥**

**३.**

**(हिंदी)**

**पाई जनम मानुख की भाई गुण गोविंदके गाना बे ।**
**श्रीकमलापतचरणनखन मों दिल अनमोल लगाना बे ॥ धृ० ॥**
**माया जायादि ये जानी मन जल्द छोर कर जाना बे ।**
**संतसंगमो अंग घुमाकर तनकी आग बुझाना बे ॥ पाई० ॥१॥**
**अंधा हो परधन परनारी किमपी मन नहि लाना बे ।**
**ध्यान पकडकर खडा रहे तब कबु दिलको न हिलाना बे ॥ पाई० ॥२॥**
**सुदिनरातपर सेवा करकर गुरु ग्यानको लेना बे ।**
**गुरुकृपाबिन ब्रह्मसदनका ताला कबहुं खुलेना बे ॥ पाई० ॥३॥**
**नयन बयन करि एक देख फिर समान मट्टी सोना बे ।**
**अलकावतिपतिचरणसौख्य में शांत कालत्रय सोना बे ॥ पाई० ॥४॥**

**४.**

**(मराठी)**

**कृष्ण कृष्ण मुखिं म्हणा बापनों । कृष्ण कृष्ण मुखिं म्हणा हो ॥**
**निजप्रीतिनें स्मरा सर्वदा रुक्मिणिरमणा हो ॥ धृ०॥**
**दारा पुत्र गोत्र वित्त हे नाशिवंतची सकळ हो ।**
**भवपुरिमध्यें तुमची विभुविण कोण करिल कळकळ हो ॥ कृष्ण० ॥१॥**
**जें जें दिसतें तें तें अवघे जलबुद्‌बुदवत् खोटें हो ।**
**जीवित हे क्षणभंगुर जाणुनि लागा स्मरणा वाटे हो ॥ कृष्ण० ॥२॥**
**ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाला मायबाप विश्वेशा ।**
**प्रेमामृत मज पाजुनि ठेवी देउनि सेवकवेशा ॥ कृष्ण० ॥३॥**

**(य२पू.२)**

५.

सांवळ्या गोपीरमणा ये बापा ये ॥धृ०॥
खेळ खेळतां गोकुळीं तूं कष्टलासि बहु देवा ।
येउनि राही हृदयीं माझ्या प्रेमे करिते सेवा ॥ सांवळ्या०॥१॥
वत्सामागें धांवत जातां कंटक रुतले पायीं ।
स्वेदबिंदु तव मुखावरी दिसती गे कृष्णाबाई ॥ सांवळ्या०॥२॥
धर्माघरिंचे पात्र काढितां कितिक सोशिले कष्ट ।
परि ते नेणुनि पुंडरिकानें उभेचि केले स्पष्ट ॥ सांवळ्या०॥३॥
नाथाघरिचे पाणि वाहतां म्लान जाहली कांती ।
आतां देवा मम हृन्मंदिरि नित्यचि घे विश्रांती ॥ सांवळ्या० ॥४॥
बहुत श्रमलां भक्तजनांचे हरतां जन्म मरण ।
निरंतर मी प्रेमें स्वामी तुमचे चुरीन चरण ॥ सांवळ्या० ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाळा गुरुप्रिया गोविंदा ।
तनुमन अर्पुनी भावें तुम्हां शरण मी परमानंदा ॥ सांवळ्या ॥६॥
॥ हरिः ॐ तत्सच्छ्रीमत्सद्‌गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥
॥ कृष्णपंचपदी समाप्ता ॥
(य२पू.३)
०००

# २

# ॥ सद्वैजयन्ती ॥

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥
आर्या

श्रीज्ञानेश्वरसद्‌गुरु करुणार्णव चरणपंकजा नमुनी ।
मेळविले तें, ज्याला क्लेशावाचोनि जाणती न मुनी ॥१॥
देवचरित सुखदुःखद, सुखदायक साधुचरित सर्वत्र ।
तीर्थ-मूर्तिफळ काळें, सज्जन नमनेचि करिति सुपवित्र ॥२॥
श्रीज्ञानेश्वरमय परि भासति तत्सचिव विश्व रक्षाया ।



?????लक्षा?? या हयबति[१] विभु शोभविती पद मदीय वक्षा या ॥३॥
ज्ञानेश्वरमित्र नमूं श्रीनरकेसरि[२] सरस्वती नामा ।
ते देती जें फळ ते द्याया शक्त न सरस्वती ना मा ॥४॥
(१नृसिंहसरस्वति)
पीयूषसमार्यजना धेनुस्तनतीर्थ हेऽकपिलधारा* ।
रघुनाथदास[३] तेवी शोभविती तीर्थ हे कपिलधारा ॥५॥
(* पांढरी दुधाची धार)
अण्डज हंस तथापि न कदापि इच्छी कुसंग काकाचा ।
असु निज सुजन न सेविति गावुनि यशभाव गंगुकाकाचा[४] ॥६॥
स्मर मारोनि स्मरती परमहंस रामकृष्ण नामाते ।
तेवी तारक वाचुनि परमहंसरामकृष्ण[५] ना माते ॥७॥
नित्य विवेकानंदी[६] होउनिया मग्न राहणे कपिला ।
नित्य विवेकानंदी होउनिया मग्न राहणे ऽ कपिला ॥८॥
त्र्यम्बकवह्निसहायें जाळि न वाया करूनि भवजाळ ।
न उरे स्वामी त्र्यम्बक[७] जपता अणुमात्र कुत्र भवजाळ ॥९॥
श्रीभगवति मधुमति ती अंगप्रिय कांतचरणपंक जिते ।
अलि मुनि क्रीडाति गोविन्दस्वामि[८] चरणपंकजि ते ॥१०॥
(य २ पू. ४)
अबबब दासोबाबा[९] महिमा महि मावरास आणोनी ।
तो पाहे निजनयनीं जो निर्भय हृदयिं नित्य वाणोनी ॥११॥
ज्याच्या चरणासाठी सोडिति धन सदन गज सुवाजी जे ।
तन्मय सदनीं असुनी क्रीडति मी वंदिते नगाजी[१०] जे ॥१२॥
भवप्रलयजल पडता रक्षक आबाजि घोंगडे[११] नाम ।
ज्यांना नगाजि[१२] करुणें सद्‌गुरु झाले स्वयें घनश्याम ॥१३॥
ते धन्यचि जे धाले सोमेश्वरसाधु[१३] नयनि पाहोनि ।
सोमेश्वर जन तारी त्यांच्या हृदयी अखण्ड राहोनि ॥१४॥
[१४]द्रविडस्वामिचरण विक्रम कळुनि द्रव जयास येइल ना ।
तो पशुघातक मूर्ती त्या सुरपुर कधिं हि देव देईल ना ॥१५॥
भाविक जन हो चित्तीं इच्छा जरि हरिपदा सुसंगा जी ।

प्रेमभरें वंदावे गुरु करुणार्णव सदा सुसिंगाजी[१५] ॥१६॥
सद्वैद्याचे औषध गेल्या करि गुणहि कोल बा कोष्ठी ।
तेवी दर्शनि तारिति धापेवाडस्थ कोलबा कोष्ठी[१६] ॥१७॥
(कोल = ६ मासे वजन)
दुःखित जीवा घेता येना भवभय उसंत नागपुरी ।
यास्तव तत्पद नमु जे बाबातेली[१७] सुसंत नागपुरी ॥१८॥
येई न आधन रिपुच्या बाबा लहरीस तूर्ण खळखळ कीं ।
निजजन तारावयाची बाबालहरीस[१८] पूर्ण कळकळ कीं ॥१९॥
इच्छिसि मना म्हणूं या कृष्णीं जोडोनि पतिपणा नाते ।
तरि मग सत्वर आधी भावें नमि पातुरस्थ नानाते[१९] ॥२०॥
अन्नदान वाढविण्यासाठी जणुं भानुपुत्र अवतरला ।
धर्माभट्ट[२०] भजनगुण किति वर्णू जन अनन्त भव तरला ॥२१॥
ती धन्य माउली कीं, पतिसेवेविण नसे झगा जीतें ।
तेवी दासाचे ही अखण्ड वंदन असे झगाजीते[२१] ॥२२॥
त्वं क्वापि शमं नीतो गुरुं विना नैव मार केनाथ* ।
यास्तव वन्दितसे मी सद्भावें देव मारकेनाथ[२२] ॥२३॥
*(अन्वय- हे मार! त्वं,‾ केनापि गुरुं विना शमं नैव नीतः।)
(य २ पू. ५)
सहस्रनामी शोभत आहे श्रीरुद्रनाथ भारतिचा ।
त्याहुनि करुणामहिमा आहे श्रीरुद्रनाथभारतिचा[२३] ॥२४॥
पापें करुनी झाली कलियुगिं नरतनुभृतांचि वाढ खुजी ।
परि जन तारावयाला बाबा वरखेड गाविं आडकुजी[२४] ॥२५॥
केशवभट्ट दयार्णव[२५] केशव अवतार निर्विकल्प खरे ।
पंढरिवरि* लोटांगण घालुनि गुरुकार्य साधिले स्वकरें ॥२६॥
(*पंढरीपर्यंत)
घुइखेडगांविं झाले भगवज्ञन कोणि बेंडूजीबाबा[२६] ।
दीनदयाल तयांची नांवे भवनदि तरावया नावा ॥२७॥
वारंवार विनविते चरणीं ठेवूनी कन्यका माथा ।
संसाराम्बुधिं बुडते घ्या वर धांवोनि अंबुजीनाथा[२७] ॥२८॥



मायापुरींत मजला बहुकाल क्रोधमांग शिवला जी ।
या या पुनित कराया बाबा धावूनि शीघ्र शिवलाजी[२८] ॥२९॥
सज्जनसंगति वाचुनि काय उगें सेवुनीहि वन बाबा ।
महोत्सवें वंदु चला अडगावीं थोर साधु बनबाबा[२९] ॥३०॥
भवशीत निवारायां झाले बाबाजी जे सिताराम[३०] ।
शांत विदेहवृत्ति तत्करुणेनें भेटतो सिताराम ॥३१॥
शिवशक्ती एकांगे नेमावर शोभलेत यापरिचे ।
आलोनेबाबा[३१] ही नेमावर शोभले तयापरिचे ॥३२॥
मायामय जीवाचे फोडाया दम्भ-काम-मान-गिरी ।
करुणावज्राङ्कितकर मुक्तिशचिप्रिय महंत मानगिरी[३२] ॥३३॥
कंचनगिरीं कंचनगिरी[३३] आधारस्तम्भ कुम्भिनीवरि हा ।
भेदुनि मीननिकेतन स्नात्सुखमति नितंबिनीवरि हा ॥३४॥
संताचि भाजि बरी, श्रीमंताची पुरी नको बाबा ।
देतिल आम्हां सकळहि पिंपळनगरस्थ आडकोबाबा[३४] ॥३५॥
वाराणशींत झाले स्वामीतेलंग[३५] कोणी बाबाजी ।
नमिते चरणाम्बुरुहा ते मज शरणागतास पावा जी ॥३६॥
सकलहि दुःखे वारिति सुरजीचे* रामकृष्णनाथ गुरू* ।
(*सुरजीचे = इंद्राचे, *गुरू = जड)
(य२पू.६)
ते दृश्यचि अवतरले सुरजीचे रामकृष्णनाथ गुरु[३६] ॥३७॥
सद्भावावाचुनिया नावडती कनक माणिक प्रभुला ।
यास्तव नमिते भावें वाहुनि मनकनक माणिकप्रभुला[३७] ॥३८॥
भो जीव भव प्राज्ञस्त्वमनुसर कदापि विभवपंकं मा ।
घेई ब्रह्मसुख सख्या, वंदुनि सद्भावयुक्त व्यंकम्मा[३८] ॥३९॥
ते जन नर कीं ज्यांही दत्त कनकसम सुमाणिकार्थ[१] असू ।
ते जन[३९] नरकीं ज्यांही दत्त कनकसम सुमाणिकार्थ* असू ॥४०॥
(टीप :- सुरमणिकार्यार्थ माणिकप्रभूंच्या प्रीत्यर्थ, प्रभुंनी समाधि घेतली त्यावेळी, काही अरब लोकांनी पोटात जंबिये खुसपून प्राण दिले, त्यांना उद्देशून ही आर्या आहे.
सुमाणिकार्थ = माणिकप्रभुंच्या प्रीत्यर्थ)
गुरु अलिमिया[४०] पदाब्जीं होउनिया अलि अखंड राहि मना ।

तत्करुणें तन्मयता पावुनि तनुभाव सोडि हा चिमणा ॥४१॥
भोबडतुल्लाशा(४१) प्रभु अझुनि जना पावताति नवसाला ।
तद्‌गुणमहिमागायक देखति जनिं कनकरूप दिवसाला ॥४२॥
वैकुण्ठास चला हो सखि सत्वर राज्य साधु उंबऱ्याचे ।
परि आधी वंदावे मीयासाहेब(४२) साधु उंबऱ्याचे ॥४३॥
भव दर्शनेचि नाशे ज्यांच्या अंगी अखंड ब्रह्मणता ।
(४३)अबदुल्लामीयाही तेवी फळती नमोऽस्तु ते म्हणता ॥४४॥
तो न तरे भीतीने जो दे धनिका म्हणूनि माना वा ।
यास्तव कादरभाई(४४) आवडीने मुसलमान वानावा ॥४५॥
(कादर यांचे सहनशक्त्यादिगुण पाहून मला हे साधू वाटले म्हणूनयांना या मालिकेत गोवले आहे)
बहु विद्वान् तथापि नेति न जन मुसलमान वा नावा ।
हर्षे ठेलोरीकर मिरनभाई(४५) मुसलमान वानावा ॥४६॥
सांभाळिती न काही येती भवसिंधुच्या भरुनि धावा ।
पापाहीं पिडिलो मी पापामीया(४६) त्वरें करुनि धावा ॥४७॥
नावडती क्षणभंगुर धन नंदन सदन बन्धु दाराही ।
ताजुद्दीन(४७) चरणाचीं आशा दासास सर्वदा राही ॥४८॥
(य २ पू. ७)
झाले कलियुगिं कैसे सकलहि जन कामचंद्र देहपर ।
शिरस ग्रामी ध्यावे बाबाजी रामचंद्र(४८) देहपर ॥४९॥
तरुणपणी उडतो परि अंति पडल सर्व शेख बाबूचा ।
आश्रय पातुरिं यास्तव करि सोडुनि सर्व शेखबाबूचा(४९) ॥५०॥
पतिव्रता पतिचरणा सेवायाला कदापि नव लाजी ।
तेवी मस्तक हे भावे वंदो सदाहि नवलाजी(५०) ॥५१॥
कांळसपुरींच राहुनि नाना कमळाकरी सुमति ठेवी ।
काळसपुरीच(५१) राहुनि नानाकमळाकरीं सुमति ठेवी ॥५२॥?????
(* का = कुत्सित, * अळसपुरी = शरीर, अळसपुरी मध्ये सुखरूप )
करुनि क्लेश बहुतहि दुर्लभ परि अगुण चिन्मयानंद ।
ते जय जय वदवाया निजजनवदनिं सगुण चिन्मयानंद(५२) ॥५३॥
देहूगांवी झाले जेंवी उद्धव प्रती तुकाराम ।



तेवी चिन्मयमय ते येळहे गावी प्रती तुकाराम(५३) ॥५४॥
हीन यातिचा आहे तरि वाटे प्राप्त होईन 'स्वा' मी ।
करतिल करुणा जरि कां अक्कलकोटस्थ सद्‌गुरुस्वामी(५४) ॥५५॥
(स्वा = ब्रह्मसुखाला)
किति असति जगतीवरि न मिती यशवंतराव महाराज ।
परि नाशिकि वृत्ती मम नमिती यशवंतराव महाराज(५५) ॥५६॥
(५६)तापेभारति-सेवे ठेवी झिजवोनि काय हा नियम ।
त्याचि येथ परत्रीं खडतर तरि करिल काय हानि यम ॥५७॥
ये येकांगे धार ति शस्त्राला घासताहि शिकलिकर ।
सर्वांगेचि सुधारिति नमिता बाबाउदासि चिखलिकर(५७) ॥५८॥
वर्णुनि सज्जनलीला हरिपदसुख पावलेत नाभाजी(५८) ।
ते मिळवाया मी नमि पारिसडोहावरील बाबाजी(५९) ॥५९॥
जानकि बाळा तरली ठेवुनि भावें अखंड रति रामीं ।
तेवीं भक्तहि तरले ठेवुनि भावा अखंड रतिरामी(६०) ॥६०॥
त्याचे कांही न करी घोरत राही असुनि सुरमाया ।
ज्यांचे तनुमन गेले (६१)अंबाबाई-पदाब्जि सुरमाया ॥६१॥
(य२ पू.८)
जें न दिसे न विकासे तेजेकरुनी कदा महारविच्या ।
ते ब्रह्मचि दाखविती वंदू त्या मायबाई आरविच्या(६२) ॥६२॥
भावें वंदू त्यांना करुनि वृत्ति भवविभवविलाच पुरी । ???????
जे श्रीदेवजि(६३) साधू नांदति गुरुसाहेब * मलाचपुरिं ॥६३॥
धिक्कारितील न कदा बाळाचे बोल बोबडे सदय ।
शिरखेडी नानाजी(६४) चरणां नमिता विनष्ट भवकुभय ॥६४॥
चुडिया गांवी वंदू सिंदाजी ब्रह्मचारि(६५) गोपाळ ।
त्यांची करुणा होता हृदयीं क्रीडल कसा न गोपाळ ॥६५॥
तारा जिंकू न शके करुनिहि उड्डान बहुत हंस गिरी ।
मोक्षार्कहि जिंकुनिया विराजती सायखेडिं हंसगिरी(६६) ॥६६॥
रेवस गावीं झाले कोणीं श्रीब्रह्मचारि बावाजी(६७) ।

श्रीकृष्णदासि[१४] नमिते ते मज शरणागतासि पावाजी ॥६७॥

(१४ पाठांतर - ज्ञानेश्वरसुत नमितो.)

जन[१५] हो श्यामगुणाने इच्छा करू पूर्ण चित्त मापाजी ।
आरविकर वंदावे यास्तव दामोदराख्य आपाजी[(६८)] ॥६८अ ॥

(१५ पाठांतर - वळता कधिहि वळेना किति सांगू केवढे स्वमन पाजी ।
यास्तव तनुमनभावें ध्यावे दामोदराख्य आपाजी ॥६८ ब ॥

जे सुख मेळविती मुनि ड्गारुनि वदनि अइ जननि गंगे ।
ते निजसुख अवतरले बाबाजी वासिमातले नंगे[(६९)] ॥६९॥

शिरसग्रामीं झाले कोणी श्रीपांडुरंग बाबाजी[(७०)] ।
पांडुरंग भेटविती देउनि अति मधुरमंत्रमावा जी ॥७०॥

जे भगवज्जन त्यांच्या कैवल्यासाठि योग सुशिव रचे ।
तेवी निजजनपालक वंदु महाराज साधु सुशिवरचे[(७१)] ॥७१॥

सर्वरक्षिता तेंवी लक्ष्मणबाबा[(७२)] मलाहि पावा जी ।
भवत्कृपें मज नेवो पर्णुनि हरि वाजवूनि पावा जी ॥७२॥

सगुण वर्णिता झाला दशशतवदनहि मुका जबाबा जी ।
रामलक्ष्मणसम ते वंदू बंधू मुकाजि[(७३)] बाबाजी[(७४)] ॥७३॥

भिल्लिणि मागें फिरला म्हणती ज्यां विश्वनाथ बाबाजी ।

(य २ पू. ९)

माया तोडुनि मुक्तचि विरुळातिल विश्वनाथ बाबाजी[(७५)] ॥७४॥

ज्यांच्या करुणादृष्टीं जगतीं कोणी नुरेचि कुंगरा[१५] जी ।
ते सत्पुरुष वंदिले बाबा भावें अखंड झिंगराजी[१६(७६)] ॥७५॥

(१५ कुंगरा = दरिद्री * १६ - झींगराजीबोवा आकोला)

असते कवित्वबुद्धी कविनां श्रीगुरुगणेशदा साची ।
तत्सार्थकार्थ वर्णू कीर्ति श्रीगुरु गणेशदासाची[१७(७७)] ॥७६॥

(१७ - गणेशदास ब्राह्मणवाड्याचे)

कामादिक हि न मरती शत्रु बहु मारितांहि लोखंडे ।
ते दुर्जन वाराया झाले बाबाजि सिद्ध लोखंडे[(७८)] ॥७७॥

जिंकिति महारथींना त्यजुनि असूंची फिकीर भट बाबा ।
इन्द्रिय जिंकुनि शोभति अपवर्गपटीं फकीरभटबाबा[(७९)] ॥७८॥



तो एक धन्य जन्मुनि करि संसारासि वंचि बाबाजी ।
जो ध्यातो निजभावें खोलापुरगावि पंचिबाबाजी[(८०)] ॥७९॥

होते मानुनि चवथे मुनिचे अद्वैतभाव शिवचरण ।
झाले सगुण बघुनि परि प्रेमळ सज्जन सुभाव शिवचरण[(८१)] ॥८०॥

ज्यांनी विनवणि करिता म्हणती अक्षय सुखी निकालस[(८२)] हो ।
त्यांना संसृतिसिन्धौ पंक पिता येई तो न कां ऽ लस हो ॥८१॥

वाराणसीस येता साक्षात् गंगा गिरीहुनी पडली ।
गंगागिरी[(८३)] नामानें जणु कां गंगा गिरीवर चढली ॥८२॥

भगवंतमूर्ति वसती मोहप गावात जे तुकाराम[(८४)] ।
तत्पद वंदुनि भावें होइल भलताहि तो न कां राम ॥८३॥

अप्रत्यक्षहि असुनि ध्यावे जनिं पवनिचे सिताराम ।
मग आम्ही प्रत्यक्ष न कां ध्यावे पवनिचे सिताराम[(८५)] ॥८४॥

साध्वी पतिव्रता ती जी चाकर राजि नाथपायाची ।
तेवीं आशा भक्तां धमतरिकर राजिनाथ[(८६)] पायाची ॥८५॥

निजक विवेककुठारें इच्छिसि तोडूं जरि कुभवभुरुहा ।
तरि सादर वंदावे सु-वासुदेवानंद[(८७)] पदाम्बुरुहा ॥८६॥

रिद्धपुरांत जहाले स्वामी महाराज गुरु अयाचीत[(८८)] ।
निजजन करुणायोगें कैवल्याहि ओपिती अयाचीत ॥८७॥

(य २ पू. १०)

कलियुगिं विश्वास नसे कामिनि रतति भुजंग स्वामीसी ।
यास्तव सोडुनि संसृति करि लगट मना, भुजंगस्वामीसी[(८९)] ॥८८॥

मुकुन्दराजचि वाटे मुकुन्दराजाभिधेय[(९०)] अवतरले ।
मोहग्रामी असुनी नवल महामोहरूप भव तरले ॥८९॥

घोराड गावि बसले केजाजी[(९१)] श्री प्रति तुकाराम ।
तद्गुण महिमा होईल भवदवतप्ता प्रती काऽऽराम[१८] ॥९०॥

(* टीपः- आराम बगिचा)

याचकदुःख हराया मूर्ति असे प्रकट शैलनाथाची ।
देउनि अपवर्ग सुखी करिति अशी कीर्ति शीलनाथाची[(९२)] ॥९१॥

धुंडति विदेहवृत्ति पाळिति जे सर्वदासवत्सास ।
ते सद्गुरुनाथ[१९ (९३)] कसे उपेक्षितिल सर्वदास वत्सास ॥९२॥
(१९ खटे बाबा)
लौकिक विघ्ने वारी सर्वजनाची पहा गजानन[२० (९४)] हा ।
भवविघ्नेहि निवारीं सर्वजणा तापहा गजानन हा ॥९३॥ /जना?
(* शेगांवकर महाराज)
काय असे ही काया भवभयमय जड अपूर्ण अळस पुरी ।
यास्तव जाई भावें शंकरभटजीस[(९५)] शरण अळसपुरीं ॥९४॥
स्ात्सुखघन जाणुनि गोविंदप्रेमतीर्थि जे नहाले ।
डोकेबाबा[(९६)] कीर्तनि सगुण घनश्याम पाळणा हाले ॥९५॥
गुरु आज्ञे जेवविले ब्राह्मण साधूनि कर्मसन्यास ।
गौमुखि स्वामी[(९७)] पावन करतिल कसे न अन्यास ॥९६॥
ज्ञानदीप जरि चित्ता षडरिछंदि तव अखण्ड मंदावे ।
ग्वाल्लेर ग्रामीं तरि गणपतिबाबापदास[(९८)] वंदावे ॥९७॥
देवीमहाराज[(९९)] ते आले साधूनि पूर्व अभ्यास ।
त्ारणाम्बुज सेवक होईल ना मान्य काय सभ्यास ॥९८॥
दत्तात्रयदर्शनें हरविति जे देहभाव-जनि-मरणां ।
वन्दन समर्पिते मी त्या श्री नाटेकरांचिया[(१००)] चरणां ॥९९॥
[१३]कोष्टी बाबा[(१०१)] साधू भजने सोडोनि देहभावास ।
अक्षय करिती वाटे नारायण चरण पंकजी वास ॥१००॥
(२१. नेरी येथील देवनाथ साधु)

(य २ उ. ११)

आपाजीसम[२२] हरिला आळविती वाचुनि हि भागवत ।
गुरुदत्त विष्णु पदवी वणिचे आपाजि[(१०२) २३] वंदु भागवत ॥१०१॥
(२२. आर्वीच्या आपाजी महाराजाप्रमाणे २३. श्रीनिवास आप्पावणी)
धननन्दन सुख सोडुनि वाणी वाहोनि जयसितारामी ।
नाचूं अक्षय ठेवुनि चन्द्रपुरी चित्त जय सितारामीं[(१०३)] ॥१०२ ॥
चिन्ताग्निदाहशान्ती झाली केव्हांहि अम्बुना नाही ।
ती झाली सहजचि परि नमिता जननीसहाम्बुनानाही[(१०४) २४] ॥१०३ ॥
(२४. अंबुनाथनाना अमरावती)



मोरशिगावीं असती कोणी सत्पुरुष रामजीबावा[(१०५)] ।
नमिते प्रेमें चरणा न्यावे संसारसिन्धुपरगावा ॥१०४॥
आळंदीस देखिले बाबा उपनांव जाहगिरदार[(१०६)] ।
सोडुनि संसृति आशा जे जीवन्मुक्ति जाहगिरदार ॥१०५॥
इच्छिसि अखण्ड चित्ता पूर्णचि परमात्मशांतित रमावे ।
तरि गुरु मोतीाबाबा[(१०७) २५] चरण सलिलरुहयुगल प्रणमावे ॥१०६॥
(२५ मोतीबाबा जामदार नागपूर)
मुनिजन अज्ञातहि जे त्यांच्या पदपंकजां नमस्कार ।
संत अनंत तथापि प्रशंसिले ज्ञानबुद्धि अनुसार ॥१०७॥
सद्वैजयन्तिमेरु संतशिरोमणि आळंदिपति सविता[(१०८)] ।
तदुदय निरखुनि हृदयीं चरणी प्रेमे समर्पिते कविता ॥१०८॥
''हरिः ॐ तत्सच्छ्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादरूपिणी गीतिछंदबद्धा
सद्वैजयंती संपूर्णा ॥ (य२पू१२)
॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

- - - - - - - - - - -

सद्वैजयन्तीमध्ये आलेल्या नावांची अकारादि विल्हे

# अनुक्रमणिका


| | नांवे | आर्यांक |
|---|---|---|
| (अ) | १ अक्कलकोट स्वामी | ५५ |
| | २ अब्दुल्लामिया | ४४ |
| | ३ अयाचित महाराज (रितपूरकर) | ८७ |
| | ४ अरब | ४० |
| | ५ अलोने बाबा | ३२ |
| | ६ अल्लीमिया | ४१ |
| (आ) | ७ आडकुजी बोवा | २५ |
| | ८ आडकोबा महाराज (पिंपळगाव) | ३५ |
| | ९ आप्पाजीमहाराज आर्वी | ६८ |
| | १० आबाजी घोंगडे | १३ |

| | | |
|---|---|---|
| | ११ अम्बाबाई | ६१ |
| | १२ अम्बुजीनाथ | २८ |
| | १३ अम्बुनाना उमरावती | १०३ |
| (इ) | १४ उदासीबोवा चिखलीकर | ५८ |
| (क) | १५ कमलाकर नाना | ५२ |
| | १६ कादरभाई | ४५ |
| | १७ केजाजी महाराज | ९० |
| | १८ केशवभट्ट | २६ |
| | १९ कोलबा बोवा धापेवाडा | १७ |
| | २० कंचनगिरि महाराज | ३४ |
| (ख) | २१ खटे बोवा | ९२ |
| (ग) | २२ गणपति बाबा ग्वाल्हेर | ९७ |
| | २३ गणेशदास ब्राह्मणवाडा | ७६ |
| | २४ गोविंदस्वामी | १० |
| | २५ गौमुखी स्वामी | ९६ |
| | २६ गंगागिरी महाराज | ८२ |
| | २७ गंगुकाका | ६ |
| (च) | २८ चिन्मयानंद | ५३ |
| (ज) | २९ जय सिताराम | १०२ |
| | ३० जहागिरदार बाबा | १०५ |
| (झ) | ३१ झगाजी महाराज | २२ |
| | ३२ झिंगराजी बाबा अकोला | ७५ |
| (ड) | ३३ डोके महाराज | ९५ |
| (त) | ३४ ताजुद्दिन महाराज | ४८ |
| | ३५ तापेभारती महाराज | ५७ |
| | ३६ तुकाराम बोवा मोहपे | ८३ |
| | ३७ तुकाराम बोवा येळ्हे | ५४(य २ पू १३) |
| | ३८ तेलीबोवा | १८ |
| | ३९ तेलंगस्वामी | ३६ |





| | | |
|---|---|---|
| | ४० त्र्यंबक स्वामी | ९ |
| (द) | ४१ दामोदर आप्पाजी | ६८ |
| | ४२ दासोबाबा | ११ |
| | ४३ देवजीबोवागुरु साहेब मलाचपुर | ६३ |
| | ४४ देवनाथ कोष्टी नेरी | १०० |
| | ४५ देवी महाराज | ९८ |
| | ४६ द्रविडस्वामी | १५ |
| (ध) | ४७ धर्माभट चांदेकर | २१ |
| (न) | ४८ नगाजी दादा पारडी | १२ |
| | ४९ नवलाजी बोवा | ५१ |
| | ५० नाटेकर महाराज | ९९ |
| | ५१ नानाजी शिरखेडकर | ६४ |
| | ५२ नानासाहेब पातुरकर | २० |
| | ५३ निकालस महाराज | ८१ |
| | ५४ नंगेबोवा वाशीम | ६९ |
| | ५५ नृसिंह सरस्वती | ४ |
| (प) | ५६ पापामीया | ४७ |
| | ५७ पारिसदोहावरील बाबाजी महाराज | ५९ |
| | ५८ पंचीबोवा खोलापुर | ७९ |
| | ५९ पांडुरंगबोवा शिरसगांव | ७० |
| (फ) | ६० फकीरभट महाराज यावली | ७८ |
| (ब) | ६१ बनबावा महाराज | ३० |
| | ६२ बाबाजी | ७३ |
| | ६३ बेंडूजी बोवा | २७ |
| | ६४ ब्रह्मचारीबोवा रेवशाचे | ६७ |
| (म) | ६५ माणिक प्रभु | ३८ |
| | ६६ मानगिरि बोवा | ३३ |
| | ६७ मायबाई आर्वीच्या | ६२ |
| | ६८ मारकीनाथ महाराज | २३ |

# ३

# बाराखडी

अ आ आर्जवाला न सोडीजे ॥
क का काम क्रोध टाकून दीजे ॥
ख खा खोटे भाषण न करीजे ॥
ग गा गाई ब्राह्मणां सेवीजे ॥
घ घा घर कोणाच न घेईजे ॥
च चा चोरी चपाटी सोडून दीजे ॥
छ छा छाया रस्त्यावरते कीजे ॥
ज जा जातां येतां ओळख कीजे ॥
झ झा झट कोणावर न घेईजे ॥
ट टा टाणा टोणा टाकून दीजे ॥
ठ ठा ठामक ठूमक न राहीजे ॥
ड डा डाव कोणासी न करीजे ॥
ढ ढा ढोंग ढांग सोडून दीजे ॥
त ता तापडपणा सोडून दीजे ॥
थ था थापड कोणा न मारीजे ॥
द दा दाळ भाकर भक्षीजे ॥
ध धा धन कोणाला न मागीजे ॥
न ना नारायण की सेवा कीजे ॥
प पा पाप पुण्य ओळखीजे ॥
फ फा फणफण कदापी न कीजे ॥
ब बा बोल गोड असू दीजे ॥
भ भा भेदभाव टाकून दीजे ॥
म मा माय बाप की सेवा कीजे ॥
य या यमपुरीला चुकवून दीजे ॥
र रा रामकृष्णातें गाईजे ॥
ल ला लहानपणा न सोडिजे ॥
व वा वडिलांना मान दीजे ॥
श शा शम दम न सोडीजे ॥
स सा संध्या प्रातःकाळीं कीजे ॥
ह हा हठ करणे सोडून दीजे ॥
क्ष क्षा क्षांती चित्तीं असूं दीजे ॥
ज्ञ ज्ञा ज्ञानेश्वर पद वंदीजे ॥

(य २ पू १६)




| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ६९ | मियासाहेब | ४३ | |
| | ७० | मिरनभाई | ४६ | |
| | ७१ | मुकाजी बोवा | ७३ | |
| | ७२ | मुकुन्दराज मोहगांव | ८९ | |
| | ७३ | मोतीबाबा जामदार | १०६ | |
| (य) | ७४ | यशवंतराव महाराज | ५६ | |
| (र) | ७५ | रघुनाथदास कपिलधारा | ५ | |
| | ७६ | रतिराम महाराज | ६० | |
| | ७७ | राजिनाथ महाराज धमतरी | ८५ | |
| | ७८ | रामकृष्ण परमहंस | ७ | |
| | ७९ | रामकृष्णनाथ सुरजी | ३७ | |
| | ८० | रामचन्द्रबोवा | ४९ | |
| | ८१ | रामजी बोवा | १०४ | |
| | ८२ | रुद्रनाथ भारती | २४ | |
| (ल) | ८३ | लहरी बोवा | १९ | (य२पू.१४) |
| | ८४ | लक्ष्मण बोवा | ७२ | |
| | ८५ | लोखंडे बोवा | ७७ | |
| (व) | ८६ | वासुदेवानन्द सरस्वती | ८६ | |
| | ८७ | विवेकानन्द स्वामी | ८ | |
| | ८८ | विश्वनाथबाबा वेरूळ | ७४ | |
| | ८९ | व्यंकम्मा | ३९ | |
| (श) | ९० | शीलनाथ महाराज | ९१ | |
| | ९१ | शिवलाजी बोवा | २९ | |
| | ९२ | शिवचरण महाराज | ८० | |
| | ९३ | शेखबाबू | ५० | |
| | ९४ | शंकरभट महाराज (अळसपुर) | ९४ | |
| | ९५ | श्रीनिवास आप्पा वणी | १०१ | |
| (स) | ९६ | सिंगाजी महाराज | १६ | |
| | ९७ | सिताराम बोवा | ३१ | |

| | | |
|---|---|---|
| ९८ सिताराम बोवा पवनी | ८४ | |
| ९९ सिंदाजी बोवा पाथटकर | ६५ | |
| १०० सुसीवरचे महाराज | ७१ | |
| १०१ सेगावकर गजानन महाराज | ९३ | |
| १०२ सोमेश्वर महाराज | १४ | |
| १०३ हयबतराव बाबा | ३ | |
| १०४ हंसगिरि महाराज | ६६ | |
| १०८ ज्ञानेश्वरमहाराज आळंदीश्वर | | (य२पू.१५) |


०००

## ४

# चित्तोपदेश

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**॥ अथ चित्तोपदेशः प्रारभ्यते ॥**

नमो देवदेवा कृपाळा गणेशा । नमो शारदा माउली ज्ञानदेशा ।
नमो सद्गुरु ब्रह्मरुपा ऽविनाशा । नमः (१) शंभू विष्णू रमोमानिवासा ॥१॥

*(पाठभेद - (१) नमः सद्गुरु सज्जनानंतवेशा ॥)*

मना सर्वदा शंकराते भजावे । मना सर्वदा कृष्णपाया पुजावे ।
मना सर्वदा सद्‌गुरु आठवावा । मना अंतरी देव तो साठवावा ॥२॥
मना स्नान ते जाह्नवी जीवनाचे । सदा सर्वदा सत्पदीं जीव नाचे ।
मना कृष्णिं घे जोडूनी जाइ नाते । अशावांचुनी संसृती जाइना ते ॥३॥
मना विश्व हे सौख्य दुःखान्त आहे । असे जाणुनी अंतरी शांत राहे ।
मना मानुषी ही तनू दो दिसाची । म्हणूनी हरीची स्मरे मूर्ति साची ॥४॥
सुधा ती नव्हे लाळ तूं जाण बापा । न कां जाणसी मूत्रपात्रप्रतापा ।
धनाच्या मुळे जीव गेले किती रे । मना यास्तव स्थान घे गांगतीरे ॥५॥
मना सर्वदा भोग ते रोग होती । मना सज्जना योगही दुःख देती ।
मना अंति रे नाहि कोणी कुणाचे । म्हणूनी प्रभूसी करी सख्य साचे ॥६॥
मना या भवीं कष्ट घेता अनंत । परी भोग ते भेटती नाशिवंत ।



मना सज्जना काम दैवे भरावा । मना धर्म तो मात्र यत्ने करावा ॥७॥
मना कृष्णनामीं जरि वाणि रंगे । चुकेना तरी कृष्ण होणे निजांगे ।
सख्या सोडूनी कामिनीमद् धनासी । हरी चिंतनीं ध्यास लावी मनासी ॥८॥
जिने वागविले तुला गर्भि पोटीं । तुझ्यासाठीं सोसूनिया दुःख कोटी ।
जिने चिंतिले सर्व कल्याण तुझे । नमोनी तिचे पाय तूं वारि ओझे ॥९॥
तुझेची तुला जोवरी हे कळेना । अहंता मना दैहिकीं जो गळेना ।
सख्या तोंवरी धर्म टाकूं नको रे । प्रतीतीविणें मुक्तिचे बोल कोरे ॥१०॥
मना सज्जना शुद्धकर्मे करावी । मना अंतरी काळभीती धरावी ।
मना दुःख जाणोनी हो सावधान । यथाशक्ति दे याचकालागिं दान ॥११॥

(य २ पू.१७)

मना अंतरी ओळखुनी चिदंबा । नको भेद पाहूं कदा विष्णु-सांबा ।
मना इंद्रियें लावूनी कृष्णपायी । त्यजोनी अहंता त्वरें मुक्त होई ॥१२॥
जरी भेटती ना घरीं मुष्टि दाणे । तरी सोडिती कामिनी आणि तान्हे ।
सुखें बोलती ना न देती सुपाणी । म्हणूनी गड्या आठवी चक्रपाणी ॥१३॥
जिवापाड जे बा तुझे कष्ट घेती । तुला अंति ते एकटे पाठविती ।
मना हा तुला कां कळेना दगा रे । सदा संतसंगे उमानाथ गा रे ॥१४॥
कसा बोलसी कामनींना सुवाणी । मना रे कसा सोडिला चक्रपाणी ।
न ते ऐकसी सांगती संत वाणी । परंतु पुढे जीविता काळ वाणी ॥१५॥
पती माय मामा सखे गोत्रबंधु । तुझ्या देखतां आटले शक्तिसिंधू ।
अझूनी कसा झोप घेसी गबाळा । उठे आठवी अंतरी नंदबाळा ॥१६॥
समाधान तेथे मना सौख्यठेवा । समाधानियांचा सुरांनाहि हेवा ।
समाधान साधू भवी किंतु घेती । शिवा मेळवाया प्रयत्नीच होती ॥१७॥
शुका पंजरी भक्षिसी अन्नपाणी । परांसाठी तूं बोलसी गोड वाणी ।
स्वतंत्रा तुझी जाति पाहोनि कष्टी । कसा तुष्टसी खाउनी डाळ उष्टी॥१८॥
तुला कान हे दीधले वासुदेवे । हरीचे तुवां गुण ते आयकावे ।
तुझी जीभ ही जाणते सौरसातें । पियावे तिने नाम सत्सौरसातें ॥१९॥
मना देव तो दूर कोठेंचि नाही । तुझा मीपणा टाकुनी त्यास पाही ।
तुझ्या अंतरी जे तुला जाणताहे । मना तेचि प्रत्यक्ष रे ब्रह्म पाहे ॥२०॥

बहुत विषय जाती जाणसी तूं मना रे ।
तुजसह विषयांतें जाणणें ज्या पुन्हा रे ।
परमसुखद विष्णू तोचि तो ओळखावा ।
नमुनि गुरुपदाते चित्सुधागोळ खावा ॥२१॥
मना सज्जना संतसेवा करावी । मना पाउले सद्‌गुरूची धरावी ।
मना अंतरी शांतता पीकवावी । मना भक्ति लोकांस रे शिकवावी ॥२२॥
मना सर्वदा नीति पाळीत जावी । मना सर्वथा कुबुद्धी त्यजावी ।
मना काम क्रोधा नको देउं ठाव । धरी या जगीं सर्वदा साम्य भाव ॥२३॥
मना सांडुनी दुर्जनांचा कुसंग । मुखे गा सदा सर्वदा पांडुरंग ।
मना लोभ तो जाण बा मूळ पापा । सख्या ओळखे विष्णुनाम प्रतापा ॥२४॥
बहु भोजनाची नको प्रीति मोठी । भुके पुरती खाइजे डाळरोटी ।
(य२पू.१८)
विरक्तीपुढे स्वर्ग तो तुच्छ मानी । सदां तूं रमे वेदबुद्धि प्रमाणी ॥२५॥
मना निश्चयाने मिळे सर्व कांही । मना निश्चय स्थापिजे विष्णुपायी ।
मना जें दिसे जाण तें सर्व खोटे । गुरूच्या पदा जाउनी शीघ्र भेटे ॥२६॥
सख्या ब्रह्म रे तूं मूळींचा अहासी । अविद्यागुणीं तूं दरिद्रा बहासी ।
हरिभक्तीने मेळवी सद्‌गुरूते । गुरूची कृपा ब्रह्म ते दाखविते ॥२७॥
तुला बोध व्हाया श्रुती शास्त्र सारे । तुला बोध व्हाया पुराणेही बारे ।
तुला बोधिती सर्वदा संत वाणी । तिथे चित्त ठेवी समाधान मानी ॥२८॥
मना या जनीं राहणे जों तुला रे । तरी बोधुनी भक्ति होई भला रे ।
दरिद्री धनी सारिखे सर्व मानी । भजोनी असत्या नको होउं मानी ॥२९॥
मठाची नको रे उठाठेव काही । विरक्ति न तों मंदिरामाजिं राही ।
घरी राहुनी आठवी पांडुरंगा । यती होउनी इच्छिजेना स्त्रिसंगा ॥३०॥
पळू जेवढा विष्णुवांचोनि जातो । मना काळही तेवढा तुष्ट होतो ।
नको वासना गुंतवूं नाशिवंती । यमाच्या घरीं पावशी अग्नि खंती ॥३१॥
मना जोंवरी इंद्रियांमाजी शक्ति । गड्या चित्तिं जों नाहि संसारसक्ति ।
जराग्रस्त जो जाहली नाहि काया । सख्या तों भजे कृष्ण सांडूनि माया ॥३२॥
भले द्रव्य तों बोलणे सर्व लोकां । पुसे ना कुणी पावल्या कर्मशोका ।



कुटुंबार्थ तूं पापकर्मे करीशी । यमाच्या घरी एकला रे भरीशी ॥३३॥
मना सोडुनी सर्व संसार धंदा । सदा आवडीने भजावे मुकुंदा ।
गुरुपाउला देउनी प्रेमदान । असावे पुरे अंतरी सावधान ॥३४॥
मना काम तो राम पाया नमाया । मना क्रोध तो इंद्रियांतें दमाया ।
मना लोभ तो ब्रह्मरूपी रमाया । * मना ज्ञानखड्गे निवाराविं माया ॥३५॥
*(* पाठभेद :- मना ज्ञानखड्गे निवारी स्वमाया ।।)*
मना बाहेरी मित्र विश्वा करावे । मना अंतरी मित्र वैरी नसावे ।
असावी दया दीन दुःखी जनांची । सदा आवडी विष्णुच्या पूजनाची ॥३६॥
मना देहसंगे हरेर्दास्य कीजे । मना जीवसंगे उमारस्तन्य पीजे ।
स्वये होई तूं शंकर स्वात्मयोगे । नको घाबरूं वैभवाच्या वियोगे ॥३७॥
मना सर्वथा सत्य सांडूं नकोरे । मना सर्वथाऽसत्य मांडूं नकोरे ।
मना आवडी ध्याइजे नित्य रामा । मना मंडुकी टाकुनी देइ रामा ॥३८॥
(य २ पू.१९)
मना त्वां मुनी चाळवीले किती रे । मना घेतले जन्म नाहीं मिती रे ।
अझोनी तरी सोडि या सर्व खोडी । यमाच्या घरी तूं नको घेउं बेडी ॥३९॥
भला होइ सांडूनि दुष्कर्म सारे । नको वित्तपुत्रार्थ होऊं पिसा रे ।
मना मृत्यु तोडिल रे त्वत्पिसारे । अझूनी गड्या नेणसी तूं कसा रे ॥४०॥
मना विश्व हे बांधले कर्मसूत्री । सुखी दुःखी तूं पाहतोसी स्वनेत्री ।
सख्या जोवरी देहबुद्धी सुटेना । तरी घोर हा कर्मबंधु तुटेना ॥४१॥
यदा माधवाची कृपा पूर्ण होते । तदा सद्‌गुरु भेटती ज्ञानदाते ।
हरीप्रेम सांडूनि, बोधार्थ कष्टी । मना होति ते पावती नात्मतुष्टी ॥४२॥
भवाच्या भयें धावतां भक्तिसाठी । मना संत येऊनियां देति भेटी ।
यदा संत संगे मिळे सन्मती रे । उमाकांत दे तेधवां सद्‌गती रे ॥४३॥
मना दुष्टसंगेचि वागूं नको रे । मना अन्न ते गोड मागूं नको रे ।
मिळे त्यांत अत्यंत संतुष्ट राहे । यशोदासुता सर्वदा चित्ति बाहे ॥४४॥
मना दृश्य तें सर्व साधी अविद्या । मना सोडि हे मेळवूनी सुविद्या ।
सख्या जाणुनि अंतरी ब्रह्मरूपा । जना दाखवी भक्तीचा मार्ग सोपा ॥४५॥
मना काम तो सांडि सर्वस्व आधी । मना सोडिरे पुत्रदारा उपाधि ।

मना वंदुनी सद्गुरु संग साधी । मना आत्मरूपी जडावी समाधी ॥४६॥
मना ब्रह्म ते एक तूं सत्य पाहे । मना द्वैत तें सर्वही मिथ्य आहे ।
मना ज्ञानदेवाप्रती शीघ्र बाहे । मना साधुनी जीवब्रह्मैक्य राहे ॥४७॥
सख्या आठवूनी मनी पूतनारी । त्वरे वीसरे दैहिकी पुंसनारी ।
दिसे ते अधिष्ठानिं लोपोनि बापा । जना तारुनी वारिजे पुण्यपापा ॥४८॥
विवेके सख्या होइ तूं देहभिन्न । विरागे करी भोग ते सर्व छिन्न ।
मुमुक्षेमुळे तीव्र साधूनी संधी । कदापी पुढे ना पडे देहबंधी ॥४९॥
मना जोंवरी होइना भोग वाणी । तरी बोलुनी काय वेदांत वाणी ।
गड्या मीपणा देहिंचा जो गळेना । परब्रह्म तें तो कदापी कळेना ॥५०॥
कुठे काय आहे कुणी काय नेले ? तुझे वित्त तारुण्य हे यांत गेले ।
अझूनी तुला श्रीहरी बाहवेना । यमाचा पुढे दंड तो साहवेना ॥५१॥
मना इच्छिसी साधुपासोनी माना । मना साहसी कां स्त्रियांच्या ऽवमाना ।
मना देसिना धर्म तो मुष्टि दाणे । पुढे अग्निकुंडीं तुझी रे ऽ वदाने ॥५२॥
(य २ पू.२०)
मना कृष्णदास्या तनू ही झिजावी । मति प्रेमरंगी हरीच्या भिजावी ।
भवाची नसावी सख्या भीति कांही । नुपेक्षी कदा कृष्ण राधार्धदेही ॥५३॥
गुणातीतता जाणली आत्मयाची । सगुणी परी आवडी पूर्ण ज्याची ।
कदा नाठवी अंतरी दारमाचा । मना धन्य तो दास विश्वोत्तमाचा ॥५४॥
मना खेळतां बाल्य ते सर्व गेले । मना यौवना योषितांनीच नेले ।
जरा ती पुढे दूति जाणे यमाची । कदा भेटि घेशील पुंसोत्तमाची ॥५५॥
मना वित्तयोगे सदा साधु सेवी । मना चित्त ते कृष्णपादाब्जिं ठेवी ।
मना बह्म जाणे गुरूच्या कृपेने । मना आत्मरूपी करी नित्य पेणे ॥५६॥
मना कर्म निष्काम दे चित्तशुद्धि । मना विष्णुभक्ति करी स्थिर बुद्धि ।
मना मुक्तिचा दायकू पूर्ण बोध । परंतु तिथेही हरिप्रेममोद ॥५७॥
मना तर्क योगे विकल्पू गळेना । मना शास्त्र-याथार्थ्य तेंही कळेना ।
म्हणोनी स्वनेत्रा मिटोनी सवेगे । भले चालती त्या पथे जाय वेगे ॥५८॥
मना कर्म ते काक होऊनी येती । तिथे साम्यता सज्जनांची प्रतीती ।
सदा अंतरी रक्षिती रामनामा । कदा नेच्छिती द्योतना कामवामा ॥५९॥
(काक = क + अक / क=सुख, अक=दु:ख)



मना अंतरी जों न वैराग्यठेवा । तरी मंदिरीं वासुदेव स्मरावा ।
भले लोक ते संगतीचे करावे । नको दुष्टसंगू जिथें धी दुरावे ॥६०॥
मना वाउगी चाउटी ते नकोरे । मना अंतरी व्यर्थ चिंता नकोरे ।
नको कांचनीं कामिनीं चित्त देऊं । सदा चिंतिजे रोहणीपुत्रभाऊ ॥६१॥
सदा सर्वदा देव कारुण्य झोकी । यमापासुनी सोडवी अंति जो की ।
जयाच्या कृपे योगियां मुक्तिठेवा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥६२॥
नको इच्छुं बा खेचरी भूचरी ते । नको रे मना पालखी बा करी ते ।
सदा रक्षि जो वारूनी दास गोवा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥६३॥
उठूनी बरा गात जा केशवाते । कदापि नको मी म्हणू या शवाते ।
विवेके हरी जाणुनिया भजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥६४॥
मना 'बह्म मी' या परी वृत्ति व्हावी । गुणातीतता आपली आठवावी ।
अनन्येपरी व्यक्त विष्णू भजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥६५॥
मना साधतो योग हा आघवाची । मना चिंतिता पाउले राघवाची ।
जनाच्या भये देह तो न त्यजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥६६॥
(य २ पू.२१)
मना कामनेने सदा राम व्हावे । मना बोलणे सर्वदा नम्र व्हावे ।
मुखे सज्जनांच्या सुधाज्ञान पीजे । मना सर्वदा माधवी वस्ती कीजे ॥६७॥
दुराशा नको पातके वांचण्याची । नको कामना स्त्री गृहीं नाचण्याची *।
जनी निंद्य ते सर्व सोडूनी दीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥६८॥
(* पाठांतर = नको कामना कामिनी नाचण्याची)
मनारे कुडे सांडुनी सर्व कावे । भले सांगती त्या रिती आयकावे ।
दयेने मना दीनता नीववीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥६९॥
मना सर्वथा नीति सांडू नको रे । जनी दावी ना भक्तिचे ढोंग कोरे ।
वरिष्ठां सतां आवडी मान दीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥७०॥
मना वाटते एधवां पा सोपे । पुढे कांपसी तूं यमाच्या प्रकोपे ।
अनूतापयोगे गुरु आठवीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥७१॥
नको दोष पाहू कदा या जनाचे । सख्या दोष पाहूनि सांडि मनाचे ।
मना संतसंगेचि काल क्रमावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥७२॥

धनाला तुझ्या लूटती लेकबाळी । तुझे साजिरे रूप ते अग्नि जाळी ।
मना सज्जना गर्व याचा त्यजावा । प्रभाते घनश्याम चिंतीत जावा ॥७३॥
जनी साधने दुष्ट, संकष्ट येती । बहूं देवता तत्फळे क्षुद्र देती ।
तयां टाकुनी चक्रपाणी पुजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥७४॥
मना निर्गुणी ध्यान तेही जडेना । सगूणप्रभू प्रेम तो आवडेना ।
अशी हानि दो पक्षिंही ना करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥७५॥
मना खाटिकी * देह जो दूषिलाहे । अरण्यी तदा राहुनी सौख्य लाहे ।
पराधीनता * सागरी नाप्लवीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७६॥
(* खाटिकी = काम क्रोध इ. ६ शत्रूंनी. / (खाट = पलंग ?) / अरण्यी = वनात.
पराधीनता = इंद्रियाधीनता, इंद्रियलोलुपता./ इंद्रियाणि पराण्याहुः)
पराधीनता वाढवी पापकोटी । पराधीनता ती बळे दुःखिं लोटी ।
पराधीनतेच्या विखे ना मरीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७७॥
विरक्ती स्वये शिकवावी मनाते । विरक्ती नसे त्या गृहस्था जनाते ।
पराधीनतोच्छेदका * दाखवावे । परंतु हरी चिंतने शिकवावे ॥७८॥
(* पराधीनतोच्छेदका = पराधीनपणाचा जो उच्छेद, त्यापासून झालेल्या सुखाला)

(य २ पू.२२)

पराधीनता तेचि वाईट घाणी । पराधीनतेला भले कोण मानी ।
कदा इंद्रियां आवडे ते न दीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७९॥
मना सज्जनी निंद्य ते शीघ्र सोडी । मना सज्जनी वंद्य ते सर्व जोडी ।
तदा अंगिं ये योग्यता सज्जनाची । जिने ये न पाळी भवीं मज्जनाची ॥८०॥
पुरे कां न वाटे तुला भोग अर्चा । पुरे वाटते कां तुला ज्ञानचर्चा ।
* मना काम संग्राम सांडूनि द्यावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८१॥
(पाठान्तर- *कुडा कामसंग्राम सांडूनि दीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ।।८१।।)
मना पूर्ण ते पुण्य अंगी भरेना । घडे पुण्य ते कामनेला पुरेना ।
मना रामनामी * विराम त्यजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८२॥
(पाठान्तर - नामि रामा ८२)
नको काम वा क्रोध वा लोभ गोवा । * मना आवडी आठवा आठवावा ।
मना घे परब्रह्मरूपी विसावा । *प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८३॥
(* पाठान्तर - जिभेला हरीपाठ तो पाठवावा ।८३)
प्रभाते उमाकांत चिंतीत जावा । जिभेने उमाकांत आधी वदावा ।
सदाचार हा थोरसा वाढवीजे । मना सर्वदोमाधवी वस्ति कीजे ॥८४॥



त्रिशूळे हरी शूळ भक्तोदरींचा । जया ध्यातसे कांतही इंदिरेचा ।
मना आदरे बिल्बपत्रे पुजावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥८५॥
अहंता धरी मानसा निर्गुणाची । करी क्षीणता देहिच्या मीपणाची ।
श्रुती सांगते त्या पथा आश्रयीजे । मना त्वां उमावल्लभीं वस्ति कीजे ॥८६॥
मना सर्वथा द्वेषिती जे शिवाते । परंतु बरे पूजिती माधवाते ।
तयाते मिळेना कदा विष्णुभक्ति । म्हणोनी भजाव्या सदा दोन्ही व्यक्ती ॥८७॥
तसे द्वेषिती इंदिरेच्या वराते । परंतु बरे पूजिती शंकराते ।
तयांना सदाशिव तो दुःखि पाडी । म्हणोनीच दोघांचिहि प्रीति जोडी ॥८८॥
हरी चिंतने सर्व कांही करावे । हरी चिंतने अन्न सेवीत जावे ।
गुरु आणि देवां समान स्मरीजे । मनारे उमावल्लभीं वस्ति कीजे ॥८९॥
सकाळी करूनी जळे शुद्ध गात्रे । स्वये आणुनी कोवळीं बिल्व पत्रे ।
तिहीं आवडी चंद्रमौळी पुजावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९०॥
मना देहसत्ये भजे आपणाते । मना रक्षिजे वाणिसत्ये जगाते ।

(य २ पू.२३)

मना चित्तसत्ये सुधाज्ञान पीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९१॥
मना सद्गुरूची न कां चाड व्हावी । कुडी वासना कासया वाढवावी ।
बुधे जाच केवी यमाचा सहावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९२॥
गुरुपाऊले नित्य घेतो उशाला । अशाला दुशाला मशाला कशाला ।
मनारे सदा संगही तोचि व्हावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९३॥
तुला दुःख ते ब्रह्मभिन्नाभिमाने । तुला जन्म मृत्यु सदा वासनेने ।
म्हणोनी स्थिती आपुली ओळखीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९४॥
मना तूं मूळीं शार्दूलापोटिं आला । परा संगतीने कसा श्वान झाला ।
वृथाध्यास हा सर्व सोडोनि दीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९५॥
दिसे डोळियांलागि ते जाण माया । त्वरें जा पदीं सद्‌गुरूच्या नमाया ।
गुरु सांगती मार्ग तो रे धरावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९६॥
जळो चित्त ते नोळखे ब्रह्म साचे । जळो ती तनू कीर्तनी जी न नाचे ।
जळो वित्त ते साधु सेवे न दीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९७॥
घरींचे भ्रमे द्रव्य जेवी मिळेना । मुळी चुकले ब्रह्म तेवी कळेना ।

महावाक्यलक्ष्ये अहंता हरीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९८॥
मना निर्गुणा ज्ञानयोगे भजावे । सगूणाप्रति ध्यानयोगे पुजावे ।
निराकार साकार एकत्व कीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९९॥
मना अंतरी साधुनी शंभुदीक्षा । सदा सर्वदा सेविजे ज्ञानभिक्षा ।
अखंडात्मतादात्म्य योगो घडावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥१००॥
नको कांही आशा करूं मंचकाची । करी झाडणी भूतसंपंचकाची ।
परब्रह्मयोगे जगा तोषवीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥१०१॥
कृपे पाळी तै श्रीगुरु लक्ष्मीराणा । भवा बाधि तै शंकरू तोचि जाणा ।
म्हणोनी गड्या तत्पदाब्जाश्रयीजे । मना ज्ञानदेवी सदा वस्ति कीजे ॥१०२॥
(य २ पू.२४)

* मना सोडि रे मानकी जीवनाची । धरीं आवडी जानकीजीवनाची ।
करी पान विद्या सिताजीवनाचे । सदा ठेवूनी कीर्तनी जीव नाचे ॥१०३॥
तुझे कल्पिले विश्व स्वप्नासमान । पुन्हा तूं तयाला कसा देसि मान ।
गुरूच्या कृपे जाणुनि ब्रह्म बोधा । सख्या रे निवारी त्वरे द्वैतबाधा ॥१०४॥
तुझा देह प्रत्यक्ष निर्जीव माती । तया मी असे मानिसी केवि चित्ती ?
त्यजोनी ममत्वा तुला त्वां भजावे । गुरूच्या कृपे शांतिसौख्यी निजावे ।१०५
जरी ब्रह्म संपन्न झालासी बापा । तरी तूं नको या करू भक्तिलोपा ।
जयाच्या कृपे जाणिली वेदवाणी । स्मरे तो सख्या सद्गुरु चक्रपाणी ॥१०६॥
(*१०३ ते १०६ हे पदाच्या गाथेतले श्लोक आहेत)

॥ हरि ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥
॥ चित्तोपदेशः समाप्तः ॥

०००

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**त्रिकांडसार**

# विषय दिग्दर्शन

ह्या पुस्तकात कर्म उपासना आणि ज्ञान या तिन्ही कांडांचा सार अभंगरूपाने थोडक्यात मार्मिक रीतीने आणला आहे. यात एकंदर २६ अभंग असून त्यातील विषय येणेप्रमाणे आहेत -

**अभंग १ -** पहिल्या अभंगात सद्गुरुनमनपूर्वक मंगल करून विषयाचा उपक्रम केला



आहे.

**अभंग २ -** सद्गुरु भेटण्याला एकप्रकारचा अधिकार आंगीं आणावा लागतो तो चित्तशुद्धीने येतो.

**अभंग ३ -** ब्रह्मज्ञान मनुष्यजन्मीच साध्य आहे म्हणून प्रत्येकाने आपले विहित कर्मानुष्ठान करून चित्ताचा मलदोष कसा घालवावा, हे सांगून 'सुखदुःख देणारा ईश्वर नाही तर प्रत्येकाचे कर्मच त्याला सुखदुःख देणारे आहे' हे सांगितले आहे.

**अभंग ४ ते ६ -** सृष्टिकार्याला बीजपर्जन्य न्यायाने 'ईश्वर साधारण कारण' असून 'कर्म हे असाधारण कारण' आहे, असे सांगून 'ईश्वरेच्छावादाचे' खंडन केले आहे.

**अभंग ७, ८ -** कर्मवादी (मीमांसक) आणि स्वभाववादी (नास्तिक) यांचे खंडन असून **'गणिताने ईश्वरसिद्धी'** केली आहे.

**अभंग ९ -** आपल्याच अनादि कर्माने जीव बद्ध झाल्यामुळे ते कर्मबीज ज्ञानाने जाळण्याचा क्रम, व जीव अल्पज्ञ असल्यामुळे कर्माकर्माचा निश्चय होण्याकरिता त्याने श्रुत्यैकशरणच झाले पाहिजे, व वेद ईश्वरप्रणीत असल्यामुळे जगाला मायबाप आणि गुरु वेदच आहेत हे सांगितले आहे. **(य२पू.२५)**

**अभंग १० -** वेदाच्या तिन्ही कांडांचे स्पष्टीकरण व अवान्तरवाक्ये आणि महावाक्ये यांची लक्षणे सांगितली आहेत.

**अभंग ११,१२ - कर्मकांड निरूपण**

**अभंग ११ -** सत्त्व वाढण्याकरिता धर्माचरण करावे. गुणकर्माप्रमाणे चार वर्णांची लक्षणे. **गुणकर्मवाद व जन्मवाद यांचा समन्वय.**

**अभंग १२ -** चारही वर्णांचे धर्म. स्त्रीपुत्रांचे धर्म.सत्त्ववृद्धीला आड येणाऱ्या धर्माचा निषेध.

**अभंग १३,१४ - उपासनाकांड निरूपण**

**अभंग १३ -** वैदिक उपासना कठिण असल्यामुळे साधुसंत पौराणिक उपासना सांगतात. मतभेद सोडून एकनिष्ठ उपासना करावी.

**अभंग १४ -** पतिव्रतेचा दृष्टान्त. **सद्गुरुजवळून सगुणोपासना घ्यावी**. स्थूळावरून हळु हळु सूक्ष्मावर मन न्यावे. **प्रणवोपासनेने निर्गुण ज्ञान** मिळवावे. उपासना ज्ञानाला निमित्त आहे.

**१५ ते २५ - ज्ञानकाण्ड निरूपण**

**अभंग १५ ते १८** साधनोपक्रम आणि १९ ते २५ उत्तरार्ध ज्ञानोपदेश.

**पूर्वार्ध अभंग १५ -** कर्म आणि उपासना हे कर्तृतंत्र असल्यामुळे संसारनिवृत्ती होत नाही. ज्ञानसाधनाचा उपक्रम. ज्ञानाला साधनचतुष्टय आणि दृढ विचार पाहिजे.

**चार प्रकारची साधने**

**अभंग १६ -** विवेकलक्षण- विषय नाशिवंत असून दुःख देणारे आहेत. विषय मनुष्याला सोडून गेले तरी मन सुखाचा उपाय शोधीतच असते. यावरून नित्यसुखाचे अनुमान.

**अभंग १७ -** वैराग्यलक्षण. इहामुत्र दुःख वर्णन. **(य२पू.२६)**

**अभंग १८-** शमादि षडंग वर्णन. (शम, दम, उपरम, तितिक्षा, श्रद्धा, समाधान, मुमुक्षा यांचे वर्णन.)

**अभंग १९ ते २५ - ज्ञानोपदेश**

**अभंग १९** – उपसर्पणादिकें करून सद्‌गुरुसेवन व परिप्रश्न यांचे स्वरूप.
**अभंग २०** – शिष्याला बोध- जीव आपल्याच अज्ञानाने बद्ध आहे म्हणून तो आपल्याच ज्ञानाने मुक्त झाला पाहिजे.
**अभंग २१**- शिष्यप्रश्न - ब्रह्माचे ठिकाणी अज्ञान कसे आले?
**अभंग २२**- उत्तर - सत्तानिरूपण व अनादि षट् पदार्थ.
**अभंग २३**- अविद्येच्या शक्ती, - आवरणाचे दोन भेद. त्यांची लक्षणे व निवृत्तीचा उपाय.
**अभंग २४-२५** – अवांतर वाक्यांनी परोक्षज्ञान व महावाक्याने अपरोक्ष ज्ञान. श्रवणादिकांचे लक्षण.
**अभंग २६**- उपसंहार. **(य२पू.२७)**

# ५

# ॥ त्रिकांडसार ॥

अथ त्रिकांडसारः प्रारभ्यते -

**॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

**अभंग १.**

**सर्व दाखविता सद्‌गुरु केवळ । सांपडे सकळ ब्रह्मसुख ॥१॥**
**परब्रह्मरूपी प्रभु रामराणा । वसिष्ठचरणां शिर लावी ॥२॥**
**परब्रह्म पूर्ण यशोदानंदन । गुरु संदीपन होय तया ॥३॥**
**ज्ञानेश्वरकन्या श्रीगुरुवांचोनी । कांहींच न मानी साधना ऽन्या ॥४॥**

**२.**

**परी तो सद्‌गुरु भेटावया आधीं । पाहिजे अवधी साधनांची ॥१॥**
**आधीं शुद्ध व्हावे आपुलें अंतर । जाऊनी विकार सर्व काहीं ॥२॥**
**पुढे चंचलता निवारण व्हावी । साधनें आणावी चारी जेव्हां ॥३॥**
**जाहलिया सिद्ध सामग्रीसंपन्न । सद्‌गुरु आपण तेव्हां भेटे ॥४॥**
**ज्ञानेश्वरकन्या केलियावांचोनी । फळप्राप्ती नाणी मनामाजीं ॥५॥**

**३.**

*कर्मकांड*

**चित्तशुद्धिसाठीं आचरावा धर्म । जयाचें जें कर्म विहीत कीं ॥१॥**
**निषिद्ध गाळावें विहित पाळावे । आवडी जाळावे पाप सर्व ॥२॥**



**पशुलागी नाही वाणींचा आवेश । ज्ञानाचा विशेष तेथ नोहे ॥३॥**
**मनुष्याचें ठायीं वाणी आणि बुद्धी । तेथ ज्ञानसिद्धि सहजची ॥४॥**
**ऐसा भेदभाव सृष्टींत दिसत । कारण निश्चित हेंचि त्याचे ॥५॥**
**ईश्वर निर्मिता सर्व जीवांलागी । भेदभाव अंगी असावा कां ॥६॥**
**परी ज्याचें कर्म तैसें देतो फळ । नव्हे घननीळ बद्ध यांत ॥७॥**
**म्हणोनिया जें जें दिसतें लोचनी । कर्मची निर्वाणी कारण त्या ॥८॥**
**समुद्र तो एक जीवनाचा जाणा । तरंग ते नाना उठताती ॥९॥**
**तयासी कारण वायु तो निराळा ।भेदभाव माळा उपाधीचा॥१०॥**

(य२पू.२८)

**एक माती घट नानाविध होती । कनकी दिसतीं अलंकार ॥११॥**
**तैसा नारायणीं नाहीं भेदभाव । फळें कर्मठेव ज्याची तया ॥१२॥**
**ज्ञानेश्वरकन्या सुखदुःखें देता । न देखें अनंता दोष कांही ॥१३॥**

**४.**

**कर्मांविण सृष्टी करी नारायण । ऐसेंही वचन बोलती जे ॥१॥**
**तयांचा ईश्वर विषम निर्दय । वेदाला ही सोय मान्य नाहीं ॥२॥**
**एकासी दरिद्री एका धनवंत । कां करी अनंत ऐसे सांगा ॥३॥**
**एकासी डोळस एकासी आंधळे । कां हें घननीळे ऐसें केलें ॥४॥**
**एक शिकुनिया राहे जैसा तैसा । एक विद्याठसा सिद्ध राहे ॥५॥**
**कां हा ऐसा भेद दिसे नारायणीं । उत्तर निर्वाणी कर्म याचें ॥६॥**
**ज्ञानेश्वरकन्या आपुलेंचि कर्म । सुख दुःख वर्म देखताहे ॥७॥**

**५.**

**घेती येथे कोणी यापरी संशय । कर्म तरी होय केलें कोणी ॥१॥**
**सर्वांहुनी आधी जो जन्म जहाला । कोणी हा लाविला बंध तेथे ॥२॥**
**म्हणोनी ईश्वर कर्ता करविता । आमुचिया चित्ता मानवलें ॥३॥**
**ऐसें म्हणोनिया वागती विरुद्ध । न मानती वेद शास्त्र कांहीं ॥४॥**
**ज्ञानेश्वरकन्या मोकळीयां मनें । मौन या वचनें करिती या ॥५॥**

६.

*चित्तशद्धिसाठी कर्मकांड*

सकळ कार्यासी कारणें तीं दोन । एक साधारण म्हणताती ॥१॥
असाधारण तें कारण दुसरे । सृष्टीसी निर्धारे दोन्ही ऐसे ॥२॥
सकळ झाडांसी पर्जन्य कारण । जैसा साधारण ओळखावा ॥३॥
परी ज्याचें बीज तैसें तया फळ । कारण केवळ दुसरे हें ॥४॥
ईश्वरही तैसा जाणा साधारण । विशेष कारण कर्मबंधू ॥५॥
बीजांतुनी वृक्ष वृक्षांतुनी बीज । कळेना सहज संबंध हा ॥६॥
तैसा जन्मकर्म संबंध अनादी । वृष्टीसम सिद्धी ईश्वराची ॥७॥
ज्ञानेश्वरकन्या निगम सिद्धांत । अकृत्रिम पंथ अंगीकारी ॥८॥

७.

येथ दुसरे ही बोलती वचन । ईश्वर कारण नाहीं नाहीं ॥१॥ (य२पू.२९)
जयाचें जें कर्म तेंचि फळदाते । मीमांसक मतें ऐसी आथी ॥२॥
परी हें बोलणें युक्तीस विरुद्ध । भगवंत वेद साहेना की ॥३॥
बीज जरी झालें तरी वृष्टीवीण । वृक्षभावापन्न केव्हां नोहे ॥४॥
तैसें जड कर्म गोविंदावांचोनी । नोहे फळदानी शक्तिमंत ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या मानी कर्मभाव । परी तेथ देव अधिष्ठान ॥६॥

८.

ऐसें पाहोनिया कोणी जे नास्तीक । मानती न एक किंवा दोन्ही ॥१॥
जें जें होते तें तें स्वभावाने सारे । कर्मे वा ईश्वरे केलें नाही ॥२॥
परी यांचे बोल बोलता निष्फळ । श्रद्धेने केवळ सांगणें हें ॥३॥
नास्तिक म्हणती आस्तिका विश्वासी । आपण तयासी सोडिती ना ॥४॥
विचार करुनी नास्तिक जाहला । ऐसा न देखिला आजवरी ॥५॥
विषयांची आशा न सुटे संसार । भलता आचार व्हावा वाटे ॥६॥
म्हणूनी केवळ म्हणती न देव । एरव्हीं न ठाव विचारांचा ॥७॥
तयासी पुसणें स्वभाव सृष्टींत । परि अपेक्षित गणित कीं ॥८॥
गणितावांचोनी स्वभावाकडोन । कार्य नोहे जाण कांही केल्या ॥९॥
जयाचें प्रमाण असेल जितुकें । मिळेल तितुकें जेव्हां कांही ॥१०॥



तेव्हांची होईल पदार्थ निर्माण । नोहे अप्रमाण कोणे वेळीं ॥११॥
गणित जाणाया बुद्धीची अपेक्षा । ऐसी ही परीक्षा व्याप्तिमूळ ॥१२॥
आतां अनुमानें पाहतां शोधोनी । सांपडे निर्वाणी सिद्धांत हा ॥१३॥
प्रमाणावांचोनी न होयचि कांही । प्रमाण ते पाही गणिताचे ॥१४॥
गणितास बुद्धि पाहिजे हे सिद्ध । सृष्टीस प्रसिद्ध तैसेची कीं ॥१५॥
येवढे जें जग निर्मिलें प्रमाणें । तेथे बुद्धि कोणें लावियेली ॥१६॥
सकळ जगाची बुद्धि ज्याच्या हाती । तोची हा श्रीपती कृष्णनाथू ॥१७॥
ज्ञानेश्वर कन्या कुमतें वारुनी । *निगमाभिमानी झाली आहे ॥१८॥ *वेदाभिमानी

९.

*वेद धर्म*

तात्पर्य आपुले कर्म जे अनादी । तें दे फळसिद्धी देवाधारे ॥१॥
भाजुनिया बीज टाकितांचिं क्षणीं । पडतांही पाणी वृक्ष नोहे ॥२॥
तैसें कर्मजाळ ज्ञानानें जाळिता । जन्म भगवन्ता देववेना ॥३॥ (य२पू.३०)
परी परतीरा जरी आहे जाणें । तरी आधी घेणें जलाश्रय ॥४॥
तैसे जाणें जरी कर्म परतीरीं । कर्माश्रय तरी आधी घ्यावा ॥५॥
शुद्ध कर्मे आधी वारावे अकर्म । ज्ञानाने सुकर्म जाळावे की ॥६॥
कर्माकर्म दोन्ही सांगताती वेद । जयांचा गोविंद वक्ता आहे ॥७॥
कोणतें तें कर्म कोणतें अकर्म । अल्पज्ञा हे वर्म कळेना कीं ॥८॥
सर्वज्ञ गोविंद तोचि जें सांगत । वेदवाणीस्थित जाहालें जें ॥९॥
तयाने करावा कर्माचा निर्णय । वेद बापमाय गुरु जगा ॥१०॥
ज्ञानेश्वरकन्या वेद वचनांचा । भरवंसा साचा चित्तीं मानी ॥११॥

१०.

मंत्र-ब्राह्मण हे मिळोनिया वेद । तैसेंची प्रसिद्ध पुराणें ही ॥१॥
दोन भाग त्याचे कर्म आणि ज्ञान । मध्य उपासन पूर्वभाग ॥२॥
जितुकीं वचनें यज्ञादिबोधक । कर्मकांड देख तितुकेंही ॥३॥
प्राण पंचवन्ही दहरादि ध्यान । तेचि उपासन द्वितीय की ॥४॥
'अयमात्माब्रह्मे'त्यादि महावाक्य । जीवब्रह्मऐक्य वचनें जी ॥५॥
तींचि ज्ञानकांडी समाविष्ट झाली । पुनः विभागिली दो प्रकारे ॥६॥

ब्रह्म आहे ऐसे जे वाक्य सांगती । तयाते म्हणती अवांतर ॥७॥
आपुले आणिक ईश्वराचे ऐक्य । तेंचि महावाक्य सांगताती ॥८॥
ऐसा हा सामान्य त्रिकांड विचार । विशेष विस्तर आयकावा ॥९॥
ज्ञानेश्वरकन्या निगमानुकूल । सुसाधनशील चित्त करी ॥१०॥

११.

आपुले विहित आपण करावें । दिसती स्वभावे दोष जरी ॥१॥
अग्नि पेटवितां धुमही उठत । म्हणोनी टाकत पाक कोणी ? ॥२॥
तैसें आचरीता आपुले सुकर्म । सदोष ते वर्म जरी वाटे ॥३॥
तरी पुढे धूमरूपीं दोष जातां । पापें धूमसत्ता कर्म जाळी ॥४॥
गुणकर्म भागें वर्ण झाले चार । सत्त्वशीळ विप्र म्हणावे कीं ॥५॥
सत्त्वरजमिश्र क्षत्रिय म्हणावे । वैश्य ते गणावे तमःसत्त्वें ॥६॥
रजस्तम दोन्ही मिळोनिया शूद्र । कदाही जे नार्द्र घोरकर्मी ॥७॥
जैसा ज्याचागुण तैसा त्याचा वर्ण । बोलिलें हे पूर्ण वासुदेवें ॥८॥(य२पू.३१)
गुणदार्ढ्यास्तव जन्मवाद झाला । समन्वय केला दोहींचाही ॥९॥
परी जन्मामुळे नये अधिकार । सद्‌गुणी अंतर केल्यावीण ॥१०॥
ज्ञानेश्वरकन्या म्हणे त्यांची कर्मे । वाटूनी निगमें दिलीं आथी ॥११॥

१२.

*ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र*

सत्त्वशील विप्रवर्ग पूर्ण शांत । तितिक्षोपरत समाधानी ॥१॥
विषयांपासोनी इंद्रिये काढावी । मग मुरडावी हृदयांत ॥२॥
तेव्हा विप्रपणा जोडे शरीराते । एरव्हीं तों होतें अहंकारु ॥३॥
विषयांच्या ऽ भावे व्यग्र नाही चित्त । म्हणोनी वेदार्थ कळे तया ॥४॥
एकाग्रतेविण न कळेचि शास्त्र । याचिसाठीं विप्र अध्यापक ॥५॥
आणीकही पांच कर्मे जी बोलिलीं । निवाराया केली पापमूळ ॥६॥
रजोगुणमिश्र म्हणोनी क्षत्रिय । दंभ मान होय चित्तीं ज्यांच्या ॥७॥
त्यांची देहासक्ति सुटल्या वांचून । नव्हे सत्त्वगुण शुद्ध प्राप्त ॥८॥
म्हणोनिया त्यांनी युद्धींच मरावे । जिवंत करावें दानादीक ॥९॥
वैश्यवर्णा सत्त्व म्हणोनिया शांती । मूढताही चित्तीं तमोगुणे ॥१०॥



म्हणोनिया तिहीं करावा व्यापार । सुपरोपकार आचरावा ॥११॥
शूद्रवर्ग नीच जरी तो गुणाने । तरी तया देणे सेवाकर्म ॥१२॥
उंच नीच होणें आपुलिया हातीं । जैसा भाव चित्तीं सत्यासत्य ॥१३॥
तैसा स्त्रियांलागीं धर्म पतिव्रत्य । पुत्रालागी सत्य पितृसेवा ॥१४॥
जननी जनक पायांचे सेवन । हाचि धर्म जाण बालकांचा ॥१५॥
परी याही माजीं एक ओळखावे । उत्तमचि घ्यावे अन्य नये ॥१६॥
धर्मे करोनिया अधर्मही जाय । त्याचा जेव्हा होय विपर्यास ॥१७॥
तोचि धर्म जरी तमोगुणीं घाली । तरी त्याचि कालीं त्यागावा की ॥१८॥
गुरु माय बाप बंधु पति देव । वाढवी ना सत्त्व तरी नको ॥१९॥
नव्हे ही माझिया पदरीची वाणी । बोलिली पुराणी भागवतीं ॥२०॥
ज्ञानेश्वर कन्या जें जें कांही मानी । उत्तमत्वा आणी तरीच कीं ॥२१॥

*

'गुरुर्न स स्यात् स्वजनो न स स्यात् पिता न स स्यात् जननी न सा स्यात् ।
दैवं (देवं) न तत्स्यान्न पतिश्च स स्यान्न मोचयेद्यः समुपेतमृत्युम्' ॥ (य२पू.३२)

१३.

*उपासनाकांड*

*भिन्न भिन्न उपासनांचा समन्वय*

ऐसें कर्मकांड जाहले संपूर्ण । आता उपासन रूप करूं ॥१॥
बहु उपासना वैदिक कठीण । पुराणे म्हणून सांगती ज्या ॥२॥
त्या अतिसुलभ चित्ता आकळती । साधूसंत घेती यास्तवचि ॥३॥
राम कृष्ण हरि गोविंद गोपाळ । शिव जाश्वनीळ पार्वतीश ॥४॥
शक्ति गणपती सूर्य वायू इंद्र । उपासना फार वाढल्याती ॥५॥
उपासनेवरी मतांतरें झालीं । भांडती आपुली व्यर्थची ते ॥६॥
सकळोपासना मूळ नारायण । वर्म हे नेणून मंदमती ॥७॥
कोणत्याही नांवे भजावा गोविंद । परमतीं भेद पाहूं नये ॥८॥
ज्ञानेश्वरकन्या दृष्टान्तेसी सांगे । जया जैसे योग्य तैसें कीजे ॥९॥

१४.

पतिव्रता जैसी आपुलाचि पती । धरुनिया चित्तीं दृढ सेवी ॥१॥

तैसें आपुलें जें इष्ट ते सेवावें । एक्या दृढभावे चित्ताचिया ॥२॥
साध्वी ती न द्वेषी दुसरीचा पती । करिना कीं चित्तीं इच्छा तीही ॥३॥
तैसी दुसऱ्याची भक्ति न मोडावी । कदा न सोडावी आपलीही ॥४॥
करावा जतन आपुला विश्वास । विरुद्ध तर्कास सोडोनिया ॥५॥
गुरुमुखे घ्यावे होवोनी सोवळे । सुंदर सांवळें परब्रह्म ॥६॥
लग्नामाजी जैसी अरुंधतीसाठी । पाहताती मोठी चांदणी कीं ॥७॥
अरुंधती तारा दिसलियावरी । सोडिती निर्धारी स्थूल तारा ॥८॥
शाखेवरी चंद्र आधी ओळखावा । शाखेचा करावा त्याग तेव्हां ॥९॥
तैसे आधी ब्रह्म सगुण पहावें । स्थूळीच करावें मन स्थिर ॥१०॥
हळुहळु पुढे स्थूळ ते सोडावे । हृदयीं जोडावें सूक्ष्मची कीं ॥११॥
अव्यक्त अनादि अदृश्य अखंड । चरण कर तोंड जया नाही ॥१२॥
व्यापक निर्गुण जवळ ना दुरी । बाहेरी अंतरी संकल्पावें ॥१३॥
भ्रमराच्या ध्यानें कीडा तोचि होय । तैसी शुद्ध सोय धरावी ही ॥१४॥
अणुहुनी अणू नभाहूनी मोठे । हे ना ते गोमटें ऐसें नाही ॥१५॥
प्रणवासहीत आधी तें चिंतावें । मग तेचि व्हावे ध्यानबळे ॥१६॥
येथवरी झाले उपासनाकांड । निमित्त अखंड ज्ञानासी जें ॥१७॥
ज्ञानकांड आतां ज्ञानेश्वरतात । कृपेने समस्त आयकावें ॥१८॥
(य२पू.३३)

**१५.**

*ज्ञानकांड*

कर्म-उपासना-कांडीं श्रद्धाबळ । न चले केवळ तैसें येथे ॥१॥
पाहिजे साधन चतुष्क संपत्ती । विचारही चित्तीं दृढ व्हावा ॥२॥
विचारावांचोनी ब्रह्मज्ञान नोहे । केलियाहि भावें साधनादी ॥३॥
बहु केले जरी कर्म उपासन । तरी सर्व जाण कर्तृतंत्र ॥४॥
कर्त्याची भावना जोंवरी त्या ठायी । तोंवरीच पाही प्राप्ति त्याची ॥५॥
निर्गुण सगुण तोंवरीच चित्ती । जंववरी वृत्ति स्थीर तेथे ॥६॥
तैसे नोहे ज्ञान होतां एके वेळीं । मग कदाकाळीं नष्ट नोहे ॥७॥
बीज कणगींत ठेविले घालून । पेरितांचि जाण उगवें तें ॥८॥



.कर्मोपासनेनें तैसें होय चित्त । सुटल्या भासत संसाराची ॥९॥
बीज भाजुनिया टाकतांचि क्षणीं । उद्भव न कोणी सांगे त्याचा ॥१०॥
तैसें ज्ञानें जेव्हा अविद्या ही जाय । उत्पत्ती न होय पुनः तिची ॥११॥
तेंचि ज्ञान पूर्ण मेळवायासाठीं । साधनें गोमटीं व्हावी चारी ॥१२॥
विवेक विराग शमादि षडंग । मुमुक्षुत्व चांग चवथें तें ॥१३॥
ज्ञानेश्वरकन्या त्यांची रूपें आतां । करी तेंचि चित्ता आणा वेगीं ॥१४॥

**१६.**

*१. विवेक*

आपुलिया मनि ऐसें वाटे सदा । सुखचि सर्वदा असावे कीं ॥१॥
म्हणोनी विषय असावे वाटती । तरी तेही जाती सोडोनिया ॥२॥
आपण जरी हे न सोडिले भोग । तरी तेचि त्याग करिताती ॥३॥
एका एक सुख तंव एक दुःख । शाश्वत सम्यक नाही कांही ॥४॥
सुखाची प्रवृत्ति तेही हारपेना । जगीही दिसेना सुख कोठे ॥५॥
याची दोन वृत्ती घेऊनी पाहतां । सिद्धांत सर्वथा सांपडे हा ॥६॥
कांही तरी नित्य आहे म्हणोनिया । सुखाच्या उपाया शोधी मन ॥७॥
अनित्य विषय येथे नाही सुख । नित्य निष्कलंक ब्रह्मची तें ॥८॥
ऐसी वृत्ती मनी त्या नांव विवेक । ज्ञानेश्वर एक दाखविता ॥९॥

**१७.**

*वैराग्य*

बाळपणीं सदा आवडती माता । तारुण्यांत कांता आवडती ॥१॥(य२पू.३४)
वृद्धपणीं पुत्रावरी मोह गाढा । सुखाचा निवाडा कोठे नाही ॥२॥
जें जें दिसे दृष्टीं तें ते नाशिवंत । केव्हां भगवंत भेटेल हा ॥३॥
सकळ भांडती आपुलियासाठी । कोणाचे शेवटीं कोणी नाहीं ॥४॥
जैसें मृत्युलोकीं तैसें स्वर्गलोकीं । विषयाचे सुखीं दुःखराशी ॥५॥
स्वर्गी जो कां वरी बैसे स्वकर्मानें । द्वेषाचे पाल्हाणे तळीं तया ॥६॥
तळींचे पाहुनी, वरिलिया अभिमान । बरोबरी जाण कलह होय ॥७॥
पुण्य संपलिया पडती तत्क्षणीं । इह पर दोन्ही सारिखेंची ॥८॥
विष्ठामूत्रासम म्हणोनी तें नको । ऐसे दृढ देखो चित्ती जेव्हा ॥९॥

तेव्हां तें वैराग्य दुसरें साधन । ज्ञानेश्वर पूर्ण शिकवीती ॥१०॥

१८.

*शम, दम, श्रद्धा, मुमुक्षा*

तिसरें साधन सहा प्रकाराचे । यथामती त्याचें रूप करूं ॥१॥
मनाचा निग्रह तो म्हणावा शम । निग्रह तो दम इंद्रियांचा ॥२॥
एकवेळ चित्त फिरलिया पुनः । विषयवासना कदा नेघे ॥३॥
यास नांव साधु उपरम देती । तितिक्षा निश्चिती आयकावी ॥४॥
शीत उष्ण सुख दुःख तें साहणें । येउं नच देणें विषमता ॥५॥
मान अपमान दोन्ही गुंडाळावे । सहज टाळावें रागद्वेष ॥६॥
तितिक्षा अत्यंत सहनशीलता । निश्चय तत्वतां व्हावा ऐसा ॥७॥
तेव्हां पुढें श्रद्धा मिळेल सुंदर । तीतींलही सार आयकावे ॥८॥
कर्म उपासनेमाजी जैसी श्रद्धा । न म्हणावी कदा तैसी हेही ॥९॥
पूर्वीची ती श्रद्धा भावसिद्ध जाणा । युक्तिसिद्ध गणा दुसरी ही ॥१०॥
वेदांत्त-सद्‌गुरु वाक्यांचा विश्वास । रूप हें श्रद्धेस साधु देती ॥११॥
युक्ति अनुभव कळविल्यावरी । तैसी स्थिती जरी झाली नाही ॥१२॥
तरी गुरु सांगतील जो अभ्यास । करावा विशेष आवडीनें ॥१३॥
या नांव म्हणती साधु समाधान । धीरतासंपन्न चित्त होणें ॥१४॥
जन्ममृत्युजरे पासोनिया केव्हां । सुटेन मी देवा ऐसी वृत्ती ॥१५॥
मुमुक्षा म्हणती साधु याचि नांव । ज्ञानेश्वरदेव कृपें कळें ॥१६॥

१९.

*गुरुसेवा*

साधने ही चारी ऐसी जेव्हा होती । तेव्हां सत्संगतीं गुरु भेटे ॥१॥
(य२पू.३५)
हात जोडोनिया मग उभे व्हावे । प्रेमे विनवावे अकृत्रिम ॥२॥
महाराज मज कळले हें जग । दुःखरूप चांग आहे सारें ॥३॥
कर्म उपासना केल्याती बहुत । परी नाही तृप्त झालो देवा ॥४॥
या दुःखांतुनी सुटाया उपाय । सांगावा मी पाय धरीतसे ॥५॥
ऐसी ऐकोनिया सच्छिष्याची वाणी । अभय गुरुनी तेव्हा द्यावें ॥६॥



भिउं नको बाळा सुटाया यांतुनी । उपाय निर्वाणी आहे एक ॥७॥
तो बोध संवाद गुरु-नंदनाचा । पुढे आतां साचा आयकावा ॥८॥
ज्ञानेश्वरप्रभु होता कृपावतं । ज्ञान हे समस्त ठायीं पडे ॥९॥

२०.

*गुरुशिष्य संवाद*

गुरु म्हणताती ऐक शिष्यराया । यांतुनी निघाया उपाय हा ॥१॥
आपणावांचोनी आपणासी मुक्त । कराया सशक्त नाही कोणी ॥२॥
रोगियाच्या साठी दुजियानें जरी । पथ्य केली तरी फळ नाही ॥३॥
तैसें दुजियाच्या ज्ञानें दुजा मुक्त । नव्हें हें उचीत बोलणें कीं ॥४॥
आपुल्या अज्ञानें आपण बांधत । आपुल्या सुटत ज्ञानेंची तो ॥५॥
जीवब्रह्म एक नाहीं भेदभाव । अद्वैत ही ठेव ज्ञान म्हणा ॥६॥
ज्ञानेश्वरप्रभु वाणी रम्य भली । स्वयें प्रकाशिली शिष्यबुद्धी ॥७॥

२१.

*अज्ञान कैसें झालें ?*

शिष्य म्हणे स्वामी एक प्रश्न थोर । कृपेनें स्वीकार करितील ॥१॥
स्वामी म्हणे तुज वाटेल तें पुसें । शिष्य तैं आपैसे बोलत कीं ॥२॥
सद्‌घन ब्रह्म एक परिपूर्ण । तेथें हें अज्ञान झालें कैसें ॥३॥
प्रकाशांत नाही अंधःकारसिद्धी । अविद्याप्रसिद्धी ब्रह्मीं कैसीं ॥४॥
ऐकुनिया ऐसें शिष्याचें वचन । बोलती आपण ज्ञानेश्वर ॥५॥

२२.

*तीन सत्ता*

अविद्येचा प्रश्न केला तुवां बाळा । विचार वेल्हाळा करी त्याचा ॥१॥
अविद्या ही आहे अनुभवें सिद्ध । येथ युक्ति बोध कांही नाहीं ॥२॥
ईश्वर व्यापक त्यांत भेदभाव । निश्चय हा ठाव अविद्येचा ॥३॥
परी इच्यायोगें न म्हणावें द्वैत । समसत्तावंत नाहींत की ॥४॥
मृगजळासंगे सूर्य लिप्त नाहीं । स्वप्नासंगें कांही देहा नयें ॥५॥
समसत्तेमाजीं द्वैत तें वाढत । विषमसत्तेंत अद्वैतची ॥६॥ (य२पू.३६)
सत्ता तीन दोन अथवा म्हणती । ऐक ती व्युत्पत्ती शिष्यराया ॥७॥

पहिलें जें भासें शेवटीं जें नासे । प्रतिभास ऐसें नांव त्याचें ॥८॥
कधीं काळीं ज्याचा नाश नाहीं नाहीं । तेचि सत्ता पाही परमार्थी ॥९॥
अविद्या ती आहे प्रतिभासरूप । ब्रह्माचें स्वरूप परमार्थ ॥१०॥
म्हणोनी विषम सत्ता दोघांची ही । द्वैत सिद्ध नाहीं तेथ केव्हां ॥११॥
ऐसें युक्तिरूपें निवारिलें द्वैत । ऐक आतां श्रौत काय म्हणे ॥१२॥

*सहा अनादि पदार्थ*

वेदांताच्या मतें पदार्थ ते सहा । अनादिच पहा आथी कीरू ॥१३॥
जीव[१] ईश[२] शुद्ध[३] जीवेश्वरभेद[४] । अविद्या[५] संबंध[६] सहा ऐसे ॥१४॥
त्यांत एक शुद्ध अनादि अनंत । इतर ते सान्त अनादीही ॥१५॥
शुद्धावांचोनिया नाश इतरांचा । ब्रह्मज्ञानें साचा होय कीरू ॥१६॥
ज्ञानेश्वरप्रभुकृपें तेंचि ज्ञान । श्रोतीं सावधान आकर्णावें ॥१७॥

## २३.

*अविद्या : आवरण व विक्षेप*

अविद्येच्या शक्ति दोनचि असती । विक्षेप, आवृति शिष्यनाथा ॥१॥
न कळणें जे कां रज्जूचें भ्रमानें । तेंचि *आवरण ओळखावें ॥२॥
रज्जूवरि सर्प भासे जो अन्यथा । *विक्षेप तत्वतां नांव त्याचें ॥३॥
तैसें ब्रह्माचे जें नाहीं वाटें ज्ञान । तेंचि आवरण आपणांतें ॥४॥
ब्रह्म विपरीत जगद्रूप भासे । विक्षेप हें ऐसें मायारूप ॥५॥
आवरण तेंही दोन प्रकाराचें । ऐकावें तयाचें रूप करूं ॥६॥
*असत्वापादक *अभानापादक । द्दढ ही ओळख चित्तीं धरी ॥७॥
ब्रह्म नाहीं ऐसें वाटणें पहिलें । दुसरें पहिलें तेंही सांगूं ॥८॥
ब्रह्म आहे परी आम्हां न कळत । याचि नांव हो तें द्वितीय कीं ॥९॥
पहिलें तें जाय परोक्ष विज्ञानें । अपरोक्षज्ञानें दुजें नाशे ॥१०॥
ज्ञानेश्वर प्रभू दोन्ही दाखवितां । तेथें सख्या चित्ता नित्य राहे ॥११॥

## २४.

अवांतर वाक्यें सांगितली जी कां । तयानें होय कां परोक्ष तें ॥१॥
ब्रह्म नाहीं ऐसें वाटत जें होतें । ब्रह्म आहेची तें होय जेव्हां ॥२॥
तेव्हां ब्रह्म नाहीं ऐसी बुद्धि जाय । ब्रह्मास्तित्वीं होय विश्वास जो ॥३॥



त्या नांव *परोक्ष म्हणताति मुनी । *अपरोक्ष वाणी ऐके आतां ॥४॥
महावाक्यें जीं कां सांगितली होती । मी ब्रह्म हे स्थिति त्यानें कळे ॥५॥
(य२पू.३७)ब्रह्म न कळें हे बुद्धि तेव्हां जाय । अपरोक्ष होय नांव याचें ॥६॥
पंचभूत आणि तयांचे शरीर । स्थूळ हें निर्धार जाणावें कीं ॥७॥
मन बुद्धि आदि लिंग हें शरीर । सकळ साचार अविद्येचें ॥८॥
कारण अविद्या जेव्हां नष्ट होय । तेव्हां तिचें कार्य तेंही नाशे ॥९॥
मग उरलें तें अखंडैकरस । म्हणताती यास *श्रवण कीं ॥१०॥
आतां पुढे तुझ्या युक्तीनें *मनन । करावें त्वां जाण शिष्यराया ॥११॥
ज्ञानेश्वरप्रभू स्वसमान करी । मग शिष्य करी बुद्धिदाता ॥१२॥

## २५.

*श्रवण मनन निदिध्यास*

आपल्या युक्तीनें करितां मनन । जें पूर्वी श्रवण केलें कांही ॥१॥
गुरुशास्त्रमुखें करावें *श्रवण । युक्तीनें *मनन आपुलिया ॥२॥
अभेद साधक, भेदास बाधक । ऐशा युक्ती देख योजीत जा ॥३॥
श्रवण-मननें झाला जो सिद्धांत । चेतन निश्चित ईश आणि मी ॥४॥
तयाचेंचि ठायीं सदा वृत्ति राहे । *निदिध्यास आहे नांव याचें ॥५॥
हाचि निदिध्यास जेव्हां पु् होत । तेव्हां तूं साक्षात ब्रह्मरूप ॥६॥
धुऊन टाकितां लसुणाचा वास । राहे तैसा भास प्रारब्धाचा ॥७॥
जळतांही वस्त्र अवभास राहे । तैसा भास पाहे प्रारब्धाचा ॥८॥
तयापासूनिया तुझें नोहे कांही । भोगोनिया पाही सारावें तें ॥९॥
ज्ञानाग्नीनें जळे पूर्वीचें संचीत । क्रियमाण कृत स्पर्शेना कीं ॥१०॥
ज्ञानेश्वरकन्या म्हणे कीं ही खूण । गुरुपुत्र पूर्ण जाणताती ॥११॥

## २६.

*फलश्रुति*

येथें जें कां पुरें उणें । तें तें सर्वही मी नेणें ।
जेणें केलें तोचि जाणे । गुरुनाथ आपण ॥१॥
सूत्रीं नाचवी पुतळे । तैसें गुरु पाळी लळे ।
नेत्र एरव्ही आंधळे । माझे सर्वा ठाऊके ॥२॥

**याचें पठण श्रवण । भावें करावें संपूर्ण ।**
**श्रद्धा आणि विचारानं । फळप्राप्ती अक्षय ।।३।।**
**ज्ञानेश्वरगुरु आई । सर्व समर्पिलें पायी ।**
**आतां वियोग तो नाहीं । तुज मज केधवा ।।४।।**
**।।हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ।।** (य२पू.३८)
**।। त्रिकांडसार समाप्त ।।**

०००

### ६. तुंबडी

# विषयदिग्दर्शन

।। श्री ज्ञानेश्वरमाउली ।।

(हे विषयदिग्दर्शन श्रीनिवास रामचंद्र हरदास यांनी प्रथमावृत्तीत प्रत्येक प्रकरणग्रंथाच्या सुरवातींस छापलेले आहे.)

**प्रसंग** – ही तुंबडी षट्प्रकरणात्मक असून **सुमदगंधछंदांत** रचलेली आहे. हिची रचना पयोष्णीतीरी झाली. तो प्रसंग असा कीं शुक्लेश्वरवाटोडा येथील दत्तमंदिरांत एके दिवशीं कांही मंडळी पात्रांत भरून ते खुळखुळ वाजवीत तुंबडीवाल्याची नक्कल करून गाणीं वगैरे म्हणूं लागली. तेव्हां तुंबडीवाल्याच्याच खेडवळ भाषेंत महाराजांनी अद्वैतवेदांताचीं तत्त्वें गोवल्यामुळे ह्या पद्यांची रचना मोठी बहारीची झाली आहे. यात आलेले विषय -

***प्रकरण १ ले***

साधकानें सद्‌गुरूला मायबाप समजून कायावाचामनानें सेवा करावी- गुरुभक्तिवाचून शास्त्राभिमानाचा निषेध- ईश्वरोपासना गुरूजवळून घ्यावी- उपासनेनें संसारवासना हळुहळु कमी होते- ज्ञानगर्वानें स्वधर्मत्याग करू नये- सद्‌गुरु न मिळाले तर स्वधर्माचें अनुष्ठान करावें- निष्कामकर्माने काम्यकर्माचा नाश होऊन ईश्वरानुग्रह मिळतो- ईश्वरानुग्रहानें विषयभोगावांचून मनाचा उल्हास वाढतो, व गुरु, संत, देव यांचे दास्यत्व करावेंसें वाटूं लागतें.- मग प्रपंचाचें ठिकाणी सहजच अनासक्ति होते- वेदवेत्ता व ब्रह्मनिष्ठ अशा सद्‌गुरूला शरण जाऊन त्यांची वैराग्यपूर्णक सेवा करावी- गुरुदत्त ईश्वरोपासनेनें विक्षेपवासनेची निवृत्ति होते. अखंड भगवत्प्रेम मिळण्याकरिता विकल्पाच्या माथ्यावर पैजार मारून



तार्किकांचा संग सोडून सत्संग करावा.मुक्त होऊनही भगवत्प्रेम सोडूं नये.

***प्रकरण २ रे***

माया ही अधिष्ठानावर कल्पित असून अनिर्वचनीय आहे. अधिष्ठानज्ञानाने तिचा नाश होतो. महावाक्यश्रवणानें जीवेश्वराचा अभेद कळतो-**(य २ पू ३९)**– मननानें अभेद दृढ होतो - निदिध्यासानें ब्रह्माकार वृत्ति होते व साक्षात्कार झाला म्हणजे अध्यासनिवृत्ति होऊन अद्वैतप्रेमाचा अखंडानुभव मिळू लागतो- द्वैतभक्ति देवाला आवडत नाही- वैकुंठादि लोक वासनेचीं फळें असून जन्ममरणांधकूप चुकवीत नाहीत- ईश्वराचें व्यापकत्व अद्वैतभक्तीनेच कळतें - श्रुतीमाय कधी खोटें बोलणारी नव्हे- श्रुत्यर्थ कळण्याला सद्‌गुरुसेवाच केली पाहिजे. मिष्टान्नाची आवडी व स्त्रीसंग सोडून जी दाळभाकर मिळेल तेवढ्यात संतुष्ट राहून सत्संग मिळविण्याचा मोठा प्रयत्न करावा कारण काळाची झडप केव्हा पडेल याचा नियम नाही- सत्संगाने पूर्णता आल्यावरही भगवद्भक्ति करीतच रहावें.

***ज्ञानाभ्यास***

महावाक्यार्थचिंतन करणे तें मनन- ब्रह्माकारवृत्ति करीत जाणें हा निदिध्यास- व निदिध्यासाची परिपाकदशा ती समाधी- ह्या क्रमानें दृढ अभ्यास करून पूर्णता संपादन करावी.

***प्रकरण ३ रे***

सामान्यजनांस नीती व धर्माचरणच सद्‌गति देणारें आहे. सर्व जीवांच्या उपाधी काढून त्यांना आत्यंतिक सुखाची प्राप्ती ज्या आचरणाने होईल तीच नीति व तोच धर्म- अशा प्रकारच्या आचरणाचा कित्ता घालून देणाराला अगोदर सर्व जीवांच्या उपाधीचें ज्ञान असले पाहिजे- सर्व जीवांच्या उपाधी कळण्याला जगाचे पूर्णज्ञान असलें पाहिजे- पूर्णज्ञान म्हणजे भ्रमप्रमादरहित ज्ञान- असे भ्रमप्रमादरहित ज्ञान सर्वज्ञालाच असूं शकते- सर्वज्ञ एक ईश्वरच आहे व वेदपुराणें ईश्वरप्रणीत आहेत म्हणून वेदपुराणात सांगितलेला जो धर्म आणि नीती असेल तीच लोकांना आचरणीय आहे- मुक्तजीवही शिष्याची संसारोपाधी नाहीशी करण्याला समर्थ असतात, परंतु त्यांच्या ज्ञानांत भ्रमप्रमाद होण्याचा संभव आहे, म्हणून जीवन्मुक्तज्ञानीपुरुष वेदाधारेच बोध करून दीनांचा उद्धार करतात- नुसत्या शब्दगर्वानेंच नीतिधर्मांचा **(य २ पू ४०)** कोंब मोडूं पाहणाऱ्या व हरिभक्ति

सोडून दोम् दोम् करीत फिरणारांचा निषेध- अशांचें वचन प्रमाण मानण्यापेक्षा ब्राह्मणांनी वेद व शूद्रांनी पुराणें वाचून गुह्य ब्रह्मज्ञान मिळवावे - सर्व वेदपुराणांचा ब्रह्मामध्येच समन्वय असल्यामुळे प्रत्येकाला वेदांतविचारच कर्तव्य आहे. परंतु शुद्धचित्त झाल्याशिवाय बुद्धि वेदांतविचार ग्रहण करीत नाही, म्हणून चित्तशुद्धी होतपर्यंत वर्णाश्रमधर्म पाळावे व वेदांतचिंतनयोग्यता आल्यावर कर्माचा आग्रह ठेवूं नये,

कारण कैवल्यमंदिरांत प्रवेश होण्याला वेदांतचिंतनच निश्चित उपाय आहे. अन्य उपायांनी कामादिक शत्रूंचा नाशहोत नाहीं. ब्रह्माचे वास्तविक स्वरूप मन व वाणीला अगम्य आहे, व वेदांचीही शक्तिवृत्ति तेथें चालत नाहीं. परंतु जिज्ञासूंची ब्रह्माकारवृत्ति होण्याकरितां वेद लक्षणावृत्तीनें प्रवृत्त होतात. तत्पदार्थाचें तटस्थलक्षण व स्वरूपलक्षण- जिज्ञासूला अध्यारोपापवादानें श्रुतिमातेनें ब्रह्मबोध केला आहे, परंतु -

सद्‌गुरुमुखाशिवाय श्रुतिसमन्वय कळत नाहीं म्हणून वेदपुराणानुकूल ज्याचें आचरण आहे अशा श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरुला शरण जावें.

***प्रकरण ४ थे***

माया अनादि व अनिर्वचनीय असून ज्ञाननाश्य आहे. माया अनिर्वचनीय कशी? सत्य ब्रह्मांत मिथ्या मायेचा शोध कसा करावा? ह्या शंकेचे उत्तर- माया बंधन केव्हां करते? ह्याचे मृगजळाच्या दृष्टांतानें स्पष्टीकरण- अध्यारोपापवादानें मायेचे निरसन- अध्यारोपापवादाची लक्षणें.

***प्रकरण ५ वे***

जगत् ब्रह्माचा विवर्त आणि मायेचा परिणाम आहे- विवर्त व परिणामाचे लक्षण- कर्म आणि ध्यान हे अज्ञानाला निवर्तक नाहीत- कर्मानें चित्तशुद्धी होऊन ध्यानाने विक्षेपनाश होतो, परंतु अज्ञानाला निवर्तक एक ज्ञानच आहे- भ्रम सिद्ध होण्याकरितां सांख्याचा स्वीकार आहे- सांख्यमत खंडन- बौद्धांचा शून्यवाद खंडन- अद्वैत सिद्धांत- द्वैतवाद्यांचा निषेध- वेदांत सिद्धांताचें महत्व आणि स्पष्टीकरण- सत्कार्यवादाचें खंडन. **(य २ पू ४१)** मजेदार दृष्टांत- तीव्र अनुताप झाल्याशिवाय जगाचे मिथ्यात्व कळत नाही- जग मिथ्या कळल्याशिवाय मन निर्विषय होत नाही- मन निर्विषय झाल्याशिवाय कार्यकारणाहून ब्रह्माचे



पृथक्त्व कळत नाही- ब्रह्माचे पृथक्त्व कळल्याशिवाय देहाभिमान सुटत नाहीं व ह्या सगळ्या गोष्टी सद्‌गुरुकृपे शिवाय घडून येत नाहीत. **सद्‌गुरुकृपा नसली तर अहंकार उत्पन्न होऊन ज्ञानही लयास जाते**- कार्य अज्ञानाचा परिणाम आहे म्हणून तें सत्यासत्यासहून भिन्न असे अनिर्वचनीय आहे- प्रत्यक्षादि प्रमाणें मिथ्या आहेत- वेदांताची मान्यता

***प्रकरण ६ वे***

उपसंहार- सद्‌गुरूचें महत्व- संसारांत अत्यंत आसक्त जीवांना बोध.(य२पू४२)

०००

(पदांची गाथा यष्टी ९ उत्तरार्ध २ री आवृत्ति, यातही तुबडच्या काव्य क्रमांक १३५२/२२३१ ते १३५५/२२३४ एकूण ४ कविता आहेत.)

# ६

# ॥ तुंबडी ॥

(सुमदगंधछंद)

## ॥ प्रकरण १ ले ॥

**॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥**

**सद्भावानें नमूं आधीं ज्ञानेश्वरपाय ।**
**ज्याच्या योगें भव करूं न शके अपाय ॥१॥**
**सोप्या भाषेमंधि सांगू ज्ञानाचा उपाय ।**
**साधकानें जाणावें जी गुरु बाप माय ॥२॥**
**गुरुसेवे झिजवावे वाणीमनकाय ।**
**गुरुभक्तालाहि लोकामंधी उणें काय ॥३॥**
**सार काहाडून बहु विस्तारली शास्त्ररूप धाय ।**
**त्याहुन सार घ्यावा जैसी दूधावरलि साय ॥४॥**
**शास्त्राचा हा सार ब्रह्म खरें जग खोटें ।**
**यावांचून आणिक काय सांगति शास्त्रि गोटे ॥५॥**
**न जाणोनि बा! उगा शास्त्राभिमानी ।**

उस्के माकूं × जो की गुरुला न मानी ॥६॥
गुरुजवळुन आधीं घ्यावी ईश्वरोपासना ।
हळुहळु न्यून मग संसारवासना ॥७॥
जरी नाहीं गुरुहि भेटला तुम्हास ।
तरी तुम्हीं दृढ धरा स्वधर्माची आस ॥८॥
निष्काम कर्माने होतो कामनेचा नाश ।
मोक्ष इच्छा मनीं नका पाहूं आसपास ॥९॥
कर्मानें मिळवा हरिप्रसादाचा ग्रास ।
ज्ञानगर्वे करूं नका स्वधर्माचा ऱ्हास ॥१०॥
निष्काम कर्मानें हरि कृपा करी खास ।
तेव्हां वाढे भोगावीण मनाचा उल्हास ॥११॥
मग व्हावे वाटे गुरु देव संत दास ।
प्रपंचाचे ठायीं मन सहज उदास ॥१२॥
विवेकवैराग्यबळें सांडुनी मदास ।
गुरुपाशीं जाऊन वारा संसारगदास ॥१३॥
समाधान धरूनिया ऐसी करा सेवा ।
तनुमनधन सारें गुरुपाशीं ठेवा ॥१४॥
सद्‌गुरुचि निवारीती ताप त्रय गोवा । (य२पू.४३)
आपुल्या मनांत ऐसा भरंवसा व्हावा ॥१५॥
वेदवेत्ता ब्रह्मनिष्ठ गुरु आधीं देखा ।
अन्य गुणदोष मग मनीं आणूं नका ॥१६॥
रागद्वेष कामक्रोध सर्व मागें सारा ।
बाइलपुत्रधनावर मुता तीन धारा ॥१७॥
गुरुवाक्यासरसि वृत्ति आपुली सुधारा ।
गुरुदत्त मंत्रें भजा जगदुद्धारा ॥१८॥
जेव्हां होईल मनीं दृढ ईश्वरोपासना ।
निवर्तेल मग तेव्हां विक्षेपवासना ॥१९॥
दोनपणा आहे तेथ मोठा आणि सान ।



लहानमोठा तेथ बाबा सहज भय भान ॥२०॥
जीव लहान ईश्वर मोठा भीतीचें कचाट ।
याचसाठीं गुरुकृपें अद्वैतकपाट ॥२१॥
उघडूनि व्हावें तुम्ही ब्रह्मचि अचाट ।
तुमच्या मागें हीच लागो सर्व लोकां चाट ॥२२॥
ब्रह्मज्ञानें चढोनी जावा मुक्तिचा घाट ।
मुक्तिमंधे भोगा हरिप्रेमाचाही थाट ॥२३॥
परी चुकू नका गुरुसंतसेवा वाट ।
कृष्णस्तुती करा नित्य होऊनिया भाट ॥२४॥
आपुल्या पुण्याचा कधीं न करा बोभाट ।
षडरींच्या पाठीवरी बरवे मारा सांट ॥२५॥
वारंवार संधीमध्यें आत्म्याची घ्या गांठ ।
उतावेळप्रेमें लावा श्रीहरीसी पाट ॥२६॥
गुरुकृपें धरा ब्रह्मज्ञानाचा सुमार ।
ज्ञान झालियाहि स्मरा नंदाचा कुमार ॥२७॥
तार्किकाचा संग बाबा ! नका करूं फार ।
तुमच्या शिरावरिल हरि सर्व हरी भार ॥२८॥
जडव्यतिरेकें सांडा धनपुत्रदार ।
सांडू नका परी हरी अखंड उदार ॥२९॥
याचिसाठीं मुनि सोडताति घरदार ।
नाना साधनांचीं यांच्यापावेतो मदार ॥३०॥
होऊं नका तुम्ही उगे संसारी बेजार ।
करसेंही करूनी साधा साधूंचा शेजार ॥३१॥
त्यांच्या घरीं आहे बाबा ! प्रेमाचा बाजार ।
हरि घेऊनिया मोल तोडावा जोजार ॥३२॥
विकल्पाच्या माथ्यावरी मारावी पैजार ।
मग कांहीं करील ना वृत्ति जोरजार ॥३३॥
पहिलें हें प्रकरण जाणोनिया खास ।

ज्ञानेश्वरगुरुपायीं करा रहिवास ॥३४॥
॥ हरिः ॐ तत्सदिति प्रथम प्रकरणं संपूर्णम् ॥
०००

## ॥ प्रकरण २ रे ॥

गुरु ज्ञानेश्वरपाय नमूनिया भाई ।
दुसरें हें प्रकरण सुनो चितलाई ॥१॥
ब्रह्मावरी जग बाबा झालें कधीं नाहीं ।
आधीं नाहीं अंती नाहीं मध्यें भास पाही ॥२॥ (य२पू.४४)
शिंपेवरी रुपें बाबा भास काय खरा ?
तैसें जग खोटें याचा विचार कांहीं करा ॥३॥
खोटें जग मध्यें भासे ब्रह्मअधिष्ठानीं ।
आरोपानें होत नाहीं वस्तुचीही हानी ॥४॥
मिथ्या सत्य दोघांलाही राहे एक ठाय ।
खोटें खरें एकाठायीं राहणें तें होय ॥५॥
सूर्यावरी भासे बाबा जैसें मृगतोय ।
ब्रह्मावरी नसूनिया तैसी माया होय ॥६॥
खोटा पुत्र वांझोटीचा तैसी नाहीं माया ।
खऱ्याखोट्याहुनी परी वेगळी ते व्हाया ॥७॥
खरी किंवा खोटी माया बोला नहि जाय ।
अनिर्वचनीय म्हणुनि वेदांताभिप्राय ॥८॥
खरी म्हणूं माया तरी ज्ञानाने ती नाशे ।
खोटी म्हणू तरी व्यवहारामध्यें भासे ॥९॥
भ्रमालाही खरें म्हणती मूढमति लोक ।
बहिनला मी × ज्याला द्वैतमुक्तिझोप ॥१०॥
वाटतसेल तुम्हाला ही केव्हां भ्रांति जाय ।
ज्ञानावांचुन नाहीं याला आणिक उपाय ॥११॥
रज्जूचैतन्यज्ञानें जैसा सर्पनाश ।
अधिष्ठानज्ञानें तैसा गळे भवभास ॥१२॥



अधिष्ठानज्ञान तें तो श्रुतिसिद्ध साच ।
जडवादी सांख्यादिक जाणावे अवाच ॥१३॥
''ज्ञानादेव मुक्ति'' सांगे गर्जोनिया वेद ।
महावाक्यज्ञानें होय जीवेश्वराभेद ॥१४॥
श्रवणानें होते जीवब्रह्मऐक्यज्ञान ।
मननानें दृढ वाटे भेद अप्रमाण ॥१५॥
ब्रह्माकारवृत्ती राहे करितां निदिध्यास ।
साक्षात्कार दृढ होतां निवटे अध्यास ॥१६॥
जीव ईश्वर तेव्हां होतीं पूर्ण एकरूप ।
द्वैतिभक्तालागिं जन्ममरणांधकूप ॥१७॥
भेदभक्तीची देवाले आवडीभी नाय ।
देवाहूनी ज्यांच्या मनीं कामना बलाय ॥१८॥
झाटा उखाडते है मूढ वैकुंठ मिलाय ।
अद्वैतामंधी तो देव भरून उरला ठाय ॥१९॥
सर्वाठायीं भरून उरला दाहा बोटें भाय ।
कधीं खोटें बोलणारी नव्हे श्रुतिमाय ॥२०॥
श्रुतिअर्थ कळेना तों गुरुपाशीं जाय ।
गोड खाऊन ढुंगण नको पोखवूं बा बाय ॥२१॥
भूक लागेल तेव्हां सेवी पाणी भाकर दाय ।
यामिनींत इछूं गको कामिनी बलाय ॥२२॥
कोई दिनतोबी काल लेवेंगा बुलाय ।
साधुसंग करीलेना गुरूको मिलाय ॥२३॥
ब्रह्मानंदमांही देना वृत्तीको सुलाय ।
गुरूहात सोहं ब्रह्म किंवारा खुलाय ॥२४॥??????????
आप पूरन होके देना मायाकू भुलाय ।
पूरन हुयेपरभी लेना श्यामको मिलाय ॥२५॥
श्रवणतें महावाक्य अर्थ करी देख । (य२पू.४५)
नानाजुक्ती मनन मारे भेद ऊपर मेख ॥२६॥

ब्रह्माकारवृत्ति करी हाचि निदिध्यास ।
याच्यासाठीं व्हावा मोठा प्रत्यहीं अभ्यास ॥२७॥
निदिध्यासप्र दशा तीचि बा समाधी ।
पावलीया मग नाहीं संसारउपाधी ॥२८॥
निरूपण झालें ऐसे कांही श्रुतिसारें ।
श्रवणादि विस्तारानें पुढें सांगू सारे ॥२९॥
दूसरें हे प्रकरण ज्ञानेश्वरपायीं ।
फूल नव्हे पंकोळी मी अतिप्रेमें वाही ॥३०॥
॥ हरिः ॐ तत्सदिति द्वितीयप्रकरणम् ॥

०००

## ॥ प्रकरण ३ रे ॥

ॐ नमो जी आद्या गुरु वेदप्रतिपाद्या ।
आत्मरूपा ज्ञानेश्वरा जय जय स्वसंवेद्या ॥१॥
दुजी वस्तू सिद्ध व्हाया पाहिजे प्रमाण ।
आत्म वस्तू एक बाबा ! जैसी तैसी जाण ॥२॥
भवाब्धींतही भ्रांतीचें वारुनी किडाळ ।
ब्रह्मनिष्ठ होती नित्य मुक्त ते सुढाळ ॥३॥
चमकती करावया दीनांचा उद्धार ।
बोधिताति घेऊनिया वेदांचा आधार ॥४॥
ईश्वरापासुनी झाला वेदांचा उद्भव ।
ईश्वरीं तो नाहीं भ्रम प्रमाद संभव ॥५॥
येर जीव जरी मुख्यतया मुक्त होत ।
तरी जगत् ज्ञान पूर्ण तयांतें न होत ॥६॥
तोही जरी वारीतसे निजशिष्यभव ।
ईशापेक्षें परी तया भ्रमाचा संभव ॥७॥
म्हणोनियां आधीं ग्राह्य निगम पुराण ।
'पुराणही वेद' ऐसें वेदात प्रमाण ॥८॥
वेदपुराणानुकूल इतरासी मान ।



तेणें गळे सहजची स्वमताभिमान ॥९॥
परंतु कलियुगीं हा उडालासे मान ।
हाग्रे मुत्रे होऊं पाहती साधूंच्या समान ॥१०॥
शब्दगर्वे मोडताती नीतीधर्म कोंब ।
वेदान्त सांगती जैसी शिमग्याची बोंब ॥११॥
कलीमंधी बाबा! नाहीं भक्तीलाही जोम ।
सांडुनिया विष्णु शिव करिती दोम् दोम् ॥१२॥
भंगूनिया वरिष्ठाज्ञा कंटक कुपास ।
छिनाल घेती पेढे पतिव्रतेला उपास ॥१३॥
आपुलीया मताग्रहें करिती मारहाण ।
न पाहती गुरु शिष्य मोठा ना लहान ॥१४॥
धनासाठीं कापताती शहाण्याची मान ।
ऐशा गाढवांचें काय वचन प्रमाण ॥१५॥
यालागीं ब्राह्मणीं वेद, शुद्रांनीं पुराण ।
वाचोनिया मेळवावें गुह्य ब्रह्मज्ञान ॥१६॥
अविद्या तोंवरी पाळावे स्ववर्णाश्रम ।
ब्रह्मज्ञान झालिया मग निवटे हा भ्रम ॥१७॥ (य२पू.४६)
अन्न नाहीं घरीं तंव पाकाचा संभ्रम ।
जेऊन तृप्ती झाली मग कोण करी श्रम ॥१८॥
सांडूनीया सर्व कांहीं संसाराची हाव ।
ईश्वरांत मिळावे जाणोनि सोहंभाव ॥१९॥
वेदपुराणांचा ब्रह्मामध्यें समन्वय ।
जाणोनिया ऐसें धरा वेदांताची सोय ॥२०॥
एक वेळ पावलिया कैवल्यमंदीर ।
मग कांहीं जाचतीना षडरी उंदीर ॥२१॥
तटस्थलक्षणें जगा ब्रह्मची कारण ।
स्वरूपलक्षणें होय जीवाचें तारण ॥२२॥
नित्य राहूनिया दावी लक्ष्यभिन्न भाव ।- - -॥२३॥
राया छत्र याचें ऐसे तटस्थ हें नांव ।

प्रभावंत सूर्य जैसा स्वरूप याचें नांव ॥२४॥
जगज्जन्मादिमत्व हें तटस्थ लक्षण ।
सत्य ज्ञानानंतानंद स्वरूपलक्षण ॥२५॥
तटस्थलक्षणें ब्रह्म निमित्तोपादान ।
स्वरूपलक्षणें गळे कुविद्यापादान ॥२६॥
तत्पदार्थाचें हें ऐसे द्विविध लक्षण ।
ओळखावें घेऊनी गुरुपासोनी शिक्षण ॥२७॥
पुढें विस्तारानें याचें करूं निरूपण ।
येणेंचि कळेल अपवादाध्यारोपण ॥२८॥
अध्यारोप म्हणजे सत्यावरी मिथ्याभास ।
अपवाद म्हणजे ज्ञानें पुनः त्याचा नाश ॥२९॥
दाखवूनि जिज्ञासूला आरोपापवाद ।
तात्पर्यानें श्रुति करी ब्रह्माचा संवाद ॥३०॥
वास्तविक ब्रह्म वाणीमनासी कानडें ।
वेदांचीही मुख्यशक्ती जेथ बहु नडे ॥३१॥
परी व्हाया जिज्ञासूची तदाकारवृत्ती ।
लक्षणेंनें ब्रह्मीं वेदपुराण प्रवृत्ती ॥३२॥
यालागीं मानोनि मनीं वेदपुराण प्रमाण ।
अनुभवें द्यावा भावें संतजना मान ॥३३॥
जिज्ञासूको शीघ्र जैसी होवेंगी पहिचान ।
ज्ञानेश्वरकृपें पुढें निरूपण छान ॥३४॥
हरिः ॐ तत्सदिति तृतीय प्रकरणम् ॥

०००

## ॥ प्रकरण ४ थें ॥

वेद तो जगत हेतू बोलत अग्यान ।
जड चले नाहीं कबु सांख्यको प्रधान ॥१॥
जगत्कर्तामांही होना सर्वज्ञको ज्ञान ।



जाही कारणतें वेदीं चैतन्यको भान ॥२॥
जडनिष्ठ भक्तकोभी होवे न तारण ।
जाही हेतू होवे पुनी ईश्वर कारण ॥३॥ (य२पू.४७)
शुद्ध चैतन्यमों नाही जगदंगिकार ।
जाही हेतू मध्यें कीना माया ना स्वीकार ॥४॥
कण कोंडा बरोबरी जाहाला उत्पन्न ।
परी घेती शोधूनिया धान्य सुसंपन्न ॥५॥
तेवी मायेचाही बाबा अनादी विलास ।
परी ब्रह्मज्ञानक्षणीं होय तिचा नाश ॥६॥
स्वप्नीं कधीं घडेना कीं स्वप्नाचाहीं शोध ।
जागृतींत पाहावें तों नाहीं स्वप्न बोध ॥७॥
तैसी मायेंतील जना माया ही अनंत ।
ब्रह्मज्ञानीं पाहावें तों तिचा होय अंत ॥८॥
दोन्हीं पक्षीं माया जाणावया नाहीं ठाव ।
याचिसाठीं बुधजन धरीती न हाव ॥९॥
खोटी माया तरी वंध्यापुत्रसम नाहीं ।
वंध्यापुत्र न दिसे ही दिसे सकळांही ॥१०॥
खरी म्हणू तरी ज्ञान होतांक्षणीं जाय ।
याचिलागीं अनिर्वचनीय पर्याय ॥११॥
सत्यब्रह्मामध्ये कैसा मिथ्यामाया शोध ।
ऐसी शंका नको सत्यावरी मिथ्या बोध ॥१२॥
समसत्ते मध्ये सत्यासत्याचा विरोध ।
विषमसत्तेंत न सत्यासत्यविरोध ॥१३॥
उष्णता ती सत्य मृगजल मिथ्याभास ।
मृगजलतेनें परी नोहे उष्णनाश ॥१४॥
उष्णतेच्या अज्ञानानें मृगा होतो भ्रम ।
उष्णतेच्या ज्ञानानें मानव निर्भ्रम ॥१५॥
मिथ्याला मानितां सत्य होतसें बंधन ।

मिथ्या ऐसें कळतां मिथ्या न करी बंधन ॥१६॥
तेवीं ब्रह्माच्या अज्ञानें माया सत्यभास ।
ब्रह्मज्ञानें पुनः तीचा कळे मिथ्या वास ॥१७॥
मग न मायेचा त्याग किंवा अंगीकार ।
मृगांबू मानवा जैसें न करी विकार ॥१८॥
परी तरुनिया जाणें जलांतुनी पार ।
तरी घ्यावा लागे जैसा पाण्याचा आधार ॥१९॥
तेवीं माया तरावया अज्ञाना उपाय ।
अध्यारोप अपवादावीण अन्य काय ॥२०॥
अध्यारोप म्हणजे मायाउपाधीचे ज्ञान ।
अपवाद म्हणजे ज्ञानें तिचें मिथ्या भान ॥२१॥
तटस्थलक्षणें मायोपहित चेतन ।
ईक्षणें तें जगत्कर्तृ आणि निकेतन ॥२२॥
संक्षेपें हें निरूपिलें विस्तारें पुढें ।
ज्ञानेश्वरकृपें आतां होईल फुडें ॥२३॥
हरिः ॐ तत्सदिति चतुर्थ प्रकरणम् ॥ (य२पू.४८)

०००

## ॥ प्रकरण ५ वें ॥

आळंदीचा राणा आम्हां गुरु बापमाय ।
पुढें वदू प्रकरण वंदूनी तत्पाय ॥१॥
निमित्तोपादान मागें सांगीतलें ब्रह्म ।
तयावरी जगत् बाबा ! जाणावा हा भ्रम ॥२॥
जेवढें हें दिसे कांहीं रूप आणि नाम ।
ब्रह्माचा विवर्त आणि मायेचा परिणाम ॥३॥
कार्य झाल्यावरी पुनः न मिळे कारणीं ।
याचें नांव परिणाम बोलताती मुनी ॥४॥
स्वरूपाचा त्याग न करूनी दुजें रूप ।



होय त्यातें बोलताती विवर्त स्वरूप ॥५॥
शुक्तीवरी रुपें तें तो शुक्तीचा विवर्त ।
भ्रांतीचा परिणाम तो जाणावा आवर्त ॥६॥
विवर्ती कारण ब्रह्म, परिणामीं माया ।
हेंचि कळे जेंव्हां भजसी सद्‌गुरूच्या पाया ॥७॥
विवर्ती तें उपादान जाण अधिष्ठान ।
परिणामी उपादान अनादि अज्ञान ॥८॥
अज्ञानाला निवर्तक एक आहे ज्ञान ।
काय × उपडते कर्म आणि ध्यान ॥९॥
कर्मे चित्तशुद्धि ध्यानें विक्षेपाचा नाश ।
परंतु ज्ञानाने होतो यथार्थ प्रकाश ॥१०॥
ज्ञानामध्यें अवघें पाहतां अद्वैतची जाण ।
जीव ईश जगत हें केवळ अज्ञान ॥११॥
अज्ञानाचे तीन गुण सत्त्व रज तम ।
सांख्याचा स्वीकार येथें सिद्ध व्हाया भ्रम ॥१२॥
सांख्य मानितातीं मुख्य जैसे कां प्रधान ।
तैसे येथें नाही ब्रह्माधिष्ठानीं अज्ञान ॥१३॥

*बौद्धमत खंडन*

अधिष्ठानावीण नाहीं भ्रांतीचा प्रभाव ।
अधिष्ठानावीण भ्रांती बौद्धांचा तो भाव ॥१४॥
भ्रांतीमध्यें कोण? आणि भ्रांति कोण जाणे ?
भ्रांतीमध्ये सर्व तरी भ्रांती कोण म्हणें ॥१५॥
भ्रांती जाणे तरी मग तेंचि अधिष्ठान ।
शून्य काय बोलतोसी मूढा अप्रमाण ॥१६॥
तोची आत्मा स्वयंज्योती सांगताहे वेद ।
पावताती मुनी ज्याच्या ज्ञानानें निर्वेद ॥१७॥
त्या वांचूनी द्रष्टा नाहीं ऐसे सांगे वेद ।
म्हणोनीया बाबा ! तेथ नाहीं कांही भेद ॥१८॥

सोन्यामध्यें होती जैसे सोन्याचेचि होन ।
भेदवाक्य सांगे त्याला येथें × कोण ॥१९॥
सोन्याच्या सूतामध्यें सोन्याचे मणी ।
तैसे ब्रह्म अद्वैतीं हें विश्व तूं गणीं ॥२०॥
स्वप्नामध्यें काय आपण एकटा न होय ।
द्वैतीयांच्या मायबापा तेथ काह्याचि सोय ॥२१॥
बहिन्ला मी × या द्वैत्यांचा प्रवाद ।
न कळूनि कांहीं उगे करिताती वाद ॥२२॥
न जाणोनी कांहीं शुद्ध श्रुतींचा ही भाव । (य२पू.४९)
तुट्पुंज्या ज्ञानावरी बांधताती हाव ॥२३॥
शिळे तुकडे खाऊन उतले जैसे × ।
× तैसा या द्वैतियांचा भाव ॥२४॥
तोंडावरी थुका यांच्या सोडुनिया गोठ ।
दृढ धरा सद्गुरुच्या चरणाचें बोट ॥२५॥
वाच्यपक्ष सांडूनिया लक्ष्यांश सिद्धांत ।
अलक्ष्य तें ब्रह्म पाहा जाणोनी वेदांत ॥२६॥
वेदांताचें मुख्य तत्व आधीं एक जाणा ।
ब्रह्म एक सत्य माया अवघी मिथ्या माना ॥२७॥
सत्य म्हणजे तिहीं काळीं नाहीं ज्याचा नाश ।
मागें आतां पुढें याचा तैसाची प्रकाश ॥२८॥
सत्यापासूनिया जरी सत्य होय कार्य ।
तरी पूर्वी होते नव्हते सांगा कांही आर्य ॥२९॥
पूर्वी होतें कार्य तरी पुनः कैसें झालें ।
मागून झालें म्हणा तरी सत्य कैसें झालें ॥३०॥
सत्यापासूनिया जरी असत्यही होय ।
तरी मग वंध्यापुत्र दृष्टी कां न होय ॥३१॥
सिंहमाय भोगूं मग नपुंसकलिंग ।
त्यापासोनी ससा निघो घेउनिया शिंग ॥३२॥



संध्याकाळ खावोनियां भरो बाबा पोट ।
सूर्यापासून उत्पन्न हो बैल घोडे कोट ॥३३॥
खिशामध्यें भिंती राहो, नखामध्यें खांब ।
तीळामध्यें राहो बाबा राक्षसीणी भांब ॥३४॥
म्हणोनियां सत्यांतूनी असत्य न होय ।
सत्य कार्य म्हणा त्याची पूर्वी केली सोय ॥३५॥
सत्य कार्य म्हणती ते सांख्य ल्लो जाण ।
साळ्या, सत्य कार्य तरी कारण कां प्रधान ॥३६॥
कारण आणि कार्य जरी दोन्हीं सत्य होय ।
तरी मग कारणकार्य बद्ध कैसी सोय ॥३७॥
सर्व सत्य तरी मग भ्रम कांहीं नाहीं ।
बंधनही सत्य तरी मुक्ती कोणा नाहीं ॥३८॥
ऐसें काय निरूपण करीतोसी खुळें ।
गर्भामध्यें आईनें का बांधले होते डोळे ॥३९॥
नीघ येथून चाल चाल झडकरी बापा ।
आम्हाला तूं करूं देई तीव्र अनुतापा ॥४०॥
अनूतापबळें जगत् सर्व मिथ्या कळे ।
विषयांची भावनाही मनीहूनी गळे ॥४१॥
कार्यकारणावेगळें ब्रह्म तेव्हां कळे ।
देह अभीमान मग सहजची पळे ॥४२॥
परी ऐसे होय तेव्हां सद्गुरु जैं वळे ।
अन्यथा तों अभिमानें बोधही मावळे ॥४३॥
सांग सांग सूर्य काय केव्हांही मावळे ।
नीघ नीघ येथून तुझे आंधळे बा डोळे ॥४४॥
म्हणोनियां सत्यासत्य कार्य नोहे जाण ।
कार्याला कारण अनिर्वाच्य तें अज्ञान ॥४५॥ (य२पू.५०)
अज्ञानाचा परिणाम कार्य तेंही होय ।
अनिर्वाच्यपण त्याच्या आंगी आली सोय ॥४६॥
सत्यमिथ्या एका ठायीं मृगजळसम ।

तैसा ब्रह्मावरी बापा! जाणावा हा भ्रम ॥४७॥
प्रत्यक्षादि तुझे अवघे मिथ्या हें प्रमाण ।
सांडूनिया सर्व एक वेदांतची मान ॥४८॥
मुक्तावली मधूनी हा काढिला सिद्धांत ।
विस्तारानें पुढें हाचि सांगू बा ! वेदांत ॥४९॥
ज्ञानेश्वरकृपावशें शुद्ध होय चित्त ।
म्हणोनिया तेथें वाहूं तनुमनवित्त ॥५०॥
हरिः ॐ तत्सदिति पंचम प्रकरणम् ॥

०००

## ॥ प्रकरण ६ वे ॥

आगे आगे गुरू और पाछे पाछे चेला ।
गुरुबिन जीव बाबा ! जिता ना मेला ॥१॥
गुरुबिन मिले नहीं महावाक्य ग्यान ।
झाटा × हैं गुरुबिन ध्यान ॥२॥
गुरुबिन पावे नहीं वेदकाभी भेद ।
मायला मी × म्हणती जीव ईश भेद ॥३॥
जन्म मरणाची बाबा ! लाज वाटो कांहीं ।
देवावीण अंती तुला रक्षणार नाहीं ॥४॥



नारायण गोविंद म्हण शेषयायी ।
नारायण गुरुबंधू बाप और माई ॥५॥
दीनकूं तो कोई नाहीं हरीवीण भाई ।
हिंदूका तो राम मुसलमीनका तो साई ॥६॥
लेकराबाळामंधी साल्या व्यर्थ जन्म गेला ।
होउनिया वृद्ध × कां बे मेला ॥७॥
कोण आहे तुम्हाला बे ! म्हातारपणीं वाली ।
म्हणूनी मी सांगते तें ऐका तुंबडीवाली ॥८॥
डोळ्यावरी काय म्हणून पुतळी ते आली ।
मराल तुम्ही जसी तुमची माय बहिण मेली ॥९॥
याचिसाठीं म्हणा कृष्णहरि वनमाळी ।
घेऊनिया महावाक्य व्हावें ब्रह्ममाली ॥१०॥
अहंसोहं दोन्हीं बाबा ! मन पवन ख्याली ।
हुशार है तूं तो क्या काल कम ख्याली ॥११॥
काळा सामने न चाले तरवार ढाली ।
यमपुरीमंधी बाबा ! लोभ तुहां म्हाली ॥१२॥
आजवरी कैसा मुखामध्यें पान प्याला ।
आतां तरी घेई ज्ञानेश्वरनामप्याला ॥१३॥
॥ हरिःॐ तत्सदिति षष्ठ प्रकरणम् ॥
श्री ज्ञानेमश्वराजार्पणमस्तु
(य२पू.५१)
॥ तुंबडी समाप्त ॥

०००

### ७. चिरंजीवपदाभ्यास

## विषयदिग्दर्शन

एकनाथ महाराजांच्या **"चिरंजीवपद"** नामक प्रकरणांत जें वैराग्य सांगितले आहे त्या भूमिकेचें विशेष स्पष्टीकरण करून साधकाला येणाऱ्या प्रतिबंधावर गोड आणि सुलभ उपाय यांत सांगितला आहे, यांतील विषयांचा

क्रम :-

**सद्‌गुरुनमनपूर्वक विषयोपक्रम.**

सद्‌गुरुवचनेकरून शिष्याला ब्रह्मबोध होतो. (ओव्या १-५)

शब्द मिथ्या आहे म्हणून तो ब्रह्मबोध करण्याला समर्थ नाहीं या आक्षेपाचे सप्रमाण खंडन. साधकपणा आहे तोपर्यंत शब्देंकरूनच अविद्यानाश होतो. अमृतानुभवांतील शब्दखंडन ज्ञानोत्तरशब्दाभिमानाच्या निवृत्तीकरितां आहे. 'मी ब्रह्म' एकवेळ कळल्यावर शब्दाचा उपयोग नाहीं (६-११)

आकाश (शब्द) जगाला आरंभक असून दोन्ही समसत्ताक असल्यामुळें शब्देंकरूनच जग निवर्त्य आहे. प्रमाण श्रुती आणि अनुभव. (१२-१५ )

शंका - शब्द जगाला कारण आहे व कारण हें कार्यनिवर्तक होऊं शकत नाहीं, म्हणून जग वाचारंभणमात्र नाहीं.

समाधान - जगद्रूपी कार्य सत्य असतें तर शब्दानिवर्त्य असतें. परंतु शब्दमात्रच ज्याची उत्पत्ती आहे त्याचा नाशही शब्दानेच होतो, याला अनुभवच प्रमाण आहे. यद्यपि तर्काने कधीं कधीं प्रत्यक्षाचा बाध होतो, तथापि **युक्तीनें अनुभवाचा बाध कधींच होऊं शकत नाही,** कारण इतर सर्व प्रमावृत्तीहून अनुभवप्रमाणच श्रेष्ठ आहे. येथें बागुलाच्या दृष्टांताने अनुभवाची सिद्धि. आईच्या शब्दानें उत्पन्न झालेली बागुलाची भीति जशी तिच्याच ''बागुल मेला'' या शब्दाने निवृत्त होते, तद्वत् गगनशब्दाने कल्पिलेल्या जगाची सम्यक्‌निवृत्ती सद्‌गुरूच्या श्रौत महा-वाक्याने होते. याप्रमाणे शब्देकरून अविद्यानिवृत्तीची सप्रमाण सिद्धि.(१६-२४)

**(य२ पू.५३)**

परंतु सद्‌गुरु श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ असून शिष्याचें मन निर्वासन व ब्रह्मानंदाभिमुख असेल तरच तें ब्रह्माकार होऊन महावाक्यविवेक फलद्रूप होईल. **श्रवणकाली मन शब्दाइतके सूक्ष्म होणार नाहीं तर वेदांतवाचन महा शीण होय,** भगवत्सुख पाहिजे असेल तर मन शब्दाधीन राहिले पाहिजे व मन शब्दाधीन राहण्याला तें आकाशमय झालें पाहिजे. आकाशाहून इतर स्थलभूतांचे स्पर्शादिक गुण अंशतः जरी चित्तांत असतील तर अनेक प्रयत्न करूनही भगवत्प्रेम मिळणार नाही. मन विषयशून्य कसें करावें याविषयीं उत्तरगीतेंतील श्लोकाचें स्पष्टीकरण. विषयदृष्टीने मन शून्य करून आत्मदृष्टीनें व्यापक असावें. (२५-३३)



मन विषयशून्य होण्याला स्थूल (दृश्य) विषय सुटून अदृश्य परमात्मसुखच त्याला आवडूं लागलें पाहिजे, व परमात्मसुख आवडण्याला अनुताप उत्पन्न झाला पाहिजे. तो दोन कारणांनी उत्पन्न होतो. एक त्रिविध तापांत पोळल्यानें, व दुसरा विचारानें. दुःखानुभवानें अनुताप उत्पन्न होऊन गृहादिकांचा त्याग केल्यावर सत्संग न मिळाला तर ते पुरुष साधुपणाच्या आरोपानें लोकमानांत गुंतून शब्दादिविषयपंचकांत सापडल्यामुळे परमार्थमार्गातून भ्रष्ट होतात. त्या स्थितीचें थोडे वर्णन- (एकनाथ महाराजांच्या चिरंजीवपदाचा विषय) ह्या अनर्थातून सुटून विवेक उत्पन्न होण्याला भगवत्कृपाच पाहिजे. (३४-४५)

प्रारब्धप्राप्त भोग ज्ञात्याला बंधन करीत नाहीत या मतांतील रहस्य- प्रारब्धाने विषय मिळाले असतां प्राप्तदुःखाप्रमाणें ते आवडूं नयेत. **''इंद्रियाचें लाड पूरवूं नयेत''**. व **''अनाचारी ज्ञाता कामा नये''** अशीं तातादि संतांची वचनें. सर्वांचे प्रारब्ध सारखें नसतें. म्हणून **एकाच्या दुराचरणानें दुसऱ्याच्या दुराचरणाचें मंडन होऊं शकत नाहीं.** ईश्वर सर्वांचा शास्ता असल्यामुळें तत्कृत वेदाज्ञा प्रमाण आहे म्हणून सत्पुरुषांचे सदाचरणच घ्यावे. त्यांचे विलोकाचरण घेण्यास वेदाचें अनुमत नाहीं म्हणून घेऊन नये. दुसरें, **मोठ्यांची विलोकाचरणकथा साधकाला विषयांपासून सावध राखण्याकरितां असते,** एऱ्हवीं ते स्वतः निर्वासन असतात. तात्पर्य, **प्राप्तभोगांतूनही आसक्ती काढून टाकणेंच इष्ट आहे.**

**(य२पू.५४)**

जसा प्राप्त भोगांचा द्वेष नसावा तसा त्यांचे ठायीं रागही होऊं देऊं नये. ह्याचा साधकानें अभ्यास करावा व सिद्धाने जपून रहावें. विवेकी पुरुषाला विषय बाधा करीत नाहीत असें म्हणून विषय सेवन करूं पाहणारांचा निषेध. जीवन्मुक्त्यर्थ विषयरोध आहे, आम्हाला विदेहमुक्तिच पुरे ह्या मताचे खंडन. **जीवन्मुक्त झाल्याशिवाय विदेहमुक्ति नाहीं.** सारांश, विवेकाचे रक्षण वैराग्यबलानेंच होतें. (४६-६५)

ज्याला विचारानें अनुताप होऊन भगवत्कृपेनें विवेक उत्पन्न झाला आहे त्याला विवेकदृढीकरणार्थ विषयवैराग्य होते. वैराग्याचे चार प्रकार व त्यांचें स्पष्टीकरण. **व्यतिरेक** विरक्तानें स्त्रीसान्निध्याविषयीं कोणता नियम पाळावा याविषयीं दोन स्मृतींचा विरोधपरिहार व चित्तपरीक्षणार्थ त्यानें योषितवृंदस्थित व्हावें असा

निश्चय. (६६-८०)

**वशीकार** वैराग्यानें हेयोपादेयशून्या वृत्ति होते परंतु विषयद्वेष राहतो. तो जाण्याकरितां भगवंताला विषय अर्पण करून भगवद्भजन करावें. **श्रीहरीभजनाची गोड प्रक्रिया.** या प्रक्रियेने वशीकारापूर्वीच्या यतमानादि तीन भूमिका न ओलांडतां सहज हेयोपादेय शून्यावृत्ति होते व विषयद्वेषही राहत नाहीं. - ही विवेकपरिपाकदशा प्राप्त होऊन जडचेतनविवेक दृढ झाला असतां मन विषयशून्य व ब्रह्मानंदाभिमुख होतें व सद्‌गुरुकृपेनें अविद्या निवृत्त झाली असतां पूर्ण भगवत्सुख मिळूं लागतें. (८१-९३)

कैवल्यप्राप्तीनंतर ज्ञान व विरक्ती रक्षणार्थ अनध्यस्तविवर्ताचे भजन करावें.

**चिरंजीवपदाचा अर्थ -**

ज्ञानहोण्यापूर्वी जी (मुक्त्यर्थ) साभिलाषभक्ति असते ती ज्ञान झाल्यावर राहत नसल्यामुळें श्रीपती पूर्णपणें आवडू लागतो व अनध्यस्तविवर्तभजनानें दृष्टसुखप्राप्ति होऊन जीवन्मुक्ति मिळते. हेंच चिरंजीवपद होय. (९४-९६)

उपसंहार (९७-१००).

**(य २ पू ५५)**

## ७

# ॥ चिरंजीवपदाभ्यास ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

**ओव्या -**

**जयजय सद्‌गुरु जगन्मोहना । जयजय सद्‌गुरु चित्तभूषणा ।**
**जय जय सद्‌गुरु प्रकृतिदूषणा । करुणाघना विश्वपते ॥१॥**
**जय जय सद्‌गुरु कैवल्यदानी । जय जय सद्‌गुरु मायबहिणी ।**
**जय जय सद्‌गुरु अन्तर्निर्गुणी । बहिः सगुणी व्यवस्थित ॥२॥**
**आतां श्रीगुरुकृपावशें । शब्दब्रह्म जें आपैसें ।**
**हृदयामाजीं विलसे । ऐसें कीजे ॥३॥**
**सकळसुखा अधिष्ठान । आळंदीवल्लभाचे श्रीचरण ।**
**सप्रेमें हृदयीं धरोन । अळुमाळ वचन समर्पू ॥४॥**



**आधीं वचनाचेनि अनुकरें । चित्त ब्रह्मरूपीं भरे ।**
**येथ आक्षेपकारें । ऐसें म्हणिजे ॥५॥**
**शंका - अहो वचन तें समूळ खोटे । तें दावूं न शके ब्रह्म गोमटे ।**
**यालागी शब्द नेटपाटे । उपयोगी नव्हे ॥६॥**
**आणि अमृतानुभव षष्ठाध्यायी । शब्द सर्वथा खंडिला पाही ।**
**येणेही माने लवलाही । उपयोगु नोहे ॥७॥**
**'आत्मा या बोलाचे । कांहींच उपेगा न वचे ।**
**स्वसंवेद्या कोणाचे । ओज आथी'' ॥**
(अमृतानुभव अ०६ओ०१३)
**(समाधान) परंतु इया आक्षेपा । उत्तर द्यावया गुरुकृपा ।**
**समर्थ जालिया कां पा । निवटिजेना के ॥८॥**
**'म्हणोनी आघवींचि शास्त्रें । अविद्याविनाशाचीं पात्रें ।**
**वांचोनि न होती स्वतंत्रें । आत्मबोधीं'' ॥**
(ज्ञानेश्वरी अ० १८ ओ० १२३३)
**एवं ताताचेंचि वचन । जोंवरी आहे साधकपण ।**
**तोंवरी शब्देंचिकरून । अविद्यानाशू ॥९॥**
**आणि अमृतानुभवीचें शब्दखंडन । तें तंव याचिकारण ।**
**ज्ञानानंतर शब्दाभिमान । न यावा म्हणुनी ॥१०॥**
**मी ब्रह्म कळलिया एकवेळ । मग वाक्याचा उपयोग नसे केवळ ।**
**म्हणवोनि शब्द हा प्रबळ । व्यर्थ होय ॥११॥**
**परी जगदादि जाण । उत्पन्न जाहलें गगन ।**
**''तस्माद् वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः'' ही श्रुती ॥१२॥**
**आकाशाचा शब्दगुण । आकाशांत अवकाशपण ।**
**पुढें सर्व जग आकाशापासोन । वाचारंभण म्हणूनिया ॥१३॥ (य२पू.५७)**
**''वाचारंभणं विकारो नामधेयमिति'' । स्वये सांगे छांदोग्यश्रुती ।**
**आणि शब्द समानसत्ताक निश्चिती । अनुभूति असे ॥१४॥**
(शंका) **अहो जे शब्देंचि आरंभिजे । तें शब्देंचि निवटिजे ।**
**येथ कवणे आक्षेपिजे । कांहीं जरी ॥१५॥**
**कीं शब्द जरी कारण । तरी तो कार्यनिवर्तक न हो जाण ।**

यालागी वाचारंभण । जग हें नोव्हे ॥१६॥
(उत्तर) तरी या शंकेचें उत्तर । सावधान ऐकोत चतुर ।
कार्य सत्य असते साचार । तरी शब्दें निवटते ना ॥१७॥
परी शब्देंचि आहे जें बोलिलें । तें शब्दें नाहीं म्हणतां गेलें ।
हें अनुभवेंही होय कळलें । युक्तिविणें ॥१८॥
अनुभवा न बाधों शके युक्ति । यद्यपि अनुमान बाधी दृष्टाप्रती ।
तथापि ते प्रमावृत्ती । भिन्न उमटे ॥१९॥
सम प्रमाणांमाजि जाण । युक्ती बलवती नव्हे अनुभवाहून ।
आणि अनुभव तंव प्रमाण । येथ आहे ॥२०॥
तोचि अनुभव ऐसा । मातेंनें बागुल कल्पिला जैसा ।
माताचि 'नाहीं' म्हणतां आपैसा । नाश पावे ॥२१॥
तैसें गगनशब्दे कल्पिलें जग । तें महावाक्यें नाश पावे चांग ।
परी पाहिजे कृपायोग । श्रुतिमातेचा ॥२२॥
''तरी अनादि परब्रह्म । जे जगदादि विश्रामधाम ।
तयाचें एक नाम । त्रिधा पै असे ॥ ३२८॥
तें कीर अनाम अजाती । परी अविद्यावर्गाचिये राती ।
माजिं वोळखावया श्रुती । खूण केली ''॥३२९॥ (ज्ञानेश्वरी अ०१७)
''<u>जागर्यायै चिरसुप्तानां श्रुतिरंबावद् इती</u>'' । बादरायण सिद्धांत सूत्रोक्ती ।
म्हणवूनि शब्दें अविद्यानिवृत्ती । सिद्ध आहे ॥२३॥
परी तो शब्द होवावा ऐसा । जो ब्रह्मपणाचा ठसा ।
आणि मनोभावही आपैसा । अर्थमात्र होआवा ॥२४॥

*वेदान्तवाचन महा शीण*
*मन आकाशमय*

<u>शब्दाइतकें सूक्ष्म मन । जरी झालें नसेल पूर्ण ।</u>
<u>तरी वेदान्तवाचन । महा शीण ओळखे ॥२५॥</u>
म्हणवूनि मन आकाशमय होईल । तेव्हांचि तें शब्दाधीन राहील ।
मग महावाक्यविवेक फळेल । सद्‌गुरुकृपें ॥२६॥
शब्दाहोनी स्थूळस्थूळ । इतर भूतांचे गुण प्रबळ ।
स्पर्शादिक अळुमाळ । चित्तीं जरी ॥२७॥



तरी केलियाही प्रयत्न नाना । भगवत्सुख न मिळे मना ।
यालागी गगनपणा । चित्ती यावा ॥२८॥
हेंचि उत्तरगीतेंत । अर्जुना सांगती जगन्नाथ ।
संशयं छेत्तुं समर्थ । वचन तेंची ॥२९॥ (य२पू.५८)
''<u>खमध्ये कुरु चात्मानं आत्ममध्ये च खं कुरु ।</u>
आत्मानं खमयं कृत्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥''
उत्तरगीता.अ.१.श्लो.१२
येथ आत्मा म्हणजे मन । तें करावे गगनासमान ।
म्हणजे गगन सकळांमाजीं असोन । अलिप्त जैसें ॥३०॥
तैसें आसक्तिरहित सर्वदा । सांडोनि देहमर्यादा ।
सोडोनि वासनेची आपदा । ब्रह्मानंदाभिमुख ॥३१॥
आकाश जैसें पोकळ । तैसें मनही होवावें केवळ ।
परी आकाश जैसें शून्य सबळ । तैसें शून्यत्व नसावें मनीं ॥३२॥
विषयदृष्ट्या शून्य पूर्ण । आत्मदृष्ट्या व्यापकपण ।
यालागीं मयट् शब्द भगवान । वदते झाले ॥३३॥
आतां मन हें विषयशून्य कैसें होईल । तरी दृश्य जेव्हां सुटेल ।
अदृश्यचि आवडेल । मनामाजीं ॥३४॥
तेव्हां स्थूल विषय आघवे । सुटोनि जातील स्वभावें ।
परी येथ पाहिजे बरवें । अनुताप सत्त्व ॥३५॥

विरक्तीचे ४ प्रकार

त्रिविध दुःखांची आटाआटी । विश्वीं पाहोनि चोखटी ।
झडझडोनि भरली पोटीं । विरक्ति शुद्ध ॥३६॥
ते विरक्तिही चतुर्विध । पहिली [१]यतमान भूमि प्रसिद्ध ।
[२]व्यतिरेक ती विशद । दुसरी कीं ॥३७॥
[३]एकेंद्रिय तिसरीं जाण । चवथी ये [४]वशीकाराभिधान ।
आतां ययांचे निरूपण । क्रमें ऐकें ॥३८॥
अनुतापाचे प्रकार दोन । प्रथम [१]दुःखानुभवापासून ।
द्वितीय तो उत्पन्न । [२]विचारानें ॥३९॥

*बुवाबाजी*

त्यातूनिही प्रथम अनुतापें । गृह सोडोनि साक्षेपें ।
साधूपणाचेनि आरोपें । माजती जे ॥४०॥
तया लोकमानाचेनि बळें । विषयपंचक अरींची पाळें ।
कंठीं धरोनि एक्याचि वेळें । पाडती तळीं ॥४१॥
'हा प्रभूचा अवतार' इत्यादि स्तुती । करूनी लोक शब्दीं[१] पाडिती ।
मग करचरण रगडूनि प्रत्यया आणिती । स्पर्शविषयों[२] ॥४२॥
दृष्टि दावोनि नानाप्रकार । रूपविषयों[३] झोंबें परिकर ।
नैवेद्यामाजीं पदार्थ फार । रसविषय[४] तेणें जडे ॥४३॥
चंदन बुका पुष्पमाळा । पूजक आणोनि घालिती गळा ।
तेणें गंधविषय[५] आगळा । चित्तीं वाढे ॥४४॥
मग वंदित होते तेचि निंदिती । परी अनुताप नुपजे चित्तीं ।
जरी कृपा करील जगत्पती । तरी विवेक उपजेल ॥४५॥
एक म्हणती प्रारब्धेंकरून । जाहलिया भोगसंपन्न ।
तरी न होय बंधन । परीं रहस्य पूर्ण वेगळे ॥४६॥ (य२पू.५९)
प्रारब्धें मिळालियाही विषयांसी । वासना नसावी 'पाहिजेत' ऐसी ।
प्रारब्धें दुःखे मिळतां जैसीं । नावडती तैसीं नावडावी सुखे ॥४७॥
जक्षणादि व्यापार । ते तंव ज्ञानिस्तुतिपर ।
एऱ्हवीं अद्वेष्टृत्वादि शार्ङ्धर । ज्ञानिचिन्ह बोलिले ॥४८॥
''म्हणोनि इंद्रियें एके । जाणतेनि पुरुखें ।
लाळावीं ना कौतुकें । आदिकरुनी ॥''२०२-ज्ञानेश्वरी अ०३
हा तातबोधु होय । आणि ''ज्ञाता अनाचारी कामा नये''।
ऐसेंही वचन आहे । समर्थाचें ॥४९॥
देवोनि पराशरादींचें उदाहरण । मंडावे ज्ञानीं दुराचरण ।
तरी घेवोनी शुकादींचे उदाहरण । कां न सदाचरण मंडावें? ॥५०॥
मोठ्यांची विलोकाचरण कथा । द्योती साधक-सावधानतार्था ।
एऱ्हवीं तया महंता । वासना नाहीं ॥५१॥
आणि एकाच्या प्रारब्धासमान । दुजीयाचें प्रारब्ध नाही म्हणून ।
एका कवणाचें दुराचरण । अन्य दुराचरण मंडूं न शके ॥५२॥



म्हणाल साधूंचें आचरण । घ्यावया काय कारण ।
तरी सकळां शास्ता ईश्वर आपण । तत्कृत वेदाज्ञा म्हणून प्रमाण तें ॥५३॥
एक म्हणती विलोकाचरण गुरूचें । करितां नांव नलगे पापाचें ।
परी येथ वेदाचें । अननुमत ॥ ५४॥
''यान्यस्माकं सुचरितानि ।
तान्येव त्वयोपास्यानि । नो इतराणि'' ऐसीं वाणी ।
तैत्तिरीयोपनिषच्छिक्षाध्यायीं ॥५५॥
एऱ्हवीं तुमचियां मतें । ऐसें होऊं पाहते ।
जें प्रारब्धप्राप्तातें । लोभें घ्यावें ॥५६॥
क्रियमाण संचितें प्राप्त नाहीं । तरी ऐसा उपदेश झाला पाहीं ।
की ज्ञान झालियां विषयीं । अवश्य व्हावें ॥५७॥
हें अनिष्ट म्हणोन । प्रारब्धप्राप्ताहीहून ।
आसक्ति काढून । टाकावी सुखे ॥५८॥
प्रारब्धें रोग जडती । ती जावयाची इच्छा जैसी चित्ती ।
प्रारब्धें येता भोग संपत्ति । तेव्हां तैसीचि निवृत्ति कांक्षावी ॥५९॥
जरी प्राप्तभोग न द्वेषावे । तरी 'राग न होऊ देणे' सांभाळावे ।
हें साधके अभ्यासावे । आणि सिद्धांनी ठेवावें जपोनी ॥६०॥
(शंका) एकाचें मत ऐसें होय । कीं विवेकी जना विषय करतील काय ।
करी त्या सकामा माय । व्यर्थ व्याली मी म्हणे ॥६१॥
आणि हें एवढें मंडन । जरी विषयाचि कारण ।
तरी उगे हपापोन । कां मागावी मुक्ति? ॥६२॥
विषयरोध जीवन्मुक्त्यर्थ । म्हणेल विदेहमुक्तिचि पुरे यथार्थ ।
तरी जाहलियाविण जीवन्मुक्त । विदेहमुक्ति घडेना ॥६३॥ (य२पू.६०)
या लागीं जे ज्ञानाआधीं । मूर्तिमंत दोषनिधी ।
त्यागिले कामादि । वैराग्यबळें ॥६४॥
ते वमनसमभोग अनुचित स्वभावे । ज्ञानानंतर कैसे घ्यावे ।
तस्मात् विवेका रक्षावे । वैराग्यबळे ॥६५॥
असो हे सविस्तर निरूपण । चिरंजीवपदी पूर्ण ।

स्वामीं एकनाथ आपण । स्वयें बोलिले ॥६६॥

(१.यतमान वैराग्य)

परी आधींचपासोन । भगवदनुग्रहें करून ।
विवेक जाहला उत्पन्न । जयालागीं ॥६७॥
तया विवेकाचें सोज्वळ तेजें । विषयामाजीं दुःख उमजे ।
विषयसुखींही सहजें । दुःखचि देखे ॥६८॥
मग कंटाळोनि मन । आरंभी विषयरोध प्रयत्न ।
ही प्रथमभूमि यतमान । बोलिजें कीं ॥६९॥

*वैराग्याचे रक्षण*

नावडे कोणाचें गोड बोलणें । नावडे कोणाचें पूजणें ।
स्तुति ऐकताचि श्रवणें । बुजोनि घेतो ॥७०॥
नावडे परद्रव्य परान्न । मागो जाय कोरान्न ।
तरी धावेल की विषयी मन । यालागीं शीर्णपर्ण भक्षुनी राहे ॥७१॥
स्त्रियेंचें नांव ऐकतां कानी । तरी प्रवर्ते सचैल स्नानी ।
सकल दुःखा कारण मानी । कामिनी एक ॥७२॥
स्त्री सुत आणि धन । जनपूज्यता आणि मान ।
देखे वमनासमान । अन्तःकरण आवरूनि ॥७३॥
ही यतमानदशा वाढती होय ।

(२. व्यतिरेक वैराग्य)

तेव्हां व्यतिरेकभूमि लाहे ।
इतुके जिंकिलें विषय । जिंकावयाचे इतुके ॥७४॥
तेव्हां चित्ताची परीक्षा पहावया । जवळी ठेवी विषया ।
परी एकांती बैसोनियां । स्त्रियां न मानी ॥७५॥
येंचि विषयीं दोन स्मृती । आधी विरोधी दिसती ।
परी तयांची परिहार-रीती । सावध चित्तीं परिसावीं ॥७६॥
*''मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।*
*बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥'' भागवत.*
*''सुवर्णके हाटकसंपरीक्षा, धनुर्धराणां च रणे परीक्षा ।*
*सुज्ञानिनां योषितवृंदमध्ये, विद्यावतां भागवते परीक्षा ॥''*



पहिली स्मृती निषेधी 'एकान्त' । द्वितीय स्मृती 'वृंद' सांगत ।
भाव कीं व्यतिरेक-विरक्त । तेणें परीक्षार्थ वृंद-स्थित व्हावें ॥७७॥
मग समस्त इंन्द्रियांची कपाटे । लागोनियां नेटपाटे ।
विषयनिरोधत्रास उमटे । चित्तामाजीं ॥७८॥
तया त्रासेंकरून । विषयद्वेष होय उत्पन्न ।
द्वेष तंव क्लेश म्हणून । निवर्त्य आहे ॥७९॥
हीचि एकेन्द्रिय विरक्ती ।

(३. वशीकार वैराग्य)

मग हेयोपादेयशून्या वृत्ति । होय तयातें म्हणती । वशीकार गा ॥८०॥
(य२पू.६१) परी विषयद्वेष जावया । कीजे ज्या ज्या उपाया ।
तंव तंव धनसुतजाया । राग उमटे ॥८१॥
संसार करितां आसक्ति वाढे ।
वैराग्य धरितां द्वेष जोडे ।
एवं दोही परी कोडें । उगवेचिना ॥८२॥
परंतु यासी एक उपाय । आवडी ध्यातां यादवराय ।
भगवंतीं अर्पूनि विषय । होय निर्विषय सहजची ॥८३॥
*''योगी इन्द्रियें कोंडिती । ते कोंडताचि कष्टीं होती ।*
*भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें ते होती नित्यमुक्त ॥'' (ज्ञाने.)*
म्हणोनी वशीकार पूर्वीच्या तीन । भूमिका नोल्लंघोन ।
करितां श्रीहरिभजन । वशीकार सांपडे ॥८४॥
तेंचि श्रीहरिभजन कैसें । विषय दीसती जेव्हां जैसे ।
भगवंती अर्पूनि समरसें । ठेवावें चित्त ॥८५॥
परनिंदा निःशेष टाकोन ।
कर्णी ऐकावें श्रीहरिगुण ।
विष्णुनिर्माल्य चंदन । लावावे आंगी ॥८६॥
प्रतिमेचे आलिंगन । त्वचा अर्पावीं याचि कारण ।
डोळिया पहावें सांवळे सगुण । रूपसंपन्न गगनतनु ॥८७॥
रसनेचे जे जे रस । तेथ दिसावा जगन्निवास ।

देवासी अर्पूनि अन्नरस । आपण नाम सुरस सेवावें ॥८८॥
समस्त भगवंता अर्पोनि गंध । स्वयें घ्यावा निर्माल्यानंद ।
रामकृष्ण हरी गोविंद । जपावें वाचें (१) ॥८९॥
श्रीहरीचे सुकुमार चरण । प्रेमें पूजावें करेकरून ।
कीर्तनी नाचावया कारण । चरण उपयोगी पडावे ॥९०॥

---

(टीप १
* वाणी गुणानुकथने श्रवणौ कथायाम् । हस्तौ च कर्मसु मनस्तव पादयोर्नः ॥
स्मृत्यां शिरस्तव निवासजगत्प्रणामे । दृष्टिः सतां दर्शनेस्तु भवत्तनूनाम् ॥ भागवत १०-१०-३८)
* घेई घेई माझे वाचे । गोड नाम राघोबाचे ॥१॥ डोळे तुम्ही घ्यारे सुख । पहा विठोबाचे मुख ॥२॥ तुम्ही आईकारे कान । माझ्या राघोबाचे गुण ॥२॥ मनातेथे धाव घेई । राही विठोबाचे पाई । तुका म्हणे जीवा । नको सोडू या केशवा ॥५॥ - श्रीतुकारामबाबा)

---

अंबा मानोनि सर्व युवती । निःशेष निवटावीं उपस्थवृत्ती ।
आसनें पायू निश्चिती । वश कीजे ॥९१॥
प्रतिमेतील जडांश काढून । श्रीकृष्ण जो सचेतन ।
तयाचें ध्यानी लागावें मन । सर्वकाळ ॥९२॥ (य२पू.६२)
जडाहूनि चैतन्य वेगळे । परमात्मपणेही मिळे ।
यालागीं आपले पण पघळे । परमात्मेंचि ॥९३॥
एवं जाहलिया विरक्ति ज्ञान । तेंचि होवावया रक्षण ।
अनध्यस्तविवर्तभजन । जैसे तैसे ॥९४॥
ज्ञानाआधीं साभिलाषभक्ती । ते अभिलाषा जावूनि निश्चिती ।
ज्ञानानंतरही श्रीपती । आवडें पुरा ॥९५॥
ज्ञानें मिळे मुक्ती । भजने दृष्टसुखप्राप्ती ।
याचि नांव जीवन्मुक्ती । चिरंजीवस्थिती या नांव ॥९६॥
चिरंजीवपद प्रसिद्ध । तेचि विशेषें केलें विशद ।
आतां आटले भेदाभेद । एक गोविंद म्हणावा ॥९७॥
गोविंद शब्दाचा अर्थु । ज्ञानेश्वर परमार्थु ।
माय बाप गुरुनाथू । तोचि आम्हां ॥९८॥
श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदूनि पाउली ।
ओंविया कुसुममाळ समर्पिली । चरणीं प्रेमें ॥९९॥



निरोपिले श्रीज्ञानदेवें । वत्सप्रेमें गुरुगौरवें ।
तें आवडी आचरावें । श्रीगुरुकृपें ॥१००॥ (य२पू.६३)
॥ हरिः ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
चिरंजीवपदाभ्यासः समाप्तः ॥

०००

## ८. शांतिसुधाकर

# विषयदिग्दर्शन

ह्यांत अनेकवादखंडनपूर्वक नुसत्या तर्कानें अजातिसिद्धांताचें (अजाति= ब्रह्माची अनुत्पत्ति) निरूपण आहे. ह्यावर कोणी शास्त्रविहित अथवा तर्कसिद्ध पूर्वपक्ष करण्यास तयार असेल तर त्यानें समोर यावें असें महाराजांचे आव्हानपूर्वक म्हणणें आहे. ह्यांतील विषयक्रम असा आहे :-

मंगलाचरणपूर्वक विषयोपक्रम. शिष्यपरिप्रश्न :- (१) युक्तीनें ब्रह्मज्ञान सांगण्याविषयीं व - (२) ब्रह्मापासून विश्वोत्पत्ति कशी झाली ?

श्रीगुरूचें उत्तर - अवधान अचल ठेवण्याविषयीं आज्ञा. ब्रह्म सत्य व जगन्मिथ्यात्वसिद्धांत. सत्यज्ञानाचें लक्षण. (ओव्या १-६)

**पूर्वपक्ष** - कालत्रयाबाधित कांहींच नाहीं म्हणून सर्वच अनित्य आहे.

**खंडन** - अनित्यता सिद्ध करावयास काल मानावा लागेल. व तो काल नित्य मानल्यास कालाचे ठिकाणीं सत्ता व चित्ता मानावी लागेल **(य २ पू ६५)** अनित्य मानल्यास दुसरा काल मानावा लागून आत्माश्रयादि दोष येतील. व कालच न मानल्यास अनित्यता सिद्ध होणार नाहीं. (७-१३)

सर्वत्र अनित्य मानल्यास ती अनित्यता नित्य मानायची किंवा अनित्य मानायची असा प्रश्न व सर्वत्राविरोध, सर्वत्रविरोध, विरोधाविरोध, व परस्परविरोधखंडनपूर्वक ज्ञान नित्य आहे असा निश्चय (१४-२४)

अनेकवादखंडनपूर्वक तर्कानें शून्यखंडन व सत्ता त्रिकालाबाध्य आहे असा निश्चय (२५-६१)

अखंडेच्छेस्तव अनुभवानें सत्तेची नित्यतासिद्धि. सत्ता अखंड आहे हें प्रत्यक्षादिप्रमाणांनीं सिद्ध होत नाहीं तर स्वज्ञानानेंच सिद्ध होतें. चित्ता व सौख्य सत्तागत आहेत ह्याची युक्ति, अनुभव व श्रुतिस्मृतिप्रमाणांनी सिद्धि. (६२-७६). सत्तेला कालपरिच्छेदाप्रमाणें देश व वस्तुपरिच्छेदहीं नाहींत म्हणून ती निरवयव आहे. याप्रमाणें प्रथम प्रश्नाचें उत्तर. (७७-८२)

**द्वितीयप्रश्नाचें उत्तर** - प्रश्नाचें वैय्यर्थ्य. उत्पत्ति कशाचीच होत नाहीं. सतापासून सताची उत्पत्ति मानल्यास आत्माश्रयादि दोष येतात, असताची मानल्यास व्याघातदोष येतो, व सदसद्विलक्षणाची उत्पत्ति मानल्यास तें अनिर्वचनीय (भ्रम) असल्यामुळें आम्हाला अप्रतीत आहे. (८३-९४)

**ज्ञानाचीही उत्पत्ति होत नाहीं.** अज्ञानापासून ज्ञानाची उत्पत्ति मानल्यास तें सर्वसंमत नाहीं व अनुभवालाही येत नाहीं. ह्याविषयीं तातवाक्य प्रमाण, ह्याप्रमाणें ब्रह्माची अखंडता व एकरसत्वसिद्धी. (९५-१०४)

उत्पत्तिविनाशादि अन्यवाद्यांच्या वादाची अप्रमाणता. त्यांच्या वादविषयाची आम्हाला प्रतीति नाहीं म्हणून कोणाला होय नाहीं न म्हणतां मौन धरून आमच्या ज्ञानाची सिद्धि (१०५-१०८)

**उपसंहार** -

हा अजातिसिद्धांत सिद्धानुवादच होय. अजातिसिद्धांत प्रशंसा. श्रीज्ञानेश्वरस्तवन-पूर्वक ग्रंथनिवेदन (१०९-११८)

**(य२पू.६६)**

## ८

# ॥ शान्तिसुधाकर ॥

*युक्तीने ब्रह्मज्ञान*

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

ज्ञानेश्वरचरणरजें । प्रेमें शिरी घेऊनि सहजें ।
स्फुरलें तें ओजें । आदरें लिहूं ॥१॥
कोणी एक सच्छिष्य आपण । करोनी सद्‌गुरूतें नमन ।
म्हणे युक्त्या होईल ब्रह्मज्ञान । ऐसे निरूपण सांगा स्वामी ॥२॥
ब्रह्मापासोनि विश्वोत्पत्ती । जाहली तरी कवणे रीती ।
हें कृपा करोनी कृपामूर्ति । संदेहोच्छित्ती करावी ॥३॥
तैं करुणाभरें श्रीगुरु । वदती होय हेंचि करूं ।
परी अवधान महामेरू । अचल ठेवी ॥४॥
ब्रह्मसत्य जगन्मिथ्या जाण । आधी तुवां पुसिलें सत्यज्ञान ।
तरी तयाचें कवण लक्षण । सावधान ऐकें पा ॥५॥



सर्वथा काली तिही । जयाचा बाधचि नाही ।
तें सत्य ऐसीं ग्वाही । श्रुतिस्मृत्यादींची ॥६॥
**(शंका)** आतां कालत्रयाबाधित । ऐसें कांहीच नोहे यथार्थ ।
तरी सर्वानित्यता प्राप्त । सहज आलीं ॥७॥
जें सर्वांसी अनित्यता । म्हणजे उत्पत्तिविनाशवत्ता ।
तेथ कालग्राह्यता । न चुके कीरू ॥८॥
सकल उत्पत्तिविनाशवंत । हे कालावीण न कळत ।
आणि *कालही उत्पत्तिविनाशवंत । तरी कवण कालें घडे ॥९॥
आपणापासूनि उत्पत्ती विनाश । तरीं आत्माश्रय ये दोष ।
दोन काल मानोनी परस्पर उत्पत्तिविनाश । तरी दोष अन्योन्याश्रय ॥१०॥
एवं काल मानोनी तिन्हीं । उत्पत्ति विनाश मानतांक्षणीं । **(२पू.६७)**
चक्रिकापत्ति येऊनी । गळा पडे ।११॥
*मानिता अनंत कालधारा । तरी अनवस्थादोष पुरा ।
*काल न मानिता उत्पत्तिविनाश पसारा । ज्ञात नोहे ॥१२॥
आणि *कालचि नित्य मानिता । तरी कवण्या ज्ञानें कळे कालसत्ता ।
*काल स्वज्ञानेंचि जाणें स्वनित्यता । तरी नित्यचित्‌ता प्रसक्ती ॥१३॥
अथवा *सर्वचि जरी अनित्य । तरी *अनित्यपण नित्य कीं अनित्य?।
*अनित्यपण म्हणतां नित्य । कवण ज्ञान जाणते ।१४॥
अनित्य ज्ञानचि जाणे अनित्यनित्यता । तरी ज्ञानासी अनित्यता आणि
नित्यता । एके पदार्थी विरुद्धता । स्वीकारिता येईल कें ॥१५॥
प्रकाश आणि अंधःकार । केंवि एकाधिकरणीं स्थिर ।
आता न करिसी जरी विरोधांगिकार । तरी खंडन मंडन निमाले ॥१६॥
भूक आणि तृप्ती । बैसावी एके पाती ।
भाव आणि अभाव स्थिती । होवावी एक ॥१७॥
तुझा आमुचा सिद्धान्त । एकचि होवावा यथार्थ ।
विरोध स्वीकारितां तरी निश्चित । विरोधज्ञ ज्ञान असावे ॥१८॥
*सकल अविरोध म्हणतां । तरी गेली स्वपक्षता ।
सकल विरोध म्हणतां । तरी स्वपक्षता हारपे ॥१९॥
*सकल मानितां अविरोध । तरी परपक्षीं काय भेद ।

या लागीं स्वपक्षता प्रसिद्ध । न दिसे कोठें ॥२०॥
आणिक सकल मानितां विरोध । तरी स्वपक्ष सिद्ध परपक्ष कां असिद्ध?
यालागीं स्वपक्ष प्रसिद्ध । न दिसे पुन्हा ॥२१॥
आणि विरोधाऽविरोध स्थिती । एतदाकार होऊंचि न शके वृत्ती ।
म्हणोनि न घडे कल्पांती । मानणें हें ॥२२॥
विरोधज्ञ मानतां ज्ञान । तरी भिन्न असावें अनित्यतेहून ।
भिन्न परि अनित्य कीं नित्य प्रश्न । पुन्हा उमटे ॥२३॥
अनित्य जरी मानता । तरी आपणा आपुली अनित्यता ।
कवणिया रिती कळों सरता । न घडेचि कीं ॥२४॥
उत्पत्तिपूर्वी नव्हते । आणि नाशानंतर नाहिसें होते ।
तरी मग काय उरते । शून्य कीं नाहीं ॥२५॥
आणि शून्यहि नित्य मानता । तरी तया आहे कीं नाहीं सत्ता ।
जे नाहीं ते सर्वथा । नाही न म्हणवे ॥२६॥
भावाविण अभावज्ञान । हे न्याय न मानी आपण ।
आणि अनुपलब्धिप्रमाणें अभावज्ञान । ऐसें वेदान्त जरी म्हणें ॥२७॥
तरी सर्ववस्तूची अनुपलब्धी । हे हेतु यावया शून्य प्रसिद्धी ।
परि भूतलादि आधार सिद्धी । असें कीं नसे ॥२८॥
प्रथमपक्षीं शून्यमिथ्यता । द्वितीयपक्ष जरी मानता । (२पू.६८)
तरी लागेल प्रमाता । म्हणोनि ज्ञातसत्ता शून्यासी ॥२९॥
प्रमाता न तरी कें निर्धारू । भविष्यत् म्हणणें नयें सरूं ।
जे अनित्यचि नित्यसिद्धान्ताकारू । मति कें घडे ॥३०॥
एवं भूत भविष्य वर्तमान । अनित्य ज्ञानें शून्यसाधन ।
हें सर्वचि जाण । असंभूत ॥३१॥
ना ऐसेंचि जरीं आहे । तरी आग्रहावीण नोहे ।
मा आमचाचि संभवे । आग्रह न कां? ॥३२॥
द्वेषें न घडे सिद्धान्तू । यालागीं सत्ता तेथें ज्ञान वस्तु ।
आतां तेही निवटीतां निश्चितू । तरी अनित्यताही नाशे ॥३३॥
सकळ जाळुनी अग्नि आटे । तेंवि सकळ निवटूनि अनित्यता निवटे ।
ना जरी अनित्यता नित्य घटे । तरी प्रकटे उत्पत्तिविनाशप्रवाहो ॥३४॥



मग अनित्य नित्य या वादा । येणें घडलें नामविनोदा ।
आणि शून्यसत्ता प्रबोधा । नयेचि कदा ॥३५॥
भावज्ञान अभावशून्य सिद्धान्त । बाधो न शके भविष्यगत ।
आणि भूतशून्यातोनि उद्भूत । तरीं पुढेंही होईल तैसे ॥३६॥
ऐसें मानितां म्हणावे लीन । लीन तरी सत्तासंपन्न ।
सत्ता असत्ताश्रित जाण । न घडे कदा ॥३७॥
आतां असत्तेमाजीं सत्ता । मानणें हे अविरोधता ।
तरी स्थापणें असत्ता । निराकरणें सत्ता योग्य नोहे ॥३८॥
आणि नसतेंचि जरी येयावें । तरी सर्वदाचि कादाचित्क म्हणावे ।
सर्वदा तरी शून्यत्व आणावे । कवणिये वेळे ॥३९॥
सर्वदा असत्तेसी सत्ता । तरी केंवि सांपडे शून्यता ।
येवो पाहे सर्वशून्यता । परी गोचरता नव्हे म्हणोनि सर्वसत्ता सिद्ध ॥४०॥
आणि कादाचित्क जरी । तरी नियती कवणे परी ।
यदृच्छा असावी परी । नियती कां दिसे ॥४१॥
नियामक शून्य म्हणणे । हे सर्वथाचि अबोलणे ।
आतां शून्यावरी हे अनादि म्हणणे । तरी नष्ट न होईल कीं ॥४२॥
नष्ट न होतां पूर्वोक्त दोष । शून्यावरी भ्रान्ति म्हणतां विशेष ।
निरधिष्ठान भ्रमभास । अप्रतीत सर्वदा ॥४३॥
आणि भ्रान्ति म्हणजे ज्ञानें निवर्तावी । शून्यज्ञान तरी ज्ञाना वर्तमानता यावी ।
मग लागेल आणावी । ज्ञातसत्ता ज्ञानासी ॥४४॥
प्रथम होईल शून्यज्ञान । मग तें ज्ञान जाईल निवटोन ।
तरी तें शून्यज्ञान । भ्रांतीचि होईल ॥४५॥
भ्रांतीसी निवटावया लागेल ज्ञान । एवं आत्माश्रयादि दोषसंभवन ।
आणि शून्याचे जेव्हां होईल ज्ञान । तैं शून्यपण ससत्ताक होय ॥४६॥
ससत्ताक शून्य म्हणतां । तरी येईल अविरोधता । (२पू.६९)
मग शून्यज्ञान भ्रांतिसत्ता । न निवर्ते कदा ॥४७॥
आणि शून्यावीण शून्यज्ञान । तरी शून्यसंकल्पन ।
कल्पना स्थिर कल्पकाविण । कदा न राहे ॥४८॥
पुनः भविष्यत् शून्यज्ञान । तरी शून्य होवावे लागेल उत्पन्न ।

शून्य उत्पन्न तरी अनित्य होवोन । नाशधर्मकत्व येईल तया ॥४९॥
आणि उत्पत्ति तरी कोठुनी । शून्यांतूनि कीं सत्तेंतुनी ।
प्रथमपक्षीं आत्माश्रयादि वाहणी । द्वितीयपक्षीं व्याह(हृ)ती ॥५०॥
उत्पन्न आणि अविनाश । तरी हें बोलणें अपभ्रंश ।
नित्यताभाव कार्यास । कदा नोहे ॥५१॥
आतां अभावरूप कार्य म्हणोनि नित्यता । तरीं अभाव जाणावया कें
वर्तमानता । जाणणें नलगे म्हणतां । तरी अभावनित्यता साधी कवण ॥५२॥
बरोबरी राहे लोकांचे ज्ञान । ध्वंस सादिरनंत कळे म्हणोन ।
नातरीं सिद्धांतस्थापन । न घडे तयाचे ॥५३॥
अथवा कारणांतूनि शून्य उत्पन्न । तरी कारणासी सत्तापण ।
मग त्याही सत्तेसी भ्रांति म्हणण । शून्यावरी कें घडे ॥५४॥
प्रथम एक सत्ता होती । मग जाहली शून्योत्पत्ती ।
तरी ते सत्तानाशस्थिती । आली कीं नाहीं ॥५५॥
सत्ता असोनि शून्योत्पन्न । कीं सत्तानाशीं शून्योत्पन्न ।
प्रथमपक्षीं विरोधास्तव जाण । मार्जारसुतवत् प्रतिबंधक सत्ता ॥५६॥
म्हणोनी उत्पत्तिबरोबरी नाशसंभव । शून्याचा होईल स्वयमेव ।
सत्तानाशीं शून्योद्भव । तरी शून्यातूनि म्हणणें झाले ॥५७॥
ऐसेचि म्हणता पूर्वोक्त दोष ।
(पूर्वपक्ष) अहो वृश्चिकमातासम सत्तानाश ।
(समाधान) तरी हेहि निःशेष । निर्मूल बोल ॥५८॥
वृश्चिकशरीर वृश्चिकप्राण भेद । म्हणोनि वृश्चिकमातामरण प्रसिद्ध ।
मेलियाहि प्रेत विशद । दिसे तिचे ॥५९॥
सत्तेंत नाहीं द्विविधपण । शून्योत्पत्तौ सत्ता नाशे आपण ।
तरी वृश्चिक मातृप्रेतवन्नयन । न पाहती तीते ॥६०॥
कल्पना करितां अवस्तुपण । शून्यनाशपक्षी किमवशिष्ट पूर्ण ।
एवं कोणेहि विधीकरून । पूर्वपक्षिवचन सिद्ध नोहे ॥६१॥
यालागीं त्रिकालाबाधित । सिद्ध झाले सत ।
(अखंडता तेचि सत्ता)
अखंडेच्छेरस्तव निश्चित । अनुभवहि हा ॥६२॥



संसार असावा अखंड । अभिमानें प्रत्येक मत अखंड ।
अनित्यांचे अनित्य अखंड । ब्रह्म अखंड मुक्तांचे ॥६३॥
अखंडता घेऊनि जाणा । मग उठली पाहिजे वासना ।
सुखेच्छा असे तेहि जाणा । अखंडाची अखंड ॥६४॥ (२पू.७०)
अखंडता-ज्ञानाविण । कोणाचे कांहीं नव्हे व्यवहरण ।
अखंडतेसी कल्पन । न म्हणवे कीं ॥६५॥
एक कल्पी दुजा न कल्पी । ऐसी अखंडता नव्हे सोपी ।
जे जे कोणी कांही जल्पी । ते अखंडताज्ञान धरोनी ॥६६॥
आणि अखंडता तेचि सत्ता । हे सिद्ध झालें तत्वतां ।
हें कवणिया प्रमाणें आतां । घेववे कीं न घेववे ॥६७॥
प्रत्यक्षप्रमाणेंकरून । नोहे त्रिकालाबाधित ज्ञान ।
सर्वांसी भूत भविष्य वर्तमान । न कळे या हेतुस्तव ॥६८॥
अनुमानें त्रिकालाबाधित । कळता उपाधि कल्पनागृहीत ।
आणि कल्पनेसी अनंत । प्रतिबंधक असती ॥६९॥
म्हणोनि अनुमानही उपयोगी नाही । आतां शब्दप्रमाण जें कांही ।
ते प्रत्यक्षावरी पाही । बोलकियाच्या ॥७०॥
एवं उपमान अर्थापत्ति अनुपलब्धि । यांची कदाहि नोहे प्रसिद्धि ।
यालागीं सत्तासिद्धि । स्वज्ञानेंचि ॥७१॥
सत्ता म्हणतां अज्ञान । तरी कोण्या सत्तेवरी तिचे ज्ञान ।
एका सत्तेंत ज्ञान अज्ञान । विरोधी न घडे ॥७२॥
अज्ञानाभास ज्ञानेंचि कळत । म्हणोनि एकच ज्ञान सत ।
दुःख अखंड असावे कोणी नेच्छित । यालागीं सत्तागतचि सौख्यही ॥७३॥
*''सत्ताचि की सुख प्रकाशू । प्रकाशूचि सत्ता उल्हासू ।*
*हे न निवडे मिठांशू । अमृतीं जेवीं''॥७४॥*
हे अमृतानुभवीं बोलिले तात ।
*''सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म''*
*''आनंदो ब्रह्म''*
हा निगमसिद्धान्त ।
आणि हेंचि श्रीएकनाथ । स्वात्मसुखीं वदले ॥७५॥

*''सत तेचि चित । चित तोचि आनंद ।*

*वस्तु नोहे त्रिविध । एक पद निजांगें''।। ७६।।*

(काल / देश / वस्तु)

जेंवि काळें परिच्छिन्न नोहे सत्ता । तेवी देशपरिच्छेदहि नसे तत्वता । ७५

निरवयव म्हणोनि सिद्धता । जाहली याचीं ।।७७।।

देशपरिच्छिन्न सावयव सत्ता । ''निदिध्यासप्रकाशीं'' खंडिली सर्वथा ।

येणेंचि वस्तुपरिच्छिन्नता । निवर्तली ।।७८।।

जे देशवस्तुपरिच्छिन्न नाहीं । तयाचे अंश न घडती कही ।

येथ तंव सत्तांशकारक नाहीं । भिन्नसत्ताक ।।७९।।

आणि जें नाहीं सावयव । तयाचा न घडे उत्पत्तिभाव ।

श्रुतींत बोलिला आकाशोद्भव । तरी ते सावयव म्हणोनी ।।८०।।

कालादिक प्रतीतिमात्र । यालागीं परमार्थदृष्ट्या स्वतंत्र ।

निरवयवोत्पत्ति अणुमात्र । सिद्ध नसे ।।८१।।

एवं प्रथम जो तुझा प्रश्न । त्याचें उत्तर हें यथाज्ञान । (य२पू.७१)

आतां दुसरा जो प्रश्न । तो व्यर्थचि जाण सर्वथा ।।८२।।

(सताची उत्पत्ति?)

सताचीं नाहींच उत्पत्ती । मानितां तरी कवणे रीती ।

सतापासुनी उत्पत्ती । सताची कीं असताची ।।८३।।

प्रथमपक्षी कार्य सत । न होईल त्रिकालाबाधित ।

आणि कारणनाशहि निश्चित । सत्तेस्तव न घडेल ।।८४।।

आपणापासुनि आपण उत्पन्न । हेहि मिथ्याच बोलण ।

आपण नव्हतो हो अघटमान । प्रत्यय म्हणोनी ।।८५।।

सत्ताभेदें पूर्वोक्तदोष ।

(असताची उत्पत्ति?)

आतां असत जे कोणाचे शेष । तयाचीहि निःशेष । उत्पत्ति नव्हे ।।८६।।

असताची मानितां प्रतीती । तरी व्याघातादिदोषाची होईल संप्राप्ती ।

मग सिद्धांतस्थिती । कासयाची ।।८७।।

वंध्यापुत्रादिकांची अप्रतीति । सर्वदा, यास्तव नोहे असदुत्पत्ती ।

त्रिकालाबाध्य म्हणोनि नाशस्थिती । सताते नाहीं ।।८८।।



एवं सत्ता असत्ता अनुत्पन्न ।

(सदसद्विलक्षण / अनिर्वाच्य)

आतां जें सदसद्विलक्षण ।

तेहि नव्हेचि उत्पन्न । अनिर्वाच्य म्हणोनि ।।८९।।

सत्ता असत्ता ऐकैकविध । आणि अनिर्वाच्य अनंतविध ।

येथ कल्पितत्वावांचोनि विरोध । निवटेना कदा ।।९०।।

आणि कल्पितासि अवस्तुपण । किंवा कल्पावें लागे अनुभवाहून ।

ज्ञानविरोधास्तव अनुभवेना अज्ञान । आणि ज्ञान तें चैतन्य ब्रह्मचि ।।९१।।

चैतन्यब्रह्म तें सदेकघन । सदैकघन तें अनुत्पन्न ।

यालागीं सदसद्विलक्षण । असो अज्ञान कोणाचें ।।९२।।

अज्ञानाचे ज्ञान नाहीं । तरी हानि होते काई ।

ब्रह्मज्ञान सर्वदाहि । म्हणोनिया ।।९३।।

कवणाचा प्रश्न जरी । तो तया असो आम्हा चिद्विलास परी ।

जें अज्ञान कवणेपरी । हातासी न ये ।।९४।।

अज्ञानाचें नव्हे ज्ञान । अज्ञानातुनिही ज्ञानासंभवन ।

सर्वदा विरोधित्वास्तव सामान्यविशेषाविरोधपण । घेतांचि नये ।।९५।।

घेतले तरी गृहीत । तें नव्हे सर्वसंमत ।

कार्य अनुभव देतां निश्चित । ज्ञानमात्र तें ।।९६।।

कार्यानुमेय अज्ञान । तरी स्मृत्यनुमेय अनुभवही जाण ।

यालागीं सुषुप्तीहि पूर्ण । ज्ञानमात्रचि ।।९७।।

नाही ज्ञेय वस्तुज्ञान । जैसें आपुले उगे मीपण ।

सुख तरी अनुभूत म्हणोन । सुषुप्ती अज्ञान घडेना ।।९८।।

इतर सर्वचि ज्ञान । हे दावी प्रमाणस्मरण ।

आणि तातही आपण । वदले ऐसे ।।९९।।

*''तैसा जाणणियाचा व्यवहारू । जेथे माखला सुमरूं ।*

*तेथें आणिजे पूरू । अज्ञानाचा'' ।।१००।।*

(अमृ.७-१००)

ययां नाव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होआवे कैसे । (य२पू.७२)

इत्यादि वचन ठसे । श्रीगुरुनाथाचे ।।१०१।।

**अमृतानुभवीं सप्तमाध्यायीं । अज्ञान विस्तरे निरसलें पाही ।**
**तें अवलोकी लवलाही । मनीषा तरी ॥१०२॥**
**सर्व प्रमाणेकरून । अज्ञान नाही हे तेथ निरूपण ।**
**यास्तव कोण्याही दृष्टीकरून । सर्वहीं अनुत्पन्न ब्रह्मत्वें ॥१०३॥**
**आणि अनुत्पन्न तरी अलय । हें सिद्ध जाहलेचि होय ।**
**जैसे तैसे अक्षय । एकरसपणे ॥१०४॥**
**सकल नित्यखंडन । उपेक्ष्य पूर्वील शिष्यप्रश्नासमान ।**
**किंवा खंडनापाठीपोटी ज्ञान । खंडनिया सहित म्हणोन खंडितचि ॥१०५॥**
**जे करिती अन्यवाद । उत्पत्ती विलयादि सिद्ध ।**
**ते परस्परांत करिती विरोध । यास्तव अप्रमाण सर्वही ॥१०६॥**
**आमच्या ज्ञानातें सकलप्रतीति । आणि प्रतीति ही ज्ञप्ती ।**
**म्हणोनि होय नाही कवणाप्रती । न म्हणो आम्ही ॥१०७॥**
**अडलों आम्हीं तुम्ही दोन्हीं । परी आम्ही मौन, अडलेंपणाचे साक्षी होउनी ।**
**तुम्ही जाहलाती मौनी । कळेना म्हणोनि निग्रहें ॥१०८॥**
**एवं भली भली अजाती । आतां कें ये व्यक्ति जाती ।**
**स्वगत सजाती विजाती । न शंकिजे ॥१०९॥**
**हाचि उत्तम सिद्धांत । हेंचि रहस्य यथास्थित ।**
**ययापरौते किंचित । असेचिना ॥११०॥**
**तूतें बोधावे जों कांहीं । तंव बोध्यबोधकपणा नाही ।**
**यालागी बोलिजे हाही । सिद्धानुवादू ॥१११॥**
**बोलतां न बोलतां प्रकट । रुचित्वे अत्यंत अविट ।**
**यालागीं उचित सुघट । अनुवादू हा ॥११२॥**
**श्रीज्ञानेश्वर गुरुराये । एकत्वी जैसे केले होये ।**
**तैसे मज ठावो ठाये । नमन असो ॥११३॥**
**गंगासागर मिळणी । एकचि असे पाणी ।**
**कीं मोतियाचे पाणी । वा चन्द्र-चांदणी ॥११४॥**
**कीं वाचेचें वाचा नाम ग्रहण । तेंवि हें निकें अभेद नयन ।**
**आतां येथील न्यून पूर्ण । श्रीआळंदीराणा ओळखिता ॥११५॥**



**जयजय श्रीगुरु करुणार्णवा । जयजय सद्‌गुरो अकृत्रिम भक्तदेवा ।**
**जय जय अजाति ज्ञानदेवा । जयजय केशवा स्वसुतपा ॥११६॥**
**श्रीज्ञानेश्वर माय माउली । साष्टांग नमुनी पाउली ।**
**अखंडित करुणा साउलीं । परिचितचि हे ॥११७॥ (य२पू.७२)**
**तेथ आपणासहित बोल । चरणीं समर्पिले सकल ।**
**श्रीगुरु ज्ञानेश्वर निष्कल । सर्वत्रचि ॥११८॥**
**हरिॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे शांतिसुधाकरे ओवीछंदबद्धे**
**अजातिसिद्धांत निरूपणं समाप्तम् ॥**

०००

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

**९. सोपानसिद्धि (योगग्रंथ)**

# विषयदिग्दर्शन

साधनचतुष्टयसंपन्न न होऊन सुहृत्प्राप्तिसिद्धिवशात् सद्‌गुरुकृपालवानें ज्याला ज्ञान झाले आहें अशा ब्रह्मविद्‌भूमिकारथ साधकाला दृष्टदुःखनिवृत्तिपूर्वक जीवन्मुक्तिसुख मिळावें एतदर्थ ह्या सोपानषट्काची योजना महाराजांनी केलीं आहे.

**ह्यापैकीं कोणत्याही एका सोपानाच्या साह्याने साधक कृतकार्य होतो.**

ह्या ग्रंथाविषयीं (सूक्तिरत्नावली प्रथमयष्टी पृष्ठ १३६) यांत योगवासिष्ठातील प्रमाण देऊन महाराज म्हणतातः-

**स्वात्मतत्त्वाभिगमनं प्रायशो भवति नृणाम् ।**
**मुने विषयवैरस्यं कदर्थादुपजायते ॥**

विश्वामित्र म्हणतात :- हे वसिष्ठमुने, आत्मज्ञान एकवेळचें सहज होऊ शकेल, परंतु विषयांपासून चित्त निघणें कठीण आहे. श्रवणादिकेकरून अपरोक्षज्ञान झालें तथापि विरक्त्याद्यभ्यास ज्ञानानंतरही करावा, हा या श्लोकाचा अभिप्राय आहे. साधनचतुष्टय संपन्न मुमुक्षूला तर तो सहज सिद्धच असतो, परंतु साधनचतुष्टयसंपन्न न होऊन ज्याला आकाशफलपातवत् महावाक्यार्थ समजला त्याने ज्ञानानंतर विरक्त्याद्यभ्यास स्वतंत्र करावा. हें निरूपण सोपानसिद्धींत स्पष्ट केले आहे.’

ह्यातील विषयक्रम असा आहेः-

**सोपान १ ले –**

विरक्ति, उपरति व ज्ञान हे तिन्ही असल्यावाचून दृष्टदुःखाची **(य २ उ ७५)** निवृत्ति होत नाही, *ज्याला विरक्ति व उपरति असून ज्ञान नसते त्याला तपोबलानें पुण्यलोकांची प्राप्ति होते, व *ज्याला ज्ञान असून विरक्ति व उपरति नसतात त्याला **विदेहमुक्ति** होते, दृष्टदुःखनिवृत्ति होत नाही. म्हणून अशा पुरुषाने ज्ञान झाल्यानंतर * दृष्टदुःखनिवृत्ति होण्याकरिता विरक्ति व उपरतीचा अभ्यास करावा, व तो करीत असतांना * त्या तपाचे ठायीं कर्तृत्वबुद्धि न व्हावी म्हणून मनोनाश व वासनाक्षय यांचा अभ्यास करावा.

**सोपान २ ते ५ -**

हें न साधल्यास सद्‌गुरूस प्रणाम करून पुढील (२-५) सोपानांतील,

* द्रष्टा व दृश्य यांचे ऐक्य करून क्षणिक साक्षीत मुरणे,

* संकेत दृष्टींत विकार उठत असल्यास ज्या प्रतिबंधाच्या उपाधीमुळें तो उठत असेल त्याचा नाश करणें,

* विकार फारच प्रबल उठत असल्यास मनाला सद्‌गुरुभक्तीनें प्रेमवश करून साक्षीची ओळख करून घेणें,

* अथवा भस्त्राकुंभक करून मनाला मूर्छित करणें,

* एक उपाधि पुढें घेऊन त्या उपाधीत सामर्थ्यवान् चैतन्य कल्पून त्या चैतन्याची मनानें गांठ घेणें,

* यमनियम प्राणायामादि योगाभ्यास अथवा कूटस्थ ध्यानपूर्वक समाधियोग करणे,

* द्वैतामध्ये अद्वैत कसें पहावें याविषयी संधिदर्शनपूर्वक ब्रह्माभ्यास व व्युत्थानकाली विक्षेपनिवारणार्थ एकतत्त्वाभ्यास करणें.

इत्यादि प्रक्रियांतून एखादी प्रक्रिया आपल्या उपाधिप्रमाणें समजावून घ्यावी व त्या प्रमाणें अभ्यास करून कृतार्थ व्हावें.

**सोपान ६ वे : - संधिदर्शन**

**प्रश्न** - संधिदर्शन सिद्धांनांच होतें किंवा साधकांसही होते व दोघांची प्रक्रिया एकच आहे किंवा भिन्न आहे?

**उत्तर** - ब्रह्मानुभवाशिवाय ह्या जगांत कोणीच नाहीं. परंतु *बद्ध हे ब्रह्मानंद विषयावर आरोपित करून फसतात व *मुक्त तेथें स्थिर राहतात; व *मुमुक्षु विषयानंद क्षणिक असल्यामुळे त्यांत दोष पाहून सद्‌गुरुला शरण जातात व ह्याच संधिदर्शनाच्या प्रक्रियेने कृतार्थ होतात.

॥ समाप्त ॥



# ९

# ॥ सोपानसिद्धि ॥

## ॥ सोपान १ ला ॥

**॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

**नमः श्रीसृादिानन्दमखंडानन्दविग्रहम् ।**
**ज्ञानेश्वरं कृपामूर्तिं सद्‌गुरुं प्रणमाम्यहम् ॥**

**ओवी -**

**ॐ नमो सद्‌गुरु आई । मस्तक ठेवोनि तुमचे पायीं ।**
**स्वानन्दानुभूति लावलाही । बोलिजें सुखें ॥१ ॥**

गद्य - कोणी एक अंतःसभावान् शिष्य सद्‌गुरूतें ऐसा प्रश्न करिता झाला - जी महाराज! निरूपण केल्याप्रमाणें निरुद्धादि भूमिका ओलांडून, ''चारी देह मी नाही'' ऐशा अनुभवातें पावल्यावर, **हें जगत् संकेतरूप आहे,** ऐशा अनुभवातें धारण करीत होत्साता, मी आपणांसच पूर्ण व शरीरदुःखादिक भासतात ह्यावरून न्यून, ऐसा किमर्थ प्रतीत होतो? तें स्वामीतें पुसिलें, जे स्वामीवांचून दुसरे कळविणारें नाहीं . म्हणून ह्या विनंतीतें स्वीकारून प्रत्युत्तरें माझा संशय फेडावा, ऐसी आशा करितो.

स्वामी ह्या शिष्यभाषणातें परिसून (म्हणतात) ''तूं जे म्हणतोस. तें मी समजलों, जगत् संकेतरूप झालें असतां, ब्रह्माचें 'सृाति' रूपाचें भान स्पष्ट होतें, दुःखनाशाचे (किंवा) सुखलाभाचें होत नाहीं हेंच इंगित ना?''

''होय. तर श्रवण कर. विरक्ति, उपरति आणि ज्ञान हे तीनही असल्यावांचून दृष्टदुःखाची निवृत्ति होत नाही. ह्यांतून -

*केवळ तत्त्वज्ञानच असलें तर विदेहमुक्ति होते **(य२पू.७७)** आणि

*विरक्ति व उपरति असली तर पुण्यलोकाची तपोबळानें प्राप्ती होते.

बहुतेक विरक्ति व उपरति ज्ञानाचें आधीं राहतात. अशा पुरुषाला ज्ञान झाल्यानंतर अत्यंत सुखप्राप्ती होतें आणि ज्याला विरक्ति उपरति नसतां

गुरुकृपेकरून तत्त्वज्ञानाचा लाभ होतो, त्यानें दृष्टदुःखाचा नाश होण्याकरितां ज्ञानाच्या पश्चात् विरक्ति उपरतीचा अभ्यास करिजेतो.''

**शिष्य :-** ''जी स्वामी! ज्या तपाच्या बळेंकरून विरक्ति उपरति ज्ञानाच्या पूर्वी असतात, तेंच तप विरक्ति-उपरति नाहीत अशा पुरुषानें ज्ञानाचें पश्चात् आचरिलें असतां 'मी तप करणारा' ऐसी कर्तृत्वबुद्धि होऊ पावेल. तें फल झाल्यावर साधनांत पडल्यासारखें कां न होईल?

ज्याने हे साधनचतुष्टय संपादिले नाहीं ऐसियाला सद्गुरुकृपें संकेतज्ञान झाले असतांही *शारीरिक दुःख सहन करणें जें तितिक्षेचें फल व *मानसिक दुःखादि सहन करणें जे समाधानाचें फल, त्या साधनफलाची इच्छा होते हा अनुभव अस्का (आहे तर ) एवढा जो प्रतिबंध तन्निवारणार्थ काम काय कीजेल?''

स्वामी - ''तूं बरवे विचारिलें . अरे, ज्ञानाच्या पश्चात् विरक्ति उपरतीचा अभ्यास करण्याकरितां, पूर्वील तप करणाऱ्यांसारखी कर्तृत्वबुद्धि न व्हावी एतदर्थ वासनाक्षय व मनोनाश यांचा अभ्यास कीजे.अथवा हें न साधेल तर गुरूस प्रणाम करून ज्ञान पश्चात् दृष्टदुःखनिवारणार्थ दुसरे कांहीं उपाय कीजेत. ते येणें प्रमाणें :-

## ॥ सोपान २ रे ॥

पहिले आपला अनुभवाविषयी काय सिद्धांत झाला आहे तो पाहणें. तो सिद्धांत देवदर्शनादि विशेष दृश्याविषयींचा असल्यास त्याचा त्याग किजे. जैसें ज्ञानेश्वर महाराजांनीं तेराव्या अध्यायी बोलिलें.

**ते अनिरूप्य की निरूपिजे । ऐकतां बुद्धि आणिजे ।**
**वांचूनि डोळा देखिजे । ऐसें नाहीं ॥**

(१) म्हणून देवदर्शनविशेष दृश्यानुभवसिद्धान्ताचा त्याग करून, बुद्धीतील आपलेपणा काढून, **(य२पू.७८)** मग राहील त्या बुद्धीनें मोकळे फिरून, क्षणेक साक्षींत मुरले असतां श्रमाचें साफल्य झालें असें जाणावें, अथवा

(२) देवदर्शनादिविशेष दृश्यानुभवाचा त्याग होत नसेल तर– सुवर्णादि धातूंच्या मूर्तीचें चिंतन करून, त्यांतील आकृतिभाव सांडून, धातूंच्या नुसत्या तेजोमय स्वरूपाचें ध्यान केलें असतां बुद्धीशीं मेळ पडेल. मग त्याने आपलेपणा



काढला असतां बुद्धि मोकळी सुटली तर द्रष्टृ-दृष्ट्याचा मेळ करून देण्याला तिला सवड नाहीं असें का आहे?

## ॥ सोपान ३ रे ॥

(१) संकेत-दृष्टीत जो विकार प्रबल उठत असेल, तो आपल्या कारणानंतर उठतो, कीं कारणनाश होऊन स्वयं उठतो ह्याचा विचार करून, कारणनाशावाचून उठत असेल तर संकेतदृष्टी चांगली समजली नाही असे जाणून **'वेदान्तपदार्थोद्देशदीपिकेत'**(य.१३) दिलेल्या सोळा प्रतिबंधा पैकीं कोणता प्रतिबंध आहे तो समजून, निवारण्याविषयीं यत्न करावा.

(२) अथवा प्रतिबंधाच्या जोराने पुनः बुद्धी फसेल तर, त्या वेळेस साध्य नाहीं असे समजून कांही दिवस विश्रांति घेऊन आळंदीची दिशा पाहत पाहत एखाद्या दिवशीं मन खुषींत आले असतां, त्याजकडून **'आपला आहेपणा'** रक्षण करण्याची चाकरी करून घेतली असतां कृतार्थता होईल.

(३) पण तें मोकळे मन जर देहावर न येता संकेताला घेईल, तर स्वप्नांत कां न फसेल? कारण तो संकेत मनापुरता झाला, म्हणून अशा वेळीं मनाला एक मर्यादा करून **भस्त्रा कुंभक** केला असतां मन मूर्च्छित होते. मग परमानंद मिळू लागतो.

## ॥ सोपान ४ थे ॥

(१) अथवा हे न होईल तर एक उपाधि पुढे घेऊन त्या उपाधींत सामर्थ्यवान् चैतन्य कल्पून त्या चैतन्याची मनाने गांठ घेतली असतां हा अभ्यास साध्य जाणावा.

(२) हेही होत नसल्यास समाधि कीजे. *तो समाहितचित्त नसला तर यम, नियम, प्राणायामादि योग पूर्ण करून तो साध्य होतो.

आणि *समाहितचित्ताला केवळ वैराग्यपूर्वक समाधीचा **(य२पू.७९)** अभ्यास केला असतां साध्य होतो.

तो सविकल्प आणि निर्विकल्प ऐशा भेदाने दोन प्रकारचा आहे.

त्यांत सविकल्प, (१)वितर्क- (२)विचार- (३)आनंद- (४)अस्मिता ऐशा भेदाने चार प्रकारचा जाणावा.

हे सर्व समाधि सर्वांसच करण्याची आवश्यकता नाहीं, एकाही समाधीवरून ब्रह्मपदाला जाऊन पोचणारे आहेत.

आतां हे समाधी सुलभ साध्य व्हावेत म्हणून कूटस्थ अभ्यास करणे.

# ॥ सोपान ५ वे ॥

(संधिसमाधीची साधना)

द्वैताच्यामध्यें अद्वैत पाहणें हा मुख्य ब्रह्माभ्यास !

(१) त्याचा स्पष्ट अर्थ सांगावयाचा म्हणजे ''दोन पदार्थाच्यामध्यें जो देश असेल तो ज्या चैतन्याचे योगाने भासतो, तोच आहे.'' स्थूलपदार्थापासून तो कारणपदार्थापर्यंत ह्याचा अभ्यास कीजे.

ज्या स्त्रीपुत्रावर आवडी असेल त्यांतील स्त्री पुत्र वेगळी करून राहिलेली आवडी जाणून तिला मोकळे सोडावे; आणि मग पुढें पंचायतन घेऊन त्या पांचांही खड्यांच्या ठिकाणी सामर्थ्यवान् चैतन्य कल्पून अथवा तारक ब्रह्मबुद्धि करून त्या पाचांही खड्यांवर दृष्टी फिरवित जाणें.

त्यांत एका खड्याहून दुसऱ्या खड्यावर जेव्हां दृष्टी जाते, तेव्हां मधील दिशा पाहून आपले भान असावे.

त्या कालीं *आपले भान नसेल तर सुषुप्तींत फसेल, अथवा *अहंभाव घेईल तर वृत्ति होईल,

म्हणून हा अभ्यास कठिण गेल्यास दोन खड्यांच्या मधली दिशाच पाहून, स्वस्थ बसून ज्याचें ठिकाणीं आपली तारकब्रह्म बुद्धी चांगली झाली असेल ती इष्टदेवता समजून, तिचें स्मरण झाल्यावर बुद्धीला मोकळी सोडून देऊन, मोकळ्या दशेंत अकस्मात् **संधि** स्फुरेल! ती स्मरली म्हणजे कृतार्थता होते.

(२) अथवा दोन *इंद्रियांच्या, अथवा *वर खालीं जाणाऱ्या श्वासाच्या, अथवा *दोन वृत्तींच्या मधल्या आपल्या भानावर लक्ष असून जितक्या वृत्ती उठतात तितक्या संधी उठतात. परंतु -

**बद्धांचे लक्ष वृत्तीवर व मुक्तांचे लक्ष संधीवर असते.**

म्हणून तसेच लक्ष आपण ठेऊन, द्रष्टा स्मरला म्हणजे गिरिसमुद्रादिक ब्रह्मांडविकार, हस्तशिरादिक पिण्डविकार हें सर्वच संकेत असें जाणून, संधीमध्यें



क्षणभर स्वस्थ झालें असतां काय होईल तें सांगता येत नाही. **(य२पू.८०)** तें अनुभवानेंच जाणण्याजोगें आहे. ह्या समाधीतून व्युत्थान झालें तर पुनः तेंच करून निदिध्यासनद्वारा येथें यावें.

(३) **निदिध्यासनाची परिपृ दशा समाधि म्हणावा** आणि पुनः व्युत्थान होऊन कांहीं सांसारिक कार्य असेल तर त्या वेळेला तें कार्यही करावें. परंतु त्याकालीं सद्गुरुमुखानें जेवढें श्रवण केलें असेल, तेवढ्याचें मनन करावें, आणि त्याहीवेळीं कांही विक्षेप त्रास देतील तर स्नेही अथवा गुरु ह्यांच्या जवळ जाऊन वाणीनें अथवा मनानें असा ब्रह्माभ्यास करावा :-

**तृतिनं तत्कथनं तदन्योन्यप्रबोधनम् ॥**
**एतदेकपरत्वं च ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः ॥**

ह्या प्रमाणें झाले म्हणजे 'मी ब्रह्म जाणलें' हें ज्ञान आणि 'जाणलें नाहीं' हे अज्ञान या दोहोंच्या मध्ये आपलेपणा रक्षण करून निर्विकार झाले असता कृतार्थता अति आहे.

०००

# ॥ सोपान ६ वे ॥

**शिष्य :-** बालबाटुक (भातकें) हटाप्रमाणें सद्यः कांहीं अन्य पुसावेसे वाटतें, तद्विषयीं स्वामी कृपा करून आज्ञा देतील तर मी चरणीं समर्पण करण्याचें लेकुरधाडस केल्यावर उत्तरपयःपानानें तृप्ति प्रचूर होईल, ही आशा आहेच आहे.

**श्रीगुरु :-** तसेंच असो.

**१. सत्यं भवतु ते वचः ।**

**२. वत्स! यत्ते मनसि स्थितं तन्मदप्रत्यवायाशंकया मदीयाभयतश्च सम्यक् प्रष्टुमर्हसि ।**

**३. शिष्य :- यत्पुरोक्तं भगवन् संधिदर्शनं, तत्सिद्धानामेवोत साधकानामपि?**

**४. आद्यपक्षे, कथं तस्यानुभवपूर्विकयोजना ?**

**५. द्वितीये वा, कथं अभ्यासपूर्विका ?**

**६. पुनरियमेव प्रक्रिया वान्या ?**

७. कतिपयभेदा अस्याः?

८. सिद्धानां साधकानां च समानत्वेनैवाभ्यसनीया उत किमपि रहस्यमस्ति?

९. एतत्सर्वं स्वामिचरणकृपां विना न कोपि व्याख्यातुं समर्थस्त्रिषु लोकेषु।

१०. श्रीगुरु :- श्रुणु वत्स !

११. नहि ब्रह्मानुभवं विनाऽस्मिन् जगतितले जीवमात्रमुपलभ्यते।

१२. किन्तु तत्रायमेव विशेषः।

१३. बद्धाश्च सुषुप्त्यवस्थायामेव तमोभिभूततया सदानंदभोक्तारो भवन्ति।

१४. चिदंशाभ्युपगमे सुषुप्तेः जडत्वाऽसंभवात्।

१५. यद्यप्येकस्मिन् ब्रह्मणि पृथक् ज्ञानरहिते सुादिानंदांशज्ञानं पार्थक्येन न संभवति। (य २ पू ८१)

१६. तथापि तदाश्रयायास्तद्विषयायाः कार्यानुमेयरूपाया लोकानुभवतो ऽ र्थापत्तिप्राप्तायाः स्वतोऽनिर्वचनीयमात्रायाश्चिदानंदमयब्रह्मप्रतिबिम्बिताया विक्षेपावृतिरूपायाः *(विक्षेप = अन्यथाभास / आवृति=लोप )* प्रकृतिर्मायाऽ ज्ञानाऽ विद्यादि पर्यायशब्दसंघटितवाच्यायाः कस्याश्चिच्छक्तेरंशाभ्युपगमाद् अस्ति तदुपहितब्रह्मणोऽपि अंश इव अंशत्वमग्नीन्धनवत्।

१७. तत्सासामान्यविशेषमात्रमेव।

१८. तत्र सामान्यं सत्तामात्रमविद्याऽऽधारत्वेन प्रतिष्ठम्।

१९. विशेषं तु शुद्धबुद्धनित्यमुक्तचिदानंदमात्रम् अविद्याऽधिष्ठानं शुक्तिरजत इति संक्षेपशारीककारिणोऽभ्युपगच्छन्ति।

२०. तत्र, अविद्याया अवस्थात्रयं सर्वे वेदान्तिनः कल्पयन्ति।

२१. जागृत्, स्वप्न, सुषुप्ति इति भेदात्।

२२. यद्यपि बद्धा असत्त्वापादनावृत्या ऽविद्यांशेनाभिभूताः सदंशेऽपि ब्रह्मणि मनो नेतुमसमर्थाः।

२३. तथापि तृतीयायां बुद्ध्यादिलीने तमोभिभूतेऽपि परमात्मोपवेशतयैव[1] आनंदांशमुपलभन्ते। *(१ उपवेशतया = समीपत्वानें)*

२४. 'सुषुप्तिकाले सकले[2] विलीने तमोऽभिभूतः सुखरूपमेति' इतिश्रुतेः। *(२ बुद्ध्यादि)*



२५. जागृदवस्थायां ''सुखमहमस्वाप्सम्'' इति स्मृतिरूप वाक्यो।ारानुमेय-प्रत्यय।ा।

२६. न तत्र चिदंशज्ञानमुपजायते जाड्यप्राधान्यात्।

२७. विजातीयेऽपि जाड्याविरोधान्नानंदप्राप्तौ प्रत्यवायः किन्तु सोऽप्यज्ञान-प्रतिष्ठोऽ भिभूततयाऽ नित्य इवानित्यः।

२८. व्युत्थाने स्मृतिप्रवृत्त्योः परिलाभे दुःखप्रतीतौ च बाध इव बाधदर्शनात्।

२९. जागृदज्ञानात् दृष्टिसृष्टिवादे दृष्टिमात्ररूपत्वाद्वा सतीष्ववस्थासु तिसृषु समानांगीकार।ा घटादावना।तिव्याप्तिः, (घटादावनातिव्याप्तिः)

३०. एवंगुणविशिष्ठाः[3] भोगसमयशांतवृत्त्यानंदभोक्तारः (मूढ, घोर, शांत, तमो, रजः, सत्त्व) तमेवाचिराद् विषयेषु स्थापयन्तोऽन्तःकरणवशतया न विवेकाग्रह विषयत्यागाभ्याम् उपसन्नन्नियतब्रह्मज्ञानसाधनमुपाश्रयन्ते। *(३ बद्ध)*
(उपसन् न नियतब्रह्मज्ञानसाधनम् उपाश्रयन्ते )

३१. अन्ये तु दुःखजिहासया शास्त्रश्रवणाज्जगतो ऽधिष्ठानाद् दैवीसंपद् उपलब्ध्या सुषुप्त्यादिसुखलिंगतो किमपि नित्यमुक्तमित्यनुमानबुद्ध्या प्रत्ययवन्तो लब्धसाधनचतुष्टयसंपन्नतया च श्रोत्रियब्रह्मनिष्ठलक्षणम् आचार्यम् अनुप्राप्य-इमाम् एव प्रक्रियां प्रश्रयन्ति।

३२. वृत्तिविस्मरण-संधिस्मरणाभ्यामिति शेषः ॥ (य२पू.८२)

॥ समाप्त ॥

०००

***ज्येष्ठ वैय्याकरणी श्री. मुरलीधर शास्त्री पाठक (नागपूर) यांनी केलेला मराठी अनुवाद –***

*श्रीगुरु :- बाळा, तुझे म्हणणे बरोबर आहे. तुझ्या मनात विचारावयाचे आहे ते खुशाल विचार माझ्याकडून तुला पूर्ण अभय आहे.*

*शिष्य :- हे भगवन्, जे आपण पूर्वी सन्धिदर्शन म्हणून सांगितले ते सिद्धांच्या साठीच आहे कीं, साधकांच्याही साठी आहे? प्रथम पक्षी त्याची अनुभवपूर्वक योजना कशी ? व द्वितीयपक्षी अभ्यासपूर्वक योजना कशी? पुनः असे कीं ही एकच प्रक्रिया आहे की दुसरीही प्रक्रिया संभवते? हिचे किती भेद आहेत? सिद्ध व साधक यांनी या प्रक्रियेचा सारखाच अभ्यास करायला हवा, कीं त्यांत काही वेगळे*

*रहस्य आहे? हे सगळे स्वामींच्या चरणकृपेविना कथन करण्यास त्रैलोक्यात कोणीही समर्थ नाही.*

*श्रीगुरु :- बाळा, ऐक. या जगात ज्याला ब्रह्मानुभव नाही असा कोणीही प्राणिमात्र नाही. पण त्यात विशेष हेंच की, बद्ध प्राणी सुषुप्ति (गाढ निद्रा ) स्थितींतच तमोगुणाने अभिभूत होऊन सत् अशा आनंदाला भोगतात. या आनंदाला चित्‌अंश युक्त मानल्यास सुषुप्ति-स्थितीचे जडत्व संभवत नाही. जरी एकाच ब्रह्माच्या ठिकाणी ज्ञान अंश पृथक राहू शकत नसल्यामुळे, सत् चित् व आनंदाचे ज्ञान वेगवेगळ्या रीतीने संभवूं शकत नाही, तथापि त्या ब्रह्माचाच जिला आश्रय आहे, अशा तद्विषयक असलेल्या जिचे रूप तिच्या कार्यावरून अनुमानाने कळते अशा, जिची सिद्धि अर्थापत्ति प्रमाणाने होते अशा, स्वतःमात्र अनिर्वचनीय असलेल्या, चिदान्दमय ब्रह्मामध्ये प्रतिबिम्बित झालेल्या, विक्षेप (अन्यथाभास) व आवृति (लोप) हे जिचे रूप आहे अशा, प्रकृति, माया अज्ञान, अविद्या, इत्यादि पर्याय शब्दांनी जिचा व्यवहार होत असतो अशा, कोण्या तरी एका विलक्षण चिच्छक्तीच्या अंशाचा स्वीकार केल्यामुळे, ज्याप्रमाणे, इंधनाचा एक अंश म्हणजे अग्नि असतो त्याप्रमाणे मायोपहित ब्रह्मालाहि, माया त्याची अंश इव असल्यामुळे अंशित्व प्राप्त झाले आहे.*

*ते सामान्य व विशेषरूपहि आहे. त्यात सामान्य सत्तामात्र अविद्येचा आश्रय म्हणून प्रतिष्ठित आहे. विशेषरूप मात्र, शुद्ध, बुद्ध, नित्यमुक्त, चिदानन्दमय असून चांदीच्या भ्रमाला जसे शिंपले अधिष्ठान असते त्याप्रमाणे ब्रह्म अधिष्ठान म्ह. आश्रय आहे, असे संक्षेपशारीरककार मानतात.*

*सर्व वेदान्ती अविद्येच्या जागृत, स्वप्न, सुषुप्ति अशा तीन अवस्था कल्पित असतात जरी बद्ध प्राणी असत्त्वापादन अशा*
*अविद्येच्या आवरणरूप अंशानेअभिभूत होउन*
*ब्रह्माच्या ठिकाणी मनाची धारणा करण्यास असमर्थ असतात. तथापि तिसऱ्या म्ह. सुषुप्ति अवस्थेत बुद्धि इत्यादि लीन झाल्यामुळे तमोगुणाने अभिभूत होऊन देखील परमात्म्याच्या देश सान्निध्यामुळे आनंदाच्या अंशाला प्राप्त करतात.*

*सुषुप्तिकाले सकले विलीने तमोऽभिभूतः सुखरूपमेति'*

*या श्रुतीच्या अनुसार व जागृत-अवस्थेत तर, 'मी सुखाने झोपलो होतो' अशा स्मरणामुळे व अनुमानयुक्त अनुभवामुळे त्या स्थितीत चैतन्याच्या अंशामुळे फक्त ज्ञान होत नसते कारण, त्या अवस्थेत जाड्या प्रधानता असते. याहून वेगळ्यां स्थितीत जाड्याशी विरोध नसल्यामुळे आनंदाची प्रतीती होण्यास कांहीच अडचण नाही. पण तोही आनंद अज्ञान प्रतिष्ठितच असल्यामुळें व अभिभूत झाल्यामुळे अनित्यच मानल्या जातो. कारण व्युत्थान स्थितीत स्मृति व प्रवृत्तीच्या समयी दुःखप्रतीति येत असल्यामुळे त्या आनंदाला बाध इव स्थिति प्राप्त होते.*

*जागृत-अवस्थेंत अज्ञानामुळे दृष्टिसृष्टिवादानुसार तींनहि अवस्थांमध्ये सारखाच*



*स्वीकार केला असल्यामुळे घटादिक पदार्थाच्या ठिकाणी अतिव्याप्ति येत नाही.*

*एवं गुणविशिष्ट बद्ध लोक भोगसमयी वृत्ति शांत झालेल्या स्थितीत आनंद भोगत आसतात. तमामुळे मूढ, रजामुळे घोर, व सत्वामुळे शान्त या स्थितीत असणारे, तोच ब्रह्मानंद विषयांच्या ठिकाणी आरोपित करून, अंतःकरणाच्या स्वाधीन होऊन विवेकाचे ग्रहण न केल्यामुळे व विषयत्यागहि न झाल्यामुळे अगदी जवळ असलेल्या व नित्य अशा ब्रह्माच्या ज्ञानासाठी साधनांचा आश्रय करीत नसतात.*

*मुमुक्षु लोक मात्र दुःखत्यागाच्या इच्छेने शास्त्रांचे श्रवण करून, जगाच्या अधिष्ठान असणाऱ्या परमेश्वराच्या कृपेने दैवीसम्पत्ति मिळवून, सुषुप्ति इत्यादि अवस्थेत होणाऱ्या सुखाच्या सूचक कारणाचा विचार करून, काहीतरी नित्यमुक्त असे एक तत्त्व आहे, अशा अनुमानरूप ज्ञानाने पूर्ण विश्वस्त होऊन साधनचतुष्टय संपन्न होऊन श्रोत्रिय अशा ब्रह्मनिष्ठ गुरूंना मिळवून याच प्रक्रियेचा आश्रय घेतात व वृत्तिस्थितीचे विस्मरण आणि सन्धिस्थितीचे स्मरण यामुळे ते कृतार्थ होतात.*

०००

|| श्रीज्ञानेश्वरमाउली ||

**१०. नित्यतीर्थ**

# विषयदिग्दर्शन

अहेतुक सद्‌गुरुप्रेमाच्या भरांत आपली इष्टनिष्ठा व्यक्त करीत करीत, प्रत्यक्ष भगवदवतार श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या शरीराची अनध्यस्त विवर्तता व तत्सान्निध्यानें आळंदीची नित्यतीर्थता, श्रुति, युक्ति व अनुभवानें या ५७ ओव्यांत महाराजांनी सिद्ध करून दाखविली आहे. त्याचा क्रम असाः-

सद्‌गुरुस्मरणपूर्वक मंगल. सद्‌गुरुकृपेशिवाय श्रुत्यर्थाचें रहस्य कळत नाही म्हणून सद्‌गुरुचरण सर्वतीर्थांना अधिष्ठान आहेत. सद्‌गुरु ज्ञानेश्वरतातांचें अनुपम भक्तवात्सल्य. उपासनादृष्टीनें आळंदी त्रैलोक्याला पावन करणारी वाराणसीच आहे परंतु श्रुतियुक्ति व अनुभवानेही आळंदीला नित्यतीर्थता आहे ह्या विषयाचा उपक्रम (ओव्या १-१३)

### *(१) श्रुतीनें आळंदीची तीर्थता सिद्धि :-*

हिरण्यगर्भाच्या आनंदाहून ब्रह्मनिष्ठाचा आनंद श्रुतीनें अनंत पटीनें अधिक सांगितला आहे म्हणून जेथें ब्रह्मनिष्ठ आहे तेथें सर्व पुण्यें राहतात. अवतारशरीराच्या हृदयांतून शिष्यहृदयांत ज्ञानप्रवाह वाहत जाऊन तो शिष्यद्वाराने जगालाही पावन करीत असल्यामुळें ब्रह्मनिष्ठाच्या शरीराहून अवतारशरीराची

विशेषता अधिक आहे, व ज्ञानेश्वरतात हे अवतारी असून आळंदी येथें समाधिस्थ आहेत म्हणून आळंदीला तीर्थता आहे (१४-१७) (य२पू.८३)

### *(२) अनध्यस्तविवर्तरूप शरीराची सांख्य व वेदांतसमन्वयपूर्वकयुक्तीनें नित्यता सिद्धि*

सत्कार्यवादी सांख्य हें कार्य त्रिकालाबाध्य सत्य मानतात व ज्ञानाने अविद्येची सकार्यनिवृत्ती होत असल्यामुळे वेदांती हे कार्य यावत्काल सत्य मानतात. परंतु अवतारशरीर ज्ञानाला अप्रतिबंधक असें अनध्यस्तविवर्तरूप असल्यामुळे तें ज्ञाननिवर्त्य नसून परानुग्रहार्थ जीवन्मुक्तस्थितीनें नित्यसिद्ध आहे, व तदवच्छिन्न प्रेमही आत्मप्रेमाप्रमाणे नित्य आहे; आणखी -

ह्या अवताराचे भक्तिस्थापन हेच केवळ प्रयोजन असल्यामुळे कुजनहननावतारी शरीराप्रमाणें येथे आरोपित तमही भासत नाहीं (१८-३७)

### *(३) अनध्यस्त शरीराची व तदवच्छिन्न देशाची योगशास्त्राच्या युक्तीनें नित्यतासिद्धि*

योगाच्या निरनिराळ्या भूमिकास्थचित्ताची फलश्रुती. निरुद्ध भूमिकास्थ योग्यांचे शरीर सत्त्वयुक्त होऊन असंप्रज्ञात समाधि दृढ झाला असतां त्या सत्त्वयुक्त देहाचा प्रलयकालच्या तमानेंही अभिभव होत नाही, याला योगवासिष्ठाची संमति व कर्कटी, भृगुसुत शुक्र व काकभुशुंडी यांचें दृष्टांत. ह्याप्रमाणें योग्याचेच शरीर जर प्रलयकालांत नाश पावत नाहीं. तर दर्शनमात्रानें सर्वांना सत्त्वयुक्त करणारें परब्रह्म शरीर व तदवच्छिन्न देश हें नाश पावत नाहींत हें सिद्धच आहे.(३८-५१)

### *(४) स्वानुभवानें आळंदीची नित्यतीर्थतासिद्धि*

पूर्वयुक्त्यनुसार नित्य अशा ज्या शरीराची मूर्तीत भावना केल्यास भक्ताची उपासना सिद्ध होते तें शरीर आळंदी येथें प्रत्यक्ष आहे म्हणून तेथें नित्यतीर्थता आहे. (५२-५४)

या नित्यतीर्थात स्नान करून सद्‌गुरूचे ध्यान करणारेही तद्रूप होतील असें वचन, व सद्‌गुरुस्तवनांत उपसंहार . (५५-५७)

**(य२पू.८४)**

०००



# १०

# ॥ नित्यतीर्थ ॥

## आळंदी महिमा

(प्रलयातहि नाश न पावणारे असे अविनाशी तीर्थक्षेत्र : आळंदी)

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥**

**जय जय सद्‌गुरो आळंदीपते । जय जय सद्‌गुरो करुणामूर्ते ।**
**जय जय सद्‌गुरो श्रौतकीर्ते । कैवल्यदानी ॥१॥**
**जय जय सद्‌गुरो विघ्नहर्ता । जय जय सद्‌गुरो बुद्धिदाता ।**
**जय जय सद्‌गुरो सत्य-ज्ञानानंता । जय जय संतमुकुटमणी ॥२॥**
**निगमाचे फळ । गुरुवीण न रसाळ ।**
**हे बोलिले केवळ । तातचि अंगे ॥३॥**
***"जयाचा दिठीव वसंतु । जंव रिघे निगम-वनां आंतु ।***
***तंव आपुलिये फळी हातु । न घेतपतीही"॥४॥ (अमृ. २-१८)***
***"यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुराविति"***
**जयाची तया प्रकाशति । सकलार्थ-स्थिति श्रुति म्हणे ॥५॥**
**म्हणवोनि सद्गुरूचे चरण । सकलतीर्था अधिष्ठान ।**
**ऐसे गुरुगीतेचे वचन । प्रमाण आहे ॥६॥**
**ही अवघियांची रीति । परी माझी विशेष स्थिति ।**
**ती सावध होऊनी श्रोतीं । ऐकावी प्रेमे ॥७॥**
**माझा सद्‌गुरु करुणाघन । आळंदीपति कल्याणनिधान ।**
**जेणे आपुलिया नामाचा मंत्र देऊन । कृतार्थ केले मजलागी ॥८॥**
***कैवल्य कनकाचियां दाना । जो न कडसी थोरसाना ।***
***द्रष्टयाचे दर्शना । पाठाऊ जो ॥९॥ (अमृ. २. २५)***
**या साच करावया निज वचना । न देखोनि मम पात्रपणा ।**
**अंकी घेवोनि खुणा । सांगितल्या स्वनामाच्या ॥१०॥**

-------

*सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पण्डित यांनी केलेला मराठी अनुवाद -*

*१. वेदांनी ज्यांची कीर्ति गायिली आहे व जे कैवल्याचे दान करतात अशा करुणेची मूर्ति असलेल्या आळंदीपती सद्गुरुनाथा, आपला जयजयकार असो.*

*२. सर्व विघ्न हरण करणारे, सद्बुद्धि देणारे हे सद्गुरो, आपण अविनाशी चेतन आणि ज्याच्या स्वरूपाला अंत नाही असे असून संतांचे मुकुटमणी आहात, सर्व श्रेष्ठ आहात, आपला जयजयकार असो.*

*३. वेदांचे अर्थज्ञानरूप फळ श्रीगुरुकृपेवाचून मधुर होत नाही म्हणजे कृतार्थ करून ब्रह्मरसाची पुष्टी देणारे ब्रह्मसुख प्राप्त करून देणारे होत नाही असे माझे तात श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनीच स्वतः म्हटलेले आहे.*

*४. ज्याचा कृपादृष्टिरूप वसंत जोपर्यंत वेदरूपी अरण्यांत शिरत नाही तोपर्यंत कोणीहि वेदांचे फळ आपल्या हाती घेऊ शकत नाही म्हणजे आपल्या स्वतंत्र बुद्धीने परोक्ष व अपरोक्ष ब्रह्मज्ञान करून घेऊ शकत नाही.*[अमृ.२.१८]

*५. ज्याचे भगवंताचे ठिकाणी जसे निस्सीम प्रेम असते तसेच श्रीगुरूंचेहि ठिकाणी आहे, त्याला वेदांनी सांगितलेले सर्व अर्थ बरोबर कळतात, असे श्रुतींनीहि म्हटले आहे.*

*६. म्हणून श्रीगुरूंचे पायच सर्व पवित्र करणाऱ्या तीर्थांना अधिष्ठानभूत आहेत म्हणजे सर्व तीर्थांचे ठिकाणी पवित्र करण्याचे असलेले सामर्थ्य श्रीगुरूंच्या चरणांचेच अंशभूत सामर्थ्य होय, असे गुरुगीतेचे प्रमाण वचन आहे.*

---

गुरुगीतेतील प्रमाण वचने

**सर्वतीर्थाऽवगाहस्य संप्राप्नोति फलं नराः ।**

**गुरोः पदोदकं पीत्वा शेषं शिरसि धारयन् ॥१८॥**

*अर्थ -जगातील सर्व तीर्थांमध्ये स्नान केल्यानंतर जे पुण्यफळ मनुष्याला प्राप्त होते ते सर्व फळ श्रीगुरूंच्या चरणाला स्पर्श झालेले उदक प्रेमाने पिऊन व मस्तकावर धारण केल्याने प्राप्त होते.*

**सप्तसागरपर्यन्तं तीर्थस्नानफलं यथा ।**

**गुरोः पादोदबिन्दोश्च सहस्रांशेन तत्फलम् ॥७५॥**

*सातहि समुद्रांचे स्नान केल्याने जे पुण्यफळ प्राप्त होते, ते सर्व पुण्य श्रीगुरूंच्या चरणामृतातील एक बंदु प्राशन केल्याने मिळणाऱ्या पुण्याच्या एकसहस्रांश देखील नाही.*

---

*७. असेच वेदाशास्त्रादिक सर्वांचे म्हणणे आहे. पण माझ्या श्रद्धेची स्थिती या सर्वांहून विशेष आहे. श्रोत्यांनी एकाग्र चित्त करून प्रेमाने श्रवण करावी.*

*८. ज्यांनी आपल्या नामाचा मंत्र देऊन मला कृतार्थ केले ते सर्व कल्याणाचे कोठार, केवळ करुणेची मूर्ति असलेले आळंदीचे स्वामी श्रीज्ञानेश्वरमहाराज माझे सद्गुरु आहेत.*

*९. कैवल्यरूप सुवर्णाचे दान करताना जो ''हा मोठा आहे की लहान आहे''*



*ही कसोटी लावून पाहत नाही व जो द्रष्ट्याचा साक्षात्कार करून देणारा वाटाड्या आहे. म्हणजे ''मोठा असो की लहान असो, श्रीमंत असो की गरीब असो, व्युत्पन्न असो की अव्युत्पन्न असो'' त्याला भगवत्प्राप्तीची तळमळ असली की पुरे, त्याचा ते उद्धार करतात, असा अर्थ.*

*१०. या आपल्या अमृतानुभवातील वचनाला सत्य करून दाखविण्याकरिताच त्यांनी माझी पात्रता न पाहता, मला मांडीवर घेऊन आपल्या* ***नामाच्या खुणा सांगितल्या म्हणजे नामाचा अर्थासह बोध केला.***

**जो आळंदीत समाधिवासी । जागृत भक्तहृदयदेशी ।**

**त्रिभुवनी वाराणसी । ती आळंदी मी म्हणे ॥११॥**

**भलतैसे हो कां पाणी । जे लागले श्रीगुरुचरणी ।**

**तें पी तयाचिया चरणी । लोळे गंगा ॥१२॥**

**हे असो माझी उपासना । येरव्ही वेद युक्ती अनुभव खुणा ।**

**विचारिता नित्यतीर्थपणा । आळंदीते ॥१३॥**

**हिरण्यगर्भान्त आनंदाहून । ब्रह्मनिष्ठानंद अनंतगुण ।**

**ऐसी श्रुति सांगे म्हणून । ब्रह्मनिष्ठ तेथ पुण्य सर्वही ॥१४॥**

**तयांचे जे शब्द । आकाशी दुमदुमती प्रसिद्ध ।**

**आणि पदरजे सिद्ध । पावन धरणी ॥१५॥**

**परी जे अवतार शरीर । ते त्याहुनी विशेष परीकर ।**

**जे शरीरातूनि शुद्ध अंतर । वाहे आरपार शिष्यहृदयी ॥१६॥**

**ते अनध्यस्तविवर्त । तातांचे अद्यापि आळंदी वसत ।**

**आणि सत्कार्यवादे पाहता निश्चित । युक्ति कळे ॥१७॥**

**सत्कार्यवादाची रीति । कपिल ऐसे बोलती ।**

**जे धर्मीविण प्रतीति । धर्माची नोहे ॥१८॥**

**अतीतता धर्म जाण । न राहे द्रव्य धर्मीविण ।**

**धर्मी अभावे धर्मदर्शन । कदा नोहे ॥१९॥**

**आणि धर्मी वाचोनि धर्म राहत । ऐसे जयांचे मत ।**

**तया मी पुसोनि परीक्षित । उत्तर प्रचीत दाखवावी ॥२०॥**

*११. असा माझा जो सद्गुरुनाथ तोच भक्तहृदयात जागृत असून आळंदीत समाधि लावून बसलेला आहे. म्हणून आळंदी ही त्रैलोक्यात दुसरी वाराणसीच (काशी) आहे, असे मी म्हणतो.*

*१२. विहिरी तळे नदी ओढा यापैकी कोठलेही पाणी असो पण ते माझ्या*

श्रीगुरूंच्या चरणास लागले म्हणून अत्यंत पवित्र आहे, असे समजून जो पितो, त्याच्या चरणावर गंगा लोळते म्हणजे गंगाहि आपल्यापेक्षा त्याला श्रेष्ठ समजते.

१३. अशी माझी गुरूपासनेविषयी बुद्धि आहे. ती असूं द्या. पण साधारणपणे विचार करून पाहता देखील १.वेद, २.युक्ति व ३.अनुभव या तिन्ही दृष्टीनी आळंदीला नित्यतीर्थपणा आहे.

१४.हिरण्यगर्भाच्या म्हणजे ब्रह्मदेवाच्या आनंदाहून ब्रह्मनिष्ठाचा आनंद अनंतपट अधिक असतो, असे तैत्तिरीय उपनिषदातील श्रुतीने सांगितले असल्यामुळे ब्रह्मनिष्ठाचे ठिकाणी संपूर्ण पुण्य असते, किंबहुना ब्रह्मनिष्ठ हा संपूर्ण पुण्याचा साठा असतो.

१५. त्यांच्या मुखातून जे शब्द निघतात ते आकाशात दुमदुमत रहातात, आणखी त्यांच्या चरणधुळीने संपूर्ण पृथ्वी पावन होते.

१६. पण जे अवतारी शरीर असते ते अशा ब्रह्मनिष्ठाच्या शरीरापेक्षाही आणखी विशेषच पवित्र असते. कारण अवतार शरीरातील अन्तःकरण शिष्याच्या हृदयात आरपार शिरू शकते.

१७. ते अवतारांचे शरीर अनध्यस्तविवर्त असते. तसेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शरीरहि अवतारशरीर असून अजूनपर्यंत आळंदीत आहे. आणि सांख्याच्या सत्कार्यवादानुसार पाहता त्यांच्या अवतार शरीराविषयी उपपत्तीहि मिळू शकते.

वेदान्ताप्रमाणे विवर्त हा (१) **अध्यस्तविवर्त** व (२) **अनध्यस्तविवर्त;** असा दोन प्रकारचा आहे. हे श्रीज्ञानेश्वरीतील अकराव्या अध्यायातील खालील ओवीतून स्पष्ट केले आहे.

**हे अवतार सकळ । जया समुद्रीचे कां कल्लोळ ।**
**आणि विश्व हे मृगजळ । जया रश्मीस्तव दिसे ॥**

## अनध्यस्त विवर्ताची व्याख्या

भगवतांच्या अवतारांना समुद्राच्या कल्लोळाची उपमा देऊन अनध्यस्त विवर्त सांगितला आहे. माझी सद्‌गुरु आई अनध्यस्त विवर्ताची व्याख्या करते -

* **अभिन्ने सति,**
* **अपररूपत्वे सति,**
* **भेद-अभानपूर्वकम्,**
* **अधिष्ठान-ज्ञान-अनावरकत्वे सति च,**
* **प्रीतिमात्रत्वात्**
* **अधिष्ठानज्ञान-अनिवर्त्यम्**
* **अनध्यस्तविवर्तलक्षणम् ॥**

अर्थ :-
* जे अवतारशरीर अधिष्ठान सद्‌चिदानंद परब्रह्माचा विवर्त आहे
* ब्रह्माशी यत्किंचितहि भिन्न न राहता अभिन्नच राहते व



* अधिष्ठानाचा लोप न करता अधिष्ठानाचे स्पष्ट ज्ञान होऊ देते आणि
* जे परमप्रेमाचा विषय असल्यामुळे
* त्याची अधिष्ठान-ज्ञानाने निवृत्तीही होत नाही,
- त्या अवतार शरीराला ''अनध्यस्त विवर्त'' म्हणतात.

या शरीराला समुद्राच्या कल्लोळाचा दृष्टांत देऊन माउलीने हे म्हणणे स्पष्ट केले आहे.

## अध्यस्तविवर्त

जीवांची शरीरे अज्ञान व कर्मजन्य असल्यामुळे ती अधिष्ठानरूप परब्रह्माची विवर्त असली तरी अधिष्ठानाचा लोप करून अधिष्ठानाचे ज्ञान होऊ न देणारी, अधिष्ठानाहून भिन्न भासणारी, परप्रेमाचा विषय होऊ न शकल्यामुळे ज्ञानाने निवृत्त होणारी असतात. म्हणून त्यांना ''अध्यस्त विवर्त'' म्हटले जाते. आणि विश्व म्हणजे सर्व जीवांची शरीरे, वर सांगितल्याप्रमाणे अध्यस्तविवर्त आहेत हेच माउलीने **''विश्व हे मृगजळ । जया रश्मीस्तव दिसे ॥** या दोन चरणांनी वरील ओवीत सांगितले आहे.

१८. सांख्यवादी कार्य सद्रूप आहे असे प्रतिपादन करताना अशी उपपत्ति देतात की धर्माची प्रतीती धर्मीवाचून येत नाही.

१९. अतीतता म्हणजे भूतकालीन अस्तित्व. हा धर्म द्रव्यरूप धर्मीवाचून राहू शकत नाही. ज्याचे ठिकाणी धर्म म्हणजे गुण राहतात त्यालाच धर्मी किंवा द्रव्य म्हणतात. धर्माला वस्तु आधार नसली तर धर्माचे ज्ञानच होणे शक्य नाही.

२०. बरे, द्रव्यवस्तु आधार असल्यावाचून धर्म ज्ञात होऊ शकतो किंवा राहू शकतो असे ज्यांचे मत असेल त्यांची मी प्रश्न विचारून परीक्षा घेतो. त्यांनी असा प्रत्यक्ष अनुभव कोठे येतो, तो दाखवावा.

**साखरेविण गोडपण । जिभेवर राहवे पूर्ण ।**
**की जिभेविण भाषण । श्रवणी यावे ॥२१॥**
**आश्रय-द्रव्य नसतां । गमनागमन घडावे तत्वतां ।**
**की पुत्रचि जगी नसतां । भासावे पुत्रत्व ॥२२॥**
**म्हणोनि अतीतता धर्माप्रति । धर्म्याश्रयता व्हावी निरुति ।**
**धर्मी तंव घट निश्चिती । यालागी कार्याप्रति सत्पण ॥२३॥**
**आता अनागत-अवस्थान । तेहि न घडे धर्मीविण ।**
**अभाव तरी सर्व उत्पन्न । सर्वत्र व्हावे ॥२४॥**
**कारणातूनि अभिव्यक्त जरी । प्राग्-अभाव गौरव तरी ।**
**याचा समन्वय परी । वेदान्ती ऐसा ॥२५॥**
**सांख्य देती कार्या मुख्यसत्यता । वेदान्ती मानती गौण सत्यता ।**

**कालत्रयाऽबाध्या मुख्यसत्यता । यावत्कालस्थायिता गौण सत्यत्व ॥२६॥**

**कारणात्मना स्थायित्व स्वीकार । हा दृष्टिसृष्टिवादेही विचार ।**

**''अद्वैतसिद्धी''त समग्र । ''मधुसूदन'' बोलिले ॥२७॥**

**जीवदृष्टि अनादि म्हणोन । ज्ञातसत्तया कार्या सत्पण ।**

**परि येथ उपादान । अविद्या एक ॥२८॥ (य२पू.८६)**

**तिची झालिया निवृत्ति । सहजचि कार्या मिथ्याप्रतीति ।**

**परी अनध्यस्तविवर्त जगत्पति ।**

**प्रतिबिम्बापेक्षिक बिम्बत्वारोपावच्छिन्न बिम्बस्थिति जयाची ॥२९॥**

**आणि तच्छरीर नोहे भयाध्यास । यालागी निवृत्त्यपेक्षा नाही त्यास ।**

**शरीरत्वास्तव विवर्तवास । परि ज्ञानअप्रतिबंधकत्वास्तव अनध्यस्त ॥३०॥**

*२१. साखरेचे (धर्मीचे) गोडपण (धर्म) साखरेवाचून जीभेला अनुभवता यावे किंवा जीभेवाचून बोलणे बाहेर पडून कानाला ऐकूं यावे.*

*२२. द्रव्याच्या आश्रयावाचून 'जाणेयेणे' या क्रिया होताना दिसाव्या किंवा पुत्राचे मुळीच अस्तित्व नसताना पुत्रत्व भासावे.*

*२३. पण असे होत नाही म्हणून 'अतीतता' या धर्माला धर्मीचा (द्रव्याचा) आश्रय पाहिजे. घट हा धर्मी सत्य असतो म्हणूनच ''घट होता, घट आहे, घट होईल'' असा ''अतीतता वर्तमानता भविष्यता'' वगैरे धर्मांचा प्रत्यय येतो. याप्रमाणे कार्य सत्य ठरते.*

*२४. भविष्यकालीन अस्तित्व (अनागतावस्थान) हे देखील धर्मी असल्यावाचून बोलता येत नाही. धर्मीचे अस्तित्व न मानता धर्मीचा अभाव मानला तर कोठेहि काहीहि उत्पन्न होईल व नियत कार्यकारण भाव मानता येणार नाही.*

*२५. कारणातून कार्य बाहेर पडते- व्यक्त होते म्हणजे ते त्या विशिष्ट कारणात अभिव्यक्तिपूर्वी असतेच. तेव्हा ते नव्हते असा प्रागभाव मानणे हा गौरव दोष आहे. वेदान्त दृष्टीने याचा समन्वय असा होतो.*

*२६. सांख्यवादी कार्याला मुख्यसत्यता देतात म्हणजे कार्य हे सदासर्वदा अविनाशी आहे असे समजतात आणि वेदान्ती व्यवहारापुरती कार्याला सत्यता देतात.*

*अ) कालत्रयीहि जिचा नाश होत नाही ती 'मुख्यसत्यता' होय.*

*आ) यावत्कालस्थायिता म्हणजे कार्यरूप जगताला अधिष्ठानभूत असलेल्या परब्रह्माचे ज्ञान होईतोपर्यन्त जगद्रूप कार्य सत्य वाटणे याला 'गौण सत्यता' म्हणतात.*

*२७. कार्याचे आपल्या कारणात कारणरूपाने स्थायी अस्तित्व असते, असे वेदान्ताच्या दृष्टिसृष्टि- वादाताहि मानलेले आहे असे मधुसूदन सरस्वतींनी अद्वैतसिद्धी नामक ग्रंथात विस्ताराने म्हटले आहे.*

*२८. जीवाची वृत्त्यवछिन्नरूप दृष्टि अनादिच असल्यामुळे व त्या दृष्टीला*



*कळणाऱ्या कार्याची ज्ञातसत्ता मानली असल्यामुळे ते कार्य **'कळते तोपर्यंत सत्य'** मानले जाते. पण जगतातील या सर्व कार्यरूप पदार्थांचे उपादन कारण एक अविद्या आहे.*

### सहा अनादि पदार्थ

***जीवेशो, हि विशुद्धा चित्, विभागस्तु तयोर्द्वयोः ।***

***अविद्या, तृतिर्योगः, षडस्माकम् अनादयः ॥***

*१- जीव, २- ईश्वर, ३- शुद्ध चिति म्हणजे परब्रह्म, ४- जीव व ईश्वर यांचा भेद, ५- अविद्या, ६- अविद्या आणि परब्रह्माचा संबंध;*

*हे सहा पदार्थ वेदान्तात अनादि कारणरूप मानलेले आहेत.*

*२९. म्हणून, अविद्येची आत्मज्ञानाने निवृत्ति झाल्याबरोबर हे सर्व जगद्रूप कार्य मिथ्या ठरते. पण बिंबाच्या अपेक्षेने जसे सूर्यावर बिंबत्व येते त्याप्रमाणे प्रतिबिम्बरूप जीवाच्या अपेक्षेने जो परमात्मा बिम्बरूपशरीरधारी झाला आहे. तेच अवतारशरीर होय.*

*३०. भगवंताचे शरीर भय उत्पन्न करीत नाही म्हणून ते नाहिसे व्हावे किंवा निवृत्त व्हावे, अशी कोणाचीहि अपेक्षा असणे शक्य नाही.*

***ते शरीररूप प्रत्ययाला येते म्हणून विवर्त आहे आणि आत्मज्ञानाला ते शरीर प्रतिबंध करीत नाही म्हणून अनध्यस्त आहे.***

**सत्कार्य म्हणोनि अभिव्यक्तीपूर्वी । देखताती योगज्ञ कवी ।**

**परी तेहि भासवें जो रवि । तत्प्रेमान्वय येथ प्रगटे ॥३१॥**

**विषय प्रारब्धाधीन । ते संपलिया होती क्षीण ।**

**प्रेम नाहे प्रारब्धाधीन । म्हणोनि प्रियक्षीणत्वा युक्ति नाही ॥३२॥**

**आणि विवर्त म्हणोनि ब्रह्माऽभिन्न । म्हणाल की बुद्धि क्षीण ।**

**तरि आत्मप्रेम समान । तो क्षीण नोहे ॥३३॥**

**आणि विवेकहि करिता । दृष्टिसृष्टिवादीय ईशैक्यता ।**

**अथवा शुद्ध ब्रह्मैक्यता । घेतली जरी ॥३४॥**

**तरी परानुग्रहार्थ स्वानुभववृत्ति । न चुके अक्षय जीवन्मुक्ति ।**

**यालागी भगवद्देहस्थिति । नित्य मी म्हणे ॥३५॥**

**आणि कुजन-हनन जे अवतारी । तेथ आरोपित तम भासे तरी ।**

**परी भक्तिस्थापक जे अवतारी । तेथ आरोपितही गुण न भासती ॥३६॥**

**तैसा माझा ताताविर्भावो । वरी समाधि सावेवो ।**

**योगशास्त्र-युक्ति-प्रवाहो । ऐसा याचा ॥३७॥**

**विक्षिप्त-भूमिकेवरी चित्त असता । तीचि भूमिका तीव्र होता ।**

**तरी यक्षादिसमान तत्वतां । शरीर होय ॥३८॥**

**असता एकाग्रभूमिकेवरी । शरीर जैसे ध्यानाहारी ।**

**ब्रह्मलोकस्थ प्रचारी । समान दिसे ॥३९॥**

**आणि निरुद्ध-भूमिकेवरी चित्त । असता सत्त्वसमशरीर होत ।**

**संस्कारशेष असंप्रज्ञात । लाधता गुणद्वय अनभिभूत देह होय ॥४०॥**

*३१. **सांख्यांच्या सत्कार्यवादानुसार** ते भगवंताचे शरीर अवताररूपाने प्रगट होण्यापूर्वीही असतेच व योगसंपन्न ज्ञानी पुरुष त्या शरीराला पाहतातही. ज्या चैतन्य प्रकाशरूप सूर्याने ते शरीर प्रत्ययाला येते, त्याच्या निस्सीम प्रेमामुळे जगात त्याचा प्रत्यक्ष प्रकट अनुभवहि येतो.*

*३२. विषय हे प्रारब्धानुसार प्राप्त होत असतात. म्हणून प्रारब्ध संपले की ते विषय नाश पावतात. परंतु प्रेम हे स्वरूपभूत असून प्रारब्धाने प्राप्त झालेले नसते. म्हणून निस्सीम प्रेमाने प्राप्त होणारे परमात्म्याचे शरीर प्रारब्ध संपले असता नाश पावते, असे म्हणण्याला काहीही उपपत्ति सापडत नाही.*

*३३. आणि ते शरीर परब्रह्माचा विवर्त आहे म्हणून परब्रह्माहून भिन्न नाही. एकरूपच आहे. 'बुद्धि क्षीण होईल तेव्हा प्रेमहि क्षीण होईल व त्या प्रेमाने अनुभवाला येणारे भगवतांचे शरीरहि क्षीण होऊन नाहीसे होईल.' असे कोणी म्हणतील - पण आत्मप्रेम '**अधिक-न्यून-भावरहित अखंड सम राहणारे**' असल्यामुळे ते कधीही क्षीण होत नाही म्हणून त्या प्रेमाने झालेले परमेश्वराचे शरीर क्षीण झाले, नाश पावले, असा प्रत्यय येऊ शकत नाही.*

*३४, ३५. आत्मानात्मविवेक केला असता जीव दृष्टिसृष्टिवादातील ईश्वराशी किंवा शुद्ध ब्रह्माशी ऐक्य पावतो, असे म्हटले तरी परानुग्रहार्थ आत्मानुभववृत्ति व त्यामुळे जीवन्मुक्तस्थिति कायम राहत असल्यामुळे, **जीवन्मुक्ताच्या देहस्थितिरूप प्रारब्धाच्या अपेक्षेने, भगवतांची देहस्थिति नित्य कायम राहते,** असेच मी म्हणतो.*

*३६. दुष्टांचा संहार करण्याकरता घेतलेल्या अवतारशरीराच्या ठिकाणी, संहाररूप तमोगुणाचा आरोप करता येत असला तरी भक्तिप्रेमाकरता घेतलेल्या अवतार शरीराच्या ठिकाणी कोणत्याहि गुणांचा आरोप होऊ शकत नाही.*

*३७. भक्तिस्थापनेकरता होणाऱ्या अवताराच्या शरीराप्रमाणे माझे तात श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा अवतारविग्रह असून आणखी त्यांनी समाधि लावलेली आहे. म्हणून त्यांच्या देहाच्या अविनाशीपणाची योगशास्त्राप्रमाणे पुढील उपपत्ति देता येते.*

### योगानुसार

*३८. '**विक्षिप्त**' भूमिकेवर चित्त असून ती भूमिका दृढ किंवा तीव्र झाली असता यक्षादिकांच्या शरीराप्रमाणे योग्याचे शरीर होते. (यक्षशरीरात गुप्त होणे, आकाशगमन वगैरे काही सिद्धी असतात त्याप्रमाणे)*

*३९. '**एकाग्र**' भूमिकेवर चित्त असून ती भूमिका तीव्र झाली असता योग्याचे शरीर ब्रह्मलोकात राहणाऱ्या ध्यानस्थ जीवांच्या शरीराप्रमाणे होते.*



*४०. सात्त्विक अशा '**निरुद्ध**' भूमिकेवर चित्त असून ते दृढ झाले असता योग्याचे शरीरहि सत्त्वमय होते. आणि केवल संस्कारमात्र चित्त राहते अशा '**असंप्रज्ञात' समाधीत** योगी असताना त्याचा देह पूर्ण रजस्तमरहित असा शुद्धसत्त्वात्मक होतो.*

**तो समाधीची जरी दृढ । तरी हृदयसूर्यकान्त उघड ।**

**चैतन्यसूर्यप्रभा सुघड । निघे तेथुनी ॥४१॥**

**ते जना पवित्र करी । मग तया शरीरी ।**

**रजस्तम भरोवरी । न स्पर्शे कदा ॥४२॥**

**प्रलयकालीचाही तम देखे । तया सत्त्वदेहा अभिभवूं न शके ।**

**हे बोलिले निके । योगवासिष्ठीं ॥४३॥**

**राये [१]कर्कटीची मूर्ति । करिता सत्त्वयुक्ती ।**

**कर्कटी समाधिस्थ होती । तरी मूर्तीत प्रवेशिली ॥४४॥**

**अप्सरेमागे [२]भृगुसूत (शुक्राचार्य) । योगे धावताहि शरीर तैसेचि स्थित ।**

**मग जो अत्यंत समाधिस्थ । तच्छरीर केवि नाशे? ॥४५॥**

**काकभुशुंडी[३] मुनी । वृक्षसहित शरीर घेऊनी ।**

**प्रलयीहि राहूनी । चिरजीवी ॥४६॥ (य२पू.८८)**

**हे ब्रह्मवराची ख्याति । आणि निरुद्ध-भूमिकेची स्थिति ।**

**पाहता ब्रह्मलोकावरुती । सहज आहे ॥४७॥**

**मग तच्छरीरा कवण । जंतु नाशू शकेल आपण ।**

**जयांचे होताचि दर्शन । सत्त्वसंपन्न सर्व होती ॥४८॥**

**म्हणोनि प्रलयीचा योगियां । आघातु न करी अपाया ।**

**वरी अनध्यस्त-विवर्त तया । न करी, हे बोलणे के? ॥४९॥**

**आणि भक्तिप्रेमाचिये पिसे । हृदयसत्त्वसूर्यकांतासरिसे ।**

**जेथोनि चैतन्य प्रकाशे । चिरजीवी वसे, भक्तहृदयी ॥५०॥**

*४१. ज्या योग्यांचा हा असंप्रज्ञातसमाधि दृढ होतो. त्यांचे हृदय इतके शुद्धसात्विक होते की सूर्यकांत मण्यातून सूर्याची किरणे जशी दुसरीकडे परावृत्त होऊन सूर्याप्रमाणे देदिप्यमान् अशी केंद्रीभूत होतात त्याप्रमाणे त्यांच्या हृदयातून अधिष्ठानभूत चैतन्यसूर्याची किरणे स्पष्ट बाहेर पडून शिष्याच्या हृदयात प्रवेश करतात.*

*४२. व इतर जनांना कृतार्थ करतात. त्या शरीराला रजस्तमगुणरूपी मळाचा पुनः कधीहि स्पर्श होत नाही.*

*४३. येवढेच नाही तर सर्वसंहार करणारा प्रलयकालीचा प्रचंड तमोगुण देखील त्या शुद्ध सात्त्विक देहाला आपल्यात लीन करून घेऊ शकत नाही, असे*

योगवासिष्ठात स्पष्ट सांगितले आहे.

४४. राजा विक्रमाने कर्कटी राक्षसीची मूर्ति केली असता, कर्कटी समाधिस्थ असतानाहि तिने सत्वगुणाच्या आश्रयाने मूर्तीत प्रवेश केला असे योगवासिष्ठ उत्पत्ति प्रकरण अध्याय ८३ मध्ये सांगितले आहे.

४५. ध्यानसमाधि लावून बसलेले भृगुऋषीचे पुत्र शुक्राचार्य अप्सरेमागे जाऊ लागले तरी त्यांचे शरीर पडले नाही किंवा नष्ट झाले नाही. मग जो ''असंप्रज्ञात'' समाधि लावून बसलेला आहे त्याचे शरीर नाश पावते, असे म्हणण्याला काहीच प्रमाण नाही.

४६. तसेच काकभुशुंडी मुनी हे ज्या वृक्षावर बसले होते त्या वृक्षासह प्रलयामध्ये देखील आपले शरीर मोक्षाप्रमाणे अविनाशी करून राहिले होते.

४७. अशी निरुद्धभूमिकेवर राहणाऱ्या श्रेष्ठ ज्ञान्यांच्या शरीराची स्थिती सांगितली आहे. विचार केला असता ही स्थिति ब्रह्मलोकात राहणाऱ्या लोकांच्या, प्रलयापर्यंत टिकणाऱ्या शरीरस्थितिपेक्षाहि अधिक श्रेष्ठ आहे, असे सहज दिसून येते.

४८. मग ज्याचे हृदय अत्यंत शुद्ध सत्वात्मक झाले असल्यामुळे ज्याच्या दर्शनाने इतर लोक तत्काळ सत्वसंपन्न होतात, अशा पुरुषाच्या शरीराचा रजोगुणी-तमोगुणी असे जंतू कसा नाश करू शकतील?

४९. अशाप्रकारे जर योगसंपन्न ज्ञान्याच्या शरीरावर प्रलयकालाचा आघात देखील अपाय करू शकत नाही, तर मग अविद्यारहित अशा अनध्यस्तविवर्त शरीरावर प्रलयाचा देखील आघात होऊ शकत नाही, हे काय सांगावयाला पाहिजे!

५०. ज्या अनध्यस्तविवर्त शरीरातील सूर्यकान्त (*) मण्यासारख्या शुद्धसत्त्वमय झालेल्या हृदयातून चैतन्याचा प्रकाश बाहेर स्पष्ट फांकतो, ते अनध्यस्तविवर्त शरीर भक्ताच्या भक्तिप्रेमाला अत्यंत वश होऊन भक्तांच्या हृदयात अखंड वास करते.

---

**(टीप – * माझी सद्गुरुआई (श्रीगुलाबरावमहाराज) प्रियलीलामहोत्सव सखिप्रेषण १३ मध्ये म्हणते की –**

**अहो जलस्थ प्रतिबिंबे सूर्य व्हावे । परी सूर्यकांती येवोनि तृण जळावे ।**
**तैसे जीवन्मुक्ते विदेहमुक्त व्हावे । परी हृदयसूर्यकान्ती येवोनि जाळावे जगदोष**
**॥२५०॥ आधी सात्त्विक केलिया प्राण । तो सहजचि स्थिर होय आपण ।**
**परी हृदय सात्त्विक होय म्हणून । प्रकाशे चेतन त्यांतुनी ॥२५१॥**
**मग तया चेतनाचेनि योगे । भजकजन पूर्ण होवो लागे ।**
**यालागी विदेहमुक्ताची सवेगे । समाधि कीजे ॥२५२॥**
**आळंदीवल्लभ समाधिवासी । ते स्वये मुक्तचि निश्चयेसी ।**
**परी मुक्तिप्रभा हृदयसूर्यकान्तासी । मिळूनि उपदेशी दीनजना ॥२५३॥**
**समुद्री मिळालिया संपूर्ण । मेघ जरी नेईल त्यातुन ।**
**तरी प्रतिबंधीना जीवन । तयापरी ॥२५४॥**
**तैसे विदेहमुक्त जाहले । आणि हृदयसूर्यकान्ती ज्ञान प्रगटले ।**



**ते इतरां उजळोनि मुक्तिद झाले । तरी आम्ही ना न म्हणो ॥२५५॥**
**अविरोधि म्हणोनि भेद नाही । इतरांचे कार्य करी सर्वदांही ।**
**यालागी समाधिस्थ ज्ञानेश आई । गुरुरूपे अनादि अनंत ॥२५६॥**
**नित्यचि चैतन्य विख्यात । आणि जो हृदयसूर्यकान्त ।**
**तत्स्थ प्रभा जनकार्य करीत । मग निवटाया समर्थ कवण असे? ॥२५७॥**
**यालागी अनंत अनंत । आळंदी हे मुख्य तीर्थ ।**
**उपदेशक तात । अखंडचि ॥२५८॥**
**परी ते परमेश्वरचि म्हणोनी । सिद्धसूर्यकान्ती सूर्यस्थानी ।**
**इतर जे कां मुक्त कोणी । ते साध्यसूर्यकान्ती सिद्धसूर्य ॥२५९॥**
**सिद्ध सूर्यरूप चिद्घन । प्राण केलिया सत्त्वगुण ।**
**आपुले जे हृदय पूर्ण । ते साध्यसूर्यकान्त होय ॥२६०॥**

अर्थ :- अहो, जलात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाला प्रतिसूर्य व्हावयाचे असेल तर त्याने सूर्यकान्त मण्याच्या द्वारा आपली किरणे केन्द्रीभूत केली पाहिजेत तेव्हाच ते प्रतिसूर्य होऊन सूर्याप्रमाणे तृण जाळू शकते; त्याचप्रमाणे जीवन्मुक्तहि निर्विकल्प समाधि दृढ साधून विदेहमुक्त होतात तेव्हा ते शुद्ध सात्त्विक अशा हृदयसूर्यकान्त मण्याच्या द्वारा अधिष्ठानभूत ज्ञानसूर्याची किरणे बाहेर फेकून लोकांचे दोष जाळू शकतात २५०.

प्राण सात्त्विक झाला असता तो स्थिर होतो व हृदयहि सात्त्विक होते, म्हणूनच हृदयातून चेतनाचा प्रकाश बाहेर पडतो. २५१.

मग त्या हृदयातून बाहेर पडणाऱ्या ज्ञान-प्रकाशाच्या योगाने त्या ज्ञानी पुरुषाची भक्ति करणारे भक्त पूर्ण होऊ लागतात. म्हणूनच निर्विकल्प समाधि साधून विदेहमुक्त झालेल्याची (सत्पुरुषांचे ठिकाणी) शीघ्रातिशीघ्र लगेच समाधि केली पाहिजे, २५२.

आळंदीवल्लभ श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधीत आहेत आणि ते स्वतः खरोखर नित्यमुक्तच आहेत तरी नित्यमुक्तरूप ज्ञानसूर्याची प्रभा त्यांच्या शुद्ध सात्त्विक अशा हृदयरूप सूर्यकांत मण्याशी संबंधित होऊन मुमुक्षुजनांना उपदेश करीत असते. २५३.

संपूर्ण नदीनदांचे पाणी समुद्रात मिळाल्यानंतर तेच पाणी घेऊन जर मेघ तयार होऊ लागले तर पाणी त्याला नाही म्हणत नाही. २५४.

त्याप्रमाणे विदेहमुक्त होऊन हृदयरूप सूर्यकान्तात त्यांचे ज्ञान प्रगट झाले आणि इतरांना मुक्ति देईल असे उपकारक झाले तर आम्ही नाही म्हणत नाही. २५५.

हृदयरूप सूर्यकान्तमण्यात प्रगट झालेले ज्ञान अधिष्ठानभूत ज्ञानरूप सूर्याशी विरोधी नसल्यामुळे ते त्याच्याहून भिन्न होत नाही आणि इतर जीवांना मोक्ष देण्याचे कार्य सतत करते, म्हणून निर्विकल्प समाधिस्थ असलेली श्रीज्ञानेश्वरमाउली अनादि व अनंत कालापर्यंत सर्वांना गुरुरूप आहे. २५६.

चैतन्य नित्य आहे हे प्रसिद्धच आहे आणि जर त्यांची हृदयरूप सूर्यकान्तात पडलेली प्रभा जनोद्धाराचे कार्य करीत असते, तर त्याचे निवारण करण्यास कोण

*समर्थ आहे? २५७.*

*म्हणून आळंदी हे अमर्याद व अविनाशी असे मुख्य तीर्थ आहे आणि तात श्रीज्ञानेश्वरमहाराज हे उपदेश करणारे अखंड गुरु आहेत. ते अनादि अनंत स्वतःसिद्ध अशा ब्रह्मरूप सूर्याचे ठिकाणीही आहेत. प्रथम बद्ध असून नंतर मुक्त होणारे असे इतर जे कोणी आहेत, त्या ''साध्य'' म्हणजे नवीन तयार होणाऱ्या शुद्ध सात्त्विक हृदयरूप सूर्यकान्त मण्यांमध्ये राहणाऱ्यांचे - शुद्ध अनादि अनंत असे ब्रह्मरूप सिद्धसूर्य ते आहेत. २५९.*

*सृदिानंदघन वस्तु सिद्ध सूर्याचे ठिकाणी असून, प्राण स्थिर झाल्याने सात्विक होणारे हृदय साध्य सूर्यकान्तमण्याचे ठिकाणी आहे. २६०.)*

---

ते परब्रह्मशरीर । न नाशे हा दृढ विचार ।
तदवच्छिन्न साचार । देश तैसा ॥५१॥
यालागी आळंदीतीर्थ । मज वाटे नित्य जीवंत ।
आणि स्वानुभवही येथ । प्रमाण आहे ॥५२॥
मूर्तीत ऐशिया शरीराची । भावना केलीया साची ।
उपासना भक्ताची । यदाधारे सिद्ध ॥५३॥
तैसे प्रत्यक्ष शरीर । जेथ नित्य पूर्वयुक्त्यनुसार ।
तेथ नित्यतीर्थता समग्र । कां न राहे? ॥५४॥
तया नित्यतीर्थी । स्नान करोनी गुरुमूर्ती ।
ध्यातां, तेहि होती । तेणेचि माने ॥५५॥
श्रीज्ञानेश्वर जनक जननी । अनंतकाल तदीय चरणी ।
राहोनी नित्यतीर्थ वाखाणी । मुक्तही असोनि सर्वदा ॥५६॥
जय जय सद्गुरो ज्ञानेश्वरा । जय जय सद्गुरो करुणाकरा ।
जय जय सद्गुरो विश्वंभरा । मज चरणी दातारा, नित्य ठेवा ॥५७॥

- - -

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपा प्रसादे ओवीछंदबद्धे श्रुत्या, युक्त्या, स्वानुभूत्या परमसमाधिरूप संस्थानाद् आलंदेर्नित्यतीर्थवर्णनं श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराज चरणयोस्समर्पितम् ॥

- - - - -

*५१. असे हे पूर्णब्रह्मरूप असलेले शरीर कधीही नाश पावत नाही, हे पूर्ण विचारांती सिद्ध आहे. म्हणून, असे हे शरीर ज्या देशात राहते तो देशहि त्याच्या*



*प्रभावाने तसाच अविनाशी होतो.*

*५२. म्हणून आळंदीतीर्थ हे कधीहि नाश न पावता (यालागी अनंत अनंत। आळंदी हे मुख्य तीर्थ।) अखंड जिवंत राहणारे आहे, असे मला वाटते व याला अनुभवहि प्रमाण आहे.*

***५३. जड मानल्या गेलेल्या मूर्तीत देखील अशा अनध्यस्त शरीराची भावना करून उपासना केली असता त्या अनध्यस्त शरीराच्या प्रभावाने उपासना सिद्ध होऊन संपूर्ण मूर्ति अनध्यस्तविवर्त शरीरमय आहे, असा प्रत्यक्ष अनुभव येतो.***

*५४. तर पूर्वी उपपत्तींनी सिद्ध केल्याप्रमाणे जेथे अनध्यस्तविवर्त अशा शरीराचाच नित्य वास आहे. त्या स्थळाला नित्यतीर्थत्व कां येणार नाही?*

### ***ध्यान करणारेहि अनध्यस्तविवर्त होतात***

*५५. त्या आळंदीरूप नित्य तीर्थामध्ये स्नान करून या अनध्यस्तविवर्त शरीरधारी गुरुमूर्तीचे ध्यान करणारेहि त्यांच्यासारखेच अनध्यस्तविवर्त शरीरधारी होतात.*

*५६. श्रीज्ञानेश्वर महाराज हेच माझे माता व पिता आहेत. मी त्यांचे कृपेने मुक्त होऊनहि अनंत काल त्यांचे चरणांचे ठिकाणी राहून नित्यतीर्थ अशा आळंदीची कीर्तिच गात राहीन.*

*५७. हे करुणाकरा आणि विश्वंभरा सद्गुरो श्रीज्ञानेश्वरा, आपल्या चरणांचे ठिकाणीच मला हे दातारा अखंड ठेवा.*

*श्रुति-युक्ति अनुभव या तिन्ही प्रमाणांनी पाहतां श्रीज्ञानेश्वरमहाराज परमसमाधि लावून आळंदीला बसलेले आहेत म्हणून आळंदी नित्यतीर्थ आहे. असे केलेले हे वर्णन म्हणजे **'आळंदी महिमा'** श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणांवर समर्पण असो !*

***- सद्गुरु वेदान्तकेसरी श्री बाबाजी महाराज पंडित***

०००

# ११

# ॥ मणिमंजुषा ॥

"महाराजांच्या वाणीतून अनेक प्रसंगी सहजगत्या निघालेली ही गद्यपद्यात्मक वचने सुबोध रसाळ व समर्पक असून सर्व प्रकारच्या मनुष्यांस सन्मार्ग दाखविणारी आहेत. ह्यात कोठे सत्संगाचे महत्व तर कोठे सांसारिकांस बोध, कोठे सगुणप्रेमाची

महती तर कोठे हरिहरोपासनेचे रहस्य, कोठे ज्ञानदानाचा पात्रापात्रविचार तर कोठे सकाम पुरुषांचे वृत्तिवैचित्र्य, कोठे तीर्थक्षेत्रातील पवित्र वागणुक तर कोठे सदाचाराची महती, कोठे परमात्म्याच्या यथार्थ स्वरूपाची ओळख तर कोठे अकृत्रिम भगवत्प्रेमाचे लक्षण, कोठे गुरुशिष्यांचा नित्यसंबंध तर कोठे विचाराची महती, कोठे दोन स्मृतींमधला विरोधपरिहार तर कोठे योग व भक्तीमधील विरोध; इत्याद्यनेकविषयक सिद्धान्त नित्यप्रचारातील साध्या व आनुभविक दृष्टातांनी सांगितले आहेत. त्या सर्वांचे पर्यवसान भक्ति, ज्ञान व वैराग्य ह्यात असल्यामुळे,

**''अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।**
**तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ॥''**

ह्या तातवचनाप्रमाणे ही छोटीशी **''मणिमंजूषा''** वाचकांना वेळोवेळी उपयोगी पडण्यासारखी आहे.

---

॥श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

**ओवी :- जय जय श्रीहरे जगन्निवासा । जय सच्चिदानंदा हृषीकेशा ।**
**जय गोपीकुचदुर्गविलासा । लक्ष्मीनिवासा यदुपते ॥**

(वासना)

**१. अग्नीला इंधन मुळीच घातले नाही तर तो विझून जातो व थोडे थोडे घातले तर अधिक वाढतो,**

**तसे वासनेचा रोध केल्याने तिचे शमन होते व भोग भोगल्याने ती जास्त वाढते.**

(विषयानंद व ब्रह्मानंद)

**२. पाणी व तूप हे दोन्ही जरी द्रव पदार्थ आहेत तरी पाण्याने अग्नी शांत होतो व तुपाने वाढतो -**

**त्याप्रमाणे विषयानंद व ब्रह्मानंद ह्या दोन्ही ठिकाणी जरी ब्रह्मानंद आहे तरी विषयसेवनाने वासना वाढते व ब्रह्मज्ञानाने तिचे शमन होते. (य२पू.८९)**

(सात्त्विक व तामस)

**३. वाघ मनुष्याला खातो व मांजर मनुष्याला भिते, परंतु एखादे वेळी मांजर बिघडले तर मनुष्याचा प्राण घेते,**

**त्याप्रमाणे सात्त्विक मनुष्य तर ब्रह्मानंद मिळवितोच, पण तामस मनुष्यही काही कारणामुळे संसारांतून निघाला तर तो पुन्हा संसारात पडत नाही.**

(उतावळी आणि प्रयत्न)

**४. आपला रोग जावा अशी रोग्यास जशी उतावळी असते तशी पथ्य करण्याची नसते.**

**त्याप्रमाणे लोक ब्रह्मसुखाकरिता उतावीळ असतात, पण विषय सोडण्यास**



**उतावीळ नसतात.**

(ज्ञान सांगू नये)

**५. रोगी पथ्य करणारा नसला तर वैद्य ज्याप्रमाणे त्याला औषध देत नाही त्याप्रमाणे**

**जो विषय सोडण्यास तयार नाही त्याला ज्ञान सांगू नये.**

(अधिकारी व अनधिकारी)

**६ कमळाच्या आश्रयाने भ्रमर व दर्दुर (बेडुक) हे दोघेही राहतात, पण भ्रमर हा सुगंध सेवन करीत असतो व दर्दुर चिखलच खातो.**

त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाजवळ अधिकारी व अनधिकारी हे दोघेही असतात. पण अधिकारी व ब्रह्मसुखाचा अनुभव घेत असतो व अनधिकारी विषयवासनाच वाढवीत असतो.

**उदाहरण** - इंद्र व विरोचन यांचे.

**दुसरे उदाहरण** - दोघे शिष्य गुरुजवळ राहून वेदांतात प्रवीण झाले पण त्यापैकी एक जो पहिल्यापासून थोडासा विषयासक्त होता त्याने सर्व ठिकाणी ब्रह्मच आहे म्हणून मातृगमनापर्यंत आपली मजल नेली परंतु दुसरा मुक्त झाला. (ही कथा छांदोग्योपनिषदात आहे.) **(य२पू.९०)**

(आपले आचरण)

**७.** एखाद्या शहाण्या मनुष्याच्या शहाणपणाने दुसरे लोक सुधरतात व तरतात, पण आपले आचरण जर तो शहाणपणाचे ठेवणार नाही तर स्वतः तरणार नाही, असे एकनाथ म्हणतात.

(समबुद्धीस प्रारंभ)

८. आपल्या बुद्धीप्रमाणे सांगितलेले जसे आपणास आवडते तसे दुसऱ्याच्या बुद्धीप्रमाणे सांगितलेले आपणास आवडूं लागेल तेव्हा आपल्या **समबुद्धीस प्रारंभ** झाला असे समजावे.

(सत्समागम)

**९.** नित्य षड्रसान्न खाणाऱ्यालाही एखादे वेळी भाकर खावीशी वाटते, त्याप्रमाणे सत्समागमांत असणाऱ्यालाही एखादे वेळी विषयानंद भोगावासा वाटतो; परंतु भाकरी जवळ नसल्यास षड्रसान्न खाणाऱ्याने त्या इच्छेचा रोध केल्यानेच जशी ती नाहीशी होते,

त्याप्रमाणे सत्समागमांत असणाऱ्या मनुष्याजवळ विषय नसल्याने

त्याची इच्छा आपोआपच नाहीशी होते व तो पुन्हा विषयसेवनाचा प्रयत्न करीत नाही.

(परमेश्वराची खात्री)

**१०.** पुरुषाला जितकी आपली खात्री असते तितकी दुसऱ्याची नसते म्हणून परमेश्वराला जर तूं आपल्याहून भिन्न पाहशील, तर हे पुरुषा, तुला स्वतःची जितकी खात्री राहील तितकी परमेश्वराची राहणार नाही.

(सत्पुरुष)

**११.** तरुणापेक्षा वृद्ध निर्बळ असतो परंतु त्याचा अनुभव जास्त असतो. त्याप्रमाणे राजे व श्रीमंत लोक यांच्यापेक्षा सत्पुरुष जरी दरिद्री असले तरी त्यांचा अनुभव हजारपटीने जास्त असतो.

(रजोगुणी मनुष्य)

**१२.** ज्याला तिखट खाण्याची संवय लागली असते, त्याच्यापुढे गोड पदार्थ असले, तरी तो तिखटच खात असतो, त्याप्रमाणे **रजोगुणी मनुष्य सत्पुरुषांत बसला तरी तो कामनेच्याच गोष्टी काढीत असतो.**

(विषयी आणि सत्पुरुष)

**१३.** विषयी लोकांची वासना सारखी वाढत असते, त्यांना सत्पुरुषांनी विषय दिले तर त्यांची वासना अधिक वाढते व विषय दिले नाहीत, तर त्यांची अपूज्य बुद्धि होते, म्हणून वैषयिकांविषयी उदास रहा आणि वैराग्यशील पुरुषांनाच परमार्थ सांग. **(य२पू.९१)**

(विषयसुख)

**१४.** आई व बहिणीवरून शिवी दिलेली लोकांना एक वेळ खपते, परंतु बायकोवरून शिवी दिलेली त्यांना अगदीच खपत नाही.

त्याप्रमाणे लोकांना अनंत जन्मपर्यंत ब्रह्मसुख नसले तरी चालते परंतु विषयसुख मात्र घडीभर विसरवत नाही.

()

**१५.** अभाविक भजन करणारे जसे प्रेमापेक्षा जड तालसुरांतच निमग्न होऊन जातात,

त्याप्रमाणे अज्ञानी लोक परमेश्वराची जगभर कीर्ति आहे तरी आपल्या अंतःकरणांतील व्याप्त चैतन्याला विसरून बाह्य देह व जग या जडालाच जास्त चिकटून राहतात.



()

**१६.** जो रोग औषधीने बरा होत नाही तो शस्त्रानेच कापून बरा केला पाहिजे;

त्याप्रमाणे परमार्थाचा उपदेश केला असता जो ऐकत नाही त्याला एकतर दंड केला पाहिजे अगर त्याचा निःशेष नाश केला पाहिजे.

(जगत् व ब्रह्म)

**१७.** पाण्यापासून जलचर व रस तयार होतात, पण जलचर व रस एकत्र केले तर पाणी तयार होत नाही;

त्याप्रमाणे ब्रह्मापासून जगातील सर्व पदार्थ तयार होतात पण जगातील सर्व पदार्थ एकत्र मिळविले तर ब्रह्म मात्र तयार होत नाही.

()

**१८.** पाण्याचा लोंढा लोखंडी अगर चुन्याच्या भिंती पार फोडून टाकतो,

त्याप्रमाणे वृत्ति ब्रह्माकार झाली म्हणजे मायारूपी भिंत फोडून टाकते.

**१९.** उंबरठ्यावर असणाऱ्या पुरुषाला आतले व बाहेरचे दिसते;

त्याप्रमाणे ब्रह्मरेषेला जो जाणतो तो ब्रह्माला व जनाला (व्यवहाराला) पाहतो म्हणून तोच गुरु !

(सत्त्वदीप)

**२०.**सूर्योदय झाल्यावर आंधार नष्ट होतो पण तोपर्यंत घरातला आंधार घालविण्याकरिता दीप लावावा लागतो,

त्याप्रमाणे आत्मोदय झाल्यावर संसाराची निवृत्ति होतेच पण आत्मोदय होईपर्यंत रजस्तमांत सांपडूं नये म्हणून सत्त्वदीप प्रज्वलित ठेविला पाहिजे. **(य२.पू.९२) 'अंतरीचा ज्ञान दिवा मालवूं नकोरे' (सोहिरोबानाथ)**

(जगाचा कर्ता)

**२१.** घट मातीचा असतो व अलंकार सोन्याचे असतात हे सर्व जगाला ठाऊक आहे तरी घट व अलंकार सर्वांनाच करितां येत नाहींत,

त्याप्रमाणे 'सृष्टी ब्रह्म आहे' हे जरी मुक्तांना समजले तरी जगाचा कर्ता परमेश्वरच आहे.

(सूर्यकांत मणी)

**२२.** सूर्याच्या उष्णतेने पदार्थ पेट घेत नाहीत पण सूर्यकांत मण्याची

थोडीशीच उष्णता असली तरी पुष्कळ पदार्थ पेट घेतात,

त्याप्रमाणे सर्वसामान्यचैतन्य अनुग्रहसमर्थ होत नाही पण शुद्धसत्त्ववृत्तींत बिंबलेली सगुण श्यामसुंदर मूर्ती अनुग्रह करिते.

**२३.** भाड्याच्या गाडीत मनुष्य गेला म्हणजे भाडेकरी त्याला नेमलेल्या ठिकाणी सोडून परत जातो;

त्याप्रमाणे दुसऱ्याच्या (~~साधुसंताच्या?~~) स्वाधीन होऊन जो जातो, तो आपलेपणावर येत नाहीं पण तीच घरची गाडी असली म्हणजे जाणे येणे दोन्ही आपल्या स्वाधीन असते.

त्याप्रमाणे योग व भक्ति जो स्वतः करितो त्याला संसारांत येणे व ब्रह्मभक्तींत जाणे सहज असते.

(साधक)

**२४.** पोहणारा पाण्यावरून सहज तरून जातो पण लोंढ्याची गती त्याला तरून जाववत नाही,

त्याप्रमाणे साधक माया सहज तरून जातो परंतु मायेतले कामक्रोधाचे लोंढे तो तरूं शकत नाही.

**२५.** हे पुरुषा, तूं गवतासारखा होऊं नकोस.उन्हाळ्यांत गवत सुकून जाते व पावसाळ्यांत पुनः हिरवे होते,

त्याप्रमाणे जगाचा प्रलय झाला म्हणजे सर्व पदार्थ अव्यक्तांत जातात व उत्पत्तींत अव्यक्तापासून व्यक्त होतात.

(उद्वेग)

**२६.** उन्हाळ्यांत जीवंत नदी सहज तरून जातां येते, त्याप्रमाणे ज्यांना दुःखात उद्वेग होत नाही ते मायानदी सहज तरून जातात. **(य२पू.९३)**

**२७.** भोगी मनुष्य रोगी होतो तसा त्यागी मनुष्य योगी होतो.

(रोग व औषधी)

**२८.** कफ, वात, पित्त हे तीन विकार आहेत; व तिक्त, आम्ल, मधुर इत्यादि सहा रसांच्या औषधी आहेत; ह्याप्रमाणे रोगाच्या दुप्पट औषधी ईश्वराने दयाळुपणाने ठेवली आहे.

(पापाचा साक्षी)

**२९. पापाला आणि पुण्याला जितके आपण साक्षी आहोत, तितका**



**दुसरा कोणीही नाही. ''मन जाणे पापा । तुका म्हणे मायबापा ॥''** - तुकाराममहाराज.

(शत्रू)

**३०.** वाघ सगळ्यांना मारतो व सारे लोक वाघाला मारतात त्याप्रमाणे

**जो सर्वांचा शत्रू असतो त्याचे सारेच शत्रू असतात.**

**३१.** शब्द कानाला ऐकू येतो पण अर्थ मनाला समजतो; म्हणून इंद्रिये ही एकदेशीय व मन व्यापक आहे.

(संवेग)

**३२.** सूर्य उष्णतेची खाणी आहे व डोळ्यांतही उष्णता आहे पण थोडी (काजव्यासारखी) आहे,

त्याप्रमाणे तीव्रसंवेग व मृदुसंवेग हे सूर्य व डोळ्याप्रमाणेंच होत.

तीव्रसंवेगाने आत्मज्ञान होऊन जीव एकदम मुक्त होतो.पण मृदुसंवेगी मनुष्याचा तीव्र संवेग झाल्याशिवाय त्याला मुक्ति मिळणार नाही.

डोळा उष्णतेची खाणी होईल तरच सूर्य होईल तसे मृदुसंवेगियाला तीव्र संवेगानेच ज्ञान होऊन मुक्ति मिळेल.

(साधक व बद्ध)

**३३.**साधकाचे हातून पाप जरी पुष्कळ घडले व पुण्य थोडेच घडले तरी त्याला दृढ वैराग्य झाले असतां मुक्ति मिळण्याचा संभव आहे, पण बद्ध पुरुषाच्या हातून पुण्य पुष्कळ व पाप थोडे जरी घडले तरी त्याला मुक्ति मिळण्याचा मुळीच संभव नाही,

**'देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प'** (तुकाराम महाराज)

(वानर)

**३४.**शहाण्या मनुष्याच्या हाती पुष्कळ विस्तव दिला तरी **(य२पू.९४)** त्यापासून स्वयंपाकासारखे उत्तम कार्यच होते; पण वानराच्या हाती विस्तवाची ठिणगी जरी दिली तरी त्यापासून सर्वत्र वनच पेटतें,

त्याप्रमाणे उद्योगी पुरुषानें धैर्याचा उपयोग वानराप्रमाणे वाईट कृत्याकडे केला असतां त्यापासून फार नुकसान होते,

पण धैर्य नसूनही परमेश्वराकडे जर चित्त वळविले तर त्या पुरुषास उद्योगाने धैर्य येते.

(मार्जारन्याय)

**३५.** लहान मुलाला मातोश्रीवर अवलंबून रहावे लागते, मांजर आपल्या पिलांना तोंडात धरून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी 'ने आण' करून त्यांचे संरक्षण करीत असते किंवा वानराचे पिलू बळानें आपल्या आईला चिकटून राहते;

त्याप्रमाणे **वृत्तीला मर्कटन्यायाने एकतर पकडून ठेवावे किंवा मार्जारन्यायाने वृत्ती सगुण ईश्वराच्या स्वाधीन करावी.**

(संतसहवास)

**३६.** वनामध्ये चंदनाच्या झाडाशी बाभुळीचे झाड घासूनच त्याला चंदनत्व येते असे नाही तर त्याच्या सान्निध्यानेच त्याला चंदनत्व प्राप्त होते,

त्याप्रमाणे संताच्या पायांशी डोकेच घासले पाहिजे असा नियम नाही तर त्यांचे जे साहजिक बोल निघतात ते ऐकून व त्यांच्या आचरणाकडे पाहून वागण्याचीच जरूरी आहे.

**'या हि स्वैरकथास्तेषां उपदेशा भवन्ति ताः'**

असे भागवतांत वचन आहे.

(मुरलीधर)

**३७.** राम आपल्या धनुष्यांनेच लोकांना दंड करीत असे, पण श्रीकृष्णानें दंड करण्याला शरचाप वगैरेंचा मुळीच उपयोग केला नाही, तर मुरलीच्या मधुर रवानेंच साम करून दंड केला म्हणून सर्व अवतारांत ज्याला शत्रु नाही असा मुरलीधरच होय.

(मोकळे मन)

**३८.** बाळपणी आईजवळ मन मोकळें असते, तरुणपणी स्त्रीजवळ मन मोकळे असते व वृद्धपणी पुत्राजवळ मन मोकळे असते.

त्याप्रमाणे साधकदशेंत परमेश्वराकडे मोकळ्या मनानें जावें.

ज्ञानप्राप्तदशेत आत्म्याजवळ मोकळ्या मनाने जावे व

जीवन्मुक्त दशेत सगुण परमानंद मोकळ्या मनानें घ्यावा. **(य२पू.९५)**

(ज्ञान्याची अवस्था)

**३९.** पाण्यावर उठणारा तरंगही पाणीच आहे, असें एकदा समजलें, म्हणजे मग तरंग उठो अगर न उठो, आपण सर्व पाणीच आहे असे म्हणतो;

त्याप्रमाणे ज्ञानी जीवन्मुक्त असो अगर विदेहमुक्त असो त्याला



ब्रह्माशिवाय कांहीच दिसत नाही.

(विष्णु व शिव)

**४०.** तुला पतिपत्नीभक्ति करावयाची असल्यास श्रीकृष्णास पती मान व शिवास पिता मान; किंवा शिवास पती मानून विष्णूस पिता मान;

पितृभक्ति करावयाची असली तर विष्णूस पिता व शिवास माता मान; अगर शिवास पिता व विष्णूस माता मान, पण एकास पिता व दुसऱ्यास चुलता, असे मात्र मानूं नकोस कारण दोघेही एकच आहेत.

पुराणांत विष्णू शिवाची पत्नी झाले होते (मोहिनी रूपाने) अशी कथा आहे व नरसी मेहत्याला रास दाखविण्याचे वेळी शिवाने गोपीचे रूप घेऊन रासांत मृदंगवादन केले अशी कथा आहे. म्हणून परस्पर पतिपत्नी आहेत.

विष्णुभक्ति करावयाची असल्यास एकास पिता व दुसऱ्यास माता मान पण भेद मानूं नकोस.

(मातेशी संबंध)

**४१.** बाळपणी मातेशी कितीही संबंध असला तरी हरकत नाही परंतु तरुणपणी तितका संबंध ठेवणे इष्ट नाही कारण -

**मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।**
**बलवान् इन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ।।**

अशी व्यासोक्ति आहे. तरुणपणी आईशी फक्त भोजनापुरता संबंध ठेवावा.

(तार्थक्षेत्रातील पथ्य)

त्याचप्रमाणे तीर्थाशीही फार वेळ संबंध न ठेवता थोडा वेळच (त्रिरात्र) तीर्थात राहून पवित्र व शुद्धाचरणाने वागावे, म्हणजे पाप क्षालन होते. नाहीतर उलटे नुकसान होण्याचा संभव आहे कारण -

**मनुष्य कितीही शुद्ध वागला तरी त्यांचे हातून सहज कांही दोष घडतातच, आणि तीर्थाचे ठायी दोष घडले असता ते वज्रलेप होतात.**

**'पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति'**

((ज्ञान,विरक्ति व उपरति))

**४२.** कोणतीही वस्तु तीन पायांच्या आधारावर चांगली उभी राहूं शकते, व दोन पायांच्या आधारावर ती उभी केली असता पडते; **(य२पू.९६)**

त्याप्रमाणे पुरुषाला ज्ञान, विषयत्याग व भोगाकडे लक्ष न जाणे (विरक्ति व उपरति) या तिघांचा आधार असला तर जीवन्मुक्तीचे पूर्ण सुख मिळते; पण यापैकी एक जरी साधन कमी असले तरी त्याला जीवनमुक्तीचे सुख मिळणार नाही.

(उपासना)

**४३.** अलंकाराची ज्याला आवड आहे तो सोन्याला अलंकार दृष्टीने पाहतो आणि सावकाराची दृष्टी किमतीकडे असल्यामुळे तो त्याला सोने याच रूपाने पहातो.

तद्वत् अज्ञान्याला आपली उपासनाच श्रेष्ठ वाटते, पण संत हे नेहमी ब्रह्मरूपानेच सर्व पाहतात.

(उपासक)

**४४.** जारिणी स्त्री नेहमी परपुरुषाकडेच लक्ष देते.आपल्या नवऱ्याने खर्च केलेल्या धनाकडे व उपकाराकडे लक्ष देत नाही.

त्याप्रमाणे उपासक नेहमी परमेश्वराकडेच पाहतो, आईबापांनी व इतर लोकांनी केलेल्या उपकाराकडे लक्ष देत नाही.

(परमेश्वरी कृपा)

**४५.** नोकरी करणारांला राजा पगार देतो असा नियम आहे. पण नोकरी न करणाऱ्यावरही जर तो प्रसन्न झाला तर त्याला बक्षीस वगैरे देणे त्याच्या स्वाधीन आहे,

त्याप्रमाणे सद्वर्तनानें वागणारावर व भक्ति करणारावर परमेश्वर कृपा करितो असा नियम आहे, पण तसे न करणारावरही कृपा करणे त्याच्या स्वाधीन आहे; यावरून परमेश्वराने एखाद्यावर एकदम अनुग्रह केला, असे उदाहरण पाहून तसाच तो आपल्यावरही करील, अशा समजुतीने स्वस्थ मात्र बसूं नये.

(गुरुकृपा)

**४६.** एखाद्याला दैवाने हांडा सापडला तसा मलाही सापडेल म्हणून उद्योग सोडून स्वस्थ बसणे म्हणजे उपाशी मरणे होय.

तद्वत् गुरु एकदम कृपा करतील या आशेवर कांही न करणे म्हणजे आपण होऊन काळाचे हाती सांपडणे होय.



(मनोनाश)

**४७.** नुसता इन्द्रियानिरोध केला व मनोनाश केला नाही तर मनुष्य सुटतो (मुक्त होतो) असे होत नाही, कारण आंधळा बहिरा मनुष्यही स्वप्नांत मनानें इंद्रिये उत्पन्न करून भोग घेतो, पाहतो व ऐकतो असा अनुभव आहे; म्हणून पूर्णपणे मनोनाशच केला पाहिजे. **(य२पू.९७)**

**कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ।। (गीता ३-६)**

(मनुष्यजन्म)

**४८.** कोणी सुषुप्तीतून, मरणांतून किंवा प्रलयांतून आत्मज्ञान कसे करून घ्यावे असे विचारीत असतात. परंतु आंधारापासून दिवा लावण्याचा प्रयत्न केला असतां उजेड कांही मिळत नाही, तर प्रथम दिव्याच्या उजेडातून दिवा लाऊन आंधारात नेला म्हणजे तो आंधार आपोआप क्षीण होऊन उजेड पूर्ण मिळतो;

त्याप्रमाणे सृष्टिकाळीच, मनुष्यजन्म मिळाला असतां, जागृतींत, गुरुशास्त्रांपासून आत्मज्ञान मिळवावें, म्हणजे व्यतिरेकांत सुषुप्ति, मरण व प्रलयरूप अज्ञान क्षीण होऊन उर्वरित व्यापक असा ब्रह्मप्रकाशच राहतो.

(सकामांची उपासना)

**४९.** पति देशांतरास गेला असतां स्त्रिया पतीच्या नांवाने तरी कुंकू लावितात पण तो मरण पावल्यावर मुळीच लावीत नाहीत,

त्याप्रमाणे सकाम पुरुष कामनेसाठींच साधूची आशा करीत असतात, पण एखाद्या साधूचा ब्रह्मबोध ऐकून कामना पूर्ण होण्याचा संभव न दिसला तर त्याकडे मुळीच पाहत नाहीत.

(ज्ञानानंतर)

अथवा, द्वैत कायम आहे तोपर्यंत ईश्वराचें ठिकाणी दीनता धरावी लागते पण एकवेळ ब्रह्मज्ञान झाले- हें संसाररूप द्वैत नष्ट झाले- म्हणजे मी लहान व देव मोठा या कचाट्याचे कर्तव्य उरत नाही.

(येथे एकाच दृष्टांतावर दोन सिद्धांत बसविले आहेत. दृष्टांतातील स्त्रियेचा पती मृत होणे व दुसऱ्या सिद्धांतातील साधकाचे संसारूप द्वैत नष्ट होणे यांचे साम्य आहे.)

(जगदुद्धार)

**५०.** धातूचे भस्म झाले तरी ती मातीमोल होईपर्यंत त्यामध्ये रोग दूर करण्याचे गुण राहतातच, त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानी पुरुषाचेही प्रारब्ध क्षीण झाले नाही तोपर्यंत तो जगदुद्धाराचे कार्य करीतच राहतो.

(संतांचा उपदेश)

**५१.** ज्याच्याजवळ शिकाळी-तांब्या असेल त्यालाच विहिरीचे पाणी काढून पिता येते, परंतु नदीचे पाणी सर्वांनाच पितां येते, तथापि तहान मात्र पाहिजे. **(य२पू.९८)**

त्याप्रमाणे वेदादि शास्त्रांतून ब्रह्मदेवासारख्या बुद्धिमंतांनाच शुद्ध तत्त्व समजून घेता येत असेल, परंतु संतांनी केलेल्या उपदेशांतून सर्वांनाच ब्रह्मबोध घेता येतो, किंतु मुमुक्षेची मात्र अपेक्षा आहे.

(कलिमाहात्म्य)

**५२.** घरांत धन मात्र पाहिजे मग सावकार दिवसापेक्षा रात्री जास्त रक्षक ठेवीत असतो.

त्याप्रमाणे भक्ति अंतःकरणांत असली तर कृतयुगापेक्षा कलियुगांत किंवा जुलमी राष्ट्रासारख्या परिस्थितीत सुद्धा परमात्मा सत्समागम अधिक मिळवून देत असतो.

**कृतादिषु प्रजा राजन् कलाविच्छन्ति संभवम् ।**
**कलौ खलु भविष्यन्ति नारायणपरायणाः ॥ भागवत.**

(मंदबुद्धी)

**५३.** मंदबुद्धीच्या लोकांना शास्त्रांतील दृष्टांताचे जसे ज्ञान होते तसे सिद्धान्ताचे होत नाही.

त्याप्रमाणे सकाम पुरुषांनांही चमत्कारादिकांच्या योगाने बुद्धि ग्रस्त झाल्यामुळे सत्पुरुषांचे खरे ज्ञान पटत नाही. ते त्यांच्या व्यावहारिक आचरणाकडेच लक्ष देतात.

सारांश, सत्पुरुषांचे व्यावहारिक आचरणच सकाम पुरुषांच्या लक्षांत येते; त्यांचे खरे ज्ञान त्यांना पटत नाही.

(अनुभवी व पंडित)

**५४** म्हशीला दूध पुष्कळ असते पण तिला आपल्या पारड्याला स्वतः पाजतां येत नाही, तर ते दुसऱ्या मनुष्याने नेऊन पाजावे लागते, आणि



गाईला दूध थोडे असतें परंतु तिला आपल्या वत्साला पाजून तृप्ति करून देतां येते.

त्याप्रमाणे शास्त्रांत किंवा अनुभव नसलेल्या पंडिताजवळ तत्त्वार्थ पुष्कळ असतो, परंतु त्यांना त्याचा दुसऱ्यास उपयोग करून देता येत नाही.

खऱ्या अनुभवी पुरुषाची गोष्ट तशी नसते.त्याच्याजवळ व्याकरणादि शब्दभांडार किंवा शास्त्रयुक्त्या जरी थोड्या असल्या तरी मुमुक्षुरूपी वत्साला कोणते युक्तिरूपी दूग्ध उपयोगी पडेल हें जाणून त्याची ब्रह्मबोधरूपी तृप्ती त्याला करून देतां येते.

(ब्रह्मबोध कोणापासून?)

**५५.** देहस्थितीवर नसणाऱ्या सत्पुरुषापासून ब्रह्मबोध मिळविणें हरिणीचे दुग्ध मिळविण्यासारखे असून देहस्थितीवर असणाऱ्या सत्पुरुषापासून ब्रह्मबोध मिळविणे गाईचे दुग्ध मिळविण्यासारखे आहे. **(य२पू.९९)**

(पिशााची गोष्ट)

**५६.**एका मनुष्याचें शेत पुष्कळ दिवसांपासून शत्रूनें कपटानें बळकाविलें असून त्यांत एक पिशाा होते.तें त्यानें दररोज दिवसा दहा वाजतां अन्न देऊन वश केलें होतें. त्यामुळे त्या शेतांतून कांहीं चोरून नेण्याची कोणाचीच छाती होत नसे.

एके दिवशीं ही गोष्ट समजल्यावर त्या शेताचा खरा मालक तेथें येऊन रात्री शेताच्या बाजूनें निजला, व कोंबड्यांनी बाग दिल्यावर पिशाचाकरितां आधींच अन्न आणून ठेवलें होतें तें त्याला खावयास दिलें.पिशाचानें ते भक्षण केल्यावर अर्थातच दहा वाजतां आलेलें अन्न क्षुधा नसल्यामुळें त्याने स्वीकारलें नाहीं; याप्रमाणें त्याला नित्यच्या नित्य प्रातःकाळी अन्न मिळाल्यामुळें खऱ्या मालकाला पिशाच वश होऊन त्याने शत्रूजवळून आपले शेत परत सोडवून घेतले.

तद्वत् आपला ब्रह्मानंद पुष्कळ दिवसांपासून कामादि शत्रूंनी हिराऊन घेतला आहे, आणि नियमित वेळी भिकार कर्मफळे देऊन तेथील मनोरूपी पिशाच्चाला त्यांनी वश केले आहे;

म्हणून आपण ही कर्मफळे मिळण्याच्या पूर्वी, मनुष्यदेही, तरुणपणी अशा पहांटे, श्रुति व साधू यांच्या शब्दांनी जागे होऊन मनोपिशााला स्वात्मानुभवाचे

अन्न देऊन वश केल्यावर, त्याच्या सहायाने कामादि शत्रूंना जिंकून आपला ब्रह्मानंद मिळवून घेतला तर आपण मुक्तच आहोत.

**कां जे यया मनाचें एक निकें । जे देखिले गोडीचिया ठाया सोके ।**
**म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें । दावीत जाइजे ॥ ज्ञानेश्वरी ६-४२०**

**श्लोक**

**शनैः शनैरुपरमेतद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ गीता ६.२५**

(विषयी मनुष्य)

**५७.** राजदूत ज्याप्रमाणे चोराचे सर्वस्व हरण करून त्याला शिक्षा करितात,

त्याप्रमाणे विषयी मनुष्याचे सर्वस्व हरण करून त्यांना यमदूत नरकांत टाकतात. **(य२पू.१००)**

(धैर्यवान समबुद्धि पुरुष)

**५८.** मनुष्यप्राणी दुसऱ्या प्राण्यांच्या केसांची घोंगडी करून तिच्या सहायाने आपले शीत निवारण करितात. परंतु इतर प्राण्यांची थंडी त्यांच्या आंगावरील केसांनीच निवारण होते, त्याप्रमाणे साधारण मनुष्य आपले दुःख निवारण करण्याकरिता मोठे कुटुंब मिळवून त्यांचे सहाय्य घेत असतो.

परंतु ज्यांच्या अंगात परमेश्वराच्या चिंतनामुळे धैर्य आले असते असे समबुद्धि पुरुष स्वतःच्या बलावर जगातील सुखदुःखे सहन करितात; त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नसते.

**आत्मलाभा सारिखे । गोमटे कांही न देखे ।**
**म्हणोनी भोगविशेखें । हरिखेना जो । ज्ञाने.**

(रात्री डांस व दिवसा माशा)

**५९.** घाणेरड्या जागेत रात्री निजले असतां डास चावतात, व उजाडले म्हणजे दिवसां माशा त्रास देतात;

त्याप्रमाणे ज्यांची चित्तशुद्धी झाली नाही, अशा पुरुषांना अज्ञानांत कामक्रोधादि रिपु त्रास देतात व शास्त्रज्ञान झाले तर नानाप्रकारचे संशय व विक्षेप त्रास देतात.



(संशय आणि विक्षेप)

**६०.** त्रिदोषाने झपाटलेल्या मनुष्याची तहान पाणी पाजले म्हणजे तितक्यापुरती नाहीशी होते, पण पुन्हा तशीची तशीच राहते,

त्याप्रमाणे त्रिगुणात्मक पुरुषांना आत्मज्ञान सांगितले म्हणजे तत्काळ त्यांना आत्मबोध होतो, पण पुन्हां तो काळ निघून गेल्यावर ते संसारात गुंतले म्हणजे संशय व विक्षेप त्यांना त्रास देऊं लागतात.

**६१.** कुत्री अतिशय लाडविली तर ती आपल्या अंगास झोंबतात, व त्यांना अतिशय मारले तर घरांतून निघून जातात, गृहरक्षणाच्या उपयोगी पडत नाहींत.

तद्वत् इन्द्रियें अतिशय लाडविली तर ती आपला सर्वस्वी नाश करितात; व त्यांचा अत्यंत रोध केला तर ती शरीराचा नाश करितात व त्यामुळे ज्ञानसाधन जे गुरु व शास्त्रे यांची सेवा करण्याला अडचण पडते. **(य२पू.१०१)**

**म्हणोनि विषयो सेवावा । ऐसा बोधू नोहावा ।**
**कां सर्वथा निरोधावा । तेंही नको ॥ (तात)**

(शत्रू आणि मित्र)

**६२.** मनुष्य विश्वासघाताने या लोकी आपल्याला शत्रू जोडून घेतो व विश्वासाने मित्र जोडून घेतो. शत्रूवर अपकार केल्याने शत्रूही याच लोकी अपकार करितात व मित्रावर उपकार केल्याने मित्र उपकार करितात.

त्याप्रमाणे धर्माच्या किंवा अधर्माच्या योगाने परलोकी देवतांशी मित्रत्व किंवा शत्रुत्व जुळवितां येते. अधर्माच्या योगाने इंद्र, वरुण, यमादि देवता वाईट फळे देतात व धर्माच्या योगाने उत्तम फळे देतात.

(धर्म)

**६३.** स्त्रियांचे कुचमर्दन करणाऱ्या पुरुषांना कुचस्पर्शाशिवाय कांहीच लाभ होत नाही, परंतु मुलाला आईच्या कुचांतून दूध मिळते.

- त्याप्रमाणे विषयांच्या दृष्टीने धर्माकडे पाहणाऱ्या पुरुषांना विषयच दिसतात. पण विषय सोडले आणि सद्गुरुचरणी लीन झाले तर त्याला श्रुतिमाता आपले ज्ञानामृत पाजते.

()

**६४.** रात्री निजलेल्या आपल्या मुलाला आई जशी थापटून उठवितें

त्याप्रमाणे अज्ञानांत निजलेल्या आपल्या पुत्रांना श्रुतिमाता थापटून उठविते.

**जागर्यायै चिरसुप्तानां श्रुतिरंबावत् । - व्याससूत्र**

(ईश्वरी पुरुष)

**६५.** मोटेच्या पाण्याने बागाइती जमीनींतच बीजांचा उदय होतो व अंकुर फुटतात. पण वर्षाकाळामध्ये मेघराजाच्या कृपेने जो पाऊस पडतो त्याच्या योगाने, बागाईत असो किंवा जिराईत असो, कोणत्याही जमीनीत अंकुर फुटतात.

तद्वत् साधारण पुरुषांच्या उपदेशाने एखाद्या सात्त्विक मनुष्याच्या चित्तांतच धर्माचा अंकुर उद्‌भवतो, परंतु एखादा ईश्वरी पुरुष उत्पन्न झाला म्हणजे त्याच्या उपदेशानें सात्त्विक असो किंवा साधारण असो कोणत्याही मनुष्याच्या मनांत पुष्कळ प्रमाणानें धर्मवासना उत्पन्न होते.

(ज्ञान व भक्ती)

**६६.** पृथ्वीवर चालणाऱ्या प्राण्याला वर आकाशांत उडतां येत नाही आणि आकाशातील चंद्र सूर्य इत्यादि गोलांना खाली पृथ्वीवर येतां येत नाही. परंतु गरुडादि पक्षी आपल्या पंखांच्या जोरावर आकांशात वर जातात व खालीही येतात.

- त्याप्रमाणे अतिशय नीच प्राण्यांना उंच अशा वैकुंठात जाता येत नाही किंवा अतिशय उग्र अशा उपासकांना त्यांची गती ब्रह्मांडाच्या बाहेर असल्यामुळे आंत येता येत नाही. - परंतु ज्ञान आणि भगवद्भक्ति हे दोन पंख ज्यांना आहेत त्यांना प्रेमाच्या योगाने वैकुंठांत जाऊन भगवंताची भेट घेतां येते ज्ञानाच्या योगाने सर्वत्र समबुद्धि असल्यामुळे पृथ्वीवरही येतां येते.

(बाळपण व तरुणपण)

**६७.** सडक न बांधलेला रस्ता उन्हाळ्यांत चांगला असतो, पण पाणीं पडलें की त्याजवरून गाडी नेतां येत नाहीं.

- त्याप्रमाणे जोपर्यंत बाळपण आहे व चित्ताला विषयाची चट लागली नाही तोपर्यंत ते स्थिर ठेवितां येतें; - परंतु एकवेळ बाळपण निघून गेले व विषयांच्या योगाने चित्त अशुद्ध होऊं लागले म्हणजे आत्म्याला देहाहून पृथक् पाहता येत नाही.

(चित्तशुद्धी)

**६८.** सडक बांधलेल्या रस्त्यावरून उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत बेधडक



गाड्या नेतां येतात.

त्याप्रमाणे ज्याची चित्तशुद्धि झाली आहे तो मग संसारात असो किंवा वनांत असो, त्याला कोणत्याही काळी देहाहून निराळे होता येते.

(ज्ञान वैराग्य व भक्ती)

**६९.** दोन साधक वस्तू एके ठिकाणी मिळाल्या असतां त्यांच्यापासून तिसरी वस्तू उत्पन्न होते. पण त्याच बाधक असल्या तर त्यांच्यापासून कांहीच उत्पन्न होत नाही. जसें स्त्री व पुरुष यांच्या समागमाने गर्भोत्पत्ति होते, परंतु पुरुषपुरुषाच्या समागमानें गर्भ उत्पन्न होत नाही.

त्याप्रमाणे ज्ञान व भक्ति किंवा वैराग्य व भक्ति असेल तर तिसरे वैराग्य किंवा ज्ञान उत्पन्न होतें. परंतु नुसते वैराग्य व ज्ञानच असलें तर त्यापासून भक्ति किंवा परमानंदप्राप्ति होत नाही.

(संयोगांतच वियोगोपलालन)

**७०.** माशांना जिकडे तिकडे पाणीच असल्यामुळें त्याचा वियोग त्यांना कधी वाटत नाही. तरी तृषा लागली म्हणजे ते पाणी पितात

त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानी भक्तांना परमेश्वर सर्व व्यापक असल्यामुळे त्याचा वियोग वाटत नाही. तथापि प्रेमाचें सुख घेण्याकरितां ते संयोगांतच वियोगोपलालन करितात.

**शांडिल्यसूत्र - मत्संयोगेऽपि वियोगोपलालनं प्रेम ॥**

**श्लोक :-**

**प्रियोत्कंठता स्त्रीस जैशी वियोगी ।**
**मला प्रीति दे ती हरी नित्य योगी ॥**
**जशी भेटि अत्यंत काळीं पतीची ।**
**सदा भक्ति ऐशी असो श्रीपतीची ॥**

(वामन पंडित)

(परमेश्वर मिळतोच)

**७१.** मुंगीचे जीवन सर्वदा साखरेवरच असल्यामुळे तिला साखर मिळतेच. त्याला तिचा लहानपणा बिलकुल आड येत नाही.

त्याप्रमाणे ज्याला परमेश्वर मिळण्याची खरी खरी इच्छा आहे व परमेश्वरावाचून ज्याला बिलकुल करमत नाही त्याला तो मिळतोच; मग त्याचा

शारीरिक किंवा मानसिक दुबळेपणा त्याला आड येत नाही.

(मनाला आवर)

**७२.** जागृतिमध्ये तोंड उघडे ठेवणे किंवा मिटून ठेवणे आपले स्वाधीन आहे परंतु झोपेत दांत खाणाऱ्या मनुष्याला दांत खाणे किंवा न खाणे आपले स्वाधीन ठेवतां येत नाही;

त्याप्रमाणे इंद्रियांना जिंकणे किंवा मोकळे सोडणे आपले स्वाधीन असते, परंतु एकवेळ इंद्रियांच्या स्वाधीन होऊन आपण परतंत्र झालो म्हणजे मग मात्र मनाला आवरणे शक्य नाही.

(गुरूंचे सान्निध्य)

**७३.** ज्याला नित्य रोग आहे असे वाटते त्याने नेहमी वैद्याला जवळच ठेविलें पाहिजे. कारण कोणत्या वेळेस काय होईल याचा नियम नाही,

त्याप्रमाणे संसार खरा वाटतो त्यांनी नित्य सद्‌गुरुजवळच राहिलें पाहिजे, कारण कोणता विकार कोणत्या वेळी येऊन पछाडून नेईल याचा नियम नाही.

(भोंड आणि माया)

**७४.** भोंड आणि माया ह्या दोन्ही वस्तु सारख्याच म्हणता येतील, कारण एखाद्या उंच मनोऱ्यावर चढून खाली पाहणाऱ्या पुरुषाला मी येथून पडेन की काय, अशा भीतीने जी घेरी येत असते तिला **भोंड** म्हणतात.

त्याप्रमाणे आपण ब्रह्मापासून च्युत झालें नसूनही जगाकडे सत्य दृष्टीने पहात असल्यामुळें, आतां मी संसारात फार दुःखी होईन अशा नुसत्या भीतीनेंच आपल्याला जो आपला विसर पडला आहे तीच **माया** होय.

(ब्रह्मनिष्ठ व ईश्वरी विभूति )

**७५.** आपण एखाद्या पात्रांत पाणी ठेविलें तर तें राहतें, व पृथ्वीवर टाकिलें असतां आटून जाते, परंतु आकाशांतून पाऊस पडूं लागला म्हणजे भलत्याच ठिकाणी पाट वाहूं लागून तळीं व नद्या बनतात.

तसें, साधन करून सिद्ध झालेल्या ब्रह्मनिष्ठाच्या हातून एकाग्रचित्त करणाऱ्या योगी शिष्याच्या हृदयांतच ज्ञान साठविलें जातें, संसारी लोकांना त्यांच्यापासून फारसा उपयोग होत नाही,

परंतु धर्मसंस्थापक आचार्य किंवा ईश्वरी विभूति जर प्रगट झाली तर तिच्या उपदेशाचा परिणाम सर्वप्रकारच्या लोकांवर होतो व शेकडो मुमुक्षु तयार



होऊन मुक्त होतात.

**परी तयांपासी पांडवा । मी हारपला गिंवसावा ।**
**जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥**

()

**७६.** आरशापुढें सरळ, वांकडे जसें तोंड केलें तसेंच प्रतिबिंब दिसते, तद्वत परमेश्वराचें ठिकाणीं जशी भावना धरावी तसेंच फळ मिळतें. **'येथे प्रतिफळे भावना, आपुलाली'**.

(निष्काम भक्त)

**७७.** औरस आपत्यास जसें आईचे दूध प्यावयास मिळून घरचें सर्वस्वही मिळतें,

तसेंच खऱ्या खुऱ्या अंतःकरणानें परमेश्वराचे होऊन राहणाऱ्याला परमेश्वराची कृपा, प्रेम व मुक्ति मिळून सुखरूप प्रारब्ध होण्याला कैलास, वैकुंठादि लोकही मिळतात.

(सकाम भक्त)

**७८.** धनासाठी दत्तक झालेल्या मनुष्याला आपल्या कुळांतून मुकावें लागतें, आईचें दूध प्यावयास मिळत नाही, व त्याला धनही कष्टानेंच मिळतें.

तसे सकाम भक्ताला त्याचा मूळचा ब्रह्मपणा मिळत नाही, भगवत्कृपा व भगवत्प्रेम हींही मिळत नाहींत व मोक्षही मिळत नाही, पण भावी पतनशील असे स्वर्गादिभोग मात्र मिळतात.

(अशुद्ध चित्ताची एकाग्रता)

**७९.** मोरींतले पाणी भरून ठेवल्यानें त्यात किडे होतात, तसे गंगेंचें पाण भरून ठेवल्याने होत नाहींत.

त्याप्रमाणें अशुद्धचित्त एकाग्र करणाराचे विकार व दुःखे अतिशयच जोरावतात, पण शुद्धचित्त एकाग्र करणाराला ते शिवतही नाहींत.

(मनाची धांव सत्त्वाकडेच)

**८०.** आपण निजतांना आंग जरी जमीनीवर टाकतो तरी उशाला कांही घेऊन मस्तका-कडचा भाग उंचच ठेवीत असतो.

तसें मन कितीही सुषुप्तीसारख्या तमात गुंतले असले तरी त्याचा सुखेच्छारूपी भाग सत्त्वाकडेच धाव घेत असतो.

(देह आणि आत्मा)

**८१.**घराचे आकार जरी अनेक असतात तरी त्यांतलें आकाश सारखेंच असतें - अशी लोकांच्या देहाची व आत्म्याची गोष्ट आहे.

(श्रद्धा)

**८२.**लहान मुलास तारुण्याचा अनुभव नसतांनाही तूं मोठा झालास म्हणजे तुझें लग्न होईल असें कोणी सांगितलें असतां त्यावर त्याचा विश्वास बसतो,

तद्वत् परलोकाचा जरी आपल्याला अनुभव नसला तरी धर्म केला असता परलोकीं तुला सुख मिळेल या साधूंच्या सांगण्यावर आपण आपण निःसंशय श्रद्धा ठेवली पाहिजे.

(एकाग्रता व अभ्यास)

**८३.** थोड्याशा पाण्यानें झालेला चिखल जसा पुष्कळ पाणी टाकून धुऊन टाकितां येतो,

तद्वत् थोड्याशा एकाग्रतेनें आलेली दुर्बलता जास्त अभ्यासाने नाहींशी करून टाकितां येते.

(अशुद्ध चित्ताची एकाग्रता)

**८४.** चोपण जमिनींत कितीही पाणी पडलें तरी तेथील चिखल वाहून न जातां उलट तेथे डेरे होतात, तद्वत् -

**अशुद्धचित्त कितीही एकाग्र केलें तरी त्यापासून सुख न होतां उलट दुसऱ्याला दुःख देण्याची त्यांत भयंकर शक्ति येते.**

**८५.** पाऊस सारखा पडत राहिला तर बीज पेरता येत नाही मध्यें काही उघाड गेली पाहिजे.

तसा, साधक सारखी साधनक्रिया करीत राहील तर ज्ञान होणार नाही, सद्‌गुरूला सांगण्याला मध्यें अवसर दिला पाहिजे.

(ब्रह्मसाक्षात्कार)

**८६.** पेरणी झाल्यावर योग्य वेळीं पाऊस आला असतां पीक चांगलें होते; तसे -

श्रीगुरूनें महावाक्यार्थ सांगितल्यानंतर योग्य वेळी त्यांनी दाखविलेलें साधन केलें असता ब्रह्मसाक्षात्कार होतो.

(वैराग्य आणि समाधान)



**८७.** ज्याप्रमाणे तापलेल्या दुधाला वारा लागला म्हणजे दूध व साय निराळे होऊन मलई वर येते,

त्याप्रमाणे वैराग्यानें तप्त झालेल्या पुरुषाला समाधानरूपी वारा लागला म्हणजे त्याचा देह व आत्मा एकमेकांपासून वेगळा होतात, म्हणजे हृदयग्रन्थी सुटून जातो.

(सृष्टि निर्माण)

**८८.** कोरड्या मातींच्या ढेकळाला दुसरें स्वरूप देतां येत नाहीं, परंतु तेंच मातीचे ढेकुळ पाण्यांत भिजवून मऊ केले म्हणजे त्याला पाहिजे तो आकार देतां येतो.

त्याप्रमाणे जगाच्या ठिकाणी जोपर्यंत सत्यबुद्धी आहे तोपर्यंत सृष्टि निर्माण करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी येत नाही, परंतु तेंच **जग एकदा कल्पनामात्र आहे असें कळले म्हणजे कोणतीही सृष्टि आपल्याला लवकर तयार करितां येते.**

(अशुद्ध चित्ताचा विवेक)

**८९.** कच्च्या आंब्यांतून गुठळी बाहेर काढूं लागले तर ती चांगली न निघता आंब्याचा भागही तिला चिकटून बाहेर येतो, पण पिकलेल्या आंब्यांतून ती चांगली बाहेर निघते;

त्याप्रमाणें अशुद्ध चित्ताने जो (मी देह नव्हे असा) विवेक करितो त्याच्या त्या विवेकाबरोबर आंतच्या आंत संस्काराने दुसरा देह बनत असतो, परंतु चित्त शुद्ध करून विवेक केला असतां देह व आत्मा स्पष्ट निराळे प्रतीत होतात.

(इंद्रियांतील चढाओढ)

**९०.** चांगल्या मनुष्याने बाहेरचे भांडण मोडण्याचे आधी आपल्या कुटुंबातील भांडण नाहीसें केले पाहिजे.

त्याप्रमाणे शाहाण्या मनुष्याने जग सुधारण्याच्या आधी आपल्या इंद्रियांमधील चढाओढ नाहीशी केली पाहिजे.

(ज्ञानाभिमान)

**९१.**कच्चा आंबा पुष्कळ दिवस पिकला नाही तो माचांत ठेवला असतां पिकण्याची आशा असते, परंतु विकरलेला आंबा माचांत ठेंवला तर तो फार दिवस राहण्याची आशा नसते.

त्याप्रमाणें मंदबुद्धि व विरक्त पुरुषाला ज्ञान झालें नाहीं तरी त्याला श्रवण, मनन, **(य२पू.१०७)** निदिध्यास व साधुसंग इत्यादिकांनी ज्ञान होण्याची आशा असते,

परंतु ज्ञान होऊन एकवेळ ज्ञानभिमानानें तो विषय सेवन करूं लागला म्हणजे मग मात्र त्याच्या मुक्तीची आशा रहात नाही.

(देहबुद्धीचे सालटें)()

**९२.** केळीला फळ येण्यापूर्वी तिचें पडदे उकलून पाहूं लागलें असतां फळ वगैरे कांही सांपडत नाहीं व श्रम फुकट जातात, पण तेंच तिला फळ आलें म्हणजे केळावरील सालपट काढून टाकले की उत्तम गाभा खावयाला मिळतो.

त्याप्रमाणे भगवंताची उपासना करीत असतांना प्रभूचें दर्शन झाले नाही किंवा श्रीहरिप्रेम उद्भूत झाला नाही तोपर्यंत प्रभू कसा असेल, तो आपल्यास भेटेल किंवा नाही? असे तर्क काढून श्रद्धेचे पडदे उकलून पाहिले असतां श्रम फुकट जातात; पण तेंच सगुण परमेश्वराचें एकवेळ दर्शन झाले किंवा त्याच्या विषयी पूर्ण प्रेम उद्भूत झाला म्हणजे परमेश्वररूपी केळावरील आपल्या देहबुद्धीचे सालटें काढून टाकलें असतां परम प्रेमानंद चाखावयास मिळतो.

(तक्ररूपी विषयानंद)

**९३.** गाईचे वांसरूं गाईपासून दूर होत नसल्यामुळे पाहिजे त्यावेळी त्याला तिचें दूध प्यावयाला मिळते, पण म्हशीचें पारडूं जन्मल्याबरोबर लोक त्याला तिच्यापासून दूर ठेवीत असल्यामुळें त्याला आईच्या दुधाऐवजी ताक प्यावयाला मिळते व ते तेवढ्यावरच संतुष्ट रहाते;

तद्वत् परमेश्वरापासून जो कधीच दूर होत नाही त्याला सत्तेने ब्रह्मानंद चाखावयास मिळतो, परंतु स्त्रीपुत्रांच्या स्वाधीन होऊन जे त्या प्रभूपासून वेगळे होतात त्यांना त्या स्त्रीपुत्रांपासून तक्ररूपी विषयानंद मात्र मिळतो.

(उपासक व ईश्वर)

**९४.** पर्वत मोठा व कठीण असल्यामुळे घटात मावूं शकत नाही परंतु आकाश सर्वात मोठें असूनही त्याचे ठिकाणी कठीणपणा नसल्यामुळे सर्व लहानमोठ्या पदार्थात जे सहज राहूं शकते;

त्याप्रमाणे कर्मी किंवा उपासक पुरुष जरी हिरण्यगर्भाच्या ठिकाणी



जाऊन सर्व जीवांपेक्षां वरिष्ठ होतात, तरी त्यांचे ठिकाणी अभिमान रहात असल्यामुळे प्रत्यक्ष कर्म केल्यावाचून सर्वांचे हृदयांतील त्यांना जाणतां येत नाही, पण परमेश्वराची गोष्ट तशी नाही तो कोणत्याच मायाकार्याचा अभिमान घेत नसल्यामुळे सर्वांपेक्षा वरिष्ठ असूनही सर्वांच्या अंतर्यामी त्याला राहता येते.*

**'अणोरणीयान् महतो महियान् ॥ आत्मास्य जन्तोर्निहितं गुहायाम् ॥'**

(कठश्रुति)

---

** (टीप - ह्याच अर्थाच्या महाराजांच्या खाली लिहिलेल्या ओव्या आहेत. :-*
*पर्वता आहे थोरपण । परी घटामाजी न शिरवे जाण ॥*
*आणि आकाशाते सूक्ष्मपण । यालागी सर्वत्र सर्वी आहे ॥*
*तैसे जगाहूनि वरिष्ठ जाहले । ते विराडादी अंतर्यामित्वा न आले ॥*
*माझे सूक्ष्मत्व वहिले । अंतर्यामी म्हटले म्हणोनी मज ॥*
*एवं जगा धाकुटे व्हावे । थोरपण रसास्वाद सांडावे ॥*
*ज्ञानाहंता व्युत्पत्तीते त्यजावे । मग सानचि परी होआवे मज एवढे ॥*
*भगवद्भक्तिसौरभ पराग ३ ओव्या ६७-६९)*

---

**९५.** पृथ्वींत शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांचही गुण आहेत.परंतु

*पृथ्वीच्या गंधगुणापासून जो आनंद होतो तो तिच्या इतर चार गुणांपासून होत नाही.तद्वत् -

* जलाच्या रस गुणांपासून जो आनंद होतो तो त्याच्या इतर तीन गुणांपासून होत नाही.तसाच -

* अग्नीच्या रूप गुणापासून जो आनंद व्यक्त होतो तो त्याच्या इतर दोन गुणांपासून होत नाही; आणि -

* वायूच्या स्पर्श गुणांपासून जो आनंद होतो तो त्याच्या शब्द गुणापासून होत नाही तसेंच -

* आकाशाच्या शब्द गुणापासून जो आनंद व्यक्त होतो तो त्याच्या अवकाश गुणापासून होत नाही व -

* मनाच्या स्फुरणापासून जो आनंद व्यक्त होतो तो त्याच्या चंचलतेपासून होत नाही.तसाच -

* बुद्धीच्या अर्थज्ञानापासून जो आनंद व्यक्त होतो तो तिनें शब्द घोकीत बसल्यापासून होत नाही; परंतु -

* आत्म्याच्या नुसत्या ज्ञानापासून आनंद व्यक्त होतो.

तात्पर्य, प्रत्येक पदार्थात प्रिय व अप्रिय भाग आढळतो तसा तो आत्म्यांत आढळत नाही. **- त्या प्रत्येक पदार्थाचा प्रिय भाग परमात्म्याची विभूति असून अप्रिय** (य२पू.१०९) **भाग मायेचा असल्यामुळे प्रियाप्रिय-विवेक करून आपण सर्वदा आत्माकार वृत्ति ठेवावी.**

**९६.** पाण्यांत तेल टाकले असतां पाण्याच्या आंतील वस्तू दिसतात;

त्याप्रमाणे अज्ञानांतही सत्यात्मक बुद्धीच्या योगाने सत्पुरुष आत्म्याला शोधून काढतात.

**९७.** पावसाळ्यांत वाढून उन्हाळ्यांत वाळून जाणाऱ्या झाडांचे आयुष्य पाऊस आणि थंडी यांच्यावरच अवलंबून असतें, परंतु मोठमोठें वृक्ष वसंतांत उष्णता असूनही फळाफुलांनी सुशोभित दिसतात.

तद्वत् नित्य जन्ममरणांत पडलेल्या जीवांची शांति विषयानंदावरच अवलंबून असते, परंतु जन्ममरणाच्या कचाट्यांतून सुटून जें शिष्ट-पदवीला गेले आहेत त्यांचा विषयानंद वैराग्यउष्णतेने जळून गेलेला असतो तरी ते ब्रह्मानंदांत निमग्न असतात.

**९८.** पावसानंतर नुकतेंच पडलेलें शरदाचे उन्ह झाडांचे शोषण करीत असतें, परंतु वसंताचें उन्ह वृक्षांना प्रफुल्लित करते.

तद्वत् नुकतेंच संसाराविषयी झालेले वैराग्य इंद्रियांचे व मनाचें शोषण करीत असल्यामुळे दुःखरूप वाटतें, परंतु पुढील ज्ञानकाळीचें वैराग्य जगन्मिथ्यत्वाकारवृत्तीने ब्रह्मानंदास साह्य करतें.

**९९.** प्रसूतिवेदनेला भिऊन गर्भपात करणाऱ्या स्त्रियांना संततींचे सुख भोगावयास मिळत नाही.

तद्वत् जगाच्या निंदेला भिऊन उद्भूत झालेल्या विवेकाचा जे रोध करितात व संसारालाच चिकटून राहतात त्या पुरुषांना ब्रह्मानंद भोगावयास मिळत नाही.

**१००.** बाळपणांत मूल आईजवळ शंका रहित मोकळ्या मनानें जातें, पण तरुणपणी विकाराच्या संभवामुळे आईचें व मुलाचेंही मन किंचित् कलुषित रहाते.



**(य२पू.११०)**

तद्वत् अंतरी खरी दीनता वास करूं लागली म्हणजे परमेश्वराकडे निर्भीडपणे जाता येते, परंतु भक्ति असूनही विद्येचा व तपाचा किंचित अभिमान असला तर पतनाच्या भयामुळें परमेश्वराची व त्याची क्रीडा चालचलाऊच असते.

**१०१.** घरांत चांगल्या सोई नाहींत म्हणून असलेले घरही जो जाळून टाकतो त्याला उन्ह वारा वगैरे गोष्टींची ददात पहिलेपेक्षाही अधिक भोगावी लागते;

त्याप्रमाणे आपल्याकडून परलोकसाधन घडत नाही म्हणून जे देहत्याग करितात ते असलेल्या देहांतच योग्य साधन न केल्यामुळें अधिक दुःखांत पडतात.

**१०२.** चांगल्या सोईचें घर तयार होईपर्यंत असेल तशाच घरांत राहून पुढील घराची जो व्यवस्था करितो व घर तयार झालें म्हणजे जुनें घर सोडून देतो, त्याला मुळीच ददात भोगावी लागत नाही;

त्याप्रमाणे याच देहांत राहून जो आपल्या शुभ कर्मानें परलोकाची तयारी करून ठेवितो. आणि तीं शुभ कर्मे संपूर्ण झाल्यावर जो या जडदेहाला सोडून जातो त्याला बद्ध होण्याची मुळींच पाळीं येत नाही.

**१०३.** सूर्याचें तेज जरी मोठें असलें तरी तें लोकांनाच मार्ग दाखविण्याच्या उपयोगी पडतें, स्वतः सूर्याला त्याचा कांही उपयोग नसतो;

तद्वत् ब्रह्मनिष्ठाच्या शास्त्रादि व्युत्पत्तीपासून मुमुक्षूचेंच कार्य होतें, स्वतः त्याला त्याचा कांहीच उपयोग नसतो.

**१०४.** सर्व पदार्थ सूर्याच्या प्रकाशनेंच प्रकाशित होत असल्यामुळे सूर्य सुरूप किंवा कुरूप म्हणतां येत नाही, कारण तो दोहोंचाही प्रकाशक आहे;

तद्वत् आत्मज्ञानानेंच त्रिगुणात्मक विश्व ज्ञानमय झालें आहे, म्हणून आत्म्याला सत्त्वगुणी देवरूप किंवा रजस्तमगुणी असुररूप म्हणता येत नाही, कारण तो गुणत्रयांचाही साक्षी आहे.

(सगुण देवदर्शन व निर्गुण ब्रह्मज्ञान)

**१०५.** कांचेत घेतलेल्या सूर्यकिरणांच्या आंगी तृणाला जाळण्याची शक्ति अधिक येते, पण त्यांत प्रकाशशक्ति रहात नसल्यामुळे त्यापासून आंधारनिवृत्ति होत नाहीं, म्हणून त्या कामी व्यापक सूर्यप्रकाशाचाच उपयोग करावा लागतो.

तसेंच सत्त्वगुणानें सगुण झालेल्या परमेश्वराच्या दर्शनानें सर्व कर्मे जळून जातात तरी पण **केवळ डोळ्याने सगुणमूर्ति पाहून अविद्यानिवृत्ति होत नाही, (य२पू.१११)** म्हणून निर्गुण ब्रह्माच्या ज्ञानानें अविद्यानिवृत्ति करून सगुण परमेश्वराच्या ध्यानानें मानसिक संकल्पविकल्प व इतर कायिक वाचिक कर्मे धीर पुरुष नाहीशी करतात.

(देहत्यागाची रीति : २ प्रकार)

**१०६. शिष्य** – गुरुमहाराज, प्रथम या देहाचा त्याग करून नंतर जीव दुसऱ्या जन्मांत जातो, असें गरुडपुराणांत सागितलें आहे आणि प्रथम दुसरा देह प्राप्त करून घेऊन नंतर पहिला देह सोडतो असें भागवतांत सांगितलें आहे, तर मग यांचा अविरोध कसा?

**गुरु** – जो दुसऱ्याच्या घरांत भाड्यानें रहात असून आपलें सत्तेचे घर बांधून ठेवीत नाही, त्याला घरमालकानें काढून दिले म्हणजे दुसरे घर पहावे लागते;

त्याप्रमाणे काळाच्या स्वाधीन असलेल्या पांचभौतिक शरीरांत राहून जे आपल्या सत्कर्मानें आपल्या सत्तेचा परलोक तयार करून ठेवीत नाहीत, त्यांना यमाजीभास्करानें काढून दिले म्हणजे हें शरीर सोडून दुसरें शरीर घ्यावे लागतें, परंतु भाड्याच्या घरात रहात असतानाच जे आपल्या सत्तेचे घर करून ठेवीत असतात, ते प्रथम त्या घरांत जाऊन नंतर जुन्या घरावरील ताबा सोडतात.

तद्वत् ज्या सत्कर्मी पुरुषांनी आपले पारलौकिक शरीर कल्याणतर केलें आहे, ते प्रथम स्वेच्छेनें त्यांत जाऊन जुन्या विशीर्ण देहावरील ताबा सोडतात, असा या दोन मतांचा अविरोध आहे.

**१०७.** भाड्याच्या घरांत रहात असतां जे आपला संसार पुष्कळ वाढवितात, त्यांच्याजवळ दुसरें घर तयार करण्याला द्रव्य शिल्लक रहात नसून घरमालकाचे देणेंही चुकत नाही व शेवटी 'नीघ' म्हटलें की निमुटपणे आपलें सामान घेऊन निघावें लागतें;

त्याप्रमाणें मनुष्यशरीरांत येऊन जे आपल्या कामना पुष्कळ वाढवितात त्यांची सर्व सत्कर्मे त्या कामनेला मिळून (कामनेसाठी संपून) परलोकाची त्यांचेजवळ सामग्री रहात नाही.तेव्हां जीवितरूपी जुनें द्रव्य कालरूपी घरमालकाच्या भाड्यात खर्च होऊन शेवटीं यमाजीभास्कराने काढून दिले असतां आपल्या कामनेचा संघात व फुटकें कर्म बरोबर घेऊन निमुटपणे निघावे लागते. **(य२पू.११२)**



**१०८.** भाड्याचें घर कितीही सोईचे असले तरी घरमालकाच्या इच्छेने तेथून केव्हा तरी निघून जावें लागते;

त्याप्रमाणे काळाच्या स्वाधीन असणारें हें पांचभौतिक शरीर कितीही निरोगी असलें तरी यमराजाच्या इच्छेने केव्हां ना केव्हां तरी तें सोडणे भाग पडतें.

**१०९.** भाड्याच्या घराची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवली तर वाटेल तितके दिवस घरमालक आपणास नीघ म्हणणार नाही, तथापि स्वसत्तेचे घर बांधल्यावांचून घरमालकाचा ताबा आपल्यावरून नाहींसा होत नाही,

तद्वत् योगांतील कालवंचनामंत्र किंवा सोमादिक रसायनें सेवन केली असतां वाटेंल तितके दिवस निरोगी राहून आयुष्य वाढवितां येईल परंतु सत्कर्मानें पुण्यलोक आपल्या सत्तेखाली आणल्यावांचून यमाचा ताबा आपल्यावरून सुटत नाही.

**११०.** घरमालकाला प्रसन्न करून घेऊन त्याला घराची किंमत दिली असतां भाड्याचे घर देखील आपल्या सत्तेखाली आणता येते.

त्याप्रमाणे देवतांना प्रसन्न करून सत्कर्मरूपी द्रव्य अर्पण केलें असतां. हे मानुष शरीर देखील स्वसत्तेखालीं आणता येते.

**१११.** विकत घेतलेल्या भाड्याच्या घराची सर्व व्यवस्था नंतर त्या विकत घेणाराकडे असते;

त्याप्रमाणे सत्कर्मानें देवतांपासून विकत घेतलेल्या अमर मानुषशरीराचें रक्षण कल्पांती वगैरे आपणाला योगबलानें करावें लागतें. याला उदाहरण योगवासिष्ठातील काक भृशूंडीची कथा आहे.

(शास्त्राचे महत्व)

**११२.** सौंदडची (शमीची) शेंग गुळचट असते व भाजी करून त्यांत तिखट मिठ टाकलें तरी ती आपला गुळचटपणा सोडीत नाही त्याप्रमाणें नुसता सात्त्विक मनुष्य शास्त्रावाचून मोक्षास प्राप्त होत नाही.

(मनावर संस्कार)

**११३.** पाणी अतिशय पातळ असल्यामुळें त्याला आपणास कोणताहीं आकार देता येत नाहीं किंवा अतिशय घट्ट अशा मातीच्या गोळ्यालाहीं कोणताच आकर देतां येत नाही परंतु माती व पाणी मिश्रित करून मृदू केलेल्या मातीला इच्छित आकार देतां येतो.

त्याप्रमाणे अतिसूक्ष्म अशा आत्म्याला कोणताही आकार देतां येत नाही, किंवा अतिशय जड अशा देहालाही कोणत्याच आकाराचें करितां येत नाही, तर मनालाच ध्यानानें घनरूप करून पाहिजे तो आकार घेता येतो.

(गुरुशिष्यांचा संबंध)

**११४.** गुरुशिष्यांचा प्रेमसंबंध हृदय व शरीर यांच्या संबंधाप्रमाणें आहे. शरीरांतील अशुद्ध रक्त घेऊन हृदय तें शुद्ध करिते व फिरून शरीरकडे पाठवितें. तद्वत् - श्रीगुरु शिष्याचें अशुद्ध विचार घेऊन ते शुद्ध करून फिरून शिष्याला देतात.

(ब्रह्मज्ञानानंतरचे पथ्य)

**११५.** निजण्याचे वेळी मनुष्य आपलें डोकें उशीवर न ठेविता तसाच निजेल तर त्याचे अन्न उद्‌गामी होऊ लागेल व त्यामुळें अपचन होऊन त्याला त्रास होण्याचा संभव आहे.

त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान झाल्यावरही जो आपली वृत्ति अंतर्मुख न ठेवितां विषयापेक्षा ठेवील त्याला पुन्हा व्युत्थान होऊन दुःख होण्याचा संभव आहे

()

**११६.** एक प्रकारचा पक्षी आहे तो रात्रीं खेक्‌खेक् असा शब्द करीत असतो. मी लहानपणी आपल्या मामाच्या गांवी (मौजा लोणी येथें) असतां एके दिवशी रात्री तो शब्द ऐकून आपल्या आजीस म्हणालो -

'हे काय आहे बाई?'

ती म्हणाली - 'हा एक पक्षी आहे.'

मी पुन्हा विचारले - 'तो काय म्हणतो?'

रात्री थंडी पडली म्हणजे तो म्हणतो **'खेक् खेक् खेकडी। सकाळ बांधू झोपडी'** परंतु सकाळ होऊन उन्ह पडले म्हणजे मग तो म्हणतो -

**'कोण माय आता बांधते झोपडी?'**

या गोष्टीवरून मला एक मोठा सिद्धांत स्फुरला तो असा की



सत्पुरुषाजवळ जे लोक येतात त्यांची हुबेहुब अशीच स्थिति असते,' आम्ही आजपर्यंत कांहीच केले नाही. आपले आयुष्य व्यर्थ घालविले' असा विचार मनांत येऊन तितक्या वेळेपुरते त्यांना वाईट वाटतें व त्यांतून निघण्याचा ते विचार करतात; परंतु घरी गेल्याबरोबर 'आतां मग करू' अशी चालढकल करीत इकडला तो विचार सोडून देतात. **(य२पू.११४)**

()

**११७.** मनुष्याचे शरीर काळाच्या स्वाधीन असूनही त्याची बाळ, तरुण, वृद्ध इत्यादि रीतीने वाढ होतच असते, परंतु मन हें काळापासून स्वतंत्र असून सत्त्वगुणाच्या योगानें मनुष्य आपली वाढ करून घेत नाही हें आश्चर्य आहे.

()

**११८.** लहान मुलाच्या हाती लाडू दिला तर तो विषाचा आहे किंवा साखरेचा आहे, हे त्याला ओळखता येत नाही. त्याप्रमाणे अज्ञानी मनुष्याला धर्म म्हणजे काय व अधर्म म्हणजे काय? हे समजत नाही.

()

**११९.** स्वप्न हें नुसत्या झोपेच्या योगानेही पडत नाही, व नुसतें आपणच असलों तरीही पडत नाही, तर आपण व निद्रा असें दोन एके ठिकाणी असलो तरच स्वप्न पडते. त्याप्रमाणें एकट्या ब्रह्माच्या योगानेंही हें जग उत्पन्न होत नाहीं, किंवा एकट्या अविद्येच्या योगानेंही ते उत्पन्न होत नाहीं तर ब्रह्म व अविद्या यांच्यामुळे जगत् भासते.

**१२०.** पाणी उसाला दिलें तर गोड रस उत्पन्न करितें व निंबाच्या झाडाला दिलें तर कडू रस उत्पन्न करितें, पण स्वतः गोड किंवा कडू नसून ते सर्वरसमय आहे.

त्याप्रमाणे परमात्मा सज्जनांचे रक्षण करतो व दुष्टांचा नाश करतो, असे जें दिसते ते त्यांच्या त्यांच्या सुष्टदुष्ट भावनांचे फल आहे, त्यावरून परमात्म्याकडे **''नैर्घृण्यवैषम्यदोष''** येत नाही, कारण तो सर्व गुणांचे अधिष्ठान असल्यामुळे ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणे त्याला फल मिळते.

**तैसा समस्तां या भजनां। मी साक्षीभूत पैं अर्जुना।**

**येथ प्रतिफळे भावना । आपुलाली ॥ ज्ञानेश्वरी**

**१२१.** घराची कवाडें चोराकरिता बंद ठेवून घरधन्याकरितां नेहमी उघडी ठेवावी लागतात;

त्याप्रमाणे अंतःकरणाच्या वृत्ति कामक्रोधादिक चोरांकरिता कर्मानुष्ठानादिकांनी रोधून ठेवून ईश्वरभक्तिकरितां नेहमी मोकळ्या ठेवाव्या.

**'दद्यान्नावसरः किंचित् कामादीनां मनागपि' (य२पू.११५)**

**१२२.** एखादा डसरा कुतरा आपल्या मालकावर प्रीति करीत असल्यामुळें त्याला जरी तो प्रिय असला तरी लोकांस तो त्याज्यच असून तिकडे लोक जात नाही;

तद्वतच, ईश्वराचें नामस्मरण करणारे पापाचरण करीत असल्यास ईश्वरास कदाचित् तें प्रिय होऊ शकतील परंतु लोकांनी मात्र तिकडे जाऊं नये.

*ओव्या*

**१२३ रोधोनि ठेवितां ओंगळ पाणी । उत्पन्न होती नाना प्राणी ।**
**तेवीं अशुद्ध चित्त रोधितांक्षणी । नाना विकार उचंबळती ॥१॥**
**१२४ निर्मळ पाणी रोधितां चांग । तरी तयाचें होय तडाग ।**
**तेवी शुद्ध मन विषयविराग । धरोनि रोधिता ब्रह्म उमजे ॥२॥**
**१२५ आपुलिया मातेचे दुग्ध । धेनूचें बाळ पियावया सावध ।**
**परी महिषीपुत्रातें प्रसिद्ध । पाजावें लागे अन्यातें ॥३॥**
**तेवी श्रोत्रिय आणि सेवासंपन्न । सत्संगे पूर्ण होती आपण ।**
**परी बद्धजनां तेंचि साधन । उपदेशावें नित्य लागे ॥४॥**
**१२६. नित्य संयोग असूनि कही । मत्स्य जलातें विटत नाही ।**
**तेवी स्मरतां शेषशाई । ज्याची वृत्ति विटेना ॥५॥**
**<u>संयोग असोनि वीट न येणे । याचि नांव अकृत्रिम प्रेम म्हणणें ।</u>**
**जेथ ब्रह्मसुख सुखाचें पारणे । भगवज्जना ॥६॥**
**१२७. बीजांतूनि वृक्ष होये । झाड मोडे बीजीं सामाये ।**
**तैसें अव्यक्तांतूनि व्यक्त होये । व्यक्त सामाये अव्यक्ती ॥७॥**
**१२८. बीजा झाडा दोहीं । आकाशावाचूनि गतीचि नाहीं ।**
**तेवीं व्यक्ता अव्यक्ता दोही । नाही ब्रह्मावांचुनि ॥८॥**



**१२९. भ्रमर नाना पुष्पीं बैसती । परी रस घेवूनि तृप्त होती ।**
**मधुमक्षिका रस आणिती । परी सेवूं न शकती रजनीगुणें ॥९॥**
**तेवी विवेकसंपन्न । ऐकुनिया शास्त्रवचन ।**
**तृप्ति पावे आत्मज्ञान । सेवूनियां ॥१०॥ (य२पू.११६)**
**परी अज्ञानी जे होती । ते शास्त्र निवडिती नाना युक्ती ।**
**तयाचा दुसरे लाभ घेती । परी आपण न सेविती अज्ञानें ॥११॥**
**१३०. धूम तो दिसे कृष्णवर्ण । अग्नि तैसा नव्हे जाण ।**
**धूमावरूनि अग्नीचें अनुमान । परी धूमासमान तो नव्हे ॥१२॥**
**तेवी ज्या ज्या उठती वृत्ति । तेणे अनुमानां येत चिती ।**
**परी वृत्तिसमान चित्संविती । कदापि न घडे ॥१३॥**
**१३१ जलामाजी उठती तरंग । ते जलाचेचि असती चांग ।**
**आणि उठवावया भाग । वायूचा येत ॥१४॥**
**तरंगसमयीं तरंग दिसती । तरंग मोडलिया जलप्रतीति ।**
**परी तरंग उठवितया वायूची स्थिति । न दिसे कदा ॥१५॥**
**तेवीं जगकालीं जग भासे । ब्रह्म ज्ञानें ब्रह्म उमसे ।**
**परी जगत्कर्त्री माया न दिसे । कवणिये वेळे ॥१६॥**
**१३२. सुवर्ण उंच मोलाचें खरे । परी शत्रु मारावया बा रे ।**
**केलिया कनकाची शस्त्रे । उपयोगी न येती ॥१७॥**
**लोहशस्त्रे घेवून । करावें शत्रूचें मर्दन ।**
**आणि स्वभोगार्थ सुवर्ण । घेयावें मग ॥१८॥**
**तेवी मारावया षडरिगण । उपयोगी नये ब्रह्मज्ञान ।**
**तेथ विवेकवैराग्यादि साधन । आवश्य होआवें ॥१९॥**
**१३३. विवेकवैराग्यदिकें करून । निवटलिया कामादि दुर्जन ।**
**मग आनंद प्राप्तिस्तव जाण । ब्रह्मज्ञान आश्रयावें ॥२०॥ (य२पू.११७)**

॥हरिःॐतत्सत् श्रीमत्सदगुरुज्ञानेश्वकृपाप्रसादे गद्यपद्यान्विता मणिमंजूषा समाप्ता ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

## १२. प्रियपाहुणेर : विषयदिग्दर्शन

**"भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा"**

असें एका प्रेमळ भगवद्भक्तानें म्हटले आहे. त्याचा अभिप्राय असा कीं अखंडैकरस भगवत्प्रेमाचा झरा ज्याच्या अंतःकरणांत वाहत असेल, तेथेंच त्या स्वयमेव परमानंदस्वरूप भगवंताचें नित्य सान्निध्य असतें. ह्या भक्तीचें लक्षण महाराजांनी "निदिध्यासन प्रकाशांत" असेंच केलें आहे :-

**अहंता निःशेष जाय । प्रीतिशरीर नित्य राहे ।**
**हे मुक्तिगत भक्ति होय । अखंडैकरस ॥**

(सूक्तिरत्नावलि प्रथम यष्टी पृष्ठ १४९ ओ० ६८.)

प्रीतिशरीर म्हणजे अनध्यस्त भगवच्छरीर. ज्या भाग्यवानाला भक्तीची संप्राप्ति झाली आहे, त्याला अनध्यस्त भगवंताचें नित्य सान्निध्य असतें, त्याचा अहंग्रंथि सुटून जातो, रागद्वेष त्याच्या वाऱ्यासही उभे राहत नाहीत, शास्त्रादिकांचे प्रयोजन क्षीण होतें व त्याच्या संपूर्ण वृत्ति भगवत्पर होऊन

**"हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः"**

अशी त्याची स्थिति होऊन जाते. ह्या स्थितीला अनुकूल अशी रसोत्पत्ति व्हावी लागते, त्या रसाचा स्थायीभाव प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणात आत्मप्रीतिरूपानें मूळचाच असतो, परंतु वेदमार्गानें चालून आपल्या इंद्रियांचे व्यापार विषयप्रवृत्तिकडून वळवून **(य २ पृ ११९)** परमात्मप्रेमाकडे लावणें एवढेंच त्यांचें कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याची योग्य दिशा सर्वांस कळण्याकरितां, आदौ चित्तांतील मलविक्षेपादि दोष कर्मोपासनादि साधनांनी नाहींसें केल्यावर सद्गुरुकृपेनें भक्तीचें स्वरूप कसें प्रगट होते? उपासना व भक्ति यांत काय भेद आहे? उपासनेंतील भावनादार्ढ्यानें अंतःकरणात अवतारमूर्ति कशी प्रगट होते? व तदाश्रित ज्ञानोत्तर भक्तिभावाने सर्ववृत्तींची एकतानता होऊन अखंडैकरसता प्राप्त झाली असतां समूळ ज्ञानाभिमान कसा नाहींसा होतो? इत्यादि गोष्टींची सप्रमाण सिद्धि या "प्रियपाहुणेर" ग्रंथांत महाराजांनी 'रूपक'अलंकारानें केली आहे. याचे एकंदर चार "आदर" असून त्यांतील विषयक्रम थोडक्यांत असा आहे :-

### *आदर १ ला*

सद्गुरुस्मरण. अनाद्यविद्येनें आत्मप्रेमाचा विषयांवर आरोप केल्यामुळें जो वियोग वाटत होता त्याचे परमात्मभक्तींत अकस्मात् ऐक्य कसें होतें तें आज सांगावयाचे आहे.

विषयप्रीतिमध्यें आत्मप्रेम सत्तारूपानें असतोच, तो सद्गुरूच्या महावाक्यश्रवणाने



चिद्रूपानें स्फुरण पाऊं लागल्यावर माधुर्यभक्तीनें आनंदरूपांत त्याचें पर्यवसान करण्याचा उपक्रम.

आत्मप्रेमाचा विषय एक अनध्यस्त अवतारशरीरच आहे, परंतु ज्ञानाभिमान समूळ गेला नाही तोपर्यंत कामक्रोधादिक शत्रु पुन्हा इंद्रियांना विषयाकडे ओढून मधुर रसोत्पत्ति होण्याला प्रतिबंध करूं पाहतात. (ह्या कामक्रोधांची भीति अज्ञान्यापेक्षां ज्ञानियालाच विशेष असते, असें तातही म्हणतातः-

**"हे शस्त्रेंवीण साधिती । दोरेवीण बांधिती । ज्ञानियांसी तरी वधिती । पैज घेऊनी ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें नलगे अज्ञान्यापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवीं ॥"**

ह्याकरितां आपल्या हृदय नामक गांवात प्रिय भगवन्मूर्तीचे आगमन होऊन शुद्ध परमार्थरूपी पाहुणेर (पाहुणचार) यथासांग करितां यावा म्हणून तेथली महाराणी जननी भक्ति हिनें मधुर रसाची पात्रें तयार करण्याकरितां व त्या सुंदर पवित्र अन्नाला कामक्रोधादि चांडालांचा स्पर्श होऊं नये म्हणून त्यांचे निवारण करण्याकरितां **(य२पृ १२०) मति** (ज्ञान) आणि **रति** (भगवद्विषयक प्रेम ) अशी दोन रूपें धारण केली. मतीच्या प्रचंड सैन्याचें व त्या सैन्यानें युद्ध करून जें प्रवृत्तीचें दमन केलें त्याचें सुरस वर्णन. शत्रूंना जिंकून मति परतल्यावर प्रियाची मार्गप्रतिक्षा.

### *आदर २ रा*

उपासना व भक्ति यांतील भेद, व पूर्णभक्ती साध्य होण्याकरितां उपासनेची आवश्यकताः-

कर्म आणि उपासना यांचा समुच्चय ईशावास्य श्रुति सांगत असल्यामुळें, कर्मानें चित्तशुद्धि व उपासनेनें चित्त एकाग्र होऊन ईश्वरविषयक प्रेम उत्पन्न झाला असतां भक्ति प्रगट होते, म्हणून उपासना व भक्ति एक नाहींत.

**उपासना** कर्मसमन्वित असून **"कर्तृतंत्र"** आहे व

**भक्ति** कर्मार्पण केल्यावर उरत असून **"वस्तुतंत्र"** आहे.

उपासनेत भौतिक वस्तूंच्या ठिकाणीं ईश्वरीभावना करावी लागतें, म्हणून ती **भावनाश्रित** आहे व भक्ति भूतरहित अवतारशरीराच्या आश्रयानें राहते, म्हणून ती **अवताराश्रित** आहे.

उपासना ज्ञानोत्तर काळीं रहात नाही व भक्ति ज्ञान झाल्यावर वृद्धिंगत होते. भावना नेहमीं कर्तृतंत्र असल्यामुळें उपासनाही कर्तृतंत्रच आहे, व ऐतिह्यप्रमाणावरून अवताराला वस्तुतंत्रता असल्यामुळें भक्ति वस्तुतंत्र आहे. ज्ञान झाल्यावर सद्गुरुचरणाची आवडी अधिक वाढते म्हणून सद्गुरूपासना मात्र भक्तिच होय.

(ह्याचें सोपपत्तिक विवेचन ध्यानयोगदिवाकराच्या सहाव्या समुल्लासांत महाराजांनी केलें आहे.)

सकर्म उपासनेस केवळ ब्राह्मणच अधिकारी आहेत व भक्तीस चारही वर्ण अधिकारी आहेत. कर्मरहित उपासनेंनें तरल्याचीं उदाहरणें इतिहासांत नाहींत, पण कर्मरहित भक्तीनें तरल्याची उदाहरणें भागवतात आहेत.

**शंका-** असें आहे तर उपासना न करितां केवळ भक्तिच करावी?

**समाधान-** असें होऊं शकत नाही. आधीं कर्मोपासनेनें चित्तांतील मळ विक्षेप घालवून उपासना तशीच पुढें दृढ चालवावी; **(य२पू.१२१)** म्हणजे धारणाविषयक मूर्तीच्या ठिकाणीं भावनेनें जसजसी उपासना वाढत जाईल तसतसी अंतःकरणांत अवतारमूर्ति प्रगट होत जाते.

ह्याकरितां पौराणिक उपासना व वैदिक उपासना या दोहोंचा समन्वय करून ब्राह्मणांनी अभ्यास करावा व इतरांनी नुसती पौराणिक उपासनाच करावी. उपासनेच्या परिपाकदशेंत अंतःकरणांत अवतारमूर्ति उत्तमप्रकारें व्यक्त झाली असतां त्या मूर्तीचेठायीं आत्मप्रीतिवत् जो साहजिक प्रेम ती भक्ति होय.

### *आदर ३ रा*

माधुर्यभक्तीचे मर्यादानिष्ठा व पुष्टिनिष्ठा असे दोन भेद, व मर्यादानिष्ठेचें स्पष्टीकरण :- अंतःकरणांत प्रगट झालेलें अवतारस्वरूप ब्रह्माचा विवर्त आहे असें ज्ञानानें जाणून त्या आपल्या आवडत्या मूर्तीचे ठिकाणीं आत्मप्रीतिवत् अखंड प्रेमधारा असणें हीच माधुर्यभक्ति होय. ही सर्वरसात्मक आहे. प्रवृत्तिदमन मार्गप्रतीक्षण, प्रियार्चन इ. निरनिराळ्या प्रेमवृत्तीत ज्या ज्या रसाचा आविर्भाव होतो त्याचें स्पष्टीकरण. मर्यादानिष्ठेचें विवेचन. सर्ववृत्ति एकरसात्मक होऊन सत्त्वगुणाचा आग्रह सुटला असतां रतिमतीचें ऐक्य.

### *आदर ४ था : पुष्टिनिष्ठा वर्णन*

इंद्रियांच्या सर्व वृत्ति अखंडैकरस परमात्मप्रेमांत तल्लीन होऊन चिच्चडभाव विसरून जाणें व भगवत्प्रेमाचें केवळ वेड लागणें ही पुष्टिनिष्ठा होय. विषयभावरहित गणिकाप्रेमाची उपमा. **''या प्रीतिरविवेकानां''** या प्रल्हादवचनाचें प्रमाण. ज्ञानी व भगवद्भक्त यांची तुलना. अज्ञान मिथ्या कळल्यानंतर ज्ञानाचा उपयोग रहात नाहीं, परंतु ज्ञानाभिमान येऊं नये म्हणून भक्तीचें रक्षण करावें. माधुर्य प्रेमाचे उद्गार. (फारच वाचनीय ओव्या) श्रीज्ञानेश्वर स्तवनांत उपसंहार.

*(प्रकाशक : श्रीनिवास रामचंद्र हरिदास. वैशाख वद्य ८. शके १८३२ / इ.स.१९१०)*



# १२

# ॥ प्रियपाहुणेर ॥

## आदर १ ला

## ॥ प्रवृत्तिदमन ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

**जयजय आळंदीवल्लभा श्रीगुरो । जय जय प्रणतकामकल्पतरो ।**
**जय श्रीज्ञानेश्वर धैर्यमेरो । प्रेम निर्झरो भवन्नामें ॥१॥**
**सकळ रसाधिष्ठान । एक श्रीगुरूचे चरण ।**
**तत्स्पृष्ट जीवनामृतपान । करिती ते सुगरण नमूं सदा ॥२॥**
**आतां सावधान सकळ । होऊनि सर्वकाळ ।**
**पियावे कल्लोळ । प्रेमामृताचे ॥३॥**
**कां अनादि मायेचिया पोटीं । जाहली होती तुटी ।**
**ते अकस्मात भेटी । आजि येथें ॥४॥**
**ना कुंकुमचिन्हित बाळी । वर्धमानप्रेमें आगळी ।**
**होती पितयाचे कुळीं । तंव महावाक्ये धुमाळी ऐक्य जाली ॥५॥**
**सत्ताभाव कुंकुमचिन्ह । चिदैक्यभावें जालें लग्न ।**
**आतां स्वानंदमंचकारोहण । तो पहिला दिन आजिचा ॥६॥**
**एकाकी एकटी बाळा । प्रियस्नेहाचा उमाळा ।**
**परी सौंदर्याचा लळा । बहुतांलागीं ॥७॥**
**अर्पिली एकाकी एकटिया । परी बहुत भुलले सौंदर्या ।**
**हरो पाहती करूनियां । उपाय नाना ॥८॥ (य२पू.१२३)**
**यालागीं शत्रुसम्मर्दन । आणि पूजावया प्रियचरण ।**
**एकटी बाळा आपण । द्व्यंग जाली ॥९॥**
**की उष्णता आणि दीप्ती । मिळूनि एक ज्योती ।**
**उष्णता जाळी तृणाप्रती । दीप्ति समस्त प्रकाशें ॥१०॥**
**परी उष्णतेहूनि कहीं । दीप्ती वेगळी नाहीं ।**

आणि कार्य तंव लवलाही । दिसती दोन ॥११॥
तैसे दोन कार्य एक परिणती । येथ दोनी अंगे एकेपांती ।
प्रियालिंगनीं होती । सहायक ॥१२॥
सामग्रीबळें वारिलें विघ्न । मग मधुर रसाचीं ताटें भरून ।
रुचिर प्रिया घालतां भोजन । तृप्त आपण नवल हे ॥१३॥
तो पाहुणेरु कैसा । जो आवडे समस्तां सरिसा ।
सकळ मांदीचिया वळसा । पाहुणेरु माझा ॥१४॥
तरी तयाचा अर्थु । साच शुद्ध परमार्थु ।
परी श्रवणभूषणें अंगमातु । साजवीजे ॥१५॥
कीं रत्नाची कीर्ती । कीळ नामें प्रशस्ती ।
आणि आधार निश्चिती । रत्न एक ॥१६॥
तेथ कवण कवणाचें अंग । परी मोहती दोनी भाग ।
स्वानंद तेवी सुरंग । उमटे येथ ॥१७॥
दोहीं प्रतिमा एक बाळा । साधनमिव लीलया वेल्हाळा ।
आश्रित परी सोहळा । आश्रयाचा करी ॥१८॥
ते या हृदयगांवींची । दोहों अंगें साची ।
महाराणी येथीची । जननी भक्ती ॥१९॥
शांतिमंचकीं परमानंद । आलिंगनीं अभेद ।
होआवया सर्वार्पण सिद्ध । पाहुणेर करी ॥२०॥
तें सुंदर सोंवळें अन्न । रक्षावें चांडाळांपासून ।
यालागीं जाहली आपण । दोन्हीं प्रतिमा ॥२१॥
तिया मति आणि रती । हृदयपटीं विराजती ।
मग आपसांत विचारिती । सानुराग ॥२२॥
बाई आज प्रथम दिनीं । रमणसमागमन सदनीं ।
परी पाहुणेर अनुगुणी । आचरावा ॥२३॥
तरी दोघी मिळोनि दोनी । कामें घेऊं वांटोनी ।
मग प्रसंग सांवरोनी । अर्चू प्रिया ॥२४॥
परी एकमेकीपासोन । भिन्नइव भासोनि न राहों भिन्न ।
शेवटीं एकभास जावोन । ऐसी आपसांत आण वाहिली ॥२५॥



मग गृहामाजी रती । प्राप्त्रे करावया निगुती ।
पाकाधिष्ठात्री सुरमती । जाहली येथ ॥२६॥
चांडाळ स्पर्श न करिती । ऐसी करावया व्यवस्थिती ।
द्वारीं उभी राहिली मती । घेऊनि सैन्य ॥२७॥
कामक्रोधादि मांग । जिंकावया सवेग ।
प्रचंड सैन्याचा लाग । धरिला हातीं ॥२८॥ (य२पू.१२४)
तेथ विवेकमंत्री मोठा । जो जाणे सकळ वाटा ।
पूर्णदर्शनदिवटा । घेवोनि हातीं ॥२९॥
तो निजसैन्या प्रकाश दावित । पारकिया तर्कगर्ते बुडवित ।
कपाटें रोधी समस्त । इंद्रियांचीं ॥३०॥
प्रतिनिधी तेथ विरक्ती । मुख्य निरोध सेनापती ।
यम ते बोलिजे महारथी । नियम गजपती वीर गाढे ॥३१॥
सत्कर्मवारू अतिचपळ । सत्सामग्री पायदळ ।
गोविंदनामकल्लोळ । धडकती वाद्यें ॥३२॥
निवृत्तिमायेचिया अनुमतीं । जय गर्जे सुवासिनी शांती ।
निरीक्षण धैर्याहातीं । चालले दृढ ॥३३॥
एवं युद्धी दळ गाढें । तेणें प्रवृत्तीचें अंग मोडे ।
मग पुत्रासी म्हणे पुढें । न जावें आतां ॥३४॥
योगशस्त्राचे घाय तिखट । तेणें काम गेला मृत्युनिकट ।
क्रोधलोभाची वाट । जाहली तैसी ॥३५॥
जडत्वाचें पांघरुण । तें कवच गेलिया फुटोन ।
चेतन जाला अभिमान । न सांगतां ॥३६॥
मग जे इतर । मातेसहित कुमर ।
ते आटले अभ्र । गगनीं जेवीं ॥३७॥
तंव शांति धांवोनि पुढा । मार्गी घातला चंदनसडा ।
मृदु स्नेहाचा पालोडा । आंथरुनी ॥३८॥
आतां सदनीं जगन्निवास । येतील हा विश्वास ।
धरोनी प्राप्त्रें रतीस । जालीं कीं पुसे ॥३९॥
परतलिया मति सुभटा । तंव हृदयीं देखे सुरस ताटा ।

जेथ रतीचा हात गोमटा । उल्हासें आला ॥४०॥
आतां केव्हां येतील भगवंत । म्हणोनी उत्सुक सचिन्त ।
श्रीज्ञानेश्वरकृपा यथार्थ । तूर्ण फळे ॥४१॥
॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
प्रियपाहुणेरे प्रवृत्तिदमनं नाम प्रथम आदरः॥
०००

### आदर २ रा

## ॥ उपासना व भक्तीतील भेद ॥

जय जय सद्गुरो करुणाघना । जय जय सद्गुरो परिपूर्णा ।
जय जय सद्गुरो कल्याणनिधाना । अळंदीपते ॥१॥
श्रोतीं होआवें सावधान । मागील कथानुसंधान ।
प्रिय यावयाकारण । उपाय रचिती पैं दोघी ॥२॥
जननी ईशावास्यश्रुती । सांगें तें धरूनि चित्तीं ।
कर्मे मृत्युरूपशत्रु मारिती । आणि उपासने बोलाविती अमृतप्रिया ॥३॥
म्हणोनि कर्म आणि उपासना । समुाये होवाया जाणा । (य२पू.१२५)
ऐशा सांगितल्या खुणा । मतीनें तेव्हां ॥४॥
मळ हा निःशेष जाय । आणि चित्त एकाग्र होय ।
मग श्रीहरीचेचि पाय । आवडती नित्य ॥५॥
तेव्हां प्रकटे भक्ती । पूर्ण परमेश्वरासक्ती ।
म्हणोनि उपास्ति आणि भक्ती । एकेपांती न बैसवूं ॥६॥
आतां उपासना-भक्तीभेद । किंचित करूं विशद ।
श्रोतीं ऐकतां सावध । हितचि होय ॥७॥
उपासना कर्मसमन्वित । भक्तीनें कर्माचा उपक्षय होत ।
कर्म अर्पिलिया उरत । प्रेमशेष ते भक्ती ॥८॥
केवल कर्तृतंत्र उपासना । भक्ति आश्रयी वस्तुतंत्र ज्ञाना ।
जैसी वेदीं 'पंचाग्नि-उपासना' । बोलिली आहे ॥९॥
तेथ ''योषिदग्नि'' निरूपण । हें सिद्ध नाहीं भावनेवीण ।



म्हणावया येथ प्रमाण । वेदूचि एक ॥१०॥
तरी प्रत्यक्षानुमानें जें न प्रकाशे । तेथचि शब्दप्रमाण विलसे ।
म्हणोनि भावना असे । या स्थळीं ॥११॥
भावनाफलार्थी प्रमाण वेदु । तेणें तो ईश्वर प्रसिद्धु ।
अन्यथाकर्तुं शक्तसिद्धु । होय म्हणुनी ॥१२॥
विवरणप्रमेयसंग्रहांत । बोलिले विद्यारण्य मात ।
कीं उपासना हे समस्त । मनोराज्यची ॥१३॥
आणि विष्णुशिवादि परोक्षज्ञान । तो तंव भ्रम नोहे जाण ।
हें विद्यारण्यस्वामीच वचन । पंचदशींत बोलिले ॥१४॥
ऐतिह्यप्रमाणावरोनि पाहतां । अवतारासी वस्तुतंत्रता ।
भक्तीसी अवताराश्रितता । वस्तुतंत्रता म्हणोनी ॥१५॥
कामिनी अग्निरूप पाही । ऐसा इतिहास कोठे नाहीं ।
म्हणूनि वस्तुतंत्रता नाहीं । उपासनेतें ॥१६॥
कर्म सोडोनि उपासना करितां । तरला हा इतिहास नाहीं तत्वतां ।
आणि कर्म सोडोनि भक्ति करितां । तरले ऐशा कथा भागवंतीं ॥१७॥
सकर्म उपासनेकारण । अधिकारी द्विज आपण ।
भक्तीस अधिकारी चारी वर्ण । भेद म्हणून दोहींचा ॥१८॥
यद्यपि प्रधानोपासनेमाजीं । स्त्रीशूद्रातें अधिकार सहजी ।
तथापि कर्मप्रसंगें अजी । म्हणों ये कीरू ॥१९॥
आणि तुकारामादि संत । केवळ भजनें परंप्राप्त ।
यालागीं भक्ती निश्चित । वेगळी म्हणो ॥२०॥
मंत्रें प्रोक्षिलियावीण अन्न । उपास्तींत नैवेद्य न चले जाण ।
भक्तिभावें रघुनंदन । बोरें खाय म्हणोन भेद ॥२१॥
उपासना ज्ञान होतां गळे ।
भक्ति ज्ञानानंतरही पघळे ।
यालागीं दोनी मार्ग वेगळे । ऐसें मी म्हणे ॥२२॥
पंचभूतात्मकही वस्तु घेऊन । तेथ ईश्वरभावें घडे उपासन । (य२पू.१२६)
आणि भूतरहित अवताराश्रयेंकरून । भक्ति घडे ॥२३॥
भावना सदा कर्तृतंत्र । म्हणोनि उपासनाही तन्मात्र[१] ।

ऐतिह्यप्रमाणें अवतार वस्तुतंत्र । भक्ति तदीयमात्र यास्तव ॥२४॥

(१.टीप - कर्तृतंत्र)

पिता भूतकार्य असतां । तेथ शिवबुद्धि करणें तत्वतां ।
तैसीचि भूतकार्य माता । तेथ करणें उमाबुद्धि ॥२५॥
सकळ स्त्रिया भूतकार्य पाही । तेथ अंबाबुद्धि लवलाही ।
भूतकार्य असोनि कान्तही ।
तेथ करणें ईश्वरबुद्धी ॥२६॥
शालिग्रामी शार्ङ्गधर । लिंगामाजीं शिवशंकर ।
तैसे पंचाग्नि अथवा दहर । हे अवघे प्रकार उपास्तीचे ॥२७॥

(सद्गुरूंची उपासना)

परी सद्‌गुरूपासना । ती तंव नोहे तैसी जाणा ।
जे ज्ञानानंतरही प्रीति चरणां । लागे म्हणुनी ॥२८॥
यालागीं सद्‌गुरुचरण ते भक्ति । हें मानलें माझिये चित्तीं ।
इया निरूपणें कोणी म्हणती । ऐसें जरी ॥२९॥

(भक्तीपर्यंतचा क्रम)

कीं उपास्ति न करितां । केवल भक्तीचि करावी तत्वतां ।
तरी स्पष्ट मी या सिद्धान्ता । विरोधी आहे ॥३०॥
आधीं करावें कर्म उपासन । तेणें मळविक्षेप निराकरण ।
तैसेचि पुढें उपासन । दृढ चालवावें ॥३१॥
पुढें घेवोनियां मूर्ती । जैसी भावनया वाढे उपास्ती ।
तैसी अन्तःकरणीं अवतारमूर्ती । प्रकटत जाय ॥३२॥
पौराणिक उपास्तीचे योगेंकरून । अवतारसदृश अन्तःकरण ।
तेंथ वैदिकोपासना समन्वयून । अभ्यास कीजे ब्राह्मणीं ॥३३॥
इतरांनी पौराणिक । उपासना करावी देख ।
अन्तःकरणीं व्यक्त सम्यक । अवतारमूर्ती ॥३४॥
मग अवतारमूर्तीचियें ठायीं । चेष्टामात्रें भजन पाही ।
ऐसें जे प्रकार कांहीं । त्या भक्ति मी म्हणे ॥३५॥
बहुताप्रकारें भक्ति एक । हें मतीचें वचन सम्यक ।
रति ऐकोनियां हरीख । पावलीं स्वयें ॥३६॥



मति ज्ञान, रति सुख । मति बोध, रति प्रेम देख ।
दोहींचा वोसंडलिया हरीख । कृष्ण कृपानायक अवतरतो ॥३७॥
श्रीज्ञानेश्वर जनकजननी । मस्तक ठेवितां तच्चरणीं ।
नवल अनुभवा ये काहणी । दोघींचीही ॥३८॥ (य२पू.१२७)
॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रियपाहुणेरे उपास्ति-भक्तिभेदे ऽपि द्वयोरावश्यकतावर्णनं नाम द्वितीय आदरः ॥

---

आदर ३ रा

## ॥ मर्यादानिष्ठा ॥

जय जय सद्‌गुरु जगन्निवासा । जय जय सद्‌गुरु सृ्‌दिानंदविलासा ।
जय जय सद्‌गुरु हृदयादिवासा । जय अलकावतीशा ज्ञानेश्वरा ॥१॥
मग मति बोधाचे उल्हासे । रति प्रेमसौरसें ॥
अवतारस्वरूप कैसें । प्रकटलें माय ॥२॥
मतीनें केली हेमपरीक्षा । रतीनें दिधली भूषणदीक्षा ।
आवडीचीं परीक्षा । आवडीं जाणे ॥३॥
येथ मर्यादा आणि पुष्टी । प्रकटों लागती गोष्टी ।
दोहींची संपुष्टी । एकांगता ॥४॥
आम्रफळाचिया आंतौती । रस आणि द्रुती ।
जिव्हा रस जाणती । द्रुति घ्राणीं ॥५॥
तेवीं रति आणि मती । ग्रंथव्यवस्थे द्विरुक्ती ।
एऱ्हवीं अंगप्रतीती । दुसरी नाहीं ॥६॥
ना तरी दुध आणि साखर । दोन्ही कीर मधुर ।
परी संगमीं रुचिर । अधिक होती ॥७॥
तेवीं पुष्टि आणि मर्यादा । आले माधुर्यप्रभेदा ।
परी भक्तीचा बांधा । जैसा तैसा ॥८॥
यालागीं तें आधीं कीजे । जे बुद्धिव्यवस्थे अवरोहिजे ।
मग शेवटीं तंव पाविजे । अन्तिमकरणें ॥९॥

भक्तीत सर्व रस

म्हणोनि हा संवादु । सकळ रसांचा अनुवादु ।
परस्पर बोधु । मति-रतीचा ॥१०॥
रौद्ररसें प्रवृत्ती दमोन ।
करुणारसें मार्गप्रतीक्षण ।
श्रृंगाररसें प्रियार्चन ।
समाधान शांतरसें ॥११॥
अद्‌भुतरसें लौकिकापहृती ।
भयानकरसें इंद्रियें वळती ।
हास्यरसें आनंदवृत्ती ।
विषयविरक्ति बीभत्सें ॥१२॥
वश करीन गोपीरमणा ।
या वीरवृत्तीचिया खुणा ।
परी संयोगवियोग मिळोनि जाणा ।
शृंगार मुख्य ॥१३॥
मर्यादा शांतरसमिश्रित ।
मधुर शांत शृंगार पुष्टिस्थित ।
मत्यंग मर्यादा प्रधानयुत । प्रधान पुष्टिसहित रतिभागू ॥१४॥
मग मति म्हणे आधीं । हेंचि कीजे त्रिशुध्दी ।
जेणे येईल अवधी । आनंदाची ॥१५॥
तेथ भवसंकट मियां वारिलें । हे गर्व जावया वहिलें ।
हें नृसिंहरूप देखिले । मतीनें देवो ॥१६॥
भगवद्विश्वासें विश्वासे मती । येथ पुढें मति, मागें रती ।
तंव रामरूपीं मिळती । समान दोघी ॥१७॥
सकळ मर्यादा अधिष्ठान । तो महाराज जानकीरमण ।
जे नृसिंहरूपाचें रक्षण । ते मर्यादा आपण राघवी ॥१८॥
इंद्रियवनचरांची पंक्ती । विषयतृण देखोनि धांवती ।
गर्वकनककश्यपसंमती । देखोनि भावप्रह्लादा अतिःदुख ॥१९॥(य२पू.१२८)
तेथ सिंहाकृति मनमोहन । गर्वगज  कनककश्यप हरून ।



नराकृती प्रऱ्हादरक्षण । निकें जें झालें ॥२०॥
तो भक्तरक्षक कृपामूर्ति । राघवरूपी मर्यादास्थिती ।
तेथ मति जाहली इतर वृत्ती । जानकी रति स्वयें जाली ॥२१॥
मति जाहली भिल्लिणी । रति जनकनंदिनी ।
शांतशृंगार काहणी । उमटली येथ ॥२२॥
म्हणाल की एकपत्नी रघुराणा । तेथ माधुर्य नोहे इतर जना ।
तरी अगस्तिसंहिता प्रमाणा । घेऊनि संशय वारिजे ॥२३॥
माधुर्यादि संबंधखाणी । जानकी वल्लभ चक्रपाणी ।
ऐसें बोलिले अगस्तिमुनी । स्वसंहितेत ॥२४॥
किंवा मति पथदायिनी । रति ती तदनुगामिनी ।
धर्मसहायें भगवद्‌गुणी । आसक्त दोघीं ॥२५॥
किंवा मति सीता सती । आणि रति मुनिगणवृत्ती ।
रामें धरिली सीता सती । परी मुनिवृत्ति आश्वासिल्या ॥२६॥
जें केलें प्रवृत्तिदमन । तयाचा गेला अभिमान ।
निगममर्यादाज्ञान । निघोट जालें ॥२७॥
तंव येथ नवलावो जाहला । मतीचा जिज्ञासुभाव गेला ।
वेगळी राहों न शके जनकबाळा । परी प्रेमें ओसंडला रत्यनुसारू ॥२८॥
साखरेचें चूर्णीभवन । जरी दुग्धीं जाय मिळोन ।
तथापि गोडपण । जैसें तैसें ॥२९॥
तेवीं मति मिळाली श्रीरामीं । परी रति मिळोनि चरणानुगामी ।
एकांग म्हणोनि प्रत्ययधर्मी । मतिही होय ॥३०॥
मग सन्मतीचें अनुकरण । केवळ पाहिजे सत्त्वगुण ।
हा आग्रह चेतन । कासया धरील ॥३१॥
जेव्हढिया वृत्ती ।
तेव्हढिया प्रकाशी चिती ।
असो ही आघवीच रूपकोक्ती । तीव्रसंवेगें अवतरें ॥३२॥
वृत्ति म्हणे मज एक एक ।
चेतन म्हणे मी अवघें एक ।

तेवीं गोपी म्हणती मज कृष्ण एक एक । कृष्णीं प्रत्यय एक आघवा ॥३३॥
अमर्याद चेतन । म्हणोनि वृत्तिपोषण ।
तरी मर्यादा वृत्ति आपण । वृत्तित्वें वागवी ॥३४॥
भोजनकाळीं माता युवती । शयनकाळीं रंभा निश्चितीं ।
तैसें ज्ञानयुक्त जी मती । ती प्रेमें रति जाहली ॥३५॥
(चूर्णिका)
लज्जावतीं सवस्त्र पूर्ण । जेथ तें सोडोनि लोकस्थान ।
एकांतीं मति रति होऊन । स्वयें लाजहीन ।
आणि रामा कृष्णत्वें सजवी ॥३६॥
दुष्टकाष्ठा सोडोनि कोरणें । द्विरेफे रामें येणें ।
कुमुदिनींत अडकणें । ते दशा मी म्हणे कृष्णत्व ॥३७॥
आतां तीच दशा कैसी । श्रीज्ञानेश्वरचरण काशी ।
स्नातां श्रीगुरुशिवकृपा अनायासीं । सांपडेल कीं ॥३८॥
हरिः ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रियपाहुणेरे
मर्यादानिष्ठावर्णनं नाम तृतीय आदरः ॥
(य२पू.१२९)

आदर ४ था

## ॥ पुष्टिनिष्ठा ॥

जय जय सद्गुरु कैवल्यदानी । जय जय सद्गुरु प्रमाणप्रमाणी ।
प्रमेयप्रमाता अधिष्ठानीं । प्रकाश तुझा ॥१॥
मेय असे परिच्छिन्न । यालागीं शोभा पावे प्रमाण ।
तूं सर्वदा अपरिच्छिन्न । तुज प्रमाण काय जाणे ॥२॥
प्रमाणांची सांखळी मोठी । तोंडाळाचिया बंधनासाठी ।
तुजमाजी पाहतां जगजेठी । प्रमाणादि सकळ मिथ्या ॥३॥
सूर्याचे प्रकाशेंकरून । प्रकाशे विश्व संपूर्ण ।
त्या विश्वाच्या प्रकाशेंकरून । सूर्य प्रकाशेल कैसा ॥४॥
तैसे सद्गुरुचरणतेजें । विश्व चैतन्यमय सहजे ।
तो सद्गुरु प्रमाणादिकीं समजे । हें मूढ म्हणती ॥५॥



परंतु प्रेमाचे पिसें । घेवोनिया विलसे ।
अनध्यस्तविवर्त असे । ज्ञानेश्वररावो ॥६॥
इतर सकळांचे मौन । बोलणें तरी तुझें प्रेरण ।
ऐसिया सद्गुरुमाये तुज नमून । त्वत्पयःपानपुष्टी वाढो ॥७॥
पूर्वील आदर मर्यादा । तो चढला पुष्टिप्रबोधा ।
मतिरतीचिया भेदा । निवटीतचि ॥८॥
रघुनंदन झाला यदुपती । तेव्हां समर्याद पुष्टिस्थिती ।
भीमकबाळा जाहली मती । आणि रति व्रजबाळा ॥९॥
शांतरसमिश्रित । मर्यादा शृंगारयुक्त ।
भीमककन्येचे यथार्थ । उल्हास ते ॥१०॥
मति जाहली पतिव्रता । रतीनें धरिलें गणिकापथा ।
परी दोघीही भगवंता- । वीण विषो नेणती ॥११॥
सादरप्रेम हें पातिव्रत्य लक्षण । प्रेमपिसें हें गणिकात्व पूर्ण ।
परी विषयभाव वेगळा करून । विष्णुपुराणीं प्रमाण ये विषयीं ॥१२॥
प्रऱ्हाद उवाच -
या प्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी ।
त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसर्पतु ॥ विष्णुपुराण.

प्रऱ्हाद म्हणे भगवंता । तुजवाचूनि विश्वीं पाहतां ।
अन्य ना, यास्तव अनंता । ऐसें मी मागें ॥१३॥
मृगजळ जळासारिखें दिसे । परी वास्तविक ती उष्णताचि असे ।
तेवीं विषयगण सुखरूप दिसे । परी तो असे ब्रह्मानंदू ॥१४॥
किंतु तें नेणूनि मृग । जळ समजूनि धांवती सवेग । तैसें मूर्ख नेणूनि ब्रह्म
चांग । विषयीं सुख समजूनि धांवती ॥१५॥ (य२पू.१३०)
मनुष्यें मगजळ मिथ्या जाणती । परी झळ लागता तळमळती ।
तेवि वेदान्ती भव मिथ्या म्हणती । परी चरफडती ज्ञानाभिमानें ॥१६॥
म्हणोनि मृगजळ मिथ्या समजून । गृहछायेंत बैसलें जाऊन ।
तयां धांवणे ना झळ संघट्टन । तैसे भगवज्जन मी म्हणें ॥१७॥
ज्ञानें मिथ्या पाहती माया । आणि मस्तकीं सगुणकृष्णकृपेची छाया ।

यास्तव ज्ञानाभिमानझळ तयां । बाधूं न शके ॥१८॥
मिथ्या मृगजळ कळलियाही पाहीं । औष्णज्ञानाचा उपयोग नाहीं ।
परी छाया रहावी सर्वदाही । यास्तव गृह रक्षणें ॥१९॥
तैसें मिथ्या कळतां अज्ञान । पुढें उपयोगा नये ज्ञान ।
परी स्पर्शू नये ज्ञानाभिमान । यास्तव भक्तिछाया रक्षण कीजे ॥२०॥
तो मृगजळसम विषयभाव गळावा । ज्ञानाभिमान समूळ पळावा ।
परी जो ब्रह्मानंदप्रीतिओलावा । तो तुवां ओढावा आपणाकडें ॥२१॥
जन्मशतांची शतें घेती । परी विषयप्रेमाप्रती ।
अविवेकी न कंटाळती । तेविं असो तुजवरुती प्रीति माझी ॥२२॥
संयोगी वियोगोपलालन । हें जें मुख्य प्रेमलक्षण ।
तेंचि पैं गणिकापण । कृष्णीं समाधानदायक ॥२३॥
पातिव्रत्यांतील शांती । सांडोनियां मती ।
गेली मिळोनियां प्रीती । रतीमाजी ॥२४॥
ती रति मतिमय रुक्मिणीपत्रिका । कीं मति रतिमय विलासी गोपिका ।
एथ पावावया ऐसिया सुखा । सुखिया होइजे ॥२५॥
मागें टाकिलें श्रुतीचें ज्ञान । नारदादिकां करविलें निजभजन ।
ऐसिया व्रजयुवतींहून । शपथ ऊंच जाण कोणी नव्हे ॥२६॥
धर्म अर्थ काम मुक्ति । हरिपायां ओवाळूनि सांडती ।
परी हरीस कष्ट न होवावे निश्चिती । ऐसी प्रीति अत्यंत ॥२७॥
श्रीरामवियोगेंकरून पाहाहो । सीता एक वेळ भूलली चिज्जड भावो ।
मुद्रिकेसी म्हणे बाई सांग वो । कां त्यजूनि आलीस राघवा ॥२८॥
सीता आपुल्या प्रेमपणीं । मुद्रिकेस म्हणें राममैत्रिणी ।
तो भाव गोपिकांस वृक्षपाषाणी । क्षणोंक्षणीं गोकुळी ॥२९॥
भावनेचिया योगेंकरून । ज्ञान नसतां वस्तुमात्र बहिण ।
भासे जयाच्या प्रेमेंकरून । तो प्रभु सांडोन कोण भजावा? ॥३०॥
विष घालूनियां स्तनीं । पूतना मारूं आलियाक्षणीं । प्रत्यक्ष केली आपुली
जननी । तो प्रभु सांडूनि कवण भजावा? ॥३१॥ (य२पू.१३१)
वैकुंठीं गेलियां चतुर्भुज होती । द्रौपदी चतुर्भुज केली महीवरुती ।



तैसा समान सर्वांभूतीं । सांडूनि श्रीपति कवण भजिजे? ॥३२॥
गुरु जाहला गीता सांगोन । परी शिष्याचें सारथ्य करी आपण ।
ऐसा गर्वरहित भगवान । सांडुनि कवण भजावा? ॥३३॥
पूर्णकाम शेषशायी । परी इंधन वाहें गुरूचे गृहीं ।
एवं धर्मरक्षक बापआई । सांडूनि कवणा भजावें? ॥३४॥
यालागीं आलिया जन्मा । हाचि अंतरीं लागो प्रेमा ।
वाचा मनसा प्राणें महिमा । गोविंदगरिमा सांपडो ॥३५॥
गुण ऐकोत श्रवण । रूप पाहोत नयन ।
उच्छिष्टरस जाणो रसन । सूंघो घ्राण निर्माल्य ॥३६॥
कर्मेंद्रियांच्या क्रिया । अश्रांत श्लिष्टोत यदुपति पायां ।
आणि विरहज्वाळा मनबुद्धि यया । नित्यचि जाळो ॥३७॥
एवं मनासी वियोगचटका । लागलियाही देखा ।
जीवासी संयोग नेटका । सदाचि राहो ॥३८॥
तो संयोग तीव्र मनीं । परी अविटत्वें वियोगोपलालनी ।
हांसूनि आणि रडूनि । एकचि फळ ॥३९॥
मियां ब्रह्मांड आघवें जिंकिलें । म्हणोनि हासें नावरे वहिलें ।
मज इतुका वेळ उपेक्षिलें । म्हणोनि रडे ॥४०॥
हांसतां सुधादंत चांदणें । रडतां गंगातरंग उसळणें ।
परी याचें फळ काय म्हणोनि पुसणें । तरी अभावोत्तर ॥४१॥
प्रकाशाशी प्रकाशाचें । फळ तरी प्रकाश साचें ।
तेवीं प्रेमा प्रेमाचें । प्रेमचि फळ ॥४२॥
म्हणोनि मति जाहली होती रुक्मिणी । तीचि रति होऊनी गोपकामिनी ।
सापत्न्यभाव विसरुनीं । नवल कीं पतिव्रता वेश्या होऊनि तरली ॥४३॥
हें कासयासाठीं झालें । ऐसिया प्रश्नां नाहीं फळलें ।
''भक्तिपदतीर्थामृतादौ'' दिधले । उत्तर याचें ॥४४॥
येथें फळकल्पना नाहीं । यास्तव प्रश्नोत्तर न सुचे कांहीं ।
वेडगळ वचन मानुनी सर्वीही । सोडूनि द्यावें ॥४५॥
आम्ही शूद्र गोपबाळा ।
वेदाधिकार नसे आगळा ।

परि ज्ञानानंतर राहे भक्तिउमाळा ।
येथ आवडी प्रमाण आमुची आम्हां ॥४६॥
द्वापारीं श्रीकृष्ण ओळखुनी । प्रेम पावल्या गोपकामिनी ।
तरी कृष्णत्वें गुरूस ओळखूनी । मीही तैसी न होईन कां? ॥४७॥
मज द्वैती म्हणोत कोणी । परी बहुती माझी अद्वैत वाणी ।
कांत श्रीकृष्ण असुनी । द्वैत भासेल मज केवी? ॥४८॥
जे स्थानिं या येती मायबापा । जयाचे वचने देव सोपा ।
तया सज्जनाची कृपा । असतां द्वैत केविं भासे? ॥४९॥ (य२पू.१३२)
श्रुति तीव्रत्वें तनु घेवुनी । व्रजीं आलिया भेद सांडुनी ।
तिया गोपी असतां जीवलग बहिणी । द्वैतकाहणी केविं भासे? ॥५०॥
अधिष्ठान सकळाश्वासनीं । माझी ज्ञानेश्वर जननी ।
तिचें पयःपान करुनी । द्वैतकाहणी भासेल कां? ॥५१॥
परी ऐसेंही असूनि एक गांठीं । जे घनःशामचरणीं आवडी मोठी ।
तेथ द्वैताद्वैत आटाआटी । पाहवेना ॥५२॥
जैसें भुकाळू दरिद्रीजन । निद्रा तोंवरी समाधान ।
परी जागृतींत देखिलिया अन्न । लाळ घोटोन धावती ॥५३॥
कां कामुकशास्त्रियांचें ज्ञान । स्त्री न देखिली तोंवरी गहन ।
तेवीं दुर्दैवें ज्यावेळीं चुकेल हरिगुण । ते वेळीं ज्ञान वदूं आम्ही ॥५४॥
एऱ्हवीं सोडोनी कैवल्यकष्टा । श्वानपणाची काष्ठा ।
पावोनि भगवद्विष्ठा । भक्षितां न लाजो ॥५५॥
इया आवडीचेनि गुणीं । मज वाळावें वेदांतियांनी ।
जैसा शूद्रापुढें ब्राह्मणी । वाळिजे वेदू ॥५६॥
नाना वेदांतयुक्तीकरून । माझी आवडी नव्हेंचि क्षीण ।
जेंवि विषय मिथ्याही कळून । मूढजन न सोडिती ॥५७॥
विषयांत दुःख वाटल्यावीण । विरक्त न होती जन ।
परी ''कृष्णप्रेमीं दुःखचि सुख संपूर्ण'' । येथ युक्ति कारण मज नाहीं ॥५८॥
सांगतां साधु नानारीती । हठें न सोडविती सुतयुवती ।
मग माझा भक्तिहठ वारायाप्रती । आग्रह चित्तीं तुमच्या कां? ॥५९॥



असो ज्ञानाचें कथन । मनुष्ययोनींत सांगावें पूर्ण ।
मज शुष्कानुभव न रुचे म्हणून । घेवोनि पशुपण हरिचरण चोखी ॥६०॥
तो हरि जयांचिया चरणी । अथवा मीचि हरि होउनी ।
जयाचिया कृष्णपणीं । भाळली होय ॥६१॥
नवल आवडीचा झरा । ब्रह्मभाव सांडूनि गोरा ।
काळा कृष्ण नोवरा । गोडसा वाटे ॥६२॥
कीं नभ व्यापक म्हणून । दूरत्वें देखे नीलपण ।
तेविं काळेंचि हें चिन्ह । पांढरीयाचें ॥६३॥
स्नान भोजन आणि शयन । चेष्टामात्रें समर्पण ।
''संयोगें नित्य आलिंगन । विरहोपलालन अतृप्तीव तृप्ती'' ॥६४॥
श्रीज्ञानेश्वर जनकजननी । अथवा कांतादिभावें होउनी ।
मज माझिया आंगीं मुरवुनी । ठेविलें चरणीं आपुल्या ॥६५॥
आतां प्रेमरसाचा लोंढा । जया कोठेंचि नाहीं वरवंडा ।
श्री ज्ञानेश्वरनाम तोंडा । आलिया सकळ ॥६६॥ (य२पू.१३३)
॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
प्रियपाहुणेरे पुष्टिनिष्ठावर्णनं नाम चतुर्थः समादरः ॥
॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥
- समाप्त -

# १३

## ॥ अलौकिक प्रवास[१] ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

एकेवेळीं माझे मित्र माधवराव व मी एकमेकांचा हात धरून वनांत क्रीडत असतां तृषेनें अत्यंत व्याकुळ झालों व पाण्याचा शोध करीत असतां आम्ही एक मोठें मनोहर तळें पाहिले. तें तळें पाण्यानें पूर्ण भरलेलें असून तरंगांनीं विलसित होतें; व पाणी अत्यंत निर्मळ असल्यामुळें सूर्याचीं किरणें त्यांत स्पष्ट डोळ्यापुढें दिसत होतीं, त्यांकडे पाहून माधवराव मला म्हणाले,

''मित्रा, चल आपण तिकडे जाऊं व यथेच्छ जलसेवन करून तृप्त होऊ.''

तें त्यांचें वाक्य ऐकून आम्ही दोघेही तिकडे गेलों असतां तेथें चमत्कारिक देखावा दृष्टीस पडला, तो असा कीं, त्या तळ्याला चार दांड असून त्यांत

पाण्याचे प्रवाह चालले होते आणि कोठें कोठें ते दांड फुटल्यामुळें एका दांडांतलें पाणी दुसऱ्यांत, दुसऱ्यांतलें तिसऱ्यांत, व तिसऱ्यांतलें चवथ्यांत, याप्रमाणें मधल्यामध्येंच पाण्याचा फेरफर होत असे; पण, मजा ही पाहिली कीं दांडांतील पाणी भोंवऱ्याप्रमाणें फिरून फिरून पुन्हा तळ्यांत जात असें व फिरून तळ्यातलें दांडांत येत असे परंतु तळ्यांत जे काहीं निर्मळ पाण्याचे तरंगे उठत होते ते पुन्हा तळ्यांतच पडत असत. अधिकच जवळ जाऊन पाहिले तेव्हा चार दांडातील पाणी चार प्रकारचें आहे असें दिसलें. त्यांत एका दांडांतलें पाणी स्वच्छ सुवर्णासारखें पीतवर्ण होतें, दुसऱ्यांतील रक्तवर्ण, तिसऱ्यातील कृष्णवर्ण व चवथ्यांत चिखल पुष्कळ असल्यामुळें, त्यांतील गागरा व पाणी कांहींच स्पष्ट दिसेना, मग सूर्याचें बिम्ब त्यांत कोठलें दिसणार? सुवर्णासारख्या (पीतवर्ण पाण्याचे) दांडांत सूर्याचें बिम्ब स्पष्ट दिसत असे, 'रक्तवर्ण पाण्यांत' मलीन दिसत असे 'कृष्णवर्ण पाण्यांत' बिम्बाची अगदींच अस्पष्टता होती आणि चिखलांत तर बिम्ब दिसतच नसे. परंतु दांड मध्यें फुटला असल्यामुळें निर्मल दांडांतील पाणी मलिन दांडांत व मलिन दांडांतील निर्मल दांडांत, असें मधल्यामधेंच मिश्रण होत असें, म्हणून कोणत्याच दांडांतलें पाणी पिण्याच्या कामीं पडलें नाहीं. तळ्यांत उत्तम पाणी होतें, परंतु तेथें जाण्याचें आमच्यांत सामर्थ्य नव्हतें.

*(टीप :- १ आपल्याला नित्य आनंदच असावा, दुःखाचा लेश स्वप्नांतही असूं नये, अशा अंतःप्रेरणेनें प्रत्येक जीव उद्योगशील बनलेला आहे; परंतु हा नित्य आनंद एका आत्मज्ञानावांचून कशानेंही मिळणें शक्य नाहीं हें तत्त्व श्रुतिसंतादि आप्त कंठरवानें सांगत आले आहेत. ह्या आप्तवचनाची आस्था बाळगून तदनुसार जे उद्योग करतात ते एकाच जन्मांत आपला नित्यानंद मिळवितात, व जे त्या वचनाची अनास्था करतात ते संशयांत पडून जन्ममृत्यूची कथा गात बसतात. ह्याप्रमाणें योग्य व अयोग्य असें उद्योगाचे दोन भिन्न मार्ग लोकांत झाले आहेत. त्यांपैकी अयोग्य मार्गांतील दोष ह्या ''अलौकिक प्रवासांतील'' तळ्याच्या दृष्टांतानें स्पष्ट दाखवून शेवटीं महाराज म्हणतात :-*

*''संशयी जीवांचे अंतःकरण विद्येनें सदा वादांत गढून राहतें, त्यांच्याकरितांच हा तळ्याचा उपदेश आहे. एऱ्हवीं श्रद्धायुक्त मुमुक्षूला याची गरज नाहीं. तो आपल्या श्रद्धेनें व अनुभवाच्या आनंदानें ब्रह्मसत्य व जग मिथ्या या बोधानें एकाच जन्मांत जीवन्मुक्त होतो. इतरांस ही मुक्ति अनंत जन्म घेऊन स्वप्नांत देखील मिळावयाची नाही.''*

*म्हणून आपला परमार्थपथ निष्कंटक व्हावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं महाराजांचे हे शब्द अंतःकरणावर खोदून ठेवण्यासारखे आहेत :-*

*''जोंपर्यंत भेददृष्टी कायम आहे, वादाचा आग्रह मनांत आहे, संशय ग्रंथी बद्ध आहे, सत्संगति घडली नाहीं, विद्वत्तेचा अभिमान गेला नाहीं, मी देह अशी बुद्धि सुटली नाहीं सद्गुरूची कृपास झाली नाहीं, आणि जोंपर्यंत सर्वथैव लीनता आली नाहीं, तोंपर्यंत हें सारें मृगजल आहे असें निर्भ्रम अद्वैत ज्ञान कालत्रयीं होणें शक्य नाहीं.'')*



नंतर आम्ही दोघेही एका टेकडीवर जाऊन बसलों. माझें मित्र माधवराव त्या तळ्यांतील पाण्याकडे पाहण्यांतच गुंग झाल्यामुळें, ते पाणी पिणेंही विसरले. इतक्यांत दोन प्रहर दिवस आला, तेव्हां त्या चारी दांडांतील पाणी आटून जाऊन केवळ तळ्यांतच पाणी राहिलें. नंतर उष्णता कमी झाल्यावर पुन्हा चारी दांड भरून भोंवऱ्याप्रमाणें पाणी तळ्यांतून येऊं जाऊं लागलें.

याप्रमाणें देखावा पाहून माझे मित्र माधवराव हांसून, टाळ्या पिटून अनुतापानें नेत्रांत अश्रु आणून मला म्हणालें,

''मित्रा, तूं हा चमत्कारिक देखावा पाहिलासना? पुढें आपलीही गती अशीच होणार आहे.''

नंतर मी म्हणालों, ''माधवराव, आपण बोललांत ह्याचा अर्थ मला नीटसा समजला नाहीं; तो समजावून सांगा.''

माधवराव म्हणाले, ''ठीक आहे. मी सांगतों, श्रवण कर.''

मित्रा ! हा सूर्य ब्रह्मरूपी आहे, हें अफाट तळें मायारूपी आहे, व त्यांतील निर्मल जल हें शुद्धसत्त्वात्मक हिरण्यगर्भरूपी बुद्धि आहे, त्यामध्यें पडलेलें सूर्याचें मोठें प्रतिबिम्ब ईश्वररूपी आहे, तळ्यांत उठणारे प्रतिबिम्बासहित पाण्याचे तरंग तेच ईश्वराचे प्रेमळ भक्त होत, आणि हे चार दांड चार जातीरूपानें आहेत; त्यांतील जल चार प्रकारच्या बुद्धिरूपानें आहे, त्यांत पडलेलें बिम्ब चार प्रकारचे जीव समजावे आणि हा वाहेतपणा कर्मरूप आहे.

मित्रा पहा ! ज्या दांडांतलें पाणी सुवर्णासारखें दिसत आहे व त्यांतील सूर्याचें बिम्बही तसेंच दिसत आहे ती देवयोनी होय. या योनींत सत्त्वगुण विशेष असतो व इतर दोन गुण म्हणजे रज आणि तम कमी प्रमाणानें असतात. यांतील जीव इतर योनींतील जीवांपेक्षां सुखी असतात.

दुसऱ्या दांडांतील पाणी व त्यांत पडलेलें बिम्ब रक्तवर्णाचें आहे. ही मनुष्ययोनी होय. या योनींत तीन्ही गुण सारख्या मानानें आहेत व हींत सुखदुःखही सारखेंच असतें. हा दांड दोन बाजूंस फुटला आहे, म्हणजे **(य२पू.१३७)** यांतील पाणी तिसऱ्या व पहिल्या दांडांत जातें, या योनींतील कर्मरूप प्रवाहांतून, दुष्ट कर्मानें दुष्टबुद्धि झालेले जीव कृष्णवर्ण पाण्यांत, म्हणजे तिर्यक्योनींत येऊन मिळतात; व सत्कर्मानें सुबुद्धि झालेले जीव सुवर्णासारख्या पाण्यांत

म्हणजे देवयोनीला येऊन मिळतात.

याप्रमाणें जीव मनुष्ययोनींत कर्मे करून आपआपल्या चांगल्या अथवा वाईट कर्माप्रमाणें देव अथवा तिर्यक्योनींतील शरीरें पावून सुख अथवा दुःखरूप फळ भोगतात. तिर्यक्योनींत रजोगुण विशेष असतो, तमोगुण त्याहून कमी व सत्त्वगुण अगदींच कमी असतो; म्हणूनच या तिर्यक्योनींतील प्राण्यांस आहार, निद्रा, भय व मैथुन यापेक्षां अधिक कांही समजत नाहीं.

आतांपर्यंत तुला तीन दांडांचे वर्णन सांगितलें. मित्रा, आतां हा चवथा दांड पहा. यांत केवळ कर्दम भरला असून पाणी निर्मळ नाहीं, बिम्ब स्पष्ट दिसत नाहीं, व गागराही शुद्ध नाहीं, सर्वतोपरी पंक झालेला आहे; आणि जेथें पाणीं असतें तेथें बिम्ब असलेंच पाहिजे असें सामान्यतः अनुमान होतें. ही अति नीच अशी स्थावर योनी आहे. वृक्ष, पाषाण, मृत्तिका व धातु या सर्वांचा समावेश याच योनींत होतो. ह्या योनींतील जीव अतिनीच फल भोगणारे आहेत. ही योनी बहुत दिवस राहणारी असल्यामुळें तींतून जीवाची सुटका लवकर होत नाहीं. या योनींत तमोगुण अतिशय प्रमाणानें आहे, रजोगुण त्यापेक्षां लक्षावधीं अंशानें कमी आहे आणि सत्त्वगुणाचा केवळ आभास मात्र आहे, तरी त्याची प्रतीति वृक्षांचे ठिकाणीं येते. औषधीशास्त्रांत पाहिलें असतां धातु, मृत्तिका, पाषाण इत्यादिकांचे ठिकाणींही सत्त्वगुणाची थोडी थोडी प्रतीति आहे असें समजतें.

दांड मध्यें फुटले आहेत म्हणून वर म्हटलें आहे, ते जीवाचे कर्मानुसारी बुद्धिरूप पाण्यासहीत जाण्याचे निरनिराळे मार्ग होत. ब्रह्मलोक, स्वर्गलोक, वैकुंठ, यमलोक व आणखी इतर सर्व लोक म्हणजे या तळ्यांतील फिरणारे भोवरे होत. प्रलयकालरूपी दोनप्रहर दिवस आला म्हणजे *(येथें वरील रूपकास अनुसरून कादंबरी प्रमाणें वर्णनानुक्रम* ***(य२पू.१३८)*** *सारखा जुळावा म्हणून प्रलयकालरूपी ''दोन प्रहर दिवस '' असें प्रलयाचें रूपक केलें आहे. एऱ्हवीं सूज्ञांनीं त्याचा अर्थ ''प्रलयकालरूपी रात्र'' असा करावा)* दांडांतील पाणी तळ्यांत मिळून जाऊन, जीवरूपी बिम्बें त्या त्या रंगाच्या पाण्यांतील ईश्वररूपी बिम्बाशीं तादात्म्य पावतात; व लीन झालेला कर्मबुद्धिरूप रंगाचा संस्कार कायमच रहातो त्यामुळें सर्गकालरूपी तिसरा प्रहर *(येथेंही मागील प्रमाणेंच रूपकास अनुसरून म्हटलें आहे, पण सुज्ञांनीं सर्ग म्हणजे बिम्बाच्या तेजानें कालरूपी प्रातःकाल असा अर्थ करावा.)* झाला म्हणजे ईश्वराच्या प्रेरणेंनें व



मायाजलाच्या अचाट प्रवाहशक्तीनें कर्मरूपी रंगसंस्कारासहीत असणारे जीव पुन्हा बुद्धिरूपी प्रवाहांत सांपडून चारी दांडांत म्हणजे देवादि योनींच्या सृष्टींत येतात; आणि स्वकर्मानुसार फलभोगरूपी आपआपलीं स्थानें घेवून बसतात. कर्मफलभोग संपले कीं पुन्हा देवांची मनुष्यें, मनुष्याचें तिर्यक् व तिर्यकांचे वृक्षपाषाणादि अशा अपकर्ष योनींत पडतात; किंवा विपरीत म्हणजे उत्कर्ष योनींतही जातात. याप्रमाणें सात्त्विक देवादिकांपासून अगदीं तामस वृक्ष पाषाणादि स्थावरापर्यंत सर्व जीवांस कर्मानुरूप उत्क्रांति किंवा अपक्रांति होत असते. असा या सर्व देखाव्याचा अर्थ आहे.

ह्या चार दांडांसहीत सर्व तळें त्रिगुण सम असतां, प्रकृतिरूप आहेत आणि यांत **शुद्धसत्त्वगुणबद्ध ईश्वर** आहे व इतर जीव मिश्रगुणबद्ध आहेत; परंतु हा खेळ सर्व बिम्बावरच घडतो, वास्तविक सूर्याला याचा कांहींच लेप नाहीं. पाणी आटून टाकल्यावर हीं सर्व बिम्बेंही सूर्यरूपच आहेत. म्हणून हा जो सांगितलेला देखावा आहे तो व्यावहारिकच आहे. अनेक वादरूपी जाल तोडण्याच्या ज्ञानासाठीं हा चांगला आहे पण परमार्थतः ह्यांत कांहींच नाहीं. हें सारें मृगजल आहे. परंतु –

जोंपर्यंत भेददृष्टी कायम आहे,
वादाचा आग्रह मनांत आहे,
संशयग्रंथी बद्ध आहे,
सत्संगति घडली नाहीं,
विद्वत्तेचा अभिमान गेला नाहीं,
मी देह अशी बुद्धि सुटली नाहीं,
सद्गुरूची कृपा झाली नाहीं,
आणि जोंपर्यंत सर्वथैव लीनता आली नाहीं,
तोंपर्यंत हें सारें मृगजल आहे,
असे निर्भ्रम अद्वैत ज्ञान
**कालत्रयीं होणें शक्य नाही.**

संशयी जीवांचे अंतःकरण विद्येनें सदा वादांत गढून राहातें, त्यांच्याकरितांच हा तळ्याच उपदेश आहे. येऱ्हवीं श्रद्धायुक्त मुमुक्षूला याची

गरज नाहीं. तो आपल्या श्रद्धेनें व अनुभवाच्या आनंदाने, बह्मसत्य व जगमिथ्या या बोधानें एकाच जन्मांत जीवन्मुक्त होतो. इतरांस ही मुक्ति अनंत जन्म घेऊन स्वप्नांत देखील मिळावयाची नाहीं.

असो. मित्रा, आपण येथें तळेंभरून पाणी प्यालों तरी आपली वासनारूपी तृषा हरण होणार नाहीं; मग येथें कशाला बसतोस? चल आपण दुसरीकडे जाऊं.

याप्रमाणें माधवरावाचें वाक्य ऐकून मी अति चकीत झालों. माझ्या हृदयांत प्रकाश पडला, नेत्रांत अश्रु आले, आंगावर रोमांच उभे राहिले, आणि अनुतापानें अतिविव्हळ होऊन माधवरावाच्या पायांवर दंडासारखा पतन पावलों. उदरीं श्वास मावेनासा झाला आणि अश्रूंनीं माधवरावांच्या चरणांस अभिषेक केला. कंठ सद्गद झाल्यामुळे शब्दही फुटेना, तेव्हां त्यांनी कृपाविष्ट होऊन मला उचलून आलिंगन दिलें आणि चुंबन घेवून मूर्ध्न्यवघ्राण करून ''नाभी नाभी '' म्हणून अभयहस्त मस्तकीं ठेविला.

ते वेळीं मी हात जोडून म्हणालों, हे भगवन्, तृषाहरण निमित्तानें आपण मला संसारांतून काढलें, याचे उपकार मजकडून अनंत जन्म घेऊनही फिटणार नाहींत. हे प्रभु आपण आम्हा दीनांसाठीं प्रत्यक्ष परब्रह्मच अवतार घेऊन आलां आहांत, म्हणूनच आपणास **''माधवराव''** ही संज्ञा शोभते.

कारण **'मा'** म्हणजे माया हिचे **'धव'** म्हणजे धारण करणारें अधिष्ठानरूप परब्रह्म, आणि **'राव'** म्हणजेम सर्वत्र सत्तावान पुरुष ! असे आपण असूनही आजपर्यंत मी न जाणून आपणांस मित्रभावानें पाहून माधवराव म्हणून हांक मारीत असे त्याची मला क्षमा असावी.

हे भगवन्, शेवटली विनवणी इतकीच आहे कीं आपण मजवर अनुग्रह करून जन्मोजन्मीं आपली प्रेमभक्ति देऊन मला चरणाजवळ ठेवावें.

याप्रमाणें मी बोललों तेव्हां ते माधवरावरूपी भगवान् ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले,

''बाळा ! आतां तूं भिऊं नकोस. **'आत्मा वै पुत्रनामासि'** या



श्वेताश्वतर श्रुतींत सांगितल्याप्रमाणें तूं माझा प्रियपुत्र असून सच्छिष्यही आहेस, तस्मात् तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व होईल. चल, आपण आतां अनुभवामृताचें भोजन करून भक्तिरूप ज्ञानेश्वरीचें उदकपान करूं, म्हणजे पूर्ण तृप्त होऊन वासनारूपी तृषा हरल्यावर सहज सुखानें विश्वलय होऊन जीवन्मुक्तीच्या मंचकावर क्रीडा करूं. चला तर आतां लौकर, असें भगवान् म्हणाले व माझा हात धरून मूलस्थानीं आणिलें. श्रोतेहो, याप्रमाणे तुमच्या अवधानकृपेनें हा **अलौकिक प्रवास** (म्हणजे लोकाचारी नाहीं असा) सुखरूप पूर्ण झाला. तो श्रीसद्गुरुज्ञानेश्वरमहाराजांचे चरणीं प्रीति पावो.

**- ॐ तत्सत् ॥**

॥ समाप्त ॥

## १४

# ॥ अमोघनिरूपण ॥

## ॐकार साधना

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

*(हा प्रणवात्मक विषय महाराजांनी आपल्या बऱ्याच लहान वयांत लिहून **कुर्याभाई** (चांदूरबाजार) नामक आपल्या एका ब्राह्मण शिष्यास सांगितला आहे. ह्यांत माया व अविद्या ही प्रकृतीची दोन रूपें, त्यांत पडलेल्या ब्रह्माच्या प्रतिबिंबाची ईश्वर व जीव अशी दोन रूपे, ईश्वराची स्वतंत्र सृष्टि करण्याची शक्ति, जीवाची परतंत्रता, मायावृत्त्यात्मक व अविद्यावृत्त्यात्मक संकल्पानें ॐकाराची सिद्धि, प्रणवाचे मनोमय, प्राणमय व वाङ्मय असे तीन भेद, त्यांची लक्षणें व कार्यें, वाङ्मय प्रणवापासून स्वरव्यंजनात्मक भाषेची प्रवृत्ति, भाषेचे भेद व त्यांची लक्षणे, प्रणवात्मक स्मरण, स्मरणाचे भेद, भावनाभेदाने प्रणवांतून निघालेले कर्म, भक्ति, योग व ज्ञान हे चार मार्ग, प्रणवजपाचें माहात्म्य, पौराणिक रामकृष्णादि नामस्मरणाचा महिमा, इत्यादि गोष्टीचें उत्तम विवेचन आले आहे)*

परब्रह्माचे ठायीं अनिर्वचनीय, नसून भासणारी, विपरीत-ज्ञानरूपिणी, जी प्रकृति तीच स्वाश्रित त्रिगुणांहीकरून माया व अविद्या अशी दोन रूपांनीं भासली.

### ईश्वर

त्यांत शुद्धसत्त्वांशी माया. तिचे ठायीं ब्रह्मप्रतिबिम्बित अहं-स्फूर्त जो ईश तो शुद्धसत्त्वप्रधान असल्यामुळे कार्यकारणकर्तृत्व-विचारयुक्त अज्ञानादि

देशरहित सर्वशक्तिमान आहे. आणि -

### *जीव*

रजस्तमांनीं गढूळ झालेला जो सत्त्वांश, त्या मलिनसत्त्वरूप अविद्येचे ठायीं प्रतिबिम्बित जें ब्रह्म तो जीव ! त्याला तमाचे लक्षण अज्ञान आणि रजाचें लक्षण चांचल्य येणेंकरून मलिन झालेला सत्त्वगुण त्याचें बंधन जडलें आहें, म्हणून तो परतंत्र आहे; आणि त्याचे ठायी कार्याकार्य विचार नाही, म्हणून स्वतंत्रपणाने हा सृष्टिकर्ता होत नाही, आणि त्याचा सर्व व्यापार ईश्वराच्या स्वाधीन चालतो; म्हणूनच ईश कर्ता आणि जीव भोक्ता असा भेद झाला आहे.

### *ईश-संकल्प*

मायावृत्त्यात्मक जो संकल्प तो ईश्वराच्या कर्तृत्वभावांचें साधन आहे, आणि मनोवृत्त्यात्मक जो संकल्प तो जीवाच्या भोक्तृत्वभावाचे साधन आहे.

ईश्वराचा संकल्प स्वतः कार्यकर्ता असल्यामुळे त्याला **सत्यकाम सत्यसंकल्प** अशीं श्रुति म्हणते; आणि जीवाचा संकल्प मलिनसत्त्वप्रधान असल्यामुळे तो परेच्छावर्ति आहे. म्हणूनच याला **भ्रमाधिष्ठान भूतात्मा** अशी स्मृति म्हणते.

यावरून सृष्टि कशी करावी, व जीवाकडून कशी भोगवावी, हें स्वतंत्र ज्ञान ईश्वरास आहे आणि त्याच्या अल्पांशाने जीवासही आहे. परंतु तें रजतम-मिश्रित असल्यामुळें भ्रांतिमूलक आहे. आणि ईशज्ञान शुद्धसत्त्व असल्यामुळे तें निर्भ्रान्त आहे.

**हें जें सृष्टीचें संकल्परूप बीज यासच ''मनोमय-प्रणव'' म्हणतात.**

येथें ईश्वराच्या मायासंकल्पांत व जीवाच्या मनःसंकल्पांत संकल्परूपच स्वांश स्वांश समष्टि सर्वव्यापक सत्यकर्म घडविणारी आणि व्यष्टिरूप अल्पव्यापक मिथ्याकर्म घडविणारी सूक्ष्म पंचभूतें आहेत. त्या भूतांची कर्मेन्द्रिये आणि अंतःकरणें आहेत. तीं समष्टिव्यष्टिप्रमाणानें दोघांचे ठायी आहेत.

फार विस्तार होईल म्हणून परिस्फुटता येथें करीत नाहीं. आणि इंद्रियोत्पत्तिविचार **पंचदशी** ग्रंथांत सांगितला आहे तो पहावा.

### *सृष्टीची अंकुरावस्था*

हे जें सूक्ष्मरूपतत्त्व त्याला सृष्टीची अंकुरावस्था म्हणतात. ही अवस्था



अपंचीकृत असल्यामुळे हिचे ठायीं सर्वेन्द्रियांचे एकीकरण झाले नसते. म्हणून येथें प्रत्यक्ष वाणीनें प्रणवोच्चार होत नाहीं. परंतु **''स्वप्नरूप प्राणमय''** उच्चार घडतो.

मनाच्या साह्यानें 'प्राणमय' हे स्वप्न द्विविध आहे. ईश-स्वप्न सत्यसांकल्पिक आणि समष्टिरूप हें पहिलें; आणि जीव-स्वप्न भ्रमसांकल्पिक व व्यष्टिरूप दुसरे. या दोहो संकल्पांत जो अहंप्रत्यस्फूर्तीचा परस्परभाव यासच **प्राणमय-प्रणव** म्हणतात. आणि म्हणूनच -

**स वै सर्वलोकस्य प्राणः ।।**
**स वै सर्वलोकस्य चित्तम् ।।**
**अभवन् पुरुषो हिरण्मयः ।।**

अशी स्मृति म्हणते.

### *वाङ्मय प्रणव / ईश्वराचें विराटशरीर*

पुनः ईश्वरसंकल्पानें समष्टि-व्यष्टिरूप सूक्ष्म पंचभूतांचे एकीकरणात्मक स्थूल पंचीकरण होऊन जेव्हां सर्वेन्द्रियांचे एकीकरण होते व जीवाचा नानायोनीरूप खेळही घडतो तेव्हा ते स्थूलसृष्टीचें अधिष्ठान व व्यवस्थापक मायासंकल्पोद्‌भुत **ईश्वराचें विराटशरीर** म्हटल्या जातें.

यासच **वाङ्मयप्रणव** म्हणतात.

तो विराडुच्चारित आहे, जीवोच्चारित नाही. कारण जीवाच्या मनोवृत्त्यात्मक मलिनसत्त्वरूप भ्रांतिमय संकल्पोद्‌भूत ज्या नाना योनी त्या विराट शरीरामध्येच असल्यामुळे त्यांना स्वयंस्फूर्त सूत्रत्व येत नाही. म्हणून सत्यसंकल्प विराटच आहे; व तद्द्वारितच हा **वाङ्मयप्रणव** होय.

जीव प्रवर्त्य आणि ईश्वर प्रवर्तक असल्यामुळे **सर्वान्तर्यामित्व** ईश्वरालाच घडतें, आणि जेव्हा जीवाच्या अल्पांश शुद्धसत्त्वरूप मनोसंकल्पाचा उदय होऊन त्याला मनुष्यजन्म प्राप्त होतो, तेव्हांच हा अंतर्यामी विराटरूपी प्रभू त्याच्या हृदयांत **स्वरव्यंजनात्मक भाषेची प्रवृत्ति** करितो म्हणूनच ईश्वराला **'विश्वतोमुख'** अशी श्रुति म्हणते.

### *भाषा : नादरूप व ध्वनिरूप व वर्णरूप*

ही भाषा दोन प्रकारची आहे. नादरूप आणि ध्वनिरूप भाषा होय.

तो ध्वनि पुन्हा दोन प्रकारचा आहे.१. एक स्वररूप २. वर्णरूप.

* जडपदार्थांतून निघालेला आवाज ती **नादरूप** भाषा आहे; आणि -

* सर्व प्राण्यांतून निघणारा आवाज ती **ध्वनिरूप.**

* मनुष्यावांचून इतर प्राण्यांत निघणारा ध्वनि **स्वररूप** आहे. आणि

* त्या स्वरांच्या साह्यानें मनुष्याप्राण्याचे ठायी अष्टस्थल विकृति करून निघणारा जो ध्वनि तो **वर्णरूप** होय.

त्या वर्णात दोन भेद आहेत; **स्वर** आणि **व्यंजनें.**

* स्थानादिविशेष विकृति न लागतां केवळ निघणारा स्पष्ट ध्वनि त्याला **स्वर** म्हणतात; आणि

* जिव्हेच्या साह्यानें स्थानादि आघातपरंपरेनें निघणारा मृदुकठिणात्मक जो विकटध्वनि त्याला **व्यंजनें** म्हणतात.

### *सर्वांचा मूळप्रवर्तक*

या सर्वांचा मूलप्रवर्तक जो 'अहं' स्फूर्तिरूप- अंतर्यामीं, विराट तोच **वाङ्मय प्रणव** होय, आणि याचींच रूपें सर्व भाषा, नाद व ध्वन्यादिक आहेत.

या सर्व भाषांचे मूलतत्त्व ॐ या वाङ्मय प्रणवरूप शब्दांत आहे. यांत तीन भेद आहेत; अ, उ आणि म. त्यांतील -

**अ** कारानें **ऱ्हस्व स्वर** दर्शविले,

**उ** कारानें **दीर्घस्वर** दर्शविलें, आणि

**म** कारानें सर्व **व्यंजनें** दर्शविली.

येथें न्यायशास्त्रांतर्गत युक्ति जोडून घ्यावी.

### *गायत्री*

हे जें ईश्वराचें **प्रवणरूप नाम** तेंच गायत्रीसहित सर्व वेदांचें मूलतत्त्व आहे.

या ॐ काराचें जें स्मरण त्यालाच **नामधारण** म्हणतात.

ह्या स्मरणाचे चार भेद आहेत. -

### कर्ममार्ग / धर्मजिज्ञासा

**(१)** ह्याच वाणीनें मनांत कामना धरून बाह्य विषयार्थी जो मंत्ररूप जप तोच **कर्ममार्ग** आणि तीच **धर्मजिज्ञासा**;

### *भक्ति जिज्ञासा*

**(२)** आणि मनात कामना न धरून ईश्वर प्रीत्यर्थ जो प्रणवजप तीच **भक्तिजिज्ञासा.**

### *योगजिज्ञासा*

**(३)** याचप्रमाणे वायू रोधून अनाहत नादामध्यें मनोमय जो प्रणवजप ती **योगजिज्ञासा**; आणि

### *ब्रह्मजिज्ञासा*

**(४)** ज्या संकल्पानें सृष्टि झाली त्याच संकल्पाचा, ॐकाररूप स्मरणपूर्वक झालेल्या ईश्वरानुग्रहानें व दीनदयाल श्रीगुरुकृपेनें, समूळ लय होऊन जीवेशभाव गेल्यावर अधिष्ठानच होऊन राहणे तोच ज्ञानमार्ग आणि तीच **ब्रह्मजिज्ञासा.**

याप्रमाणे चारीही मार्ग एका प्रणवांतून आहेत. म्हणून प्रणवजप करणें हेच सर्वांचे कर्तव्यकर्म होय.

जीवन्मुक्त जरी झाला तरी देह आहे तोपर्यंत इतर इंद्रियांच्या कर्माप्रमाणे हा एक प्रणवजपही वाणीनें कारावा.

कोणी भोळेभाविक कदाचित् राम-कृष्णादिकांच्या नांवांचे स्मरण, प्रणवच आहे असें समजून, भक्तीने करतील तर त्यांनाही ब्रह्मत्वच फळ मिळेल; कारण सर्व भाषा प्रणवांतूनच आहेत, आणि

* सर्व सृष्टि विराटाचीच आहे, म्हणून पुराणादिकांचे ठायीं राम, कृष्ण, हरि, इत्यादि नामांचा जो महिमा तो सत्य प्रणवरूप आहे, म्हणून त्यांचीही उपेक्षा करूं नये.

फुकट आग्रह धरून जे उपेक्षा किंवा उच्छेद करूं पाहतात, ते केवळ एकदेशीय आहेत. त्यांना प्रणव हें सर्वाचे बीज आहे असें कोठलें कळणार ?

याप्रमाणें हा श्रीगुरुप्रेरित प्रणवात्मक विषय सद्‌गुरु सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरणीं प्रीति पावो !

॥ हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

- - -

**टीप -** * हा विषय महाराजांच्या अलीकडील 'योगप्रभाव' ग्रंथांतील समाधिपादाच्या 'तस्य वाचकः प्रणवः' व 'तज्जपस्तदर्थ भावनम्' या सूत्रांवरील व्याख्यानांत विस्तारपूर्वक आला आहे.

०००

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

**१५. स्त्रीगीत**

# विषयदिग्दर्शन

या गीतांचा प्रसंग ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला आहे, त्यांना त्या प्रसंगाची नुसती आठवणही असह्य होऊन अन्तःकरण द्रवल्याशिवाय राहणार नाही. कारण, ह्या स्त्रीगीताची मुख्य जनयित्री सौ. मणिकरणिका आई (महाराजांचें कुटुंब) इहलोक सोडून गेल्यापासून ह्या गीतांची रचना बंद पडून सगळें जग आज त्या आनंदाला मुकलें आहे. त्यांच्या हयातींत जीं गीतें झालीं त्यांपैकीं हें सबंध पंचप्रकरणात्मक गीत येथें छापून इतर स्फुट गाणीं निराळीं छापावयाचीं आहेत. प्रस्तुतच्या पांच प्रकरणांचा विषयानुक्रम येणेंप्रमाणें आहे :-

**प्रकरण १ ले.**

मंगलाचरण, सद्गुरुमहिमा निरूपण, सद्गुरुसेवा निरूपण.

**प्रकरण ३ रे.**

संसारांत दारापुत्रादिकांची धनाविषयी ओढ, जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत टाकणाऱ्या वासनाडाकिणीचें भयंकर स्वरूप, त्रिविध तापांची जांचणी, देहाची तुच्छता, इत्यादि कचाट्यांतून सुटून जीवन्मुक्तीसुख व अंतरी अवीट प्रेमझरा मिळण्याविषयी भक्तिवैराग्यपूर्वक विनंतिरूप गुरुप्रश्न वर्णन.

**प्रकरण ४ थे.**

**अधिकारानुसार बाह्यांतरंगसाधनपूर्वक गुरूपदेश :-**

चहूंवर्णीच्या स्त्रियांनी जीवन्मुक्तिसुख मिळण्याकरितां नास्तिक पाखंडमतांचा त्याग करून वेदाज्ञेने चालावें. प्रथम वैराग्य होण्याकरितां अहेव स्त्रियांनी पतिव्रताधर्म पाळून पतीची सेवा करावी, भाग्य आलें असतां उन्मत्त होऊ नयें, सपत्नीजनांवर प्रीति करावी, वरिष्ठांची सेवा करावी मैत्रिणीस साह्य करावें, दासदासीजनांवर कृपा ठेवावी, दारिद्र आलें तरी पतिसेवेंत अंतर पाडूं नये, देव ,गुरु, अतिथी यांना संतोष द्यावा, पतीलाच दैवत मानून सर्वभावानें त्याच्या सेवेंत देह झिजवावा, जारिणी स्त्रियांचें तोंड देखील पाहूं नये, पतीशीं वांकडे व देवाची दांभिक पूजा करून नर्काचें साधन करूं नये, विधवा स्त्रियांनी ईश्वराला पति मानून सर्वदा भगवच्चिंतन करावें.

**अशा प्रकारच्या बहिरंग साधनांनी चित्ताचा मलदोष जाऊन वैराग्य प्राप्त झाल्यावर सर्व संग सोडून पतिसेवादिक बाह्य कर्माचा त्याग करावा;** व विवेक वैराग्यादि अंतरंग साधनांनी युक्त होऊन पति, पिता, पुत्रादिक गोत आड आलें असतां त्यांची भीड न धरतां सद्‌गुरूस शरण जावे. सद्गुरुनीं सांगितलेली ईश्वरोपासना करावी, सर्वकाल भगवन्नामस्मरण करावें, सद्गुरुसेवेंत देह झिजवावा, सद्गुरुमुखानें शास्त्रश्रवण करावें, व त्यांनी दिलेल्या मंत्राचा जप करून सर्व बंधनें तोडावीं. अशा साधनक्रमानें चित्ताचें ठायीं प्रेमभाव येऊन जीवन्मुक्तिसुखाचा अनुभव मिळू लागतो.

**प्रकरण ५ वे.**

कैवल्यदानाविषयीं सर्वदा उदार, आत्मसुख दाखविण्याकरितां स्वयंदर्पणरूप, चारी मुक्ती ज्यांच्या पायांतळीं लोळतात, गुरुत्वाचा अभिमान नसून गुरुत्वच ज्यांच्या पायीं लोळतें, ज्यांची भेट होतांच साधनें सहज हस्तगत होतात, इत्यादि यथार्थ-परीक्षापूर्वक सद्गुरुलक्षण कथन. वेदवेत्ता व ब्रह्मनिष्ठ तोच ब्राह्मण इतर सारे शूद्र. उपसंहार.

- प्रकाशक

## १५

# ॥ स्त्रीगीत ॥

**प्रकरण १ ले.**

## ॥ सद्गुरु महिमा ॥

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**ॐ नमो ज्ञानेश्वरा । सद्गुरु विश्वंभरा ।**
**दीन बालकावरी ग बाई । त्वरीत कृपा करा ॥१॥**
**त्रिलोका आधार । ज्ञानेश प्रभू माझा ।**
**देवो मजला स्फूर्ति ग बाई । कृपाळू गुरुराजा ॥२॥**
**सद्गुरु वांचोनियां । ईश्वर प्राप्ति नाहीं । धुंडीतां शास्त्र साही ।**
**॥ चाल ॥ साजणि बाई । कृष्णाला विडा देते ।**
**गोवळ्याची राई ॥३॥**
**सोयरे ग गणगोत । माउली ग गुरुराव ।**
**वाहिला ग जीवभाव । पदीं त्यांच्या ॥४॥**
**गुरूचे गुणदोष । पाहूंचि नये कधीं ।**
**विश्वासें आत्मसिद्धी । प्राप्त होय ॥५॥**
**सद्गुरुचरणाच्या । अष्टमहासिद्धि दासी ।**
**प्रेमें शरण येती त्यासी । इंद्रादीक ॥६॥**
**न लगती जपतप । न लगती व्रतें नेम ।**
**सद्गुरूचे पायीं प्रेम । राहो सदा ॥७॥**
**वेदाचे गहिंवर । साही शास्त्रांचे सार ।**
**श्रीगुरु बाप माझा । सगुण साक्षात्कार ॥८॥**

पैशाचें गणगोत । पैशाचे मायबाप ।
सद्गुरु कृपामूर्ती । वारील तीन्ही ताप ॥९॥
सद्गुरु वाक्यावरी । विश्वास ज्याचा आहे ।
तयाला उणें काय । त्रिभुवनीं ॥१०॥
जयाच्या प्रेमासाठीं । सद्गुरु पाळी लळे ।
तयाच्या पायीं लोळें । मोक्षसुख ॥११॥
येऊनि नरजन्मी । सद्गुरु नाहीं केला ।
तयाचा वायां गेला । सर्व जन्म ॥१२॥
सूर्याच्या तेजामध्यें । खद्योता नाहीं धांव । (य२पू.१४९)
तैसी सद्गुरुपायीं । हरीली स्वर्ग हांव ॥१३॥
होऊनि वेदपाठी । शास्त्रार्थ केला जेणें ।
सद्गुरुकृपेवीण । तयाचें व्यर्थ जीणें ॥१४॥
साधील्या गुप्त सिद्धी । केले बहू सायास ।
सद्गुरु कृपेवीण । ऊपणला भूस ॥१५॥
उत्तम कर्मधर्म । उत्तम जातीकुळ ।
सद्गुरुकृपेवीण । व्यर्थ तयाचें सकळ ॥१६॥
कुंकुम विधवेचें । गायन गोवाऱ्याचें ।
सद्गुरुकृपेवीण । ज्ञानही तैसें त्याचें ॥१७॥
जयाचा शुद्धभाव । एका सद्गुरुपायी ।
तयाला शेषशाई । उद्धरीतो ॥१८॥
(फलश्रुति)
सद्गुरुस्तुतिगीत । वाचतील ज्या कोणी ।
देईल चक्रपाणी । स्वपद त्यां ॥१९॥
सद्गुरुस्तुतिपर । पहीलें प्रकरण ।
ज्ञानेश्वराचें पायीं । केलें तें समर्पण ॥२०॥
॥हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते सद्गुरुमहिमा निरूपणन्नाम प्रथमं प्रकरणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥
०००
प्रकरण २ रें

## ॥ गुरुसेवा ॥

ॐ सद्गुरु मायबाप । देवाचेंही दैवत ।
तुमचे चरणावरी । सद्भावें प्रणीपात ॥१॥
सर्वथा बुद्धिहीन । ज्ञानाची नाहीं ठेव ।
एक्या तुमचिये पायीं । ठेविला भोळाभाव ॥२॥
माझें या सृष्टीवरी । स्वकीय नाहीं देवा ।
कोणत्या उपचारें । तुमची करूं सेवा ॥३॥
लेंकरू मी लहान । पदरीं मज घेई ।
सर्वदां ग ठेवी पायीं । आपुलिया ॥४॥
नलगे योग याग । नलगे तपक्रिया ।
शरीर झिजवीन । श्रीगुरु तुमचे कार्या ॥५॥
निश्चय हाचि माझा । सद्‌गुरु ज्ञानेश्वरा ।
येयां उपरी तुम्हां । कळेल तैसें करा ॥६॥
तुमचे सेवेलागीं । सामर्थ्य नाहीं मज ।
परि वेडे वाकुडेंही । गायीलें त्यागुनि लाज ॥७॥
होईल हळू हळू । ऐसी मज नाहीं वेळ ।
म्हणूनि तुम्हांपाशीं । घेतली थोर आळ ॥८॥
तुमचे सेवेवीण । इतर नाहीं आशा ।
सद्गुरु जगदीशा । मायबापा ॥९॥
तुमचे सेवेवीण । मागेन अन्य देवा ।
तरी तात्काळ माझी । झडोनी जावो जिव्हा ॥१०॥
शरीराच्या त्वचा । काढूनि लवलाही ।
पादुका तुमचे पायीं । वाहियेल्या ॥११॥
तुमची रजधूळ । माझीये भाळीं राहे ।
सर्वत्र सर्वभावें । सेवक मीची होवो ॥१२॥
तुमच्या निर्माल्याची । घ्राणासीं लागो प्रीती ।
तुमचे गुणवाद । आयको सदा श्रुती ॥१३॥

स्वरूपीं तुमचिया । जडोत सदा नेत्र ।
पाऊलें ठेवावया । हृदय असो पात्र ॥१४॥
मुखमंदीर माझें । तुमची पीकदानी ।
विष्ठा प्रसाद मज । द्यावा जी मोक्षदानी ॥१५॥
तुमची लघुशंका । ते मज सप्तसिंधू ।
अमृतकुंड माझा । तुमचा पदबिंदु ॥१६॥
शुद्धसत्त्वाचा पंखा । वारोत माझे हात ।
आज्ञानुसार पाय । क्रमोत सुखें पंथ ॥१७॥
माझे बाह्य कुटुंब । होवोत पददास ।
माझीया दास्यत्वाचा । वाढो बहू उल्हास ॥१८॥
माझा तो शुद्धभाव । तेंची प्रान्नाचें ताट ।
प्रेमाचें पाणी वरी । पावेन पाहतां वाट ॥१९॥
मी स्वतः कापूर । जळेन ज्ञानाग्नींत ।
मग सर्वत्र तुम्ही । गुरुराया उर्वरीत ॥२०॥
ऐसीच जन्मोजन्मीं । मजला घडो सेवा ।
यावीण अन्य नको । तुमची आण देवा ॥२१॥
तनू मन धन । अर्पण तुम्हां प्रती ।
आतां हृदयीं माझ्या । राहावे कृपामूर्ती ॥२२॥
एवढें कृपादान । द्यावें जी ज्ञानेश्वरा ।
अर्पीला आत्मभाव । तुमच्या नमस्कारा ॥२३॥
हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते गुरुसेवानिरूपणन्नाम द्वितीयं प्रकरणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

प्रकरण ३ रें

## ॥ श्रीगुरुंना विनंती ॥

सद्गुरु मायबापा । सत्वर कृपा करा ।
स्वप्रसादें मज । भवाब्धींतुनि तारा ॥१॥
तुमचे स्वरूपाची । ओळख नाहीं देवा ।
कोण्याप्रकारें । प्रकारें करूं सेवा ॥२॥
(चाल गंगाजमना)
गंगेचें हिरवें पाणी । मोती दाणा ।
मोती बांधले पांच पदरी ।
राजा नांदतो सात नगरी ।
साता माय किल्यावरी । राजा बोले ॥ धृ० ॥
माय बाप बंधू । सोयरे गणगोत ।
संसारीं बुडवीती । धरूनि माझा हात ॥३॥
जोंवरी धन । तोंवरी याना याना ।
आपुल्या अर्थासाठीं । लोक म्हणती काका नाना ॥४॥ (य२पू.१५२)
धनासाठीं सुत दारा । आंगीं लागल्याती बारा ।
तियाचे आशेनें । जाणें घडे यमदारा ॥५॥
संसार दुःखमूळ । विंगळ्याचा माज ।
किंचीत सुख येथ । नाहीं गुरुराया मज ॥६॥
वासना ही डाकिनी । नेत ओढोनि तात्काळ ।
कामादि वैरी साहा । मज मारीती सर्वकाळ ॥७॥
करावें जें जें कर्म । वासना तेथें जाय ।
तीच्यायोगें नाना । योनींत जन्म होय ॥८॥
चवऱ्याशी लक्ष योनी । भोगीलें दुःखवास ।
मातेच्या गर्भामध्यें । कष्टले नवमास ॥९॥
मायगर्भिंच्या यातना । सांगतां दुःख वाटे ।
कंटाळला जीव । आतां न न्यावे त्या वाटे ॥१०॥
उजवीकडे नर्क । डावीकडे मूत्र ।
कफानें बंद मूख । देह झाला अपवित्र ॥११॥
जठराग्नीच्या तापें । कढला देह माझा ।
सोडवि येथूनिया । समर्था गुरुराजा ॥१२॥
पूर्वीच्या दुष्कर्मानें । दुःखित झालें फार ।

ओसंगा घेई आता । शिरीं ठेवी कृपाकर ॥१३॥
वात पित्त कफ । व्याधी करिती दारुण ।
प्राणाचें भय मोठें । चित्तीं नाहीं समाधान ॥१४॥
आवडते भोग । भोगूनी संपलीया ।
दुःख वाटे मना । चिंतेनें जळे काया ॥१५॥
सृष्टींत सर्व भूतें । दुःखद मज होती ।
व्याघ्र सर्प चोर शत्रू । मज खावया पाहाती ॥१६॥
अकस्मात प्रारब्धाचा । येऊनी पडे घाला ।
न सुचे कांहीं तेणें । नरजन्म वाया गेला ॥१७॥
सूर्यादि नवग्रह । लागले माझ्या पाठीं ।
दाविती सुखदुःख । सेवा चुकतां गोमटी ॥१८॥
ऐसे हे तिन्ही ताप । यांनी फार तापवीलें ।
पदरीं धरा स्वामी । तुम्हा शरण मी आलें ॥१९॥
धुंडिता त्रिभूवनीं । न मिळे दाता कोणीं ।
अर्पिलें तनू मन । आता तुमचें चरणीं ॥२०॥
अस्थींची मोळी देह । स्वरूप कीटकाचें ।
तयासी म्हणें मी मी । ब्रह्म विसरूनी साचें ॥२१॥
श्रीगुरु मायबापा । मज संसारीं नका ठेवूं ।
तुह्मी जरी मोकलीलें । तरी शरण कोणा जाऊं ॥२२॥
मायासिंधूचा भोवरा । ओढी आपुलीयाकडे ।
गुरुराया तुह्मावीण । पाहूं कोणाच्या मुखाकडे ॥२३॥
संसार दुःखमूळ । तो म्यां त्यागीला सकळ ।
श्रीगुरु तुह्मां आतां । माझी असो कळकळ ॥२४॥
नेणें मी भाव भक्ती । बहु साधनांच्या कोटी ।
सद्गुरु मायबापा । माझे अन्याय घाला पोटीं ॥२५॥
अनंत अपराधी । पातकांचें बिढार ।
सद्गुरु मायबहिणी । माझा करी अंगीकार ॥२६॥
सांडोनि सर्वस्व म्यां । धरीले तुमचे पाय । (य२पू.१५२)
व्हावया जीवन्मुक्त । कोणी सांगावा उपाय ॥२७॥
झालियाही जीवन्मुक्त । सेवा घडो गुरुनाथा ।
निर्वाण प्रेम सदा । असो चढता वाढता ॥२८॥
सद्गुरु कृपावंता । स्वामीया ज्ञानेश्वरा ।
अंतरीं द्यावा मज । अवीट प्रेमझरा ॥२९॥

॥ हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते भक्तिवैराग्यपूर्वक विनंतिरूप गुरुप्रश्नवर्णनन्नाम तृतीय प्रकरणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

०००

प्रकरण ४ थें

## ॥ साधनपूर्वक गुरूपदेश ॥

करुनि एकचित्त । सद्गुरु उपदेश ।
आयकतां सावधान । तुटलें भवपाश ॥१॥
सद्भावे युक्तमनीं । चिंतावे गुरुपाय ।
संसारीं नाहीं भय । किंचितही ॥२॥
सद्गुरु म्हणती कन्ये । वेदांची पाळी आज्ञा ।
जीवन्मुक्तीची पाव संज्ञा । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥३॥
नास्तिक बुद्धादीक । पाखंडी सर्व मतें ।
त्यागूनी तियांप्रती । चालावे वेदमतें ॥४॥
कंठीं प्राण आलीयाही । जारकर्म करूं नये ।
पतिसेवा सर्वकाळ । करीतां सुख होय ॥५॥
आलीयाही मोठें भाग्य । उन्मत्त होऊं नये ।
चिंतावे ग गुरुपाय । मनीं सदा ॥६॥
अहेव स्त्रियांलागीं । पतीच गुरु देव ।
विधवांसाठीं आहे । स्वामी तो रमाधव ॥७॥

जिला मोक्षइच्छा तीनें । गंधर्व करूं नये ।
विधवा झालीयाही । चिंतावे हरिपाय ॥८॥
सपत्निजनांवरी । करावी सदा प्रीती ।
धरावी वरिष्ठांची । सर्वदा सेवावृत्ति ॥९॥
विपरीत झालें तरी । क्रोध कदा करूं नये ।
पतीवरी धरूं नये । द्वेषभाव ॥१०॥
आपुल्या मैत्रिणीसी । उचित द्यावे सदा ।
दासदासी सेवकांच्या । चुकवाव्याचि आपदा ॥११॥
ऐसीया आचरणें । कामिनी धन्य होती ।
उलट करिती त्या । कुलटा म्हणवीती ॥१२॥
दारिद्र आलें तरी । करावी पतिसेवा ।
संतोष द्यावा सदा । अतिथी गुरु देवा ॥१३॥
स्त्रियांनां सर्वभावें । दैवत पतिराजा ।
अंग हे झीजवावें । तयाच्या सेवाकाजा ॥१४॥
पतीचा त्रास जीवीं । इतरांसवें सुख । (य२पू.१५३)
पतिव्रता स्त्रियांनीं । त्यांचें पाहूं नये मुख ॥१५॥
बाहेरीं उज्वल । अंतरीं जारआशा ।
स्त्रियांनीं गुंतू नये । तियांच्या मोहपाशा ॥१६॥
देवाची दंभपूजा । पतीलागीं वांकडे ।
तिचा व्यर्थ गेला जन्म । कल्पवरी नर्की पडे ॥१७॥
स्वासीनी बाईयांनों । भावें करा पतिसेवा ।
विधवांनों तुह्मी मनीं । आठवा रमाधवा ॥१८॥
चारीवर्णाच्या स्त्रियांनीं । करावी हींचि कर्में ।
.... । येणें कुंठती बंधमर्में ॥१९॥
ऐसीया सत्कर्मांनीं । चित्तींचा मल जाय ।
...... । अंगी विरक्तता होय ॥२०॥
येथील सर्वभोग । वाटती तुच्छ मनीं ।
स्वर्गींची आशा गेली । सहज हारपोनी ॥२१॥

अनित्य विश्व सारे । नित्य तें ब्रह्म एक ।
वैराग्यासह यासी । म्हणती सुविवेक ॥२२॥
विषयांवरी जातां । मनासी आवरावे ।
इंद्रिय सांवरावे । कानादिक ॥२३॥
ओळविलेल्या मना । पुन्हा विषय न द्यावे ।
ऊन हींव सुखदुःख । अंगें सहन करावे ॥२४॥
वेदगुरुवाक्यावरी । पतिवचनींही तैसा ।
विश्वास दृढ व्हावा । कधीं न ढळेल ऐसा ॥२५॥
मिळो वा न मिळो कांहीं । प्रेमें करावें चिंतन ।
समाधान* म्हणती या । मुनिराज पुरातन ॥२६॥
जन्म मृत्यु जरा रोग । ह्यांतुनि तरण्याची आशा ।
चित्तीं दृढ तिया मुनी । म्हणताती विविदिषा* ॥२७॥
विवेक* विराग* । शमादी षटक ।
मुमुक्षे*सहित हे । चतुःसाधन कटक ॥२८॥
पतिसेवादि पहिलीं । साधनें बहिरंग ।
दुसरें विवेकादि । जाणावें अंतरंग ॥२९॥
वैराग्य झाल्यावरी । सोडावा सर्वसंग ।
पतिसेवादिक सारीं । कर्मे त्यागावी बहिरंग ॥३०॥
विवेकादिक चारी । साधनें साधलीया ।
गुरूसी शरण जावें । निर्लज्ज होऊनियां ॥३१॥
पति पिता पुत्र गोत । कोणी आलें जरी आड ।
तरि हित सोडूं नये । न धरावी त्यांची भीड ॥३२॥
गोविंद विष्णु कृष्ण । राम नारायण हरी ।
सर्वकाळ आवडतें । नाम जपावें अंतरी ॥३३॥
धरूनि दृढ ध्यान । करावी देवपूजा ।
न मिळतां उपचार । तरि कीजे मानसपूजा ॥३४॥
ऐसी दृढ हरिभक्ती । साधिलीया देवराव ।
अनुग्रह देतांक्षणीं । दृष्टि पडे गुरुराव ॥३५॥

मग सर्व सांडूनियां । त्याचे पायीं शरण जावें ।
अर्पूनि जीवभाव । देह झीजवावा सेवें ॥३६॥
पुढें त्या श्रीगुरुमुखें । शास्त्र करावें श्रवण ।
दिलेल्या मंत्रजपें । सर्व तोडावें बंधन ॥३७॥ (य२पू.१५४)
सद्गुरु मायबापा । कृपाळू ज्ञानदेवा ।
ॐ कार युक्त मंत्र । स्वामी मज उपदेशावा ॥३८॥
तो मंत्र जपतांचि । चित्तीं येतो प्रेमभाव ।
तुमच्या पदामृताचा । सहजची अनुभव ॥३९॥
ज्ञानेश्वर माऊलीये । मज करी बह्मश्रुती ।
स्त्रीगीत चालवावें । पुढें देऊनियां स्फूर्ती ॥४०॥
॥ हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते अधिकारानुसार बाह्यान्तरंगसाधनपूर्वक
गुरूपदेशो नाम चतुर्थं प्रकरणं संपूर्णम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥
०००

प्रकरण ५ वें

## ॥ यथार्थ परीक्षापूर्वक सद्गुरुलक्षण ॥

ॐ कार जया मुखी । अंतरी मळ नाही ।
... । शरण जावें त्याचे पायीं ॥१॥
अज्ञान सज्ञानासी । सारीखा प्रीतिकर ।
तयासी दोन्हीकर । जोडा भावें ॥२॥
जयाच्या चित्तीं नाहीं । द्वेषासी कदां थारा ।
मुमुक्षुजनीं कीजे । सदा तयाचा आसरा ॥३॥
वाणींत ग सिद्धशक्ती । ईश्वरासी प्रिय ।
ऐसीयांचे पाय । धरा वेगीं ॥४॥
पंचविषयांचे ठायीं । जया लोलुपता नाहीं ।
त्याचे पदीं ठेवा डोई । प्रेमभावें ॥५॥
जाति क्रिया गुण धर्म । याच्या वेगळें जें वर्म ।
तें जाणूनिया मर्म । निर्द्वंद्व जो ॥६॥
अविद्येमाजीं जीव । पाहूनि घेतो धांव ।
......। तोचि सत्य गुरुदेव ॥७॥
चारीही मुक्ती ज्याच्या । लोळती पायातळीं ।
आपुला जीवभाव । तयासी द्यावा बळी ॥८॥
संयोगीं हर्ष नाहीं । वियोगीं नाहीं शोक ।
सद्गुरु तो ब्रह्मवेत्ता । ब्रह्मपदीं पावे सूख ॥९॥
विद्येचा गर्व नाहीं । सर्वा भूतीं समदृष्टी ।
तयाच्या चरणाहूनी । ओवाळावी सर्व सृष्टी ॥१०॥
ब्राह्मण गाय हत्ती । चांडाळ आणि श्वान ।
जयाच्या दृष्टीपुढें । सर्व दिसति समान ॥११॥
सगुणयोग ज्याला । जाहला साक्षात्कारी ।
निर्गुणामध्यें जो कां । सहज आत्माचारी ॥१२॥
वेदांचा अर्थ जाणें । षट्शास्त्र पारंगत ।
... । परी निरहंकार चित्त ॥१३॥
वेदार्थ जाणूनियां । झाला जो ब्रह्मनिष्ठ ।
तयासी शरण जातां । नासती भवकष्ट ॥१४॥
केवळ अनुभवी । परि वेदार्थ न जाणें ।
ऐसा तो उपदेशा । पात्र नाहीं वाचागुणें ॥१५॥ (य२पू.१५५)
संशय जिज्ञासूंचे । तेथें न तुटती स्पष्ट ।
म्हणोनी गुरुपदा । पात्र नाहीं ब्रह्मनिष्ठ ॥१६॥
निःशंक मुमुक्षूला । सद्गुरु तो होय खरा ।
परि शंकायुक्तांलागीं । तेथें न मिळेचि थारा ॥१७॥
वेदाचा अर्थ जाणें । नाहीं ब्रह्मात्मानुभव ।
व्यर्थ तो शब्दज्ञानी । तेथे धरूं नये भाव ॥१८॥
जग मिथ्या तो सांगे । अहंब्रह्म म्हणे तोंडा ।
अंतरीं बोध नाहीं । उगा कांडियेला कोंडा ॥१९॥
म्हणूनी गुरु व्हावा । वेदार्थी ब्रह्मवेत्ता ।

चुकती भवपाश । तयासी शरण जातां ॥२०॥
वेदांच्या योगें तोडी । जो शिष्याचे कुतर्क ।
ब्रह्मात्मानुभवें । वारी तो भवशोक ॥२१॥
जयाच्या कृपादृष्टीं । बंधचि मोक्ष होय ।
... । प्रेमें वंदा त्यांचे पाय ॥२२॥
कैवल्य देण्यासाठीं । उदार सर्वकाळ ।
भेटतां अधिकारी । करी ब्रह्मचि तात्काळ ॥२३॥
आपुल्या सामर्थ्यानें । ईश्वर वश केला ।
आत्मसुख दावावया । स्वये दर्पण जो झाला ॥२४॥
जयाची भेट होतां । साधनें येती आया ।
... । शरण जावें त्यांचे पाया ॥२५॥
अविद्याआंधारांत । विज्ञानसूर्योदय ।
जयाच्या प्रसादानें । सहज लाभ होय ॥२६॥
अपुला शिष्य जरी । दुसरीकडे गेला ।
तरी द्वेष नाहीं ज्याला । सद्गुरु ... तो ॥२७॥
पिपीलिकेहूनी । ब्रह्मया पर्यंत ।
सारीखी भूतें जया । ब्रह्मचि सर्वगत ॥२८॥
अंतर बाह्य जैसा । विशुद्ध गंगाजळ ।
द्वैताचा नाहीं मळ । चित्तीं त्याच्या ॥२९॥
सृ‍िदानंद पदें । तिन्ही जो झाला ।
तयाच्या चरणांतळीं । लोळत मोक्षसूख ॥३०॥
शिष्याच्या उपदेशीं । गुरुत्वगर्व नाहीं ।
परि लोळे आपणची । गुरुत्व ज्यांच्या पायीं ॥३१॥
देऊनि ब्रह्मज्ञान । शिष्यासी घाली पोटीं ।
परी कर्तव्याची दृष्टी । नुमटे ज्या ॥३२॥
जैसा जो अधिकारी । तैसा दे उपदेश ।
भलती वटवट । कदा न धरी वेष ॥३३॥
देऊनि कृपादान । सहज करी बोध ।
साधनीं लावूनियां । शेवटीं करी सिद्ध ॥३४॥
श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । नाहीं दंभ अभिमान ।
चित्तीं ज्ञान भूतदया । त्याचे काय वर्णू गुण ॥३५॥
ऐसीया लक्षणांनीं । युक्त जो तो गुरुराव ।
माय बाप हितकारी । त्यासी द्यावा जीवभाव ॥३६॥
आपुल्या पुत्रावरी । करी तो प्रेम कांहीं ।
तैसेची शिष्यावरी । अधीकगुणें पाही ॥३७॥
ब्रह्मस्वरूप शिष्य । झालिया पूज्य मानी ।
कदा नव्हे अभिमानी । गुरुत्वाचा ॥३८॥
सच्छिष्यावरी लक्ष । टिटीव पक्षापरी ।
अर्पावें तनमन । तयाचें पायांवरी ॥३९॥
जाति वर्ण कुळ कांहीं । सद्गुरूचे पाहुं नये ।
अंत्यज हो का कोणी । धरावेची दृढ पाय ॥४०॥
याति वर्ण कुळ गोत्र । देहीं कल्पित सकळ ।
देहारहित जो झाला । तया कैचें यातिकुळ ॥४१॥
वेदवेत्ता ब्रह्मनिष्ठ । तोचि ह्मणावा ब्राह्मण ।
इतर शूद्र सारे । त्यांना जाऊं नये शरण ॥४२॥
शांति क्षमा भूतदया । ब्रह्मज्ञान विरक्तता ।
कर्म योग हरिभक्ती । जया गुरु जो पूरता ॥४३॥
तयासी शरण जावें । सांडुनी सर्व पाश ।
क्षणांत करील तो । मायाबंधनांचा नाश ॥४४॥
ॐकाररूपी ऐसा । बापमाय ज्ञानेश्वर ।
तया गुरुपायीं राहो । जन्मोजन्मी माझें शीर ॥४५॥
हरिः ॐ तत्सत् स्त्रीगीते यथार्थ परीक्षापूर्वक
सद्गुरुलक्षण कथनं नाम पंचम प्रकरणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ समाप्त ॥

१६

# श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरापराधक्षमापन स्तोत्र

श्लोक

आधीं कर्मवशें स्वमाय उदरीं गर्भाशयीं राहिलो ।
विण्मूत्री जठरानळें करुनियां रात्रंदिनीं दाहिलों ।
तैं युष्मत्स्मरणें सुटोनि भुललों बाहेर मंत्रक्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥१॥
लाळेनें मुख माखलें चिवडिलें विण्मूत्र नानापरी ।
मा मा मा म्हणुनी दुधास्तव रडे माशा निवारी करी ।
ऐसा बाळपणी पदें विसरुनी मी पावलों कुश्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥२॥
तारुण्यांत धनें सदा युवतिचे पाळोनि नाना लळे ।
शब्दस्पर्शरसादि पंच विषयीं केले स्वनेत्रांधळे । (य२पू.१५७)
होवोनि अति मत्त आचरितसे सोडोनि धर्मागमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥३॥
वित्तस्त्रीकुमरस्नुषागृहगणाहंतागुणें थाटलों ।
म्हाताराचि घरीं सदा किरकिरी श्लेष्में उरीं दाटलों ।
आयुः कालकरीं तथापि न करी वाणी सुनामोद्यमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥४॥
नाहीं स्मार्तहि शक्य जें प्रतिपदातिप्रत्यवायान्वित ।
श्रौताची मज कायसी गुणकथा जें विप्रवर्णा हित ।
एवं धर्म न कोठिली मग मला जीवेश्वरैक्यप्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥५॥
तीर्थी वित्त न वेचुनी न म्हटलें कोणास जेवाल कीं ।
आळंदीप्रति येउनी न धरिली स्कंधावरी पालखी ।
''मी माझें'' म्हणुनी कुणा न गणुनी सेवीं भवीं विभ्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥६॥
पाळाया पथिकांस उष्ण समयी नाहीं प्रपा घातल्या ।
कार्पण्यें सदनी रमाधवतनू नाहीं कदा पातल्या ।
कामक्रोधबळें तपीळ हृदयीं थारे न शांत्युत्तमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥७॥
ज्ञान ध्यान तुझें न धीस कळलें मानोनि भोगीं सुखा ।
हे नाथा जरि साच सर्व तरि मी पाहूं कुणाच्या मुखा ।
स्वामी ठेउनि मस्तकी मम करा द्या प्रेम भक्त्युद्‌गमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥८॥
पाळीलें नवमास कष्ट करुनी पोटीं जिने आवडीं ।
तीतें पाणि न देउनी शिरिं धरीं वेश्याघरीं कावडीं ।
श्रीमंता स्तविलें धनास्तव सदा भ्यालोहि नाहीं यमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥९॥
द्याया बाळपणीं सुमिष्ट रसनें वित्ता परांच्या हरी ।
नारी तेविं पराविया फसवुनी भोगीत शय्येवरी ।
नानादेवपदां फळार्थ पुजिलें नेणोनि त्वद्विक्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥१०॥
वाचेनें गुणवज्जना विगुणता लावोनि उच्छेदिलें ।
स्वांगींचें लपवोनि दोष जगतीं साधुत्व संपादिलें ।
अल्पज्ञानबळें फुगोनि धरिलें माथां गुरुत्वभ्रमा ।
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु जननिये अन्याय कीजे क्षमा ॥११॥
माझ्यासमान न जनीं अति पापकारी ।
नाहीं तुम्हांसमहीं पावन पापहारी ।
यालागिं पादकमलें नमितें स्वभावें ।
ताता तुम्हां दिसल योग्य तसें करावें ॥१२॥ (य२पू.१५८)

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

१७

# रामपंचपदी

१

भज मनुजा श्रीराम दयालू भज मनुजा श्रीराम ॥धृ०॥
सुरकार्यास्तव दशरथवंशी अवतरला सुखधाम ॥ दयालू ॥१॥
सज्जनतारक दुर्जनहारक । जानकीमनविश्राम । दयालू ॥२॥
द्विज तरला पुत्रस्नेहें बाहता । घेऊनि एकच नाम ॥ दयालू ॥३॥
ज्ञानेश्वरपदकिंकर विनवी । दाखवी मज निजधाम ॥ दयालू ॥४॥

२

नीलकंठ ध्यात जया तो मन्मनी राहो । नीलकंठ ध्यात जया ॥धृ०॥
सज्जनमनरंजन जो भवरिपूभयभंजन । श्रुतिगम्य सुरूप निरंजन ।
मम हृदयी येवो । नीलकंठ० ॥१॥
जानकीपति चिद्घन तनू । करी धृत दृढ कांचन धनू ।
जग सुखकर राम सुगुण । डोळे भरी पाहो । नीलकंठ० ॥२॥
ज्ञानेश्वरपदकिंकर । विनवी जोडोनि द्वयकर ।
राममंत्र तेराक्षर । संतसुखे लाहो । नीलकंठ० ॥३॥

३

रामावीण मजला ग बाई । अन्य नलगे मोक्षादि काही ॥धृ०॥
श्यामसगुण श्रीरघुनंदन । शिर ठेवीन त्याचे पायीं ॥ अन्य० ॥१॥
निजभक्तांचे हृदय जाणुनी । सत्वर येऊनी राही ॥ अन्य० ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु दीनदयाळा । राममंत्र मज देई ॥ अन्य० ॥३॥

४

सख्यांनो दावा मज श्रीराम ॥धृ॥
क्षीराब्धिजापति प्रभू हरी तो । निर्विकार गुणधाम । सख्यांनो० ॥१॥
जाऊनि कोणि तरी आणा तयाते । साकृती निरुपम राम । सख्यांनो० ॥२॥
ज्ञानेश्वरप्रभुपदकिंकर म्हणे । मंत्र स्मरा श्रीराम । सख्यांनो० ॥३॥

५.

श्रीराम जय राम जय जय राम वदा वाचे ॥
तुटती साच भवपाश स्मरता नाम राघवाचे ॥धृ॥
त्रयोदशाक्षरी मंत्र जपता । निजहृदयी भावे ।
संख्या भरता तेरा कोटी । प्रत्यक्षचि पावे ॥१॥
श्रीराम जय राम जय जय राम वदा वाचे ॥
तुटती साच भवपाश स्मरता नाम राघवाचे ॥धृ॥
दुस्तर संसृती तरावी । म्हणुनी श्रुति शिकवी तुम्हा ।
त्रयोदशाक्षरी मंत्र सुगम हा वाचेवरी नेमा ॥२॥
श्रीराम जय राम जय जय राम वदा वाचे ॥
तुटती साच भवपाश स्मरता नाम राघवाचे ॥धृ॥
अतसीकुसुमसम कुमुदवदन सुखसदन नीरदगात्र ।
भानुवंशी दशरथसुत झाला स्कंदतात मित्र ॥३॥
श्रीराम जय राम जय जय राम वदा वाचे ॥
तुटती साच भवपाश स्मरता नाम राघवाचे ॥धृ॥
ज्ञानेश्वरप्रभुपदकिंकर कर जोडुनिया विनवी ।
हे रामा गुणधामा द्या मज भक्ति नित्यनवी ॥४॥
श्रीराम जय राम जय जय राम वदा वाचे ॥
तुटती साच भवपाश स्मरता नाम राघवाचे ॥धृ॥
॥ ॐ तत्सदिति रामपंचपदी संपूर्णा ॥

०००

(इतरत्र समावेश नसलेल्या या पंचपदीचा या यष्टीत अंतर्भाव केला आहे - संपादक. ३ री आवृत्ति २००२)

# श्रीगुलाबरावमहाराजांची ग्रंथसूची

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| **सूत्रग्रंथ** | | |
| १. अन्तर्विज्ञानसंहिता | (सं) | य १६ |
| २. ईश्वरदर्शनम् | (सं) | य १६ |
| ३. समसूत्री | (सं) | य १६ |
| ४. दुर्गातत्त्वम् | (सं) | य १६ |
| ५. काव्यसूत्रसंहिता | (सं) | य १६ |
| ६. शिशुबोधव्याकरणम् | (सं) | य १६ |
| ७. न्यायसूत्राणि | (सं) | य १६ |
| ८. एकादशीनिर्णयः | (सं) | य १६ |
| ९. पुराणमीमांसा | (सं) | य १६ |
| **आकर ग्रंथ** | | |
| १०. संप्रदाय सुरतरु, (भा. १ व २) | | य ११ |
| **भाष्यग्रंथ** | | |
| ११. नारदीयभक्त्यधिकरण-न्यायमाला | (सं) | य १६ |
| १२. भक्तिसूत्रभाष्यम् | (सं) | य १६ |
| १३. भक्तिसूत्रभाष्यम् (मराठी) | | य १४ |
| १४. प्रियलीलामहोत्सव (भागवत स्कंध १) निमंत्रणविलास (वरील भाष्य) | | य ३ |
| १५. प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) आमंत्रणविलास | | य १४ |
| १६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः | (सं) | य १६ |
| १७. श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः | (सं) | य १६ |
| १८. ब्रह्मसूत्रव्याख्या | | य १५ |
| १९. निगमांतसुभा | | य १५ |
| २०. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे | | य १८ |
| २१. भगवद्गीतासंगति | | य १ |
| २२. मनोहारिणी (हिन्दी) | | य १८ |
| २३. गीतेवरील निरूपणे | | य १७ |
| २४. गीतेवरील प्रवचने | | य १७ |
| २५. गीतेवरील निरूपणे | | य १८ |
| २६. गीतेवरील स्फुट निरूपणे | | य १८ |
| २७. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) | | य १५ |
| २८. षट्पद्ध्वनिः | (सं) | य १६ |
| २९. ईशावास्योपनिषद् | (सं) | य १६ |
| ३०. ऋग्वेदटिप्पणी | (सं) | य १६ |
| ३१. चौसष्टी | | य १ |
| ३२. चिरंजीवपदाभ्यास | | य २ |
| ३३. बालवासिष्ठ | (सं) | य १६ |

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ३४. योगवासिष्ठ तत्त्व | | य १७ |
| ३५. योगवासिष्ठ निरूपणे | | य १८ |
| **शास्त्रग्रंथ** | | |
| ३६. सुखवरसुधा | | य १३ |
| ३७. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका | | य १३ |
| ३८. शास्त्रसमन्वयः | (सं) | य १६ |
| ३९. आगमदीपिका | (सं) | य १६ |
| ४०. युक्तितत्त्वानुशासनम् | (सं) | य १६ |
| ४१. प्रेमनिकुंज | | य १० |
| ४२. शांतिसुधाकर | | य २ |
| ४३. वेदान्तप्रक्रियासमुच्चय | | य १५ |
| ४४. वेदान्तनिरूपण | | य १५ |
| ४५. तत्त्वबोधः | (सं) | य १६ |
| ४६. षड्दर्शनलेशसंग्रहः | (सं) | य १६ |
| **भक्तिग्रंथ** | | |
| ४७. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) | | य १ |
| ४८. निगमांतपथसंदीपक | | य १ |
| ४९. भगवद्भक्तिसौरभ | | य २ |
| ५०. प्रीतिनर्तन | | य २ |
| ५१. नित्यतीर्थ | | य २ |
| ५२. प्रिय पाहुणेर | | य २ |
| ५३. भक्तितत्त्वविवेक | (सं) | य १६ |
| ५४. प्रियप्रेमोन्माद | (सं) | य १६ |
| ५५. गोपिकापादपीयूषलहरी | | य १५ |
| ५६. गोविंदानंदसुधा | (सं) | य २ |
| **योग** | | |
| ५७. निदिध्यासनप्रकाश | | य १ |
| ५८. ध्यानयोगदिवाकर | | य २ |
| ५९. सोपानसिद्धि | | य २ |
| ६०. हिरण्ययोग (स्वप्नयोग) | | स १५ |
| ६१. योगांग यमलक्षण | | य १५ |
| ६२. योगप्रभाव (पद्य) | | य १५ |
| ६३. योगप्रभाव १-२ (गद्य) | | |
| ६४. ज्ञाने. कुंडलिनी निरूपण. | | य १५ |
| **सांख्य** | | |
| ६५. सांख्यसुरेंद्र | | य १४ |
| ६६. सांख्यतत्त्व सूत्रावरील विचार | | य १५ |
| ६७. सांख्यसार एक निबंध | | य १५ |



| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ६८. सांख्यसार | | य १८ |
| **संगीत** | | |
| ६९. छंद प्रदीप | | य १५ |
| ७०. गानसोपान | | य १५ |
| **आयुर्वेद** | | |
| ७१. मानसायुर्वेद | (सं) | य १६ |
| ७२. मानसायुर्वेद | (मराठी) | य १५ |
| ७३. भिषगिंद्रशचीप्रभा | (सं) | य १६ |
| ७४. वैद्यवृंदावन | | य १५ |
| ७५. वैद्यनंदिनी | | य १५ |
| **प्रकरणग्रंथ** | | |
| ७६. स्वमतनिर्णयः | (सं) | य १६ |
| ७७. संप्रदायकुसुममधु | (सं) | य १६ |
| ७८. सच्चिन्निर्णयः | (सं) | य १ |
| ७९. कांतकांतावाक्यपुष्पम् | (सं) | य २ |
| ८०. चित्तोपदेश | | य २ |
| ८१. सद्वैजयंती | | य २ |
| ८२. बाराखडी | | य २ |
| ८३. त्रिकांडसार | | य २ |
| ८४. प्रमादकल्लोळ | | य १५ |
| **गाथा** | | |
| ८५. अभंगांची गाथा | | य ९ पू |
| ८६. पदांची गाथा | | य ९ उ |
| **निबंध** | | |
| ८७. अलौकिक प्रवास | | य २ |
| ८८. अमोघनिरूपण | | य २ |
| ८९. बौद्ध निबंध | | य १५ |
| ९०. वेदान्तनिरूपण | | य १५ |
| ९१. सिद्धिसार | | य १५ |
| ९२. अलौकिकाख्यानमाला | | य ५ |
| ९३. युक्त्या | | य १७ |
| ९४. गुरुचरणकौमुदी | | य १८ |
| ९५. निरूपण | | य १७ |
| **संवाद** | | |
| ९६. साधुबोध | | य ८ |
| ९७. मणिमंजुषा | | य १२ |
| ९८. सुवर्णकण | | य १७ |
| ९९. स्वमंतव्यांश-सिद्धान्त-तुषार | | य ६ |
| १००. दुर्मत-हृदयभंजन | | य १५ |
| १०१. प्रश्नोत्तरे | | य १५ |

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १०२. वृत्तिक्षीरसागर | | य १५ |
| १०३. बालबुद्धि विवर्धिनी | | य १७ |
| **पत्रे ११८** | | |
| १०४. अकरा पत्रे | | य १ |
| १०५. वीस पत्रे | | य २ |
| १०६. अडतीस पत्रे | | य ७ |
| १०७. सत्तेचाळीस पत्रे | | य १२ |
| १०८. एकपत्र | | य १५ |
| **लोकगीते** | | |
| १०९. स्त्रीगीते | | य ४ |
| ११०. स्त्रीगीतसंग्रह | | य ४ |
| १११. तुंबडी | | य २ |
| ११२. रुक्मिणी स्वयंवर | | य ९ |
| ११३. रुक्मिणी पत्रिका | | य ९ |
| **स्तोत्रे** | | |
| ११४. ज्ञानेश्वर-मातृपितृ-भावनाष्टक | | य २ |
| ११५. कृष्णपंचपदी | | य २ |
| ११६. गुरुपंचपदी | | य २ |
| **चरित्र - आख्याने** | | |
| ११७. आत्मचरित्र | | य १५ |
| ११८. सूचना प्रकरण | | य १ |
| ११९. सूचना प्रकरण | | य २ |
| १२०. अभंगात्मक १९ आख्याने | | य ९ |
| १२१. पदात्मक ७ आख्याने | | य ९ |
| १२२. पतिव्रताचरितामृत | | य १५ |
| **विविधरचना** | | |
| १२३. सुखपर्व (नाटक) | | य १५ |
| १२४. मात्रामृतपानम् | (सं) | य १६ |
| १२५. पत्नीप्रेमपराग | | य १ |
| १२६. नवीन भाषा - 'नावंग' | | य १६ |
| १२७. शब्दकोष (नावंगभाषेचा) | | य १५ |
| १२८. सांकेतिक भाषा (लघुलिपी) | | य १५ |
| १२९. मोक्षपट (क्रीडा) | | य १५ |
| १३०. हरिपाठाच्या प्रतिज्ञा | | य १५ |
| १३१. हरिपाठाचा अर्थक्रम | | य १५ |
| १३२. मायर्सवरटीपा | | य १५ |
| १३३. शिक्षणरत्नाकर (अप्रकाशित) | | (चरित्र) |
| १३४. ज्ञानबोध | | य ९ पू. |
| १३५. गायत्री अन्वयार्थ | | य १ |

*प्रथम यष्टीतील*

# कान्तकान्तावाक्यपुष्पम्

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥
॥ मंगलाचरण ॥

**यत्कृपालेशमात्रेण महिषो वेदपारगः।**
**ज्ञानेश्वरं तमाचार्यं वंदे बद्धांजलिर्मुदा ॥१॥**
**तपोभिः क्षीणपापानामिहामुत्रविरागिणाम् ।**
**सत्संवादमिषेणात्र भक्तिर्ज्ञानं च कथ्यते ॥२॥**

*सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पण्डित यांनी केलेला मराठी अनुवाद -*

**अर्थ** - ज्यांच्या किंचित कृपाप्रसादाने रेडा वेद बोलू लागला त्या सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजांना हात जोडून वंदन करतो ।।१।। तपश्चर्येने ज्यांनी आपली पापे धुवून टाकली व ऐहिक व पारलौकिक सुखावर तिलांजली दिली असा साधकांकरिता भक्ति व ज्ञान विषयक संवाद सांगतो ।।२।।

**विषयनिवृत्यनंतरमात्मज्ञानेनैव ब्रह्मणः सच्चिदांशद्वयम् अविद्यानिवृत्तिपूर्वकं ज्ञातुं शक्यते ।**

**अर्थ** - वैराग्यप्राप्तीनंतर आत्मज्ञानाने अज्ञान घालविल्यावर ब्रह्माच्या सदंश व चिदंशांचे म्हणजे साक्षीस्वरूपाने ज्ञान मिळू शकते.

**किंतु स्वानंदप्राप्तये भक्तिरेव गरीयसीति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानां अभिप्रायः ।**

**अर्थ** - ब्रह्मानंद प्राप्तिकरिता श्रुति स्मृति पुराणादि इतिहासावरून असे दिसते की भक्तिच श्रेष्ठ आहे. म्हणजे भगवंताची भक्तीच केली पाहिजे.

**तत्र भूबीजांकुरतरुफलरूपा निरुपाधिमायोपाधिसूत्रविराड् विष्णवश्चैते पंचेश्वरपुरुषा नीलकंठोक्ता भवन्ति ।**

**अर्थ** -

१. **'भू'रूप** म्हणजे निरुपाधिक ब्रह्म किंवा शुद्ध ब्रह्म.
२. **'बीज'रूप** म्हणजे मायोपाधिक ब्रह्म.
३. **'अंकुर'रूप** म्हणजे हिरण्यगर्भ किंवा ब्रह्मदेव.
४. **'तरु'रूप** म्हणजे विराटस्वरूप.
५. 'फल'रूप म्हणजे विष्णु, शिव, रामकृष्णादि अवतार.

- असे ईश्वर पुरुषांचे पांच प्रकार नीलकंठाचार्यांनी सांगिले आहे.

**तत्र ब्रह्मैव भगवद्भक्तानुग्रहकरणेक्षणात् विष्णुरूपेण स्वयमाविर्भवति ।**

**अर्थ** - हे ब्रह्मच स्वेच्छेने विष्णुरूपाने भक्तावर अनुग्रह करण्यासाठी अवतार घेते.



**स आविर्भावोऽपि नित्यः सुखैकानुग्रहकरणेक्षणमात्रत्वात् ।**

**अर्थ** - भक्तावर सुखरूप अनुग्रह करण्याच्या इच्छेने अवतार होत असल्यामुळे तो नित्य म्हणजे अविनाशी आहे.

**अयमेव भक्तिसदनम् ।**

**अर्थ** - हेच भक्तीचे मंदिर होय म्हणजे अशा या अवताराचीच भक्ती होऊ शकते.

**तद्वाररक्षकज्ञानप्राप्तये शांकरपदार्थानुदाहरति ।**

**अर्थ** - ज्ञान हे भक्तीचे द्वाररक्षक आहे म्हणजे ती भक्ति ज्ञानानंतर होते असे हे ज्ञान श्रीशंकराचार्यांनी सांगितले, ते असे -

**ईशो माया महान् जीवः संबंधो भेद एव च ।**
**अत्र पंचानादि सान्ताश्चेशोऽनादिरनन्तकः ॥३॥**
**ईशो हि ब्रह्मशब्देन वेदान्ते समुदाहृतः ।**
**मायाऽज्ञान प्रधानाद्याः पर्याया मुनिसंमताः ॥४॥**
**मायोपाधिर्जगद्योनिः सर्वकृच्छबलो महान् ।**
**हेमगर्भोऽपरेशश्च पर्यायौ शबलांशकौ ॥५॥**

**अर्थ** - (१) ईश्वर, (२) माया, (३) मायोपाधिक ब्रह्म, (४) जीव, (५) चैतन्य व अविद्या यांचा संबंध, (६) जीव व ईश्वर यांचा भेद; ह्या सहा पदार्थामध्ये ईश सोडून बाकीचे अनादि व सान्त आहेत. ईश म्हणजे शुद्ध ब्रह्म अनादि व अनंत आहे. ।।३।। वेदान्तात 'ईश' शब्दाने ब्रह्मच सांगितले आहे व माया, अज्ञान, प्रकृति, अव्यक्त, प्रधान एकाच अर्थाचे आहेत, असे मुनींनी अंगीकारिले आहे. ।।४।। या जगताचे कारण मायोपाधिक शबल ब्रह्म आहे. हिरण्यगर्भ हा अपरेश म्हणजे गौण ईश्वर आहे. यालाच शबलब्रह्म किंवा मुख्य जीव म्हणतात. ।।५।।

**मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।**
**तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं जगदिति श्रुतिः ॥६॥**
**मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।**
**संभवः सर्वभूतानां तस्मादिति परा श्रुतिः ॥७॥**

माया म्हणजे प्रकृति व मायेला धारण करणारा तो महेश्वर जाणावा. ह्या प्रकृतिनेच सर्व जग व्यापिले असे श्रुति म्हणते. ।।६।। सर्व भूतांचे उत्पत्तिस्थान म्हणजे परमात्म्याची त्रिगुणात्मक प्रकृति, त्या महद्‌ब्रह्मरूप प्रकृतीच्या ठिकाणी परमेश्वर सामर्थ्यरूप बीज स्थापन करतो म्हणजे परमेश्वराचे सत्तेने ही प्रकृति कार्य करू लागते असे गीतेत म्हटले आहे. ।।७।।

**अस्येशादिपदार्थत्रयस्य लक्षणानि भक्तिपदतीर्थामृतात् बुधैरुपहर्तव्यानि ।**

**अर्थ** - ईश, माया, महान् म्हणजे मायोपाधिक ब्रह्म ह्या तीन पदार्थांची लक्षणे भक्तिपदतीर्थामृत या ग्रंथात मी विस्तृत केली आहेत, ती शहाण्यांनी जाणून घ्यावी.

**पदार्थषट्कलक्षणानि अपेक्षितानि चेत् शारीरकशांकरभाष्यप्रोक्तानि अत्र विस्तरभयान्नास्माभिर्लिख्यन्ते ।**

**अर्थ** - शारीरक शांकरभाष्यात सहा पदार्थांची लक्षणे केली आहेत.

विस्तारभयास्तव ती आम्ही येथे सांगत नाही. अपेक्षा असल्यास ती मूळग्रंथावरून पाहून घ्यावीत.

**''परापरेति भेदेन द्वे विद्ये'' मुंडकोक्तितः ।**

**अर्थ** - विद्येचे परा व अपरा असे दोन प्रकार मांडुक्योपनिषदात सांगितले आहेत.

**तत्रोपनिषत्पुराणेतिहासवर्जितवेदवेदांगप्रतिपाद्याऽपरा ।**

**अर्थ** - वेदातील उपनिषत् भाग व पुराणेतिहासादिकातील ज्ञानभाग सोडून वेदवेदांगादिकांतून वर्णन केलेला भाग ही **अपराविद्या** होय.

**उपनिषत्पुराणेतिहासप्रतिपाद्या परेति ''वेदार्थादधिकं मन्ये पुराणानि वरानने'' इति नारदोक्तितः स्पष्टमेव प्रतीयते ॥**

**अर्थ** - उपनिषत् पुराणेतिहासात सांगितलेली विद्या **पराविद्या** होय, हे ''वेद अस्पष्टार्थबोधक असून पुराण स्पष्टार्थबोधक आहेत'' या श्रीनारदाचार्यांच्या वचनावरून स्पष्ट आहे.

शिष्य उवाच -

**यदेकं निष्कलं ब्रह्म व्योमातीतं निरंतरम् ।**
**यस्मिन्नतद्व्यावृत्या चकितं वदति श्रुतिः ॥८॥**
**तस्मिन् शुद्धे चिदाकाशे लक्ष्यज्ञानैकगोचरे ।**
**अनादि जडरूपाया मायायाः किमुत प्रमा ॥९॥**
**ब्रह्मरूपात् पृथक् सास्ति ह्यपृथग्वाऽथ विद्यते ।**
**कस्य स्याद् बंधनं तस्याः कस्य नेति वेदस्व भोः ॥१०॥**

**अर्थ** - शिष्य म्हणतो : ब्रह्म जर अंशरहित, आकशाच्या पलीकडे असणारे व अविनाशी आहे तर ब्रह्माहून जे निराळे भासते त्याची निवृत्ति करून वेद भीत भीत ब्रह्माचे ''नेति नेति'' असे वर्णन कां करतात ॥८॥ अशा या शुद्ध ज्ञानप्रकाशात व जे ब्रह्मज्ञानाने प्राप्त होते. त्यात जडरूप असणाऱ्या मायेची उत्पत्ति कशी झाली ॥९॥ *(ती माया ब्रह्माहून वेगळी आहे का की एकरूप आहे तिचापासून बंधन कोणाला होते आणि कोणाला होत नाही हे स्वामी आपण सांगा ॥१०॥* ***टीप*** *- हा अर्थ मुळात श्रीबाबाजीमहाराजांचा अनुवाद नसल्यामुळे वेगळा केला आहे.- संपादक.)*

श्रीगुरुरुवाच -

**श्रृणु वत्स गुरुशास्त्रयोः साधनदशायां सिद्धदशायां च यत्प्रयोजनं तत्ते सादिभ्रमानादिभ्रमनिवृत्तिमिषेण फलरूपतयोपदिश्यते ।**

**अर्थ** - श्रीगुरु म्हणतात : हे वत्सा ! साधनदशेत साधकाला व सिद्धदशेत ज्ञान्याला गुरु व शास्त्राचा काय उपयोग आहे, ते ऐक -

सादिभ्रम म्हणजे भ्रमाचा आरंभ व अनादिभ्रम म्हणजे भ्रमाला आरंभच नाही, अशा या दोन्ही भ्रमाची निवृत्ति करण्याच्या निमित्ताने उपदेश करतो.

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥११॥**
**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।**



**अनादिमत् परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥१२॥**
**ब्रह्मैवानादिरूपं हि मायाऽनादिस्वरूपिणी ।**
**तस्मान्माया ब्रह्मरूपात्पृथक्‌ापि न विद्यते ॥१३॥**
**सादिभ्रमोपदेशे तु मुक्तानां बंधसंभवः ।**
**तस्मादनादिरूपेण माया तिष्ठतु सर्वदा ॥१४॥**
**सादिभ्रमस्य निवृत्तेः साधनं नैव विद्यते ।**
**तस्मादेषा ह्यनादिः स्यान्मायाऽविद्या च मे मतिः ॥१५॥**

**अर्थ** - गीतेत म्हटले आहे की, प्रकृति व पुरुष हे अनादि आहेत म्हणजे त्यांचा आरंभच नाही. सत्त्व, रज, तम हे गुण व त्यांचे विकार हे प्रकृतीचे कार्य आहेत. ॥११॥ ज्याला ज्ञेय म्हणतात ते मी सांगतो - जे जाणले असतां जीव अविनाशी होतो ते उत्पत्तिरहित असलेले परब्रह्म होय. त्याला सत् म्हणता येत नाही व असत्‌हि म्हणता येत नाही. ॥१२॥ ब्रह्म अनादि आहे व माया हीहि अनादि आहे, म्हणून माया ब्रह्मस्वरूपाहून वेगळी कोठेहि राहत नाही ॥१३॥ भ्रम म्हणजे माया. हिचा आरंभ मानला तर मुक्तांना बंध होतो असे मानावे लागेल. हा दोषपरिहार करण्याकरिता माया अनादि आहे म्हणजे मायेला आरंभ नाही, असे म्हटले आहे. ॥१४॥ जर मायेचा आरंभ काल असला तरी तिच्या निवृत्तीचे कोणतेच साधन नाही. म्हणून माया/अविद्या अनादि आहे असे माझे मत आहे ॥१५॥

**ब्रह्मात्मैक्यप्रत्ययेऽपि विस्मृतेः प्रत्ययो वृथा ।**
**सोऽयं सादिभ्रमस्तस्य निवृत्तिश्चास्ति नास्ति वा ॥१६॥**
**गुरुवाक्येन निवृत्तिं यः पश्यति स पश्यति ।**
**न पश्चन्ति ज्ञानमूढा ब्रह्मालस्याभिमानिनः ॥१७॥**
**यस्य ब्रह्माभिमानोऽस्ति देहेऽपि ममता तथा ।**
**न स योगी न वा भोगी केवलं दुःखभागसौ ॥१८॥**
**अनादिभ्रमनिवृत्तिर्न शास्त्राध्ययनं विना ।**
**सादिभ्रमस्य निवृत्तिर्न गुरोर्वचनं विना ॥१९॥**
**यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।**
**तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥२०॥**

**अर्थ** - जीव ब्रह्मैक्य झाल्यावरहि आत्मविस्मृतीचा प्रत्यय व्यर्थच राहतो. त्याला सादिभ्रम म्हणावे. या भ्रमाची निवृत्ति होते किंवा नाही. (होते) ॥१६॥ गुरुवाक्याने भ्रमनिवृत्ति ज्याची झाली त्याचीच खरी भ्रमनिवृत्ति झाली. ब्रह्मज्ञान झाले असे समजून आळशी होऊन राहणारे पढतमूर्ख यांच्या भ्रमाची निवृत्ति होत नाही. ॥१७॥ ज्याला 'ब्रह्मज्ञान झाले' असा अभिमान असतो व ज्याची देहावर ममता किंवा प्रेम असते तो ज्ञानी नव्हे किंवा भोगी नव्हे. तो केवळ दुःख भोगणाराच होय ॥१८॥ अनादिभ्रमाचा निरास शास्त्राध्ययनाने होतो व सादिभ्रमाचा निरास गुरुवाक्याने होतो. ॥१९॥ ज्याची देवाचे व श्रीगुरूचे ठिकाणी सारखी पराभक्ति असते त्या पुरुषाला श्रुतीचा यथार्थ बोध होतो ॥२०॥

**चक्रवाकखगस्यात्र मृगतोयं करोति किम् ।**

**तथा माधवभक्तस्य ह्यविद्या किं करिष्यति ॥२१॥**
**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।**
**मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥२२॥**
**मृगांबुजन्मनिवृत्तिं चक्रवाको न चेच्छति ।**
**तथा माधवभक्तोऽपि मायासत्वमुपेक्षते ॥२३॥**
**चक्रवाकैरदृष्टाऽपि मृगैर्दृष्टा मरीचिका ।**
**अज्ञानिभिः संप्रदृष्टा भक्तो ऽविद्यां न पश्यति ॥२४॥**
**एतत्ते कथितं गुह्यं ज्ञानेश्वरकृपालवात् ।**
**यो जानाति यथा वत्स सुखमत्यन्तमश्नुते ॥२५॥**
**कान्तकान्तावाक्यपुष्पग्रथनं गद्यपद्ययोः ।**
**यः सेवते प्रभातेऽस्मिन् व्रजेद्धि परमां गतिम् ॥२६॥**

**अर्थ** - ज्याप्रमाणे चक्रवाक् पक्ष्याला मृगजलाची बाधा होत नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताला अविद्येची बाधा होत नाही. (ह्या वचनाचे समर्थन गीतेतील श्लोकाने होते) ॥२१॥ त्याचा अर्थ असा :- ''माझी ही त्रिगुणात्मक माया पार करणे दुस्तर आहे. पण जे मला शरण येतात तेच ही दुस्तर माया पार करून जातात'' ॥२२॥ मृगजलाबाहेर कसे होता येईल याची चिंता चक्रवाकपक्षी करीत नाही त्याप्रमाणे श्रीकृष्णभक्त मायेच्या भासाकडे दुर्लक्ष करतो ॥२३॥ ज्याप्रमाणे मृगाला मृगजल दिसते परंतु चक्रवाक पक्ष्याला ते दिसत नाही, त्याप्रमाणे अज्ञानी लोकांना अविद्या / माया दिसते. परंतु भगवद्भक्ताला अविद्या दिसत नाही ॥२४॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने हे गुह्य तुला कथन केले. जो कोणी हे चांगले समजून घेईल तो हे वत्सा ! अत्यंत सुखी होईल ॥२५॥ जो दररोज सकाळी ह्या पतिपत्नीसंवादाचे मनन करील त्याला सद्‌गति प्राप्त होईल ॥२६॥

॥ इति कांतकातावाक्यपुष्पं समाप्तम् ॥

०००

---

*- टीप -*

हा ''कांतकातावाक्यपुष्पं'' प्रकरणग्रंथ प्रथम यष्टीत अन्तर्भूत आहे पण तेथे श्रीगुलाबराव महाराजांचे उत्तराधिकारी सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडितांनी केलेला मराठी अर्थ मुद्रित करण्याचे राहून गेले सबब या ठिकाणी पुन्हा हे कांतकातावाक्यपुष्पं अर्थासहित मुद्रित केले आहे.

***- प्रा. देवराव भुजाडे,***
*कार्यकारिणी सदस्य,*
*मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती.*

---

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

# द्वितीय यष्टि पूर्वार्ध



तृतीय आवृत्ति

*कलिवर्ष : ५१०४ / इ. स. २००२*



॥ सर्वेसर्वा ॥

**॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥**

दहिसाथ, अमरावती, दूरभाष -०७२१-६७६३०७

**रु. ४०**

**॥ ज्ञानेश्वर तात आणि कृष्ण पती ॥**

**॥ सौभाग्य संपत्ती नित्य मज ॥**

*

॥ श्री ज्ञानेश्वर संस्थान ॥

पाताळेश्वर मार्ग, महाल, नागपूर

४४०००२

*

**: प्रकाशक :**

**॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती ॥**

**मुद्रक**

श्री. हरी गोखले, ऋचा ग्राफिक्स, स्वा. सावरकर चौक, खामलारोड, नागपूर.

दूरभाष - ०७१२-२२०७१३

**श्रीगुलाबरावमहाराजांचे रेखाचित्र** - कै. प्रा. मनोहर वा. इंदापवार.

**ग्रंथोपलब्धी**

* **श्री. सुधाकर फणसाळकर,**
  सिद्धान्त बी-३, सुयोग मंगल कार्यालयामागे, शनिवार, **पुणे** ३०
  टेली. ०२०-४४८०६४५
* **डॉ. राम पंडित,**
  पंचलतिका ग्रंथन्यास, १४/४५९, नेहरूनगर, कुर्ला (पूर्व) **मुंबई** ४०००३४
  टेली. ०२२-५२२०४१३
* **श्रीरंग घटाटे,**
  गोकुळ, श्रीमंत बाबासाहेब घटाटे चौक, घटाटे ले-आउट, सिव्हिल लाईन्स, **नागपूर**
  ४४०००१. टेली. ०७१२- ५२९७७० / ५३३९९७

# द्वितीय यष्टि : पूर्वार्ध

## अनुक्रमणिका


१. **कृष्ण पंचपदी** *(पद्य ५)* **१**

२. **सद्द्वैजयंती** *(आर्या १०८)* **३**

३. **बाराखडी** *(वाक्य ३२)* **१५**

४. **चित्तापदेश** *(श्लोक १०२)* **१६**

५. **त्रिकाण्डसार** *(अभंग २६)* **२३**

*कर्मकाण्ड* २५

*उपासनाकाण्ड* २९

*ज्ञानकाण्ड* ३२

६. **तुंबडी** *अ.६ (पदे १८४)* **३५**

*प्रकरण १ ले (३४)* ३८

*प्रकरण २ रे (३०)* ४०

*प्रकरण ३ रे (३४)* ४२

*प्रकरण ४ थे (२३)* ४४

*प्रकरण ५ वे (५०)* ४६

*प्रकरण ६ वे (१३)* ४९

७. **चिरंजीवपदाभ्यास** *(ओवी १००)* **५०**

८. **शांतिसुधाकर** *(ओव्या११८)* **६१**

युक्तीने ब्रह्मज्ञान

९. **सोपानसिद्धी** *(योग ग्रंथ अ.६)* **७०**

*सोपान १ ला* ७२

*सोपान २ रा* ७३

*सोपान ३ रा* ७३

*सोपान ४ था* ७४

*सोपान ५ वा (संधिसमाधि)* ७४

*सोपान ६ वा* ७६

**१०.नित्यतीर्थ** *सार्थ (ओ.५७)* **७९**

**११.मणिमंजूषा** *(मणि १३३)* **९३**

**१२.प्रियपाहुणेर** *(ओ.१८३)* **११७**

*१.प्रवृत्तिदमन (४१) १२०*

*२.उपासना व भक्ती (३८) १२३*

*३.मर्यादानिष्ठा (३८) १२६*

*४.पुष्टिनिश्ठा (६६) १२९*

**१३.अलौकिक प्रवास** *(गद्य)* **१३४**

**१४.अमोघनिरूपण** *(गद्य)* **१३९**

**१५.स्त्रीगीत** *(ओवी १५७)* **१५३**

*१.सद्गुरुसेवा (२०) १४४*

*२.सद्गुरुमहिमा (२३) १४६*

*३.सद्गुरुंना विनंती (२९) १४७*

*४.साधनांचा उपदेश (४०) १५०*

*५.सद्गुरुपरीक्षा (४५) १५२*

**१६. ज्ञाने.अपराधक्षमापनस्तोत्र**

*(पद्य ९)* **१५६**

**१७. रामपंचपदी** *(पद ५)* **१५८**

**१३५ ग्रंथांची सूची** **१५९**




श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

**'गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी'**

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते.त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही.त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्‌गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!

# मनोगत

॥ श्रीज्ञानेश्वर माउली ॥

*परमसद्गुरु श्रीगुलाबरावमहाराजांच्या शिष्यपंचायतनातील कै. दत्तात्रेय उर्फ **श्री भाऊसाहेबजी खापरे** यांनी चाळीस वर्षे महाराजांच्या ग्रंथांचे साक्षेपाने अध्ययन करून ६५० पृष्ठांचा - **ज्ञानेश्वर मधुराद्वैत दर्शनाचा ''माधुर्य मधुकोश''** नांवाचा सूचीग्रंथ तयार केला. यात कोणता विषय कोणत्या पानावर आहे हे चटकन सांपडते. हा सूचीरूप कोशग्रंथ मुद्रित झाल्यानंतर कोणत्याही विषयावरील महाराजांचे विचार पूर्णरूपाने समजण्यास अभ्यासूंना फार उपयोगी आहे. अशा या मधुकोशाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन श्रीभाऊसाहेबजींचे पुत्रद्वय **श्री बाबूराव खापरे** व प्रा. **डॉ. माधवराव खापरे** यांनी आणि भाऊसाहेबजींचे नातू **श्री मधुकर खापरे, भंडारा** यांनी, आपल्या खापरे कुटुंबियांचा पारमार्थिक वारसा सर्व विषयातील तज्ञांपुढे मुद्रितरूपाने लवकरच उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. माधुर्यमधुकोशातील पृष्ठक्रमांक पहिल्या आवृत्तीनुसार असल्याने या आवृत्तीत कोणता विषय कोणत्या पानावर आला आहे त्या संदर्भाचे पहिल्या आवृत्तीनुसार पृष्ठ क्रमांक दिले आहेत.*

***पहिल्या आवृत्तीतील पान जेथे संपते तेथे - कंसात - त्या जुन्या आवृत्तीतील पृष्ठक्रमांक दिला आहे.** उदा. (य२पू.२४) इ.*

*ही आवृत्ती अगदी तंतोतंत, एका अक्षरातही बदल न करता, पहिल्या आवृत्तीच्या ग्रंथानुक्रमानुसार आहे. श्रीमहाराजांनी मांडलेला विषय लवकर लक्षित होण्यासाठी आधुनिक रीतीनुसार सविस्तर अनुक्रमणिका, विषयानुसार परिच्छेद आणि शीर्षके यांचा मात्र नव्याने अंतर्भाव केला आहे.*

*या ग्रंथाच्या मुद्रणासाठी **श्रीमती वत्सलाताई विष्णुपंत चांदेकर,** अमरावती यांनी मुद्रणसेवेत बहुमोल सहभाग दिला. श्रीमहाराज त्यांना आपल्या चरणांजवळ जन्मोजन्मी ठाव देवोत, ही माउलींचे चरणी मनःपूर्वक प्रार्थना !*

***- किसन सखारामपंत केकरे,***

*उपाध्यक्ष,श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती.*



# मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराज जीवनाचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.
* नवव्या महिन्यत अंधत्व आणि अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ. स. १८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रीमत जठार यांना पत्र. त्यात *मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा केली. *स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना. * पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन. * हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ - माधान
* इ. स. १९०४ - * पूर्वजन्म - गुजरातेतील झुंझुरवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामीसंबंधी संस्मरण. * आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट. * ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ- * ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली. * माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे, बालसवंगडी व प्रथम शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना. * आळंदीवारीचा आरंभ. * स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना. * पहिली सार्वजनिक कात्यानी - शुक्लेध्वर-वाठोडा.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह. * श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति. * नित्यपूजा. * प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांशी भेट. * मुलगा-अनंत यांचा जन्म. * ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.

* इ. स. १९०७- *नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ. * जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा. * कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम. * जगन्नाथपुरीयात्रा. * मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा. * योगप्रभाव निरूपणे. चित्तोपदेश व सद्वैजयंतिरचना. * शिवपार्थिवपूजनाचा आरंभ. * प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. १९०९ - * अंतर्विज्ञानसंहिता, * अलौकिक व्याख्यानमालादि ग्रंथ-रचना. * वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन. * साहित्यसम्राट न. चि. केळकरांशी भेट.
* इ. स. १९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - * श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत, * देवासच्या राजांशी पत्रव्यवहार व देवासभेट. * संगीतकार पं. भातखंडेशी चर्चा व गानसोपानाची रचना. * धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५ - भाद्रपद शु. १२, पुणे मुक्कामी चाकण ऑइलमिलच्या परिसरातील घरातून महाप्रयाण.

## कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोत्तेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्यतत्त्वज्ञानांची भारतीयसिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्‌दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो. टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासकि सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्‌मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३० ग्रंथांची रचना. *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०, *श्लोक-१०००, *ओव्या- २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

० ० ०

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

# द्वितीय यष्टि

## पूर्वार्ध

## २



मधुराद्वैताचार्य
श्रीगुलाबरावमहाराज


॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती. दूरभाष -०७२१-६७६३०७


**रु. ४०**

श्रीगुलाबरावमहाराज : द्वितीय यष्टि पूर्वार्ध रु. ४०

श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

**॥ आतां गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी ॥**

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल, घरदार, शिक्षण, वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहान-मोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत तेही प्रमुख होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच कांहीदेखील मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले- ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन अमोघ आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील !''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.'
पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं.
त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत.
अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांतून महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली.
दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित झालं.
आणि सर्वांना उपलब्ध झालं !

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

# द्वितीय यष्टि

## उत्तरार्ध

## २



मधुराद्वैताचार्य
श्रीगुलाबरावमहाराज

॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती. दूरभाष -०७२१-६७६३०७

रु. ५०

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

द्वितीय यष्टि

## पूर्वार्ध

२



मधुराद्वैताचार्य
श्रीगुलाबरावमहाराज

॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती. दूरभाष -०७२१-६७६३०७

रु. ४०

पांडुरंग चौसष्टी या पुस्तिकेतील

# पांडुरंग परिचय

## ॥ सख्यभक्तीचा हृदयंगम आविष्कार ॥

- लेखक -

कै. वासुदेवराव वामनराव मुळे

(श्रीमहाराजांच्या सख्यभक्तीचे अधिकारी)

सेवानिवृत्त मुख्याध्यापक, नीलसिटी हायस्कूल, पाताळेश्वरमार्ग, महाल, नागपूर.

- - -

**श्रीपांडुरंगपादपद्मीं समर्पण**

**व**

**साष्टांग प्रणतिपूर्वक विनंती**

- - -

**दीक्षा माधुर्याची याची भिक्षा सदैव हे माते ! ।**
**दे मातें इच्छीना मग मी ब्रह्मांडवर्ति हेमाते ॥१॥**
**दे हरिपदिं रति धन्ये ! श्रीमज्ज्ञानेशसद्गुरुकन्ये ! ।**
**या 'वासुदेव' बाला न छळावें चित्तवानरें वन्यें ॥२॥**

*- गुलाबचरणारविंदभृंग*

***वासुदेव वामन मुळे***

*(ई. सन १९३८)*



## ÷ ख्अड्ढत्द णठ जथ ऋजण ÷

*Oliver Cromwell.*

- - - - -

**परानंदाय शांताय चित्सुखाय चिदात्मने ।**
**लोकलालनलीलायालोकातोकाय ते नमः ॥१॥**
**माधुर्यामृतकल्लोलं सचिदानंदविग्रहम् ।**
**पांडुरंगगुरुं वंदे मोढवंशसमुभ्दवम् ॥२॥**

- - -

अवतार काल : ई. स. १८८१, शके १८०३ ते
ई. च. १९१५, शके १८३७

- - -

श्रीपांडुरंगनाथ यांचें व्यावहारिक नांव गुलाबराव गोंदूजी मोहोढ असें होतें. याचें चरित्र लिहिण्याचा माझा हेतु नसून, ही व्यक्ति किंस्वरूप होती, यांनी काय केलें, ही व्यक्ति मला कशी भासली, व यांच्या अवतार कृत्यांतीलं इतर कांहीं ठळक ठळक गोष्टी सांगण्याचा आहे.

यांचा जन्म वऱ्हाडांत झाला. बाळपणींच हे नेत्रसुखाला आंचवले. बाह्यदृष्टि नाहीशी झाली असतांही या बालमहात्म्याची चिन्मयदृष्टि निर्मल व सतेज असल्यामुळे त्याची चित्तवृत्ति नेहमी आनंदित असे. यांची बालवृत्ति लहानपणापासून तों अखेर पावेतों जशीची तशीच होती. आनंदानें डोलावे, नाचावें, गांवे, मान हालवाववी, चुटक्या माराव्या व आपल्याच आवतीभोंवती गिरक्या मारून फिरावें व आतां मी रास खेळतों असें म्हणावे. कधी कधी मला कडेवर घेऊन व झपाट्याने चक्राकार फिरून. मला विचारावें कारे मुळे, तुला रास दिसला कारे ! श्रीमहाराजांची श्रीकृष्णासंबंधानें माधुर्यभक्ति असल्याकारणानें, व मला नामाभिधान (वासुदेव) कृष्णपयार्यवाचक असल्यामुळें, महाराज मला माझ्या नांवानें कधींच हाका मारीत नसत, मला ते नेहमी माझ्या 'मुळे' आडनांवानेंच हाक मारीत.

आम्ही ह्या बालवृत्ति सत्पुरुषाचें एका तपापेक्षां जास्त काल पावेतों जें चरित्र पाहिलें त्याचा विचार करतांना मति अगदी गुंग होते. ह्या पुरुषाला आपल्या आंगीं असलेल्या लोकोत्तर गुणांची अलौकिक ज्ञानाची व शक्तीची जाणीवच नव्हती असें मला वाटते. प्रकाशघन सूर्य खगोलीं यथेच्छ विहार करतो, भूगोलांतील लोकांनी त्या प्रकाशाचा चांगला वाईट वाटेल तसा उपयोग करून घ्यावा, सूर्य कांही ''ना'' म्हणत नाही; तद्वत् ही करुणास्वरूप चिति बालोन्मत्तपिशाचवत् वागून सर्वत्र मूर्त स्वरूपानें विहार करते - तद्वत् ह्या चित्सुखस्वरूपी संतांची अवतारी पुरुषांची - स्थिती ! हे निरंतर चिदाकाशी विहार करणारे; भूताकाशीं

विहार करणाऱ्या जिज्ञासूंनी, मुमुक्षूंनी त्यांचा यदृच्छेनें आत्मकल्याणार्थ उपयोग करून घ्यावा, ते 'ना' म्हणत नाहीत. वृक्ष हे वरच्या भागानें सूर्याचा ताप सहन करून खालच्या भागानें थकल्या भागल्या वाटसरूंवर छाया पाडून त्यांना विश्रांती देतात; त्यांचा श्रमपरिहार करतात, एवढेच नव्हे तर, त्यांच्यावर दगडफेक करणाऱ्या पुरुषांवरही अमृतफलांचा वर्षाव करून व त्यांची क्षुधा हरण करून त्यांना संतोष देतात; तद्वत् मला व माझ्या मंडळीला ह्या बालवृत्ति पुरुषाचा अनुभव आला. चितिवत् त्यांची सर्वत्र अनुमंतव्यता असल्यामुळे त्यांचेकडून कधींही कोणालाही प्रवृत्ति निवृत्ति नसते - कोणत्याही गोष्टीचा त्यांना आग्रह म्हणून नसतो; खरा ज्ञानप्रकाश पाडून पुढें चालणें हा त्यांचा स्वभावच - **'देवस्यैष स्वभावोऽयमाप्तकामस्य का स्पृहा'**

सारांश, त्यांना कर्तव्य म्हणून असें कांहींच नसते. कल्पवृक्षाप्रमाणें हे फलद होतात. जो कोणी जशी भावना करील तदनुरूप हे त्याला फलदायी होतात, याची प्रचीति मला आली. **'सेवानुरूप फलदोऽसि यथा महीपः'** परंतु येथें सेवेंचें काम नसून नुसतें प्रेमाचेंच काम होतें, व असते.

### *प्रथम भेट*

मी उमरावतीस असतांना, मला श्रीगुलाबरावसंबंधाने थोडी बहुत माहिती त्याच्या ज्ञातीपैकीं एका नारायणराव नांवाच्या बुकसेलरनें दिली. यांचें दुकान अंबादरवाज्यावर असतांना मी बरेचसे ग्रंथ यांचेकडून विकत घेत असें. तेथें माझी व गुलाबरावांची प्रथम भेट झाली, परंतु त्या दिवशी श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांची ताईमहाराजांच्या खटल्यांत साक्ष असल्यामुळे मला कोर्टात जाण्याची घाई होती, सबब माझें व गुलाबरावचें थोडें भाषण होऊन मी कोर्टांत गेलो.

पुढें माझी व त्यांची भेट श्रीमंत हरिभाऊ केवले यांच्यायोगें झाली. जमनाबाईच्या उताऱ्यावर मी यांची निरूपणें ऐकलीं व हें पाहून मला कौतुकही वाटलें व हा २० - २२ वर्षांचा मुलगा असून याला ज्ञान इतक्या चांगल्या रीतीने सांगतां येतें हें त्याचे ज्ञातीस भूषणावह आहे अशी या बालसाधूची तारीफ करीत आम्ही आपल्या घरीं आलो. पुढें आमचे मित्र श्रीनिवासशास्त्री व भालेरावादि हेही या बालसाधूला हरिभाऊ केवलेसह भेटले व त्यांचें अमृतानुभवावरील निरूपण ऐकल्यानंतर -

यांनी गुलाबरावांला प्रश्न केला की ' हें जगत कसें व कां भासते' ?

गुल्ह्यानें चटकन् उत्तर दिलें - 'आरूढ भावानें.'

सर्व मंडळी चकित झाली ही सर्व मंडळी मजकडे येऊन त्यंनी मला हा सर्व प्रकार सांगितला. 'अमृतानुभवाचें निरूपण' व 'आरूढभावानें जगत् भासतें' हें उत्तर ऐकून माझा ह्या गुल्ह्याबद्दल गौरव वाढला.

हा गुल्ह्या अमृतानुभवासारख्या ग्रंथावर निरूपणे करतो हे ऐकून आमची



बरीच मंडळी - श्री. यशवंत गोविंद देशपांडे, श्री. जयराम केशव असनारे, श्री. उमाकांत सदाशिव, श्री. बोधनकर, आमच्या शाळेंतील शिक्षक वगैरे - आठदहा दिवस एकसारखी आमच्या प्रायव्हेट हायस्कूलच्या आवारांत संध्याकाळचे पांच वाजल्यानंतर गमतीखातर म्हणून येत व आमच्या गुलाबाबरोबरच चर्चा करीत. कोणी विचारावें 'हे जगत् खरें कीं खोटें ? 'ईश्वर किंस्वरूप आहे?' 'वेदांमध्ये व पुराणांत सर्व ज्ञान आहे तर मग गुरु कशाला हवा?' 'वेद पौरुषेय कीं अपौरुषेय?' 'पुराणें रूपकें की खरीं ? परमेश्वराचा जगन्निर्माण करण्यांत हेतु काय?' 'ही सुखदुःखें जीवाला कोठून आली?' कर्मानेंच सुखदुःख भोग मिळतो, तर मग ईश्वर कशाला हवा? 'ईश्वराचें काम काय?' 'थिऑसफी खरी कीं खोटी?' असे नानाप्रकारचें प्रश्न मंडळीनें विचारावे. आमचा गुल्ह्या या प्रश्नकंदबानें यत्किंचितही न डगमगतां नुसती मान हालवी व मंडळीला उलट प्रश्न करून त्या मंडळीला कुंठित करी. हा प्रकार जेव्हां मी दोनचार दिवस एकसारखा पाहिला,

तेव्हां मी गुलाबरावाला जोरानें म्हटले, 'अजी महाराज ! असा वाद मागें पुष्कळ झाला, आज होत आहे व पुढें असाच वाद चालू राहील, पण यापासून निष्पन्न काय? अशा निष्फळ वादानें जीवाला अव्यंग सुख मिळत नाही, मिळाले नाहीं, मिळणार नाही; एखादें असे साधन सांगा की त्यायोगे जीवाला अव्यंग सुखप्राप्ति होईल.''

हें ऐकून आमचा गुल्ह्या हांसला व मंडळी बरखास्त झाली.

आमच्या गुलाबानें **'वृक्ष ओळखिजे फुलें । मानस ओळखिजे बोलें ।'** या न्यायानें ही मडंळी कशी काय आहे हे ओळखले; म्हणून अथपासून इतिपावेतों त्याची रीती, आपले गुह्य चोरून ठेवून कोणास एकदम कळूं न देता व प्रत्येक प्रश्न करणाऱ्याला उलट प्रश्न करून त्याला अडविण्याचीच होती, हे माझ्या नजरेस आलें.

हा सृद्दिंभोधि हंस आपलें रहस्य, चावटी करणाऱ्या मंडळीसमोर उघडणारा नव्हता.

**'Socrates was not a man to throw**
**pearls before swine'**

**वादे वादे जायते तत्त्वबोधः ।**
**बोधे बोधे सृद्दिानंदभासः ॥**

असें खात्रीनें वाटल्यावांचून हा आमचा गुलाब मान हालवून आनंदानें डोलत गप्प बसायचा. ह्या मौनापासूनही शिक्षण घेण्यासारखें कांहीं नव्हतें असें नाही, **'गुरोस्तु मौनमाख्यानम् । शिष्यस्तु छिन्नसंशयः ।** हें प्रसिद्धच आहे. सारांश, सर्व श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठांची हीच पद्धति आहे, असें जेव्हा आम्ही आमच्या गुलाबाला पाहिले व ऐकिलें तेव्हा आम्हाला उमजलें. व्यवहारांतले शहाणे वावदूक

आग्रही व वितंडवादी; आमचा गुलाब तसा नव्हता.

अस्तु. साधन सांगण्यासंबंधानें माझें जोराचें म्हणणे ऐकल्यावर गुलाबराव कांही दिवसांनी माझे घरीं एके दिवशी दोघां तिघांसह रात्रौ ९-१० चे सुमारास माझ्या दारासमोर येऊन विचारूं लागले,

'काहो मुळे ! येऊ कां मी तुमचे घरीं ?'

मी घरांतूनच कोण आहे याची विचारपूस न करतां 'या' असें म्हटले, व दार उघडून पाहतों तो आमचा गुलाब ! मला फार आनंद झाला हें कांही सांगायला नको.

श्रीगुलाबरावांचे योगानें मी एक ऐतिहासिक पुरुष होईन असें मला त्यावेळी वाटत नसल्यामुळें मी तो विवक्षित दिवस टिपून ठेवला नाही. परंतु ई.स. १९०१ च्या अखेरचा किंवा ई.स. १९०२ च्या आरंभंचा हा एक दिवस असावा असें मला वाटतें. नंतर आम्ही माडीवर गेलो; तेथें गेल्यावर त्यांनी होऊनच ओवीबद्ध निरूपण केलें, व त्या ८००, ९०० ओवींच्या निरूपणांत पाहतो तों माझ्या अनेक शंकांचे निरसन श्रुतियुक्ति प्रमाणासंह ऐकून मी व सर्व मंडळी आनंदसागरांत बुडून गेलो. घटकाभर देहभान विसरून 'काय ही अद्‌भुत विभूति' असे ज्याच्या त्याच्या तोंडून उद्‌गार साहजिक निघूं लागले; मंडळी आनंदांत डोलूं लागली.

**'तिये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।**
**मग सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥१॥'**

याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हांला यांच्या निरूपणानें आला. माझ्या मनांतल्या सर्व शंका मी न सांगतां त्यांनी ओळखल्या व एक आठवडाभर उमरावतीस महाजनपूर दरवाज्यावरील माझ्या घरी रोज रात्र येऊन ८००-१००० ओव्या श्रुतियुक्ति प्रमाणांसह म्हणाव्या व सर्व मंडळीला आनंदसमुद्रांत लोटून देऊन ते आलेल्या मंडळीसह पुनः मध्यरात्री भुसारी दरवाज्याबाहेरील उताऱ्यावर निजावयास जात.

ज्ञानाचा भडिमार केला, मनांतल्या सर्व शंका न सांगतां ओळखल्या, व श्रुतिस्मृतींची प्रमाणें देऊन त्या सर्व निरसन केल्या व सर्व मंडळीला आश्चर्यचकित करून सोडलें. ह्याप्रमाणे आमची त्यांचेसंबंधाने उत्तरोत्तर गौरवबुद्धि वाढत गेली. पण ते मला मित्रभावनेंच वागवीत. भेट झाल्यादिवसापासून, न जाणों मी सेवाचोर आहें हें जाणूनच की काय त्यांनी मला व मडंळीला म्हणावें -

'तुम्ही कांही करूं नका, मी निरूपण करतों तें ऐका; तेवढ्यानेंच तुमचें कार्य होईल'

आम्हांला आनंद झाला. आम्हांला आनंदच पाहिजे होता व नेटानें कांही करायला नको होते. पुढें मला, त्यांचें मजकरितां इतके लांबून येणे व पुनः मध्यरात्रीं उताऱ्यावर परत जाणें हे बरें न वाटल्यामुळें, माझी वडील बहीण



गं.भा. जिजीबाईच्या संमतीनें महाराजांना सकुटंब आपल्या घरी रहावयासच बोलाविलें व तुम्हीच मला निभावून घ्या अशी मी त्यांना विनंती केली. यावर 'होय' 'नाही' कांही न म्हणतां हे जोडपें दुसऱ्या दिवशीं सडेच आमचे घरीं आलें. जवळ कांहींच सामान नव्हतें. गळ्यांत अडकविलेली एक मोठी कपड्याची पिशवी व त्यांत ज्ञानेश्वरी व श्रीमद्‌भागवत (मूळ) हीं दोन पुस्तकें व हातांत एक आवडतें पुस्तक अशा थाटानें ह्या दिव्य जोडप्यानें आमचे घर पावन केलें. आमचें घरी गोकुळींचा आनंद सुरू झाला.

ह्या गुलाबाचा परिमल अगोदरच उमरावतींत पसरलेला होता. त्यामुळें नाना प्रकारची मंडळी यांना पहावयास येत असे, व ह्या बालमूर्तीला पाहून व यांचे भाषण ऐकून आश्चर्य प्रदर्शित करून परत जात असे. आमचे घरी आल्यावर महाराज मला नेहमीं म्हणत असत - 'जन्मांतरी माझ्या हातांतून सुटलेले १०-१२ जण मला एकत्र येथें सांपडले, म्हणूनच मला तुमचें घरीं राहणें इष्ट आहे'.

यांपैकी कांहीजणांचा उल्लेख महाराजांनी मला लिहिलेल्या पत्रांत व श्रीयुत राजेश्वरराव त्रिपुरवारांनी महाराजांच्या ५००-६०० पानांच्या चरित्रांत केला आहे तो पहावा. प्रारंभी प्रारंभी माझे घरीं माडीवर रात्रौ मंडळी १००-१२५ जमत असे. त्यांत (पान नं ८) श्रीनिवासशास्त्री, गोविंदराव राजूरकर, भालेराव गुरू, हरिभाऊ केवले, रामभाऊ डोळे, गोमपाळराव बापट, आबाजी प्रमुख असून गांवांतील विद्वान मंडळीही मधून मधून येत असे. अकोल्याचे हेडमास्तर हरिभाऊ रोहिणखेडकर यांच्याशीं महाराजांचा एके दिवशीं पुराणविषयावर बराच वादविवाद झाला व ''मथुरावृंदावन येथें आजही कृष्ण, गोपिका, रास वगैरे दृष्टीस पडतो हें व खरी सोन्याची द्वारका समुद्रांत भक्तांना दृष्टीस पडते हें सर्व म्हणणें अगदीं झूट आहे.'' प्रथम प्रथम असे भावनाप्रधान विषय निघून महाराजांनी त्यांना प्रत्युत्तरें द्यावीं किंवा त्यांना उलट प्रश्न करून कुंठित करावें, असा प्रकार बरेच दिवसपावेतों चालला, व अशा वादांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटून मंडळीची गर्दी कमी कमी होऊं लागली.

महाराजांची स्वयंस्फूर्तीची ७००, ८०० ओव्यांची निरूपणें बहुतकरून रात्रीच्या बाराच्या नंतर होत असत. लोकांना वाटे कीं महाराजांना ओव्या म्हणण्याची स्फूर्ति बाराच्या नंतर होते. कधीं १ वाजावा, कधीं २ वाजावें, कधीं रात्रीचे तीन चारही वाजावे; तेव्हां इतका वेळपावेतों, व तेंही रोज जागतो कोण? लोकांनी कंटाळून निघून जावें. यांवर लोकांचे तर्क चालावे. कोणी म्हणावें त्यांची देवता त्यांना रात्रीचे बारानंतरच स्फूर्ति देते, व ती त्यांना स्फूर्ति केव्हां देईल याचा नियमही नाही. तेव्हां फुकट जागण्यांत अर्थ काय? असें म्हणून गर्दी हळू हळू दिवसेंदिवस छटत चालली. मग बेताचीच मंडळी राहिली.

***ज्ञानेश्वरींतील पहिल्या ९ ओव्या***

''रात्रौ नियमानें १०/११ वाजल्यावर ज्ञानेश्वरी मी तुम्हांला सांगतों, मी तुम्हांला सत्कार्यवाद सांगतों.'' असें म्हणून जवळ जवळ दोन वर्षे पावेतों ज्ञानेश्वरींतील पहिल्या ९ ओव्यांचें निमित्त करून नाना शास्त्रांचे निरूपणाचा भडिमार केला. निरूपणाला सुरुवात करण्यापूर्वी हातांत एखादें ज्ञानेश्वरी भागवतासारखे मोठें पुस्तक घ्यावें, मला मुख्य श्रोता म्हणून समोर बसवावें व इतरांना त्यांनी निरूपण ऐकावयास सांगावें. श्रीनिवासशास्त्री हरिदास यांनीं निरूपणाचे वेळी निरूपणानंतर महाराजांना नाना प्रकारचे प्रश्न करून आम्हां सर्वांना महाराजांचे मुखानें बरेंच शास्त्रज्ञान ऐकविलें, हे शास्त्रीमहाराजांचे मंडळीवर बरेच उपकार झाले असें म्हणण्यास हरकत नाही. नंतर महाराजांनी आम्हाला कांही कांहीं निरूपणाच्या प्रतिज्ञा लिहून द्याव्या व जिजीबाईचें महाराजांचे सांगण्यावरून प्रसादादाखल साखर व भुईमुगाचे दाणे सर्वांना देणें झाल्यावर मंडळी श्रीज्ञानेश्वराचे घोषांत आपआपलें घरीं जात व कांही कांहीजण आमचे माडीवरच निजत. हा रात्रीचा नित्यक्रम असे.

दिवसा यांनी नऊ दहा वाजतां उठावें. बाईनें (सौ. मणकर्णिकाबाई हें यांच्या कुटुंबाचें नांव होतें ) व आमच्या वडील भगिनी गंगाभागीरथी जिजीबाईनें महाराजांच्या शौच्यमुखमार्जनाची, स्नानाची, पूजाअर्चेची, व जेवणाची व्यवस्था ठेवावी. महाराज स्वेच्छेनें घंटोनिशीं भिंगरीच फिरवीत, गातच बसत, बाईसह गोपीगीत म्हणत, स्वतःची पदें म्हणत, नामदेवांचे व तुकारामांचे अभंग म्हणत; असा यांचा साधारण क्रम असे. नियमितपणा म्हणून कांहींच नव्हता आमचे घरीं उमरावतीस असतांना महाराज गोपीगीत (संस्कृत व मराठी ) नामदेवांचा

**''बोबडा''**

**'कान्हा थमालले थमाल आपुल्या गाई ।**
**आम्ही आपुल्याले घलासि जातों भाई ॥**
**येथ लाह्याचा धलम आमुचा नाहीं ।**
**तुमची संगत ले संगत पुलेले भाई ॥ कान्हा ० ॥१॥**

रोज नियमानें उ्रास्वरांत, मधुर स्वरांत म्हणत असत व सर्वांच्या वृत्त्या तल्लीन करून सोडीत. बाहेरची मंडळी हा उ्रा, मधुर स्वर ऐकून आमचे घरांत येई व आनंदित होऊन 'वा ! काय मधुर कंठ, काय हा आवाज' अशी तारीफ करत घरांतून बाहेर पडे.

दहा साडेदहा वाजतां जेवण करून मी शाळेंत जाऊं लागलों म्हणजे त्यांनी 'राके ळुमे, वेजण लाझें याक? ळाशेंत ताजोस याक?' असें गमतीनें विचारावें. कधीं कधीं अगदीं शाळेंत जायच्या वेळी महाराजांनीं एखादा प्रश्न उपस्थित करावा व आम्ही थांबतों कीं नाहीं हें पहावें. मग आम्ही गयावया करूं लागलों म्हणजे त्यांनी आम्हाला शाळेंत जावयास परवानगी द्यावी. अशा अनेक प्रकारांनी



मंडळी किती परमार्थपर आहे हें महाराजांनी चांचपून पाहिलें.

महाराजांचें जेवण खाण ३/४ वाजेपावेतों आटोपावें. संध्याकाळीं २/४ जण बरोबर घेऊन देवीचे दर्शनास जावें; वल्लभसांप्रदायी लोकांचे देवळांत सेज पहावयास जावें, शनिवारीं शनीच्या देवळांत जावें; असा त्यांचा नित्यक्रम असे यांची रोजची पूजाअर्चा आटोपली म्हणजे देवासमोर हिंदी भाषेंत, जेवणाचे अगोदर वेदान्तपर निरूपण व्हावें; तें प्रश्नोत्तर रूपानें असल्यामुळे फारच श्राव्य असे. त्यावेळीं फक्त घरची व शेजारची मंडळी त्यांचेजवळ असे. रात्रौ रोज गद्य निरूपणें व स्वयंस्फूर्तीनें ७००/८०० ओवींचा अध्याय म्हणणें असे तें निराळेंच! ओव्या किती झाल्या त्यांची शेवटी संख्या सांगणें व त्या ओवीसह झालेल्या विषयाचा समारोप ऐकून मंडळी थक्क होई.

### *चौरस्त्यावर शिवाशीवीचा खेळ*

आम्ही फिरावयास गेलों व फिरतां फिरतां खापर्डे यांच्या घरासमोर आलों किंवा चौरस्त्यावर आलों म्हणजे त्यांनी म्हणावें -

''मुळे मास्तर, आपण येथें दवडून शिवाशिवी करूं.''

आम्हांला लाज वाटावी, पण महाराजांनींच तो प्रकार सुरू केल्यावर तो खेळ आम्ही जेमतेम चालवावा. दोनचारदां असा प्रकार झाला कीं त्यांनी खापर्डे यांच्या घरासमोरून स्टेशनगेटपावेतों एकसारखी दवड मारावी व ''माझ्या पाठोपाठ मुळे, तुम्ही दवडा व मला शिवा कसे !'' असें म्हणावें.

मी दवडावें पण लाज वाटावी किंवा दवडतां दवडतां एखाद्याचे आंगावर जाऊन पडावें व त्यामुळें हंसाहंसी व्हावी. कधीं कधीं दुसऱ्याशीं शिवीगाळही व्हावी. पण थेट रेल्वेच्या फाटकापर्यंत महाराज रस्त्यावरील माणसांस चुकवून एकधूम दवडत जात. ह्या करण्यांत त्यांचा काय हेतु असावा हें ज्यानें त्यानें ओळखून घ्यावें. हा पागलसदृश खेळ कांहीं पागलांच्या इस्पितळांतला खेळ नव्हता हें खास !

### *गुजराथी लोकांप्रमाणें उजव्या पायावरून कासोटा*

त्यांनी कोणाला सांगावें कीं ''तूं माझ्याप्रमाणें - गुजराथी लोकांप्रमाणें उजव्या पायावरून कासोटा घाल.'' व कांहींजणांनी तसें केलेंही.

बायकांना म्हणावें ''तुम्ही माझी वेणी फणी करून द्या, मला कुंकूं लावून द्या.'' व हा प्रकार चालू असतां त्यांना ते सोप्या भाषेंत भक्तिज्ञानाच्या गोष्टीही सांगत, गाणेंही गात. बायकांना मौज वाटावी.

श्रावण मासांत मंगळवारीं ''मला न्हाऊं घाला, मला लुगडें नेसवा, माझे आंगांत चोळी घाला, हातां सुवर्णकंकणें घाला, माझे गळ्यांतील मंगळसूत्र नीट करून द्या, मला आज मंगळागौरीचें पूजन करावयाचें आहे.'' मग नाना अलंकार आंगावर घालून व भिक्षुक पूजा सांगत आहे - अशा थाटांत महाराजांनीं मंगळागौरीचें

पूजन करावें. अशा वेळीं बायकांची हळदकुंकवाकरितां गर्दी असे व आम्ही सर्वजणानीं कौतुकानें हा मंगल समारंभ पहावा. चैत्रांत दोघांचौघांना बरोबर घेऊन ज्यांचेकडून बोलावणें आलें असेल त्यांचे घरीं ते पुरुषवेषांतच हळदकुंकू घ्यावयास जात व आपणाला **'पंचलतिका'** समजून बायकांच्या आग्रहावरून श्रीकृष्णाचें नांव घेत.

''नाथांची करणी शेषावर धरणी ।
पंचलतिकेचें चित्त श्रीकृष्णाचे चरणीं ॥''
''नांव घ्या म्हणायला निगम झाले भाट ।
पंचलतिकेच्या मंदिरी वासुदेवाचा थाट ॥''

अशा वेळीं व नांव घेतांनाच बायकांना यांचा स्त्रीवेष दिसत असे.

मोठमोठ्या पंडितांबरोबर वादविवाद करण्यांत महाराज फार पटाईत असून वादाला प्रवृत्त झालेल्या पंडिताला तो हारला व दीन झाला म्हणजे त्याला महाराज, त्यानें वाचलेल्या शास्त्रामधूनच आत्मखुणा सांगत; मग तो प्रसन्न चित्तानें महाराजांची वाखाणणी करीत परत जाई. असे एक दोनच नाहीं तर अनेक प्रसंग आम्हीं पाहिलें.

महाराजांनी योगबलानें आपल्याजवळील मंडळीचे नानाप्रकारचे प्रतिबंध दूर करून, त्यांचे रजतमाचे कण झाडून त्यांना सत्त्वसंपन्न करून भक्तिज्ञानोपदेशानें ऋजुमार्ग दाखवून दिला.

महाराजांना नुसत्या भजनी मंडळीत, कोरड्या ज्ञान सांगणाऱ्या पंडित समाजांत, उठणेंबसणें फारसें आवडत नसे. ते कधींही कोणाला एकदम साधन सांगत नसत. **रजतमनाश न होतां चित्ताची एकाग्रता फार हानिकारक आहे** असें ते नेहमीं म्हणत.

### *अभंगांची गाथा*

महाराजांची नुसती अभंगांची गाथा स्वस्थ चित्तानें चांगली वाचली तर त्यांचा सगळा आयुष्यक्रम, त्यांची शिक्षणपद्धति, भक्तिज्ञानयोगाची तत्त्वें सुंदर रीतीनें कळून येतील. अभंग एकंदर दोन हजारांवर आहेत. मुमुक्षूंनीं तरी ते अभंग अवश्य वाचावे एक दोन अभंग मी येथें देतों त्यांवरून त्यांची ज्ञान वगैरे सांगण्याची दिशा कळून येईल.

अभंग १८/२० गुलाबवाटिकाविहार.

### *वैराग्यावाचून अभ्यासाने नरकवास*

१८

भूक नसोनियां करणे भोजन । तरी तें अजीर्ण पचेना कीं ॥१॥
गोडचि अन्नाचे कडू ते ढेंकर । होय गुदद्वार दुर्गंधाचे ॥२॥
तैसीं हीं साधने वैराग्यावांचोनी । शरीराभिमानी करिताती ॥३॥



गोडचि साधनें कडवट होती । नरकासी नेती बांधोनियां ॥४॥
म्हणोनियां आधीं शुद्ध कीजे मन । नामचि घेऊन श्रीहरीचें ॥५॥
आरशाचा मळ निघावया वेळ । मुख तें तात्काळ दिसे मग ॥६॥
तैसा मनोमळ काढायासी कष्ट । परमात्मा स्पष्ट आहेच कीं ॥७॥
ज्ञानेश्वरप्रभु वळल्या सद्‌गुरू । मग तो निर्धारुं पुढें ठाके ॥८॥

२०

### *समाधी : वैराग्याचें फळ*

जोंवरी विराग नुपजे विषयीं । तों अभ्यास कांहीं करूं नये ॥१॥
वैराग्यावांचोनि केलिया अभ्यास । तंव वासनेस तीव्रता ये ॥२॥
मलीन सलील सांठवितां घरी । किडे त्या माझारीं होति तेव्हां ॥३॥
अशुद्ध मनाची तेविं एकाग्रता । होय आत्मघाता कारण ती ॥४॥
शेवटीं समाधी वैराग्याचें फळ । अभ्यास केवळ मध्यस्थाचि ॥५॥
आत्मानात्मयाचा विवेक करणें । तो विरागावीणें न घडेचि ॥६॥
ज्ञानेश्वरकन्या भोगीं विरागीणी । जाहली जोगीणी प्रियासाठीं ॥७॥

तुलसीदासाप्रमाणेंच नाममहिमा - भक्तिमहिमा - यांवर महाराजांचा फार जोर. तुलसीदास म्हणतात :-

**रामनामको अंक है सब साधन है सून ।**
**अंक गये कछु हात नहीं अंक रहे दसगून ॥**
**रामनाम कहबौ करो जबलग घटमें प्राण ।**
**कबहूं दीन दयालुके भनक परेगी कान ॥**

रामनाम हा एक अंक/आंकडा असून इतर सर्व साधनांची किंमत शून्य आहे. रामनाम सोडून कोणतेंही साधन शून्य, व्यर्थ होय; पण रामनाम अंक न सोडतां कोणतेंही साधन केलें तर त्याची किंमत दहापटीनें वाढते; म्हणून देहांत प्राण आहे तोंपावेतों रामनाम सोडूं नका, कधींनाकधीं प्रभूचे कानीं तुमची हांक जाईलच व मग तुमच्या इतर सर्व साधनांचें- जप, तप, अनुष्ठानांचे- चीज होईल.

महाराजांची ज्ञान झाल्यावर सर्वांनीं भक्ति करावी यावर मोठा जोर. एतदर्थ त्यांचा प्रेमनिकुंज ग्रंथ वाचावा.

'शुद्ध सत्वांत आवरकत्व नाहीं । आणि स्थीरत्वें विक्षेपही नसे कांहीं ।
म्हणोनि आनंदाधिष्टान लवलाही । जैसेंचि तैसें शुद्ध भासे ॥१॥
परी सत्त्ववृत्तिस्तव पृथगिवपण । जे आनंदाधिष्ठानीं चिन्ह ।
तेंचि अनध्यस्तविवर्त सगुण - । ब्रह्म श्रीकृष्ण अस्मन्मतीं ॥२॥
तें रासपणें आलिंगिलें । श्रीगुरूपणें हृदयीं धरिलें ।
अंतर् बाह्य सुंदर भरलें । श्रीज्ञानेश्वर पदकमल ॥३॥

ह्याप्रमाणें 'अनध्यस्तविवर्त' सगुण ब्रह्म श्रीकृष्ण यांची भक्ति करावी.

याशिवाय जीव कृतकृत्य होत नाही. अनध्यस्त विवर्त म्हणजे सत्त्वगुणावच्छिन्न आनंदाधिष्ठान श्रीकृष्ण परमात्माच होय हें जाणून तद्भक्ति ज्ञानोत्तरही करणें - **ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा मद्भक्तिं लभते पराम् ।** असेंच भगवद्गीता सांगतेः व ह्याच व अशाच पराभक्तीवर महाराजांचा फार फार जोर आहे; व हेंच महाराजांचें विशेष ध्येय होय. ह्या भक्तीचा प्रसार करण्याकरितांच त्यांचा अवतार आहे, व हेंच कार्य त्यांना पुढेंही करावयाचें आहे. ह्या ज्ञानाविरोधी अनध्यस्तविवर्त भक्तींत गुरुदेवांना कनकालंकारादिवत् अद्वैतनमन प्रक्रियाच प्राधान्येंकरून सांगितली आहे. अनध्यस्तविवर्त लक्षण मी महाराजांच्या शब्दांतच पुढें देत आहे. तें फार लक्ष्यपूर्वक - मननपूर्वक वाचावें.

***अनध्यस्तविवर्त लक्षण***

**'अभिन्ने सत्यपररूपत्वे सति,**
**भेदाभानपूर्वकम् अधिष्ठानज्ञान-अनावरकत्वे सति च**
**प्रीतिमात्रत्वाद्, अधिष्ठानज्ञान-अनिवर्त्यम् अनध्यस्तविवर्तलक्षणम् ।**

अपराभासरूप असूनही, भेदपूर्वक द्वैतभान होत नसल्यामुळें, व जें अधिष्ठान ज्ञानाचा लोप करीत नसल्यामुळें व तेथेंच प्रेम जडल्यामुळें, जें आनंदमयस्वरूप, अधिष्ठानज्ञानानें सुवर्णालंकारवत् निवृत्त होत नाहीं ते अनध्यस्तविवर्त स्वरूप होय. अपराभास असून अधिष्ठानाभिन्न असल्यामुळें व अधिष्ठान ज्ञानानेंही निवर्त्य नसल्यामुळें व जें नुसत्या प्रेमावच्छिन्नतेमुळें अधिष्ठानज्ञानाचा लोप करीत नाहीं तें अनध्यस्तविवर्त स्वरूप होय. असें स्वरूप ज्ञानोत्तर कालींही भज्य आहे.

असाच ज्ञानाचा व ज्ञानोत्तरकालीचा भाव श्रीज्ञानेश्वर महाराजांनी चांगदेव पासष्टींतही ध्वनित केला आहे. तेथेंही खरी दृष्टी चुकली कीं कसा घोटाळा होतो हें श्रीशंकराचार्यांनी एका आर्येत व्यक्त केलें आहे.

**'दान्तिनि दारुविकारे दारु तिरोभवति सोऽपि तत्रैव ।**
**जगति तथा परमात्मा परमात्मन्यपि जगत्तिरोधत्ते ॥**

एखाद्याची लांकडाच्या हत्तीचें रूपावर नजर बसली म्हणजे जसा लांकडाचा तेथल्या तेथेंच (हत्तींतच) लोप होतो (म्हणजे लांकडाची विस्मृति होते), व लांकडांवर नजर जमली म्हणजे हत्तीचा तेथेंच म्हणजे लांकडांतच लोप होतो; तद्वत् एखाद्याची जगतावरच दृष्टि जडली म्हणजे जगतांतच परमेश्वराचा लोप होतो, व परमात्म्यावरच नजर पोंचलीं म्हणजे तेथेंच जगद्भान लोपतें - नष्ट होतें.

याचें कारण काय तर व्यवहारचतुर सुवर्णकारांची दृष्टि केवळ सुवर्णावर असते व मूढांचि दृष्टि नुसत्या अलंकारशोभेवर असते. खरें सुवर्ण ओळखून तदालंकारांचा भोग घेणारे खरे भाग्यवान् थोडे ! तद्वत् शुष्क ज्ञानांतच समाधान मानणारे किंवा मृदंगतालनादांतच समाधान मानणारे भजनीमंडळ या दोघांनीही खरें ध्येय विसरूं नये व ज्ञानभक्तीची सांगड घालून जीवन्मुक्तीचा सोहळा अनुभवावा



व कृतकृत्य व्हावें. हाच खरा पुरुषार्थ होय.

***अध्यस्तविवर्तलक्षण***

**'अपररूपत्वे सति भेदभानपूर्वकं अधिष्ठानज्ञानावरकत्वे सतिच अधिष्ठानज्ञान-निवर्त्य अध्यस्तविवर्तत्वम् । रज्जुसर्प; शुक्तिरजतावभासवत् ।**

जें अपररूप भेदभान- द्वैतभान- उत्पन्न करून अधिष्ठान ज्ञानाचा लोप करतें व जें अधिष्ठान ज्ञान झालें असतां निवृत्त होतें तें अध्यस्त विवर्त होय.

कोणी कोणी घटाकाश व महदाकाश हें उदाहरण घेऊन घटोपधि नष्ट झाली म्हणजे तेथील आकाश व महदाकाश हे जागचे जागीं एकरूप अभिन्न आहेतच अशा प्रकारें मला अद्वैतज्ञान झालें असें समाधान मानून मी कृतकृत्य झालों व मला पुढें आतां कांहीं कर्तव्य नाहीं. असे समजतात.

पण एवढ्यानें दृष्टदुःख नष्ट होत नसून **'अहंब्रह्मास्मि'** असा कोरडा ज्ञानाभिमान मात्र त्यांचे ठिकाणीं राहतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

**'नवल अहंकाराची गोठी । नलगे अज्ञान्याचे पाठीं ।**
**सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥**

पुढें ज्ञानोत्तर कालाच्या भक्तीच्या स्थितीबद्दल तेच म्हणतात -

**'तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे ।**
**हें अनुभवाचीजोगें, नोहे । बोला ऐसें ॥**

अशा प्रकारच्या 'सुवर्णालंकारवत् नमनाशिवाय - अनध्यस्तविवर्तरूपी सहज भजनाशिवाय अहंकारगांठीं पूर्ण विरत नसून जीवन्मुक्ति सोहळा भोगणें शक्य नाहीं. नाहींतर **'अहंब्रह्मास्मि'** म्हणून दृष्टदुःख नष्ट होत नाहीं, व तें भोगावेंच लागतें. पांडुरंगनाथ - गुलाबरावमहाराज हाच भाव स्पष्टपणें आपल्या 'गोविंदानंदसुधेंत' अशाप्रकारें व्यक्त करतात :-

'अद्वैते सहजप्रीतिः क्रियाभावंविना हरौ ।
परा तातपदैरुक्ता दर्शिता रमणैरपि ॥१॥
यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
जाग्रत्सौषुप्तवेदाभ्यां सा समा गुरुदेवयोः ॥२॥
माहात्म्यज्ञानसंयुक्ता प्रीतिर्वै व्रजयोषिताम् ।
यथा तथा 'स एवाहं' भूमौ रक्तिः परा भवेत् ॥३॥
विज्ञातं सच्चिदानंदं समाधौ व्यतिरेकतः ।
अन्वयेन पुनस्तद्धि व्युत्थाने व्यक्ततामियात् ॥४॥
स्थाय्येव रसतां यातः परानंदतया हरिः ।
अनध्यस्तविवर्तश्चेत् किमन्यदवशिष्यते ॥५॥
अभेदे सच्चिदानंदं, भेदे भाति तदेव हि ।
अध्यस्तजातिव्यावृत्तौ व्यक्तिः कृष्णशिवात्मिका ॥६॥

सेव्यसेवकभावेऽपि न प्रेमैक्यं विनश्यति ।
'शिवो भूत्वा शिवं यजेदि'त्याह जननी श्रुतिः ॥७॥

ह्याच भक्तीच्या प्रसारार्थ श्रीगुलाबरावमहाराजांचा हा अवतार आहे; व हेंच भक्तिकार्य त्यांना नारदमुनींच्या अनुज्ञेनें पुढें करणें आहे हें त्यांनी 'स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषारांत' लिहून ठेविलें आहे. ह्या छोटेखानी ग्रंथांत मधुराद्वैत भक्तीचें प्रतिपादन प्रश्नोत्तररूपानें हिंदी भाषेंत फार सुंदर रीतीनें केलें आहे. अस्तु.

## बाललीला

अशाप्रकारें रोज रात्रौ अलौकिक ज्ञान सांगून मग त्यांनी बालभावानें विचारावें कां 'मुळे मास्तर' आवडलें कां निरूपण तुम्हांला? अशा वेळीं सर्व मंडळीच्या वाहवा! वाहवा! काय निरूपण हें, अशा घोषांत माझे डोळे आनंदानें भरून येऊन व 'होय' सूचक मान हालवून मी आनंदसागरांत बुडून जातों न जातों तोच यांनी पुनः बाललीला सुरू करावी व म्हणावें -

''काबे! बोलत कां नाहींस, मारूं कां 'उशी' तुला ?'' असे म्हणून व दिवा मालवून, फेकलीच उशी माझ्या आंगावर; मीही तीच प्रतिक्रिया करावी असा प्रकार सुरू झाला म्हणजे मंडळीनें हंसावें व माझी वडील बहीण जिजीबाई हिनें मला दरडावून म्हणावें

''वासुदेव ए ! तुला कांही लाज वाटते कांरे ?''

नंतर महाराजांनी तिच्यावर उलट रागवावें व म्हणावें ''तुला आमच्या मध्यें बोलण्याचें काय कारण?''

पुनः मंडळीचा हंशा पिकावा. अशा रीतीनें मंडळीचा 'वाहवा, वाहवाचा आनंदघोष जाऊन, हास्यरस पिकावा. महाराजांना आपला स्तुतिपाठ न आवडून त्यांनी ही हास्यरसाची शक्कल काढली कीं काय असेंच मला वाटे.

अशाच ह्या त्यांच्या बाललीलेंत मला एकदां चांगला मार खाण्याचाही प्रसंग आला; पण त्या प्रसंगांतून महाराजांनीच मला वांचविलें.

मी एकदां शुक्लेश्वर वाठोडा येथें कात्यायनीच्या व्रतसमाप्तीचे वेळीं दिसंबर महिन्याच्या चवथ्या आठवड्याच्या आरंभीं कांही मंडळीसह गेलों व 'ज्ञानेश्वर महाराज की जय' चा घोष झाल्यावर महाराज विनोदानें म्हणाले,

'मुळे मास्तर, आपण आज भांडण करूं'

मी म्हटलें ''महाराज, येथें जमलेले लोक काय म्हणतील? याचा तर विचार करा.''

''तुम्हाला माझी शपथ आहे, आपण भांडण करूंच.''

असें म्हणून त्यांनी दिली बोवा मला शिवी; मग मला तीच प्रतिक्रिया चालू ठेवावी लागली.



इतक्यांत ज्या देवळांत ही सर्व मंडळी उतरली होती त्या देवळांतील, महाराजाबद्दल पूज्यबुद्धि असलेला, एक 'सिंग' नावांचा मनुष्य आला माझ्यावर धांवून व पुरभैय्यांजवळ जशी लांब, लट्ठ लाठी असते तशी उगारली माझ्या पाठीवर मारण्याकरितां ! माझ्या पाठीवर तो दणका पडणार तोंच त्यांनी त्या लाठीचा जोराचामार वरचेवर आपल्या हातावर झेलला व त्या सिंगाला जोरानें दरडावून म्हणाले -

''जाव तुम यहां से, तुम्हारा कुछभी काम नहीं है.''

पुढें मंडळीनें त्या सिंगाला एकीकडे नेऊन त्याची समजूत घातली व त्याला सांगितले कीं ''ये मुळेमहाराज, बडे महाराजके, बडे प्रेमी है. और बडे महाराज उमरावतीमें इनके यहांही रहते हैं'' वगैरे वगैरे.

पुढें तो 'सिंग' मला मानूं लागला व मी संध्यापूजा आटोपल्यावर, देवळात ज्ञानेश्वरी वाचूं लागलों म्हणजे तो मला साष्टांग नमस्कार घालीं व मोठ्या आदरबुद्धीनें तो ती ऐके. अशी ही यांची बाललीला !

## सामर्थ्य व चमत्कार

अशाच प्रकारें यांचें सामर्थ्यही मोठें व तें नित्य कोणत्यातरी मिषानें बाहेर सहज प्रगट होई. यांच्या चमत्काराच्या गोष्टीच जर यांच्याजवळ असलेल्या मंडळीनें लिहून काढल्या असत्या तर १०००/२००० पानाचें एक पुस्तक सहज झालें असतें. ही अतिशयोक्ति नव्हे, ही प्रत्यक्ष पाहिलेली कथा आहे, ऐकलेली नव्हे. अशा प्रकारें चमत्कार करण्यांत त्यांचा चांगदेवाप्रमाणें आपला गौरव वाढावा, मोठेपणा वाढावा हा उद्देश नव्हता. शिष्यशाखा वाढवावी व आपण आपलेच स्तोम माजवावें हेंही नव्हतें. खरा मार्ग दाखवून प्रेमानें मंडळी आपल्याकडें ओढावी, योगसामर्थ्यानें मंडळीचे प्रतिबंध दूर करून त्यांना परमार्थाकडे वळवावें हेंच त्यांचें ध्येय. ते म्हणतही असत -

**'एतदेवहि दयालुलक्षणं । यद्विनेयजनबुद्धिवर्धनम् ।** शिष्याच्या बुद्धीला वाढवून ती परमार्थप्रवण करणें हेंच खरें दयालुपणाचें लक्षण होय.

ह्या पुरुषाचें बालपण काय, किशोरपण काय, प्रौढपण काय सर्वच चरित्र अतर्क्य, व आश्चर्यजनक होय. यांना व्यक्तिशः कृष्णाचा अवतार समजावें कीं ज्ञानेश्वरांचा, कीं श्रीशंकराचार्यांचा, कीं नारदांचा, कीं गोपींचा अवतार समजावें, किंवा एकसमयावच्छेदेंकरून सर्वांचा समष्टि अवतार समजावें, हेंच मोठें गूढ होय. याच पुस्तकांत आर्या दिल्या आहेत त्या वाचल्या म्हणजे हा भाव चांगला कळेल. ह्यांनां सर्व विद्या व सर्व कला अवगत होत्या. एवढें ज्ञान, एवढी भक्ति व एवढें योगबल अंगी असूनही, अंधत्व पत्करून आमच्यासारख्या अज्ञ जनांमध्यें राहून व प्रसंगविशेषीं थोडाबहुत अपमानही सहन करून, आपल्या सामर्थ्याचा यत्किंचितही आविर्भाव न करितां हे आमच्यांत कसे राहिले, याचेच आम्हांला

राहून राहून आश्चर्य वाटतें.

मला मात्र ते नेहमी म्हणत 'मुळे मास्तर, तुम्ही माझ्या ज्ञानालाच भाळलात; तुम्ही अजून माझें सामर्थ्य पाहिलें नाही'

मी अर्थातच म्हणावें - नाही.

मी 'नाही' म्हटलें म्हणजे त्यांनीं हंसावें.

मग मी विचारावें - 'महाराज, तुम्ही कोण आहां, तुमचा हेतु काय, तुम्हाला ही सर्व विद्या कशी प्राप्त झाली' वगैरे.

त्यांनी उत्तर द्यावें - 'तुम्ही माझ्यासारखे झाले म्हणजे मग तुम्हाला सर्व कळेल. मी सर्व शक्तीचा विग्रह आहे असेंच तुम्ही समजाना.'

मग पुढें मी त्यांना याबद्दल विचारलें नाहीं, व मला तसें करणें बरेंही वाटलें नाही. ह्या पुरुषाबद्दल जितकें लिहावें तितकें थोडेंच वाटतें. एकवेळ पृथ्वीवरील धूलीचे कण मोजवतील पण अशा पुरुषाचें चरित्र लिहिणें अशक्य. म्हटलेंच आहे :-

असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिंधुपात्रे ।
सुरतुरुवरशाखालेखनी पत्रमुर्वी ॥
लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालम् ।
तदपि तव गुणानामीश पारं न याति ॥१॥

*Could we with ink the ocean fill,*
*Were the Whole world of parchment made,*
*Were every single stick a quill,*
*Were every man a scribe by birth:*
*To write the love of God alone,*
*Would drain the ocean dry;*
*Nor would the scroll contain the whole*
*Though stretched from sky to sky.*

ज्याची तुटली वासना कांसोटी । विराली अहंकाराची गांठी ।
प्रारब्ध उरलें देहाचें तटीं । त्यासी ऐक्य सृष्टीं आभासें ॥

*Always without desire we must be found,*
*If its deep mystery we would sound,*
*But if desire always within us be,*
*Its outer fringe is all that we shall see.*

ह्या पुरुषाचें ज्ञान, यांचें योगसामर्थ्य, यांची रोजची वागणूक, यांची निरहंकार स्थिति, यांची निरुपचार आनंदवृत्ति, यांची यद्दच्छालाभसंतुष्टता पाहूनच मी यांचेजवळून फार फार शिकलों, व माझ्या अनेक जन्मांचें काम माझ्या ह्या एका जन्मांतच संपलें असें मला वाटूं लागलें.

श्रीमहाराजांनी आपला माधुर्यभक्तीचा - भक्तिज्ञानाचा - संप्रदाय चालू



राहावा म्हणून श्रीयुत बाबाजीमहाराज पंडित यांजवर विशेष प्रसाद करून सोंपविला असल्यामुळें पूर्वी श्रीमहाराजांचे जवळ असलेल्या मंडळीनें आपआपल्या अनुभवाची टिपणें पंडितजीजवळ दिली तर पंडितजीला मागें पुढें श्रीयुत त्रिपुरवारांनी अभिवचन दिल्याप्रमाणें पुढील चरित्राच्या उत्तर खंडाची तीनचार प्रकरणें लिहावयास सुगम जातील असें मला वाटतें.

मीही हा उपक्रम श्रीयुत भाऊसाहेब खापरे यांचे सूचनेवरून सुरू करून छापून काढला आहे. भाऊसाहेब, केकरे, गोखले, नानाजी कविमंडण, भालेराव, श्रीनिवासशास्त्री हरदास वगैरे मंडळींनी आपआपल्या अनुभवाचीं टिप्पणें पंडितजी महाराजांचे स्वाधीन केलीं तर उत्तरखंड कादंबरीप्रमाणें मनोहर व लोक शिक्षणार्ह होऊन सूर्यप्रकशवत् खरा परमार्थमार्गप्रदर्शक होईल अशी मला खात्री वाटते.

खऱ्या गुरूचें लक्षण काय? योगसामर्थ्याचा उपयोग कसा, कोणाकरितां, केव्हां करावा? पुराणादिकांनी वेदांताचें उपबृंहण कसें केलें ? चातुर्वण्यव्यवस्था कायम ठेवून परमार्थ कसा साधावा ? वगैरे गोष्टींचें रहस्य श्रीगुलाबराव महाराजांचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचले असतां सहज कळून येईल. आजकाल एकदेशीय मार्ग निघून दुसऱ्या मार्गांची निंदा करणारे लोक फार निघाले. ह्यामुळें सर्वत्र घोटाळा होऊन, अज्ञजनांत बुद्धिभेद उत्पन्न होऊन नास्तिक्यता वाढली, व विषयप्रवणता बोकाळली, याशिवाय दुसरें कांहीं झालें नाहीं.

उत्तरखंडांतील **प्रथम सुहृत्प्राप्तिप्रकरण** छापून तयार आहेच. **दुसरें अलोकप्रकरण**– यांत महाराजांनीं आपल्य अलौकिक सामर्थ्यानें आपल्या भक्तांचे नानाप्रकारचे प्रतिबंध दूर करून त्यांना परमार्थप्रवण कसें केलें याचें वर्णन यावयाचें आहे. **तिसरें वाङ्मयप्रकरण**– यांत त्यांनीं नाना शास्त्रांची मर्यादा व उपयुक्तता दाखवून वेदान्त व त्याहीवर भक्तिशास्त्राची श्रेष्ठता दाखवावयाचीं आहे. व मधुराद्वैतसंप्रदायाच्या प्रसारार्थच महाराजांचा अवतार आहे हें दाखवावयाचें आहे. **चवथें स्वभावविवेचन प्रकरण**– यांत माणसांच्या भिन्न भिन्न प्रकृत्यनुसार भिन्न भिन्न शास्त्रें कशीं निघाली व सर्व प्रकारच्या जनांशीं अधिकारानुरूप वागणूक ठेवून आपली समबुद्धि ढळूं न देतां मधुराद्वैतप्रसारार्थ महाराजांनी काय केलें व पुढें सर्व मंडळीसह हें कार्य कसें करावें हें दाखववायाचें आहे. असो; आम्ही येथें आपल्या मनाविरुद्ध थांबतों; कारण चरित्र लिहिण्याचा माझा हेतु नाहीं.

महाराजांच्या बाललीलेला अनुसरून मी जो आपला अनुभव फार फार थोडक्यांत लिहिला आहे, तो जिज्ञासु वाचकांना सुखदायी व वरदायी होवो.

०००

श्रीपांडुरंगमाउली समर्थ.

***

# श्रीगुलाबराव महाराज यांचें संक्षिप्त चरित्र

॥ लेखक ॥

***श्री. वासुदेवराव वामनराव मुळे-मास्तर, अमरावती.***

(गुलाबवाटिकाविहार या सांप्रदायिक नित्यनैमित्तिकपाठाच्या पुस्तकातून)

**नमितों सद्भावें मी प्रार्थित श्रीमद् गुलाबरायातें ।**
**नारायणपदपद्मी सुप्रेमा दाविला बरा यातें ॥१॥**
**श्रीराधारमणाच्या विश्वस्तुतचरणकमलिंचा भृंग ।**
**यद्वैराग्य स्मरवी दशरथजामात विप्र तो शृंग ॥२॥**
**परानंदाय शांताय चित्सुखाय चिदात्मने ।**
**लोकलालनलीलायालोकतोकाय ते नमः ॥३॥**
**माधुर्यामृतकल्लोलं सच्चिदानंदविग्रहम् ।**
**पांडुरंगगुरुं वंदे मोढवंशसमुद्भवम् ॥४॥**

जन्मसिद्ध विद्वत्ता, साधुत्व आणि कवित्व हे तिन्ही गुण आंगी एवकटलेले, विदुर, व्याध, नारदादि प्राचीन महात्मे व श्रीज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज, श्रीतुकारामादि अर्वाचीन महात्मे यांच्या तोडीचे श्रीगुलाबराव महाराज हे वऱ्हाडांत होऊन गेले. याचें व्यावहारिक नांव **गुलाबराव गोंदूजी मोहोड माधानकर** असें आहे. माधान गांव हे यांचे राहण्याचे मुख्य ठिकाण असून तें उमरावती जिल्ह्यांत एलिचपूर तालुक्यांत आहे. श्रीगुलाबरावमहाराजांचा जन्म परम पवित्र पुण्यशील माउली सौ. अलोकाबाई इचें उदरी शके १८०३ वृषभनामसंवत्सर (ई. स. १८८१ जुलई) आषाढ महिन्यांत लोणीटाकळी गांवी त्यांच्या आजोळी झाला.

यांचे आजे राणोजीराव निस्सीम शिवभक्त होते. गुलाबराव महाराजांच्या तीर्थरूपांचें नांव गोंदूजी. यांच्या वयाच्या तिसऱ्यावर्षी यांची मातोश्री निवर्तली व यांचे वयाच्या तेराव्या वर्षी यांचे वडील निवर्तले. हल्लीं माधान येथें यांची आप्तेष्टमंडळीही पुष्कळ आहे. हे जातीने सूर्यवंशी भारद्वाजगोत्री राणा रजपूत असून व्यवहारांत आपणास शूद्र म्हणवितात. सुमारें नऊ महिन्यांचे असतानांच कांही दुर्निमित्ताने यांचे दोन्ही डोळे आंधळे झाले. बाराव्या वर्षी यांचे लग्न होऊन, यांचे २४ व्या वर्षी (शके १८२८ श्रावण वद्य चतुर्थी, ई.स.८ आगस्त १९०६ त) यांची पत्नी सौ. मनकर्णिकाबाई ही परलोकवासी झाली. इला शके १८२७ कार्तिकशुद्ध पंचमी (ई.स.१ नवंबर १९०५) रोज बुधवारी एक मुलगा झाला.



त्याचें नांव अनंता असें आहे. श्रीगुलाबरावमहाराज हे पुण्यपत्तनी भाद्रपद शुद्ध १२ शके १८३७ त (ई.स.२० सप्तेंबर १९१५ त) सोमवारी समाधिस्थ झाले.

महाराजांची अलौकिक बुद्धिमत्ता व भक्तिज्ञान-वैराग्यादि संपत्ति लहानपणापासूनच प्रगट दिसूं लागली. चौदा ते वीस वर्षाच्या आंतच यांनी सत्यशोधकादि वेदबाह्यमतांचा मोड करून ब्राह्मणांचा पक्ष घेतला.

सामवेदादि ज्ञानाने व गानाने ब्रह्मवृंदांस संतुष्ट केलें.

अमोघ निरूपण म्हणून प्रणवात्मक विषय लिहिला. सांख्य, योग, वेदान्त, वैद्यक, व्याकरणादि विषय लोकांस शिकविलें.

कोयाळ, भिंगरी, फुगड्या, पिंगा इत्यादि बाललीलांनी व भजन, गोपाळकाला इत्यादि मधुरलीलांनी परिचित जनांस प्रेमलुब्ध केलें. हस्तस्पर्शाने व्याधिपीडित-जनांचे रोग दूर केले.

गायत्रीचा अर्थ लेखन केला. नारदभक्तिसूत्रावर ओवीबद्ध भाष्य लिहिले; हिप्नाटिझम्, विल-पावर यांचे प्रयोग करून दाखविले.

आंगांस देव आणून ढोंग ढांग करून भोळ्या लोकांस फसविणाऱ्या स्त्रिया व पुरुष यांची बिंगें बाहेर काढली.

डार्विन, स्पेन्सरादि पारकीय मतवाद्यांचे सप्रमाण व सयुक्तिक खंडण करून मार्मिक जनांत कौतुक उत्पन्न केले. व अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, भारतभागवतादि ग्रंथांतील विषय आपल्या गद्यपद्यमय रसाळ वाणीने मराठी व संस्कृतभाषेंत निरूपण करून भगवद्‌गुणसंकीर्तनाने जनांस भक्तीचा मार्ग दाखविला. संतचरित्रमालेंत रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचे संबंधाने लिहितातः-

''सत्पुरुषमालिकेंत त्यांच्या सारखा दांडगा ज्ञानीभक्त व सप्रेमवक्ता माझ्या पाहण्यांत दुसरा आला नाही. त्यांचें वादपटुत्वही असामान्य होते. श्रीगुलाबराव यांना कोणीही सरळपणाने प्रश्न केला म्हणजे ते सरळ सुंदर भाषण करीत. पण कोणी छलबुद्धीने, कपटबुद्धीने त्यांजकडें गेला म्हणजे त्याची वृत्ति ते चाचपून पहात.

त्यांची कृष्णोपासना होती व श्रीज्ञानेश्वर महाराजांना ते 'तात' समजून स्वतःच्या ठिकाणी गोपीची भावना ठेवीत असल्यामुळे ते आपणास 'ज्ञानेश्वरकन्या' (पंचलतिका) भावीत. त्यांच्या ठिकाणी अगाध ज्ञानाबरोबर भक्तीचा जिव्हाळाही विलक्षण होता.

**'वर्णाश्रमधर्म व जातीधर्म उत्तम रीतीने पाळले जाण्यांतच हिंदुधर्माचे संरक्षण होणार आहे'** असा त्यांचा निश्चय होता. महाराज सनातन हिंदुधर्माचें पुरस्कर्ते होते; जे नवीन पंथ जातीभेदावर घसरणारे वगैरे आहेत त्यांजवर

त्यांचा तीव्र कटाक्ष होता. **'संकरो नरकायैव'** म्हणजे वर्णसंकर झाल्यास व तो होऊं दिल्यास हिंदुराष्ट्राचा नाश होईल, म्हणून वर्णधर्म, जातिधर्म संभाळून प्रत्येक पुढारी विद्वानाने आपलें आचरण ठेविलें पाहिजे असें ते म्हणत.'

'महाराजांची दांडगी विद्वत्ता त्यांच्या ग्रंथांवरूनही प्रतीत होते.+

+

+

शब्दप्रामाण्य, युक्तिवाद, कोटिक्रम या सर्वांत त्यांचा हातखंडा असे. न्याय-योग-वेदान्तादि शास्त्रांची प्रमेयें त्यांनी स्पष्ट, सुलभ व निःसंदेहपणाच्या अधिकारयुक्त वाणीने सांगितली आहेत. श्रीगुलाबराव महाराजांकडे पाहिलें म्हणजे हा पुरुष हाच मूर्तिमंत चमत्कार आहे असें वाटे. स्पष्ट, निर्भीड व निर्लोभ अशी त्यांची शिकवण असे. कर्म, ज्ञान व उपासना ह्या तिहींचाही त्यांच्या भाषणांत व आचरणांत इतका उत्कृष्ट मिलाफ असे कीं, त्यांना **'विदुरांचा अवतार'** म्हणावेसें वाटे. त्यांची वाणी अत्यंत खणखणीत असून पराकाष्ठेची मधुर होती. त्यांचे बैठे कीर्तन व पुराण चाललें की, श्रोत्यांच्या वृत्ति अगदी तन्मय होत. पुराणांत तात्कालिक स्फूर्तीनें शेकडों ओव्या व अभंग हे रचत रचत म्हणत.''

महाराजांचे सविस्तर व उत्कृष्ट चरित्र त्यांचे शिष्य कैलासवासी राजेश्वरराव त्रिपुरवार यांनी लिहिले आहे. त्या चरित्राच्या प्रस्तावनेत रा. रा. पांगारकर म्हणतातः-

'महाराज बोलूं लागले कीं भक्तिप्रेमामृताचा नुस्ता पाऊस पडे.

ते चर्चा करूं लागले की त्यांची निर्दोष वादसरणी, विलक्षण ज्ञान व युक्तिवाद पाहून मन कुंठीत होई;

ते प्रेमाने गाऊं लागले की मुलाच्या माधुर्यालाही लाजविणारी त्यांची अत्यंत मधुरवाणी ऐकून चित्त नागासारखे डोलूं लागे.

पूजादिकर्मे ते इतक्या सशास्त्ररीतीने व सद्भावाने तासचे तास करीत कीं त्यांची कर्मनिष्ठा पाहून कर्मठालाही धन्यता वाटे.

कर्म, ज्ञान, उपासना या तीनही बाबतींत त्यांचें अन्तःकरण व आचरण इतके बिनतोड असून अव्याज मनोहर होते की, ही साधुमूर्ति लोकांना मार्ग दाखविण्यासाठींच अवतरली आहे असें भाविकांच्याच काय पण सुबुद्ध तार्किकांच्याहि मनाला वाटे.

ते आस्तिकाशी व नास्तिकाशी निर्विकारपणे वाद करायला ते हवे तेव्हां सिद्ध असत.

पण कोणी छलबुद्धीने परीक्षा पहाण्याच्या हेतूने कांही कपट मनांत धरून



आला की ते तात्काळ ओळखीत व मग आपल्या हृदयांतील सारी कोमलता आच्छन्न करीत व त्यांशी अशा रीतीने बोलत की, त्यांच्या स्वतःविषयी, त्याचा अनादर व्हावा !

पुण्यांतील कित्येक विद्वानांना त्यांनी अशाच रीतीने धुडकावून लाविलें व हें ते मजपाशी स्पष्ट बोललेही होते. ००००

०

अव्यंग कर्म, विशुद्ध ज्ञान, अलोट भक्ति या तिहींचे एकीकरण सत्पुरुषांवाचून अन्यत्र कोठेंही दिसत नाही. ते महाराजांत होतेंच पण याशिवाय अर्वाचीन चिकित्सक दृष्टीलाही ज्याचा उलगडा होत नाही अशा कित्येक गूढ (मिस्टिक) गोष्टी त्यांज जवळ होत्या असें कोणाही पूर्वग्रहविमुक्तपुरुषास कबूल करावें लागे.''

### *अलौकिक कवित्वशक्तीचा अनुभव*

ई. स. १९०६ साली रा. रा. पांगारकर यांस महाराजांच्या अलौकिक कवित्वशक्तीचा जो अनुभव आला तो पुढें त्यांनी आपल्या मुमुक्षुपत्राच्या शके १८३० भाद्रपद वद्य १४ गुरुवार, ता. २४ सप्तेंबर १९०८ च्या अंकात छापून प्रसिद्ध केला तो येणेप्रमाणे -

''यांच्या (श्रीगुलाबराव महाराजांच्या) कवित्वाची एक स्वानुभवांतली गोष्ट सांगतों :- आम्ही उमरावतीस असतांना एकदां तेथून आठ कोसांवर पूर्णानदीच्या तीरी शुक्लेश्वर वाठोडा येथें यांचें कात्यानीव्रत चाललें होतें, तत्प्रीत्यर्थ तेथें मुद्दाम गेलों. उमरावतीहून ८/१० इसम बरोबर होते. त्या प्रसंगीं आमचे पुण्याचे मित्र **श्रीज्ञानेश्वरीभक्त व अत्यंत पुण्यशील आणि खरे मुमुक्षु रा. केशवराव देशमुख** बी. ए. हेही होते. आमचे तीन दिवस श्रीकृष्णाच्या नंदगोकुळांत जाण्याइतके परमानंदांत गेले.

दुसरे दिवशीं दुपारीं तीन वाजतां सुमारे ४०/५० इसम एका उपवनांत आम्ही शिवालयासंन्निध एका हेमाडपंती देवळांत पुष्पवाटिकेंत बसलों होतों. गुलाबमहाराज अर्थातच बरोबर होते. त्यांची वृत्ति प्रसन्न झाली, व ''मी आता पुराण सांगतो, तुम्ही सर्वजण ऐका'' असे ते म्हणाले. पुराणाचा विषय आम्ही सुचवावा असा त्यांचा फार आग्रह पडल्यावरून -

**'हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपण जाहला ॥'**

ही ज्ञानेश्वरीतील बाराव्या अध्यायातली ओवी आम्ही सुचविली.ओवी ऐकताच गुलाबरावांनी मान दहावीस वेळी फिरविली, (ही त्यांना संवयच आहे) व ओव्या म्हणण्यास आरंभ केला.

पुराणाचे मंगलाचरण त्यांनी १५० ओव्यात केले.१०० ओव्यात वरील ओवीचा मागचा संदर्भ जुळवून दिला व एका प्रहराच्या अवधीत म्हणजे तीन साडेतीन तासात वरील ओवीच्या अर्थाचे विवरण तात्काळ रचत म्हटलेल्या किंवा म्हणत रचलेल्या एकहजार ओव्यांत त्यांनी केलें ! आमच्या प्राचीन संतकवींचें आम्हांस स्मरण झाले.ओव्या तरी सामान्यांतल्या होत्या असे नाही. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथभागवत, विवेकसिंधु ह्या जगन्मान्य ग्रंथांच्या टीकाराला सर्वथा शोभण्यासारख्या भारदस्त, शुद्ध, अत्यंत प्रेमळ अशा त्या ओव्या होत्या.

नामदेव तुकारामांचे अभंग कोटींनी मोजण्यासारखें असणे अशक्य नाहीं असें आम्हास तेव्हां वाटलें.भागवतावर व रामायणावर नाथ हजारो ओव्या कसे बोलत गेले असतील याची कल्पना आम्हांस तेव्हा आली.

महाराजांनी दुसऱ्या दिवशीही

**''म्हणोनि जे जे उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।**
**ते हेतुरहित । आचरे तूं''**

ह्या तिसऱ्या अध्यायांतल्या ओवीवरही अशाच ७००/८०० ओव्या तात्काळ रचीत म्हटल्या.ओवी प्रौढ व प्रासादिक होती.सर्व अर्वाचीन कवि त्यांच्या पायावर घालावे असे मला तत्काळ वाटले !

ज्ञानेश्वर महाराज हे तात, श्रीकृष्ण (वासुदेव नामक) हे पति व स्वतः आपण गोपी (पंचलतिका) अशी त्यांची उपासना पाहून कित्येक नवीनांस आश्चर्य वाटे; तथापि त्यांचा अत्युत्कट भक्तिप्रेमाचा जिव्हाळा पाहून मी त्यातच दंग झालो.

भोजनप्रसंगाचा आनंदही अनुपम होता.मी श्लोक म्हणावा व त्याचे त्यांनी तत्काळ व त्याच वृत्तांत रचलेल्या श्लोकाने उत्तर द्यावें असे सारखे चालले होते. ती

००० अद्भुत तो ०००

नांव घेण्याचा अपूर्व समारंभ, या सर्वांनी माझे मन मोहून गेले. गुलाबराव महाराजांच्या संगतीत **'अद्भुतं रोमहर्षणं'** असा भक्तिप्रेमानंद चांगला भोगायला सापडला. ते नुस्ता **'ज्ञानेश्वर माउली'** अशा साध्या मंत्राचा पूजापुराणोत्तर जो


मंजुळ घोष करीत तो अजून माझ्या कानात घुमत आहे. इतके मधुर नामस्मरण अन्यत्र कोठे ऐकावयाला मिळालेच नाही.''

ई.स.१९११/१२ साली तळेगांवाहून परत येतांना वाटेंत २।४ लावण्याही त्यांनी मजेने म्हणून दाखविल्या.

एके दिवशी स्नानाला पाणी उपसले होते. दोन चार स्वयंसेवक पाणी उपसण्यात गुंतले होते, दर्शनास आलेल्या शेपन्नास लोकांचा भोवती गराडा पडला होता अशावेळी मी महाराजांस सहज प्रश्न केला की,

''आपल्या अध्यात्म्याच्या तोडीचे पाश्चात्यतत्त्वज्ञानांत काय आहे?''

यावर त्यांनी, **''प्लेटो, साक्रेतीस, डेकार्ट, कान्ट, हेगेल, स्पेन्सर, मिल्ल** इत्यादि अनेक तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांचे विहंगमदृष्ट्या विवेचन करून म्हटले कीं, यात कोणी कोणी लांबून चाचपडणारे सांपडतात, पण सूर्यप्रकाशासारखे आत्मज्ञान स्वच्छ असलेले महात्मे भरतखंडांतच उपजले आहेत. **प्लोटिनस** कांहीसा जवळ गेलेला दिसतो.''

कोणी लघुलिपी लेखक जवळ असता तर कोण बहार झाली असती ! पाश्चात्य तत्त्वज्ञानावर इतके उत्कृष्ट व्याख्यान देणारा प्रोफेसर कोणात्याही कॉलेजांत मिळावयाचा नाही, असे उद्गार श्रोत्यांच्या तोडून निघाल्यास नवल काय? सत्पुरुषांची ज्ञानेन्द्रिये अत्यंत सूक्ष्म असतात व म्हणून सामान्य जीवानां अगम्य अशा गोष्टी त्यांच्या सूक्ष्म दृष्टीला सहज गम्य होतात.अनेक चमत्कारांचे बीज या एका गोष्टींत आहे.

## सर्व धर्मांची तत्त्वे

पृथ्वीतील सर्व धर्मांची तत्त्वें यांना अवगत होती. यच्चयावत् लौकिक व अलौकिक शास्त्रांचे हृदय यांच्या करतलगत होते.जगातील कोणत्याही भाषेतील धर्मशास्त्रविषयक विचार यांना पूर्ण ज्ञात असून, श्रुति, युक्ति, अनुभवाने ते दुसऱ्यास समजावून देण्यात कुशल व अधिकारानुसार नित्य नूतन साधनप्रक्रिया सांगण्यांत ते प्रवीण होते.

सांख्ययोगवेदान्तादि शास्त्रांची मूळ परंपरा सोडून ज्या टीकाकारांनी त्यावर टीका लिहिल्या त्यांचे त्यांनी खंडण केले.

यांची कविताशक्ति तात्काल स्फूर्तिजन्य अशी होती.प्रत्यहीं नूतन प्रेमळ पद्यांनी भगवंताला आळविणे, गद्यपद्यमय ग्रंथरचना करून बद्धांस सन्मार्गगामी करणे व मुमुक्षूंचा उद्धार करणे, गुणी जनांची मैत्री संपादन करणे, प्राचीन व अर्वाचीन विद्याग्रंथांचे परिशीलन व व्यवहाराचे निरीक्षण करणे, **चांगल्या उक्तीचा संग्रह करणे** इत्यादि विद्याव्यासंगांत यांचा काळ जात असल्यामुळे यांचे वास्तव्य

असे तेथून वाद, भेद, निंदा हे कळिकाळाचे फंद देशोधडी होऊन कृतकालीन न्याय, धर्म, हरिनाम तेथे नांदूं लागत.

श्रीगुलाबराव महाराजांचे **आचरण** अत्यंत शुद्ध व वेदमार्गाला धरून होते. **विनय** तर यांची मोठी संपत्तीच होती.

**उपासना**दृष्टीने हे हरिहरोपासक असून मधुराद्वैताचे पुरस्कर्ते व **मधुराद्वैतदर्शनाचे आचार्य** होते.

ज्ञानोत्तरकाली दृष्टदुःखनिवृत्त्यर्थ व परमानंदप्राप्तिकरिता भगवद्भक्ति पाहिजे हें यांचे ध्येय होय. व -

एवढ्याचकरितां * स्वतःला ते ज्ञानेश्वरकन्या व श्रीकृष्णपत्नी म्हणवीत असून मंगळसूत्र, वेणी कुंकुमादि सौभाग्यचिन्हें ते धारण करीत.

* नित्य (शिवाची) पार्थिवपूजा,
* श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुकांची व श्रीकृष्णमूर्तीची पूजा,
* एकवेळ भोजन,
* गुरुवारी श्रीज्ञानेश्वर महाराजांची पालखी,
* द्वादशीला काला, * वर्षातून एक दोन वेळ आळंदीची वारी,
* प्रतिवर्षी मार्गेश्वरांत -

**श्रीकृष्णो रमणो भवेदिति धिया कात्यायनीस्वर्चनम् ।**
**आरब्धं बलहीनयाऽपि हि मयाऽलंदीश्वरांगोत्थया ।**
**अत्रागत्य महाजना भगवतः पादप्रसादोत्सवाः ।**
**गोविंदोऽस्तु पतिस्तवेति वचनैः स्तुवन्तु नो मंगलम् ॥**

याप्रमाणे अनुयायी, प्रेमी व मित्रमंडळीस निमंत्रणपत्रिका पाठवून कात्यानीव्रतोत्सव, *माघवद्यांत महाशिवरात्र्युत्सव, *श्रावणवद्यांत श्रीकृष्णजन्मोत्सव, *चैत्रांत रामनवमी हें नित्य नैमित्तिक०

०० होय.

यांची बहुतेक चर्या रात्रीं चालत असे. यांच्या वयाची पहिली वीसबावीस वर्षे माधानांत व आसपासच्या खेड्यापाड्यांतच गेली. पुढें विशेषे करून उमरावतीस व इतरत्र गुणग्राही प्रेमाची मंडळी मिळाल्यावर यांचा सत्कीर्ति-परिमल हां हां म्हणतां लांबवर पसरला.

आर्वीचे श्रीयुत **दामोदर आप्पाजी महाराज** व अकोल्याचे श्रीयुत **घोंगेशास्त्री**



यांच्या सारख्या प्रेमळांनी मोठ्या आवडीने यांच्या जवळ आपलें हितगुज सांगितले आहे.

काशी येथील प्रसिद्ध **श्रीकृष्णानंद** या सारख्यांनी यांना ''श्रीकृष्ण व नारद यांच्या बरोबरीचे'' म्हटले आहे.

प्रयाग येथील **पंडित आदित्यराम भट्टाचार्यां** सारख्यांना हे केवल बालबृहस्पति व

आधुनिक आंग्लविद्याविभूषित विद्वानांस हे एक इंटलक्चुएल फिनॉमिना *Intellectual Phenomena* म्हणजे मूर्तिमंत बौद्धिक देखावा वाटत असे.

एवढी अलौकिक बुद्धिमत्ता यांना आपोआप कशी प्राप्त झाली या कोड्याचें उत्तर ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाच्या ४५३- ४५४ ओव्यांत आहे. त्या अशा :-

**तैसी दशेचि वाट न पाहतां । वयेसेचिया गांवा न येतां ।**
**बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥४५३॥**
**तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।**
**मग सकळशास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥४५४॥**

शब्दावरून माणसांचा व ग्रंथांचा स्वभाव ओळखणे हा त्यांचा मोठा दृष्ट चमत्कार असे.

ते स्वतः चमत्कारांचा व करामतीचा निषेध करीत असून त्यांची सगळी खटपट आश्रित जनांची बुद्धि वाढविण्याकडे असे.

यांची वर्तणूक सर्वांशी मित्रत्वाच्या नात्यानें असून साह्यकर्त्यास ते गुरु म्हणून मान देत असत.

बाळपणचे खेळ, स्वच्छंद विहार, एकांताची आवड इत्यादि गोष्टी यांच्या ठिकाणी अखेर पावेतों तशाच कायम होत्या.

### *स्वेच्छा विहार*

श्रीगुलाबरावमहाराजांचे राहाण्याचें मुख्य स्थान अमुकच ठिकाणी असें नव्हतें. ते बालपणापासूनच अत्यंत स्वेच्छाचारी होतेः-

**'जातो ते स्थळ सांगेना । सांगितलें तेथें जाईना ।**
**आपुली स्थिती अनुमाना । येवोंचि नेदी'॥**

या दासबोधांतील समर्थोद्गाराप्रमाणें त्यांचें वागणें असे. घटकेत कोठें जातील याचा नेम सांगतां येत नसे. वाटले तर पुनः पूर्वस्थळी येत, किंवा दुसऱ्या मुक्कामी आपला पुस्तकसंग्रह बोलावून घेत. तोंपर्यत त्यांचा पुस्तकसंग्रह चार आठ दिवस

पूर्वमुक्कामींच असे. शिवाय ते जेथून जात तेथून लेखी व छापील ग्रंथ मिळतील तेवढे मिळविण्याची त्यांची खटपट असे. श्रीगुलाबरावमहाराजांचा ग्रंथसंग्रह आजमित्तीस सुमारें १०-१२ हजार रुपये किंमतीचा आहे.

यांनी दयार्द्र होऊन, स्वयंस्फूर्तीचा वेग कमी करून केवळ लोककल्याणार्थ ज्या ग्रंथांचे लेखन करविले ते ग्रंथ **'सूक्तिरत्नावली'** या नांवाने आजपर्यंत तेरा भागात छापून तयार झाले आहेत. तीन चार भाग आणखी निघतील असा अदमास आहे. ग्रंथलेखनवाचनाच्या कामांत यांना मुख्यत्वें साह्य करणारे चांदा येथील **श्रीयुत नारायणराव पंडित** व उमरावतीचे **श्रीयुत हरिभाऊ केवले** हे होत. श्रीयुत नारायणराव पंडित (श्री बाबाजी महाराज) हल्ली महाराजांचे गादीवर महाराजांनीच नियुक्त केलेले आहेत. या छापून झालेल्या सर्व ग्रंथांची संक्षिप्त माहिती या पुस्तकाच्या शेवटीं दिली आहे.

### *ग्रंथरचना*

अनेक शंका कुशंकांचे निरसन करून होईल तितक्या रीतीने धार्मिक व शास्त्रीय विषय पटवून देण्याची प्रतिज्ञा यांनी या ग्रंथांत बरीच पूर्ण केली आहे. यांना आपल्या स्वयंस्फूर्तीच्या प्रासादिक, ओजस्वी व वेगवती वाणीनें जे कोट्यावधी अभंग, ओव्या, पदे, लावण्या, श्लोक, वगैरे म्हटले ते आम्ही शंभर दोनशे जन्म घेऊनही लिहूं शकलों असतों की काय, याची आम्हाला वानवाच वाटते. रा. रा. पांगारकरांच्या म्हणण्याप्रमाणे येथें त्यांच्या लघुलिपीलेखकाची देखील तारंबळ उडून तो नुस्ता बसला असता. ज्या ठिकाणी श्रोत्यांच्या बुद्धीचा वेगही त्यांचे वेगवती वाणींतून निघालेल्या शब्दांचा पूर्ण अर्थ झेलण्यास असमर्थ असे त्या ठिकाणी बिचारा लघुलिपीलेखक किती टिकाव धरणार! नुस्ते शब्द झाले तरी काय, त्याला कांही मर्यादा आहेच. महाराजांचे काम पडलें अमर्याद! आम्हीही त्यांच्या संगतीतले असल्यामुळें रा. रा. पांगारकरां प्रमाणे, दोन चार वेळ ह्याबद्दल, महाराजांजवळ आपली दिलगिरी प्रदर्शित केली शेवटीं ते मला म्हणाले -

**''मुळे मास्तर, माझें काव्य लिहिण्याचें काम पुष्कळ निराळ्या शक्तीचे 'लघुलिपी लेखक' करीत आहेत हें तुम्हांला समजूं नये काय?''**

**''माझें कोणतेंही काव्य फुकट जात नाही.''**

हे शब्द ऐकून आम्ही या विषयांतला वाग्व्यवहार बंद करून, गुलाबवाटिकेंत चैनी गड्यांप्रमाणें कांही न करिता यथेच्छ विहार करूं लागलों व मजा घेऊं लागलो. तेव्हापासून डोळे मिटून- हळहळ न करितां आम्ही मधून मधून 'वाहवा! महाराज वाहवा!' म्हणून नागाप्रमाणें डोलण्याचीच क्रिया चालूं ठेविली.



### ग्रंथवाचन

ग्रंथ वाचण्याची महाराजांची पद्धती फार विलक्षण होती. ग्रंथ कितीही नवीन असो, त्याच्या अनुक्रमणिकेवरून किंवा प्रस्तावनेवरून आंतील विषयाचें स्वरूप त्यांच्या चटकन ध्यानांत येत असे. पूर्वाचार्यांचे ग्रंथ, प्राचीन शास्त्रीय व पुराणादि ग्रंथ हे देखील त्यांना साग्र कोणी वाचून दाखविले नव्हते. तथापि **''अमुक ग्रंथांतील अमुक प्रकरण किंवा भाग वाच''** असेंच ते बहुत करून सांगत. पहिल्या २०।२२ वर्षांत ते खेडवळ भागाच्या फारसे बाहेर गेलेले नव्हते व नंतर उमरावतीस आले तेव्हां पहिली एक दोन वर्षे ग्रंथवाचन, चितच चालत होते. ज्ञानेश्वरीवर ओवीबद्ध निरूपणें व नवीन अभंग, पदें, गाणीं व मधून मधून ग्रंथलेखन हीच फार होत. शिवाय शेवटी भेदधिक्कार, श्रीहर्षाचे खंडनखंडखाद्य यांसारखे कठीण ग्रंथ वाचून दाखवितांना वाचकांची नुसत्या शब्दापलीकडे कितपत दृष्टि जात असेल हें त्यांनाच माहीत !

परंतु इतक्याही भानगडींतून सनातन वेदश्रुतिसिद्धान्ताशी न मिळणाऱ्या मतांची योग्य व मार्मिक समीक्षा करून सनातन धर्माचे श्रुतिसिद्ध सिद्धान्त महाराज नवीन तऱ्हेनें व श्रुति- युक्ति- अनुभवानें कसें प्रतिपादन करतात व नूतन प्रक्रियायुक्त रहस्यमय ग्रंथांत ते किती चटकदार रीतीनें लेखन करतात याची यथार्थ कल्पना त्यांच्या सहवसावांचून होणे शक्य नाही. त्यांच्याहून अनेक पटीनें अधिक काळ घालवून ग्रंथवाचनाचा उद्योग सामान्य मनुष्यानें केल्यास त्याला असें सामर्थ्य येईल किंवा नाही हा संशयच आहे.

ह्या सगळ्या गोष्टी ध्यानांत घेऊन विचार केला असतां, ''यांना सगळी विद्या पुस्तकें वाचून आलेली आहे'' अशा प्रकारची तार्किक पद्धतीची कोटी कोणी केल्यास ती क्षणभरही टिकणे शक्य नाहीं हें निर्विवाद आहे.

### स्वज्ञातिबांधव

श्रीमहाराजांचें त्यांच्या स्वज्ञातिबांधवांवर प्रेम होते व त्यांना संस्कृत वगैरे शिकवून त्यांची उन्नती करण्याची महाराजांनी वाटेल तेवढी खटपट केली. परंतु ''हे गुलाबराव, ब्राह्मणांस अनुकूल आहेत'' अशा समजुतीनें की काय कोण जाणें, त्यांना कोणी साह्य झालें नाही.

महाराजांचे ग्रंथ सांख्य, योग, वेदान्त व विशेषेंकरून भक्तिरसानें परिप्लुत आहेत. तथापि त्यांचे श्रीमद्भगवद्गीता, वर्णाश्रमधर्म, खरे गुरु, साधकांची वागणूक, यज्ञोपवीत घालून आपणही वेदपठण कां करूं नये म्हणून उपस्थित झालेले ब्राह्मण-ब्राम्हणेतर व जातीजातींचे तंटे, आचार्यांच्या ग्रापीठावर आरूढ झालेल्या धर्मगुरूंची कलिकाळानें मूढ झालेली बुद्धि, व आपलें (महाराजांचे) मुख्य कर्तव्य

काय, या व इतर बाबतीत त्यांचे विचार काय आहेत हे त्यांनी विशेषेकरून पत्रांच्या यष्ट्या, अलौकिक व्याख्यानमाला, सुधबोध व अभंगाची गाथा यांत ग्रथित केले आहेत; ते जिज्ञासूंनी अवश्य वाचावे. याची दिशा व कल्पना जिज्ञासूंनां खाली दिलेल्या कांही उताऱ्यावरून करतां येईल.

***निष्काम कर्म कोणते ?***

१. **सर्वांचे धर्मपुस्तक होण्याला जननी भगवद्गीताच योग्य आहे.**

तथापि पाश्चात्य विद्याविभूषित टीकाकार(लोकमान्य टिळक) कर्मपर अर्थ लावून या साध्वीचा वाक्छल करीत आहेत!

शास्त्रीय कर्मच निष्काम करावे, असा वास्तविक गीतेचा अभिप्राय आहे.

* कोणतेंही कर्म निष्काम करावे असे मानले तर मुलांचे अद्वातद्वा खेळणें, वेड्यांचे दगड मारणे, ही सुद्धां सर्व निष्काम कर्तव्यांतच येतील.

* एक उठतो तो सरकारी नोकरी आपलें निष्काम कर्तव्य आहे म्हणून गीतेचे उदारण देतो, तर -

* दुसरा फाजील जहालपणा करणेंही आपलें कर्तव्य मानतो.

* पण **'ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि'** ह्या गीतेच्या वचनाकडे सारेच दुर्लक्ष्य करतात.

**'कर्म फळांची कामना मनीं । आणि दृढ देहाभिमानी ।**
**या अविद्येचा आश्रय करूनी । राहे जीव ॥**

याप्रमाणे जीवाला काम स्वाभाविकच आहे, त्यामुळें तो कांही तरी कर्म करणार हेंही ठरलेले आहे; म्हणून स्वतःच्या उद्धाराचेंच कर्म करणे त्याला श्रेयस्कर आहे. त्यांतही काम मिसळूं दिला तर लोकांच्या प्रवृत्तिसारखेंच शास्त्रालाही बनविणें होईल!

वेदान्त व राजकीय तत्त्व एकच आहे असे लोक म्हणतात, पण वेदान्त००
०
००००
मातब्बरी काय?

तथापि सूर्यप्रकाश सर्वत्रच असल्यामुळे सर्वानाच मिळतो, त्याप्रमाणे वेदान्ताचा आधारही सर्वच घेतात. (साधुबोध)

**२.**

भक्ति म्हणजे भगवंताचे ठिकाणी एकसारखी प्रेमाने वृत्ति लागून राहणें. **'द्रवीभूत चित्ताची तैलवत् अविच्छिन्न धारा परमेश्वराच्या चरणाकडेच गंगेसारखी वाहत जाणें म्हणजे भक्ति'** असें भक्तिरसायनांत सांगितले आहे. ती ज्ञानसंयुक्त



झाली म्हणजे समाधी नसतांनाही अन्वयामुळें व्यक्तानंदाचा प्रत्यय येतो. (पत्र-यष्टि ७ वी)

**३.**

**सद्गुरुउपदेश व्यवस्थिती । यत्ननिश्चय आपल्याहाती ।**
**ईश्वर दूर करी विघ्नपंक्ति । तैं जीवन्मुक्ति सांपडे ॥१॥**
**श्रवणी श्रुत्यविरोध- व्यवस्था । मननीं साधकयुक्तिव्यवस्था ।**
**निदिध्यासनी वृत्तिव्यवस्था । अथवा रहस्यव्यवस्था एकांती की ॥२॥**
**प्रेमभक्ति संप्रदाय व्यवस्था । एवमादिक तत्वतां ।**
**या सर्वावरी सत्ता । श्रीगुरूची ॥३॥**
**आपुले अवधान नसतां । जे कां उमटे सार्थ कविता ।**
**ती सद्गुरूची सत्ता । ऐसें मी म्हणे ॥४॥**

भागवत रहस्य व योगप्रभाव

**४.**

**वैदिक ज्ञान आणि ध्यान । सांख्ययोगशब्दें करून ।**
**बोलिले यास्तव निरोधसहकृन्महावचन । सप्रेम ब्रह्मज्ञान उपजवी ॥१॥**
**येर ब्रह्माचें स्वानंदपण । जंव नाशेना संपूर्ण ।**
**तंव प्रेम राहिल्या जाण । विरोध काय ॥२॥**
**येथ कोणी असो अवस्था । आज काय त्याची चिंता ।**
**देही जाणोनि व्यापक परमार्था । अनध्यस्तविवर्त गुरुनाथा भजावें ॥३॥**

(ध्यानयोगदिवाकर)

**५.**

**शुद्धसत्त्वांत आवरकत्व नाहीं । आणि स्थिरत्वे विक्षेपही नसे कांही ।**
**म्हणोनि आनंदाधिष्ठान लवलाही । जैसेंचि तैसें शुद्ध भासे ॥१॥**
**परी सत्ववृत्तिस्तव पृथगिवपण । जे आनंदाधिष्ठानी चिन्ह ।**
**तेंचि अनध्यस्तविवर्त सगुण । ब्रह्म श्रीकृष्ण अस्मन्मतीं ॥२॥**

००
००
० **सुंदर भरले । श्रीज्ञानेश्वर-पदकमल ॥३॥** प्रेमनिकुंज.

**६.**

***दीनता आणि वैराग्य***

**तरी परमेश्वरठेवा । जो वारी बंधगोवा ।**

**तेथ सर्व भावा । समार्पिजे ॥१॥**
**जेवी ज्ञाना आधी विरक्ती । तेवीं भक्ति आधी दीनतास्थिती ।**
**निस्साधन व्हावया निश्चिती । दीनता साह्य ॥२॥**
**सानन्यदीनता जाण । तैंचि फावें परमात्मा आपण ।**
**००**
**०**
**००॥३॥**
**येऱ्हवीं त्यागोऽनन्यता । हे नारदसूत्रोक्ति तत्वतां ।**
**स्वचित्तदोषदर्शन दीनता । येथ विरक्तता सहजचि ॥४॥**
**विरागें विषय तिरस्कारे सुटती । तेणें बळकावे कठोर वृत्ती ।**
**आणि दीनतायां विषय स्वभावे सुटती । नम्रवृत्ति बळावे ॥५॥ भोग्यदोषदर्शन ती विरक्ती ।**
**भोक्तृदोषदर्शन दैन्यस्थिती ।**
**येणें निःसाधन प्रतीती । साविया घडे ॥६॥**
**सर्वदां चित्तीं वाहे अनुताप । हृदयी अनन्य भगवत्संकल्प ।**
**पति पुत्र माय बाप । भगवंत देखे ॥७॥**
**सानन्य दीन पुरुषांप्रति । जवळी असतां विषयसंपत्ति ।**
**इंद्रिये कर्षो न शकती । ऐशी प्रतीती महंताची ॥८॥** (प्रथम यष्टि)

**७.**
***प्रत्यक्ष आणि अपराक्ष यातील फरक***

**म्हणोनि प्रत्यक्ष आणि अपरोक्ष । येथ किंचित् भेदपक्ष ।**
**इंद्रियनिष्ठ तें प्रत्यक्ष ।**
**अपरोक्ष तें साक्षिनिष्ठ ॥१॥**
प्र.यष्टि.

**८.**
***संतग्रंथ : निर्मितीची प्रक्रिया***

**श्रवणीं योग्य विवेक उत्पन्न । मननीं तया अंगधरण ।**
**निदिध्यासनी होय तरुण । साक्षात्कारीं मोक्षत्वें परिणमे ॥१॥**
**मग तया साक्षात्कारांतूनी । साक्षात्कारीनिमित्तकवाणी ।**
**निघे ते अधिकार संपन्न, श्रवणी । स्वफलदानीं प्रवर्ते ॥२॥**
**तोचि तया ग्रंथ । वैराग्य निस्कंथ पंथ ।**
**मिळवोनि संभ्रांत संथ । कराया उपयोगी ॥३॥**



**ब्रह्मनिष्ठ साक्षात्कृत । तद्रचित जे ग्रंथ ।**
**ते नानाप्रक्रिया समन्वित । शिष्यबोधार्थ प्रकटती ॥४॥**
**जैसी ठिणगी पेटे तृणावर । विझोनि जाय पडतां नीर ।**
**तैसे श्रवणें ज्ञान उपजे साचार ।**
**परि मायाजळ लागतां मावळे ॥५॥**
**मेघांत विद्युलता-अग्नि जैसा । पाणी पडतांही न विझे अैसा ।**
**परी क्षणें उत्पन्न, क्षणें नाशा । प्राप्त होय ॥६॥**
**तैसें मननज्ञान । क्षणैक युक्तिबळें समाधान ।**
**क्षणैक संसारें मावळे जाण ।**
**००००००० ॥७॥**
**क्षणैक व्यवहार-चातुर्य उघडे । क्षणैक वाद गळां पडे ।**
**क्षण एक मोडे विषयवृत्ति ॥८॥**
**क्षणैक बिहे संसारभया । तनुज-तनु-कामिनी दया ।**
**क्षणैक मनीं फाविजे लया । क्षणैक यामिनीलया पावे ॥९॥**
**समद्रात वडवानळ । निजबळें भक्षी तुंबळ जळ ।**
**न विझे, परी सबळ । प्रकाशही देवों न शके ॥१०॥**
**तैसे निदिध्यानसज्ञान । ब्रह्माकारवृत्तिसंपन्न ।**
**कदापि संसारमोहें करून । न मावळे तें ॥११॥**
**म्हणजे ब्रह्माकारवृत्ति । तियेसी विरुद्धवृत्ति मोडो न शकती ।**
**परी साक्षीची सहजस्थिती । वृत्तित्वामुळे प्रगटेना ॥१२॥**
**जैसा सहज प्रकाशे रवी । आणि न मावळे कदा केंवी ।**
**तेविं ब्रह्मसाक्षात्कृतकवी । सहज झळके ॥१३॥**
**कदा न मावळे तद्ब्रह्मस्थिती । कदा न भोगी जन्ममृती ।**
**साक्षीची सहज स्थिती । जे तेचि की तो॥१४॥**
*** शब्दें ब्रह्मप्रत्यभिज्ञा श्रवण । * युक्त्या ब्रह्मानुमान मनन ।**
*** ब्रह्मप्रत्यभिज्ञा चिंतन निदिध्यासन । प्ृ ब्रह्मरूपभवन समाधी ॥१५॥**
**वा *ब्रह्मापरोक्षकरमहावाक्य श्रवण । *असंभवानाद्वयनिवर्तक मनन ।**
**विपरीतभावनानाशन निदिध्यासन । स्वानंदरूपभवन साक्षात्कृती ॥१६॥**
गीतासंगती, प्रथम यष्टी

**९.**
***दहा नामापराध***

**दशापराधान् संत्यज्य शिवं नारायणं स्मरेत् ।**

**गंगास्नानं च सत्संगं यथाशक्या समाचरेत् ॥**
**सन्निंदा ऽसतिनामवैभवकथा श्रीशेषयोर्भेदधीर्-। अश्रद्धाश्रुतिशास्त्रदेशिकगिरां नाम्न्यर्थवादभ्रमः।**
**नामास्तीति निषिद्धकर्म-विहितत्यागो हि धर्मान्तरैः।**
**साम्यं नाम्नि जपे शिवस्य च हरेर्नामापराधा दश ॥**
**(१) नामविश्वासें निंदणे संतां । (२) दुर्जनां नामवैभवकथा ।**
**(३) रामकान्ता आणि उमाकान्ता । भेदबुद्धी पाहणें ॥१॥**
**(४) श्रुती-स्मृती-सद्गुरुवचन । येथ न विश्वासे मन ।**
**आणि (५) नामें पातकें जळती संपूर्ण । ००००॥२॥**

**(८) हें निषिद्ध आचरणासी ।**
**प्रवृत्ति लागली विशेषी । जयाची होय ॥३॥**
**(९) जवळी नामस्मरण चांग । मानुनी करी विहित्याग ।**
**(१०) अन्यदेवता आणि श्रीरंग । यांची नामे समचि म्हणे ॥४॥**
**एवं हरिहरमंत्र जपतां । हे अपराधदशक सर्वथा ।**
**येवों न द्यावे माथां । प्राण गेलियाही ॥५॥** प्र.यष्टि.

**१०.**

**'त्याचा तूं आहेसी' हा मलिनगुण । तें ब्रह्म तूं आहेसी' हा सत्त्वगुण । 'हे हरि, तें सर्व तूंचि' हे स्तवन । शुद्ध लक्ष्यांश महावाक्याचा ॥१॥ 'तस्य त्वमसि' हें विपरीत ज्ञान । 'तदेव त्वमसि' हा ज्ञानभिमान । 'तत्त्वमसि' रूप सगुण हें ऐक्यभजन प्रेमरूप ॥२॥**

भक्तिपदतीर्थामृत प्र.यष्टि.

**११.**

**स्वयं प्रतीतिः स्वगुरुप्रतीतिः शास्त्रप्रतीतिर्मनसश्च रोधः।**
**दिने दिने यस्य भवेत्स योगो सर्वेषु कालेषु सुसंमतोऽभूत ॥**

**गुरुप्रतीति, शास्त्रप्रतीति व आत्मानुभव या तिहींच्या साह्यानेंच मनुष्यानें चालावें. (१) शास्त्रप्रत्यय म्हणजे शास्त्रांत सांगितलेला सामान्य मार्ग; (२) गुरुप्रत्यय म्हणजे आपल्या अधिकारानुसार शास्त्रांतून गुरुनें आंखून दिलेला मार्ग; (३) आत्मप्रत्यय म्हणजे प्रयत्नानुसार आलेला निरोधाचा अनुभव व त्याचा पुनः गुरुशास्त्रांशी पडलेला मेळ.**

सं.सुरतरु ११ वी यष्टि.



**१२.**

***लोकांना उपदेश***
***कोणी, केव्हा आणि कसा करावा?***

**होईल राखण निगममर्यादा । तरी जनबोधा प्रवर्तावे ॥१॥ नाहीं तरी उगें बैसानी घरांत । गोपीकांचा नाथ आळवावा ॥२॥ स्त्रिया न सोडिती पतीचीं पाउले । पाहिजे बोलिले ऐसें त्वां बा ॥३॥ पुत्र करतील मायबाप सेवा । उपदेश व्हावा ऐसा तुझा ॥४॥ गुरुभक्ति वाढे शिष्याचिया पोटी । ऐस हातवटी तुझी व्हावी ॥५॥ हरिहरभेद न करावा कोणी । ऐसी सांग वाणी शुद्धभावें ॥६॥ ज्ञानेश्वरप्रभु न होता कृपाळ । पाषाण केवळ गुरुपणा ॥७॥**

अभंग ११५७.

**१३.**

**वैद्य आणि गुरु । भीडखोर घातकरू ॥१॥**
**नको नको त्यांचा संग । आशाबद्ध महामांग ॥२॥**
**पथ्य न सांगतां कांहीं । रोग कदां जात नाही ॥३॥**
**तैसे राखी शिष्यमन । मुक्ति न होयचि त्यानं ॥४॥**
**म्हणे ज्ञानेश्वरबाळा । गुरु वैद्य जिते जाळा ॥५॥**

अभंग. १२६२.

**१४.**

***समानतेचा अर्थ***

**समदृष्टि नोहे + + सवें खाणें । यथेच्छ सेवणें वेश्येलागी ॥१॥ समदृष्टिसाठी देह व्हावा तृण । क्षणोक्षणीं जीव कासावीस ॥२॥ जोडा आणि तोंड एकाचि चर्माचें । संघट्टन त्यांचे करू नये ॥३॥**
**अन्न आणि विष्टा एकाची धान्याची । साम्यता दोहींची म्हणू नये ॥४॥**
**ज्ञानेश्वरस्वामी न होता कृपाळ । वट वट वेळ वृथा सारी ॥५॥**

अभंग १२६३.

**१५.**

***रामायण, महाभारत, भागवत व योवासिष्ठ***

**धर्मचाड तरी पहावे भारत । समन्वयीं चित्त ठेवोनिया ॥१॥**
**नीतिचाड तरी गावें रामायण । वाल्मिकीकीर्तन काव्य शुद्ध ॥२॥**
**भक्तिचाड तरी शुद्ध भागवत । सदा हृदयांत ठेवा वेगी ॥३॥**
**ज्ञानचाड तरी वसिष्ठ स्मरावा । अंतरीं धरावा गुह्य भाव ॥४॥**

गुरुचाड तरी स्मरा ज्ञानेश्वर । हेंचि धर्मसार बोलिले म्यां ॥५॥

अभंग १३१३

**१६.**

**चार अवतार**

**१. माय २. बाप ३. गुरु ४. श्रीकृष्ण**

निर्गुण सगुण दोन्हीही अकळ । एका ज्ञानबळ ध्यान एका ॥१॥
ज्ञानमय साक्षी आपुलें अंतरी । सगुण बाहेरी अभिव्यक्त ॥२॥
माय बाप गुरु वनितांचा पती । चार अभिव्यक्ति सगुणाच्या ॥३॥
चौघांच्या हृदयी साहजिक दया । नलगे उपाया करणें बहु ॥४॥
अल्पपुत्रश्रमें मायबापकृपा । उमटता सोपा तपोमार्गू ॥५॥
आणिक देवतां सांग धाल्यावीण । स्नेहाभावी शीण उगा देती ॥६॥
अल्पश्रमसेवा प्रियेची पाहोनी । नुचंबळे मनीं ऐसा कोण ॥७॥
सर्व ब्रह्म मग शिष्य कां श्रमावा । सद्‌गुरुस्वभावा कृपा येणें ॥८॥
होईल तो धर्म साधे येणें माने । उल्हासे सन्मानें पूजिलीया ॥९॥
ज्ञानेश्वरस्वामी नाही पक्षपाती । एका दुजे पंथीं पाठवाया ॥१०॥

अभंग २९६

**१७.**

सोडवेना जया एकाएकी भोग । तया नाही त्याग सांगितला ॥१॥
करावा संसार विहीत सेवोनी । अतिथी पुजोनी वर घ्यावे ॥२॥
स्वस्त्रियेवांचोनि जननी सकळ । लोकी मान मेळ वाढवावा ॥३॥
जंव नेघे मन निर्विकल्पदीक्षा ।
तंववरि भिक्षा मागों नये ॥४॥
जंववरी दिसे परदोषगुण ।
तंव लोकां ज्ञान सांगों नये ॥५॥
बोलिल्यासारिखे जंव चालवेना ।
तंव शिष्य कोणा म्हणो नये ॥६॥
जंव जीभ शिश्न नायके सद्वाणी ।
तों कोणा तोडोनी बालों नये ॥७॥
हिताचें वचन सांगणे जो कानी ।
ते लाड करोनी कामा नये ॥८॥
घरींच राहोनी पाहिजे जों देव । आठवावा तंव ज्ञानेश्वर ॥९॥

अभंग ११८३



**१८.**

***चित्तशुद्धि प्रथम, नंतर साधने***

भूक नसोनिया करणे भोजन । तरी ते अजीर्ण पचेना कीं ॥१॥
गोडचि अन्नाचे कडू ते ढेंकर । होय गुदद्वार दुर्गंधाचे ॥२॥
तैसीं ही साधने वैराग्यावांचोनी । शरीरभिमानी करिताती ॥३॥
गोडचि साधने कडवट होती । नरकासी नेती बांधोनीयां ॥४॥
म्हणोनियां आधी शुद्ध कीजे मन । नामचि घेऊन श्रीहरीचें ॥५॥
आरशाचा मळ निघावया वेळ । मुख तें तात्काळ दिसे मग ॥६॥
तैसा मनोमळ काढायासी कष्ट । परमात्मा स्पष्ट आहेच की ॥७॥
ज्ञानेश्वरप्रभु वळल्या सद्‌गुरु । मग तो निर्धारू पुढें ठाके ॥८॥

अभंग १०९३

**१९.**

सांडू नये कदा आपलें उचित । दुःखाचे पर्व पडलियाही ॥१॥
नाही नाही जगा माय श्रुती ऐसी । येर अविश्वासी मार्ग नाना ॥२॥
वर्णाश्रमाचारें नियमी शरीर । नियमी अंतर उपासना ॥३॥
ज्ञानें ब्रह्मरूप भासताती भूतें । नाही या परौतें जाणायाचें ॥४॥
हाचि हाता आला कांडत्रयसार । सखा ज्ञानेश्वर अन्तर्बाह्य ॥५॥

अभंग १०२४

२०. जोंवरी विराग नुपजे विषयीं । तो अभ्यास कांहीं करूं नये ॥१॥
वैराग्यावांचोनि केलिया अभ्यास । तंव वासनेस तीव्रता ये ॥२॥
मलीन सलील सांठविता घरी । किडे त्यामाझारी होति तेव्हा ॥३॥
अशुद्धमनाची तेवि एकाग्रता । होय आत्मघाता कारण ती ॥४॥
शेवटी समाधी वैराग्याचे फळ । अभ्यास केवळ मध्यस्थचि ॥५॥
आत्मानात्मयाचा विवेक करणें । तो विरागावीणें न घडेचि ॥६॥
ज्ञानेश्वरकन्या भोगीं विरागीणी । जाहली जोगीणी प्रियासाठी ॥७॥

अभंग १०४९

**२१.**

उचित करीता न व्हावें उदास । कदां नोहे नाश सत्कार्याचा ॥१॥
आज उद्यां भेटे केलियाचे फळ । व्यर्थ उतावेळ करू नये ॥२॥
किती गेले दोष आपुल्या चित्ताचे । समाधाने साचें निरीक्षावे ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या सद्‌गुरूचे पायी ॥ विश्वासोनि राही जन्म जन्म ॥४॥

अभंग ११८१

**२२.**

**ब्रह्म-ऐक्याभास केलियावांचोनि । करिती भाषण धिटाईनें ॥१॥**
**न पाहती डोळां आपलें दुर्गण । इतरांचे गुण निंदिताती ॥२॥**
**ऐसियासी गुह्य सत्यचि चोरावें । कधीही न द्यावे हातातळी ॥३॥**
**लाडविणें आणि खेळविणें सर्पा । दोन्ही मार्ग तापा दान देती ॥४॥**
**तैसे दुष्टी नको प्रीति आणि द्वेष । दोहींपक्षी नाश होत साचा ॥५॥**
**उगेंचि असोनी तया विलोकावे । कदा नायकावे ज्ञान त्यांचे ॥६॥**
**ज्ञानेश्वरप्रभु असता सांगाती । निजशिष्यांप्रति सुख सदा ॥७॥**

अभंग १०८१

**२३.**

**योगयागधर्मे नाकळे गोविंद । 'नेति नेति' वेद बोलताती ॥१॥**
**सत्संगप्रेम धरितां सांपडे । अनाहूत चढे हृदयात ॥२॥**
**साक्षीचा आनंद चित्तीं शुद्धप्रीती । घनःश्याममूर्ती डोळ्यांपुढे ॥३॥**
**ऐशा स्थितीमध्यें मीपण काह्याचे । नारायण वाचें नाम सदा ॥४॥**
**ज्ञानेश्वरकन्या निरंकुश-तृप्त । जोडोनिया आप्त नंदसूनु ॥५॥**

अभंग ८३६.

**२४.**

**पाहतां पाहणें हारपूनि जाय । ध्याता होय ध्येय, नाम गातां ॥१॥**
**मन रंगे ध्यानी, वाणी रंगे नामी । प्राण प्राणायामी प्रेमोच्छ्वास ॥२॥**
**जान्हवी यमुना नयनीचें जळ । हृदी घननीळ अभिषेकूं ॥३॥**
**आळंदीजीवन वळल्यावांचोनी । न होय साधनी कार्य साधें ॥४॥**

अभंग ९२०.

**२५.**

**नाकळे म्हणोनि नको भिऊं मना । शिव नारायणा गायी ध्यायी ॥१॥**
**केव्हां तरी स्वामी ऐकेल श्रवणी । दासविनवणी दीनबंधु ॥२॥**
**पाणियांत कणु टाकतां तरंग । तेविं रमारंग कृपा सिंधु ॥३॥**
**एकही अक्षर तयानें ऐकता । उचंबळे चित्ता कारुण्य तें ॥४॥**
**तया सिंधु मिळे भक्तिमंदाकिनी । ज्ञानेशजननी प्रसादानें ॥५॥**

अभंग ११९१.

**२६.**

**ऐसा सृदिानंद आत्मा । याची घेउनी श्रौती प्रमा ।**
**श्रवण मनन निदिध्यासन परमा । साधावें की ॥१॥**



**सत्तामात्र ते श्रवण । चिन्मात्र तें मनन । आनंदमात्र निदिध्यासन ।**
**वा श्रवण मनन निदिध्यासन सच्चिदानंदी ॥२॥**
**परि अनुभव आणि श्रुतिबळें । वृत्तीनें बंधत्व घेतले सकळे ।**
**तरी वृत्तीनेंच मोकळें । होणे पडे ॥३॥**
**यालागी सच्चिादानंद । वृत्तीत गोचर प्रसिद्ध ।**
**पृथकत्वें शुद्ध । करणें पडती ॥४॥**
**सूर्याचीच उष्णता सूर्यकांती । घेतां होय पृथक् प्रतीती ।**
**तेवी सृदिांनद ब्रह्मीं अपृथक् असती ।**
**परी पृथक्वत् भासती वृत्त्येति, स्मृति असे ॥५॥**
(आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति संति धर्माः । ब्रह्मणोऽपृथक्त्वेपि पृथगिवावभासन्त इति ॥ - पद्मपादाचार्य. विषय म्हणजे वेदान्तविषयक ब्रह्म; तदनुभव म्हणजे चित् इतर अर्थ स्पष्ट आहे.)
**काल्पनिक- भेदाभ्युपगमे । सृदिानंद भासती पृथग्मे ।**
**तै बंधाभावविशिष्टवृत्त्यागमे । सत्यता ब्रह्मीं ॥६॥ तदाकारवृत्त्यवच्छिन्न ।**
**बह्म प्रगटे चेतन ।**
**प्रीत्यादिवृत्त्यवच्छिन्न । आनंद जाण प्रगट तो ॥७॥**
**किंवा व्यंजकवृत्त्यवच्छिन्न ज्ञान । आनंद अनुकूलवृत्त्यवच्छिन्न ।**
**अथवा आणीकही अवभासन । होत असे ॥८॥**
**परोक्षज्ञानें प्रगटे सत्ता । अपरोक्षज्ञानें कळे चित्ता ।**
**प्रेमभक्तीनें आनंदवत्ता । अंगीं बाणे ॥९॥**
**आत्माकार मानावी वृत्ति । आणि आनंदावच्छेदक कां न म्हणावी भक्ती ।**
**यालागी अद्वैती अनिर्वाच्य भक्ति । ब्रह्मनिष्ठांची ॥१०॥**
**'तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैती भक्ति आहे ।**
**हें अनुभवाचि जोगें, नोहे । बोला ऐसें ॥ ज्ञाने.**
**परी हा पृथगिव आनंदाभास । न म्हणावा आनंदमय कोश ।**
**तेथ परतंत्रता आणि विषयानंदता विशेष । येथ ब्रह्मानंद ज्ञानास उपयोगिता १२**
**तेथ आत्मया बंधन । येथ होय मोचन ।**
**ही प्रक्रिया अद्वैतकौस्तुभांतून । घेतली कांही ॥१३॥**
**व्यवस्था आणि भक्ति । ज्ञानेश्वरकृपा संमती ।**
**कृष्णपत्न्या यथामती । निरूपिली ॥१४॥**
**एंव उत्तमाधिकारा । हा सृदिानंद भाव खरा ।**
**परी मध्यमाधिकारी दहरा । उपासिती ॥१५॥ प्र. यष्टि**

**२७.**

**वैराग्यावांचुनी सांगू नये ज्ञान । शुद्ध फसवण दीनाची ते ॥१॥**
**रागद्वेष ज्यांचे नाहीत निमाले । बोल वायां गेले सर्व कांही ॥२॥**
**शरीरापुरते अन्न आच्छादन । आणिक थुंकोन सर्व घाली ॥३॥**
**सुलभाजनक शब्द आणी ध्यानीं ।**
**न रहावें मौनी सापराधा ॥४॥**
**शिष्य वाढवोनी करूं नये सोंग ।**
**येणें रमारंग अंतरतो ॥५॥**
आळंदीवल्लभ येवोनी अरण्यी । घाली मुखी पाणी दासाचीया ॥६॥ अभंग १३०८

**२८.**

**पटु झाला सर्वापरी । तरी न भेटे मुरारी ॥१॥**
**येथें पाहिजे वैराग्य । ज्ञान आणि भक्तिभाग्य ॥२॥**
**रागद्वेषां विमुक्तता । याचें नावं विरक्तता ॥३॥**
**उपाधीवेगळा जीव । ब्रह्मज्ञान याचे नांव ॥४॥**
**नारायणावीण नेणें । याचे नांव भक्ति जाणे ॥५॥**
**स्वामी आळंदीवल्लभ । नोहे चंचळा सुलभ ॥६॥**
**अभंग १३११**

***स्व-जाति-बांधवांपाशीं विनंती***

**२९.**

श्रीगुलाबराव महाराजांनी देशीसंस्थानिकादि सर्व स्वजाति-बांधवांपाशीं मोठ्या कळकळीच्या शब्दांनीं अशी विनंती केली आहे :-

''बापहो, आपसांत भाडूं नका. धर्मबाबतीत तरी ब्रिटिशसरकारच्याच धोरणाचें अनुकरण करा.(वेदांचा) अर्थ जर तुह्मांला शिकतां येतो तर अक्षरांविषयी उगाच आग्रह करूं नका. ज्याचा त्याचा धर्मवेडेपणा ज्याच्या त्याच्या जवळ राहूं द्या. केवल (वेदाची) अक्षरें न पढविण्यानें तुमच्या बुद्धीच्या उन्नतीस अडथळा होत नाही.

**बिभीषणाला जसे रामापासून राज्य मिळवावयाचे होते त्याप्रमाणें मला ब्राह्मणांपासून कांही मिळवावयाचें नाही.**

माझ्या व्रतादिकांस पैसे देणारे बहुधा ब्राह्मणेतरच असून उलट हर्दा, थूगांव आदि ठिकाणी ब्राह्मणांच्या हातून थोडासा माझ्या विरुद्ध प्रयत्नही झाला होता; असें असताही मला जे विचारानुकूल वाटतें तेच लिहितो, विकाराने



कांहीही लिहीत नाही.

माझी विनंती मानिल्यास आपलें सर्वाचें हितच आहे. म्हणून गरीबाच्या वाणीचा अव्हेर करूं नका. निदान विचार तरी करा. श्रीआळंदीवल्लभ ज्ञानेश्वरमहाराज आपणां सर्वांस सुविचार व सुबुद्धि देवोत.'' यष्टि १२ वी.

**३०.**

***योगाचे चाळे***

**लावोनीयां डोळे झगमगरूपा । जपती अजपा श्वासामध्यें ॥१॥**
**छेदन चालन दोहन जिव्हेचें । होती खेचरीचे अधिकारी ॥२॥**
**जंव नाही वृत्ति निरोधिल्या पांच । तों न योग साच अवघे चाळे ॥३॥**
**अभ्यास वैराग्य एकवेळ जरी । घडले नाही तरी अवघे चाळे ॥४॥**
**पर वैराग्याने वीट त्रिगुणांचा । नये जरी साचा अवघे चाळे ॥५॥**
**जिंकोनी जिंकोनी संयमें भूमिका । स्थिर जों न निका अवघे चाळे ॥६॥**
**क्लेशकर्मपाक आणिक आशय । भिन्न देवराय तयाहूनि ॥७॥**
**तयाचे जरी न केलें प्रणिधान । तंव हें साधन अवघे चाळे ॥८॥**
**जंव नाही झाली ज्ञानेश्वरदया । तवं योगक्रिया राजयक्ष्मा ॥९॥**
अभंग १५०४

***गुलाबराव महाराजांचे मुख्य कर्तव्य***

**''जीवन्मुक्तीकरितां भक्ति पाहिजे ह्या प्राचीन ऋषींच्या मताची सिद्धी करणें व तदनुसार कर्म ज्ञान उपासना स्वतः आचरून लोकांत त्या मताचा प्रसार करण्याकरिता ग्रंथ लेखनादि कामें प्रयत्नपूर्वक करणें''**

हे महाराजांचे प्रयोजन होते.'स्वमन्तव्यांशसिद्धान्ततुषार' नाम प्रश्नोत्तररूप हिंदी ग्रंथांत महाराज म्हणतातः-

***'सखिवचन'***

**प्रश्न :- तुम कौन हो?**
**उत्तर:- मैं ज्ञानेश्वरकन्या और कृष्णपत्नी हूं.**
**प्रश्न :- भक्तिस्थापनकरनेकी किनकी आज्ञा है?**
**उत्तर:- श्रीभगवान् नारदाचार्य मुनीकी !''**

ज्ञानोत्तर भक्तीची आवश्यकता प्राचीन ऋषी, मुनी, भक्त्याचार्य, आद्य श्रीमच्छंकराचार्य व अर्वाचीन संतमालिका यांनी पूर्वी प्रतिपादन केली आहे. त्यालाच शास्त्रीय स्वरूप देऊन, वेदान्तशास्त्राला चालन देऊन व त्यांत भक्तीचा समन्वय करून ''मधुराद्वैतदर्शन'' या नांवाने महाराजांनी हे मत पृथकत्वानें प्रगट केले आहे. या विषयी महाराजांचे वेदांतपदार्थोद्देशदीपिकेतील म्हणणे असे

आहेः-

१. द्वैत - माध्व, शैव, पाशुपत यांचे,

२. द्वैताद्वैत - निंबार्क यांचे,

३. विशिष्टाद्वैत - रामानुज व श्रीकंठ यांचे,

४. अचिंतनीय द्वैताद्वैत- कृष्णचैतन्यांचे,

५. शुद्धाद्वैत - वल्लभांचें,

६. अनुभवाद्वैत - द्वितीय आप्पया दीक्षितांचे,

७. वृत्तिकाद्वैत - प्रत्यभिज्ञांचे,

८. त्वंवाच्य नित्यताद्वैत - रसेश्वरांचें,

९. केवलाद्वैत - श्रीमच्छंकराचार्यांचें,

**१०. मधुराद्वैत- रसाद्वैत- भागवताद्वैत** - (हे एकाच अर्थाचे पयार्य आहेत)

**या दर्शनाविषयी**

**एकटी ज्ञानेश्वरकन्याच सध्यां निष्ठावान् आहे.''**

''मधुराद्वैतसंप्रदाय आदिनाथांपासून नवनाथांच्या परंपरेने तातांकडेस- श्रीज्ञानेश्वर महाराजांकडेस आला. घेरण्डाचार्य हे श्रीगोरक्षनाथांचे शिष्य असून घेरण्डसंहितेंत मधुरभक्तीचा उल्लेख आहे.''

''शांकरवेदान्तांत भक्तीचा समन्वय केल्यामुळे या दर्शनाचा म्हणजे मधुराद्वैतभक्तीचा- मधुराद्वैत दर्शनाचा- पृथक् निर्देश केला आहे. कणादांनी जसा गुरुत्वाचा नियम शोधला, गुरुत्व शोधलें नाही, त्याचप्रमाणें या सनातन दर्शनाचा ध्वनी प्रभूंनी माझ्या मुखमृदंगांतून प्रगट केला आहे.

* 'जीवन्मुक्तीत भक्ति पाहिजे' एवढेंच या दर्शनाचें **म्हणणे** आहे. व विचारांती हेंच दर्शन सनातन ठरतें. वामन पंडित विदहेमुक्तीतही भक्ति ठरवितात तितकी भक्ति कबूल करण्याचें धाडस या दर्शनांत नाही. निदिध्यासनप्रकाशादि ग्रंथांत विदेहमुक्तीतही भक्ति ठरतें, असे जें म्हटले आहे तें वादीजयार्थ आहे.

* 'जीवन्मुक्तीत भक्तीची अपेक्षा नाही' असे म्हणणारे जे वेदान्ती आहेत त्यांचा हे दर्शन तिरस्कार करते.

* प्राचीन केवलाद्वैतभाण्डारांत या दर्शनाला अनुकूल अशी वचने मधून मधून चमकतात. त्यांचा संग्रह दर्शनोद्धासकांनी घेतलेलाच आहे.

* कैलास हे माहेर, त्याचा आळंदीशी समन्वय, व व्रज हे सासर, व शेवटी सासरमाहेरचा अभेद हे या दर्शनांतील **ध्येय** आहे.

* सर्व शांकरवेदान्तात दृष्टिसृष्टिवादच उत्तम असून त्यांतही ईश्वर व तद्भक्ति ही अवाधित राहतात हे या दर्शनाचें **ज्ञेय** आहे.



* गुरुचे ठिकाणी पतिभक्ति आचार्यांचून इतराला नाही ही यांतील **मर्यादा** आहे.

* दर्शनाला विरोध न येईल अशा रीतीने नानाप्रक्रियांची रचना हे यांतील **प्राविण्य** आहे.

* धर्मभेदसहिष्णुता **दृश्य** आहे, आणि

* **प्राप्य** तर शांकरमताचें व याचे (या मधुराद्वैतदर्शनाचें) एकच आहे म्हणून ते निराळ्याने सांगितले नाही.''

* **या दर्शनाविषयीं एकटी ज्ञानेश्वरकन्याच सध्या निष्ठावान आहे.**

* **प्रामाण्य विचार** शांकरमतांतील व आमच्यांतील एक आहे परंतु

* पुराणें वेदतुल्य असून ईश्वरप्रणीत आहेत ह्मणून वेदांचा जसा कशानें बाध होत नाहीं तसा पुराणांचाही बाध कशानें होत नाही ह्मणजे

* पुराणांचा व वेदाचा विरोध वाटल्यास समन्वयच केला पाहिजे, किंवा समजत नाहीं ह्मणून सोडून दिलें पाजि हा आमच्यंत **विशेष** आहे.

* वेद आह्मी **परम प्रमाण** मानतो.

* तात हे या दर्शनांतील आदिपीठ असून अस्मदादि उपपीठ आहों.

* खाण्यापिण्यावांचून कोणत्याही जातीला या दर्शनांतील श्रौतभाग वर्ज करून (कोणताही भाग) वाचण्याची परवानगी आहे.

* आपद्धर्माची सवड असतांही उगीच स्वधर्मत्याग करूं नये.

* संपत्काळी सद्धर्मच पाळावा.

* शिव, कृष्ण, तात (ज्ञानेश्वर महाराज), उमा आणि गोपी हे दर्शनांतील **पंचायतन** आहेत. त्यांच्या ठिकाणी क्रमाने पिता, पति, गुरु, माता व भगिनीभाव विवक्षित आहे. पण श्रीकृष्णाचें ठिकाणी देखील माधुर्यभक्ति सर्वांनांच साधते असे नाही, म्हणून **आपापल्या भावनेप्रमाणे भक्ति करण्याची या दर्शनांत आज्ञा** आहे.''

**'कात्यायनीव्रत, जन्माष्टम्युत्सव, शिवरात्री** हे तीन या मतांतील **विहित कर्म** आहेत.

आळंदी, शिवकृष्णतीर्थ **नित्य गम्य प्रदेश** आहेत.

एक तातांचा उत्सवही **विहित** आहे.

गंगा या दर्शनांत **प्रायश्चित**-रूप असून प्रयाग **आश्लेश** आहे; आणि हिमायल **एकान्त** आहे.''

### *गुरुभक्ती*

''आतां गुरुभक्तीची मात्र अशी स्थिती आहे की पारकीय मतांत ज्याप्रमाणें एकच व्यक्ति सद्गुरु मानतात तसें येथें नाही, तर साक्षात् उपदेशकाचें ठायी

पूर्वमुख्यगुरूचा समन्वय मानून तदेकतानतारूप ईश्वरत्वाने गुरुभजन करावे.''

* महाराजांचे वर निर्दिष्ट केलेल्या मताचें (मधुराद्वैत दर्शनाचे) मुख्य **प्रमाणभूत ग्रंथ** संप्रदाय सुरतरु व प्रेमनिकुंज हे आहेत; व इतर म्हणजे भक्तिपदतीर्थामृत, भगवद्भक्तिसौरभ, प्रीतिनर्तन व प्रियपाहुणेरादि मधुरभक्तीला पोषक असे प्रकीर्ण ग्रंथ आहेत; त्यांतही प्राधान्येंकरून मधुरद्वैतभक्तीचेच वर्णन आहे.

* शास्त्र (वेदान्त), ईश्वर, गुरु व स्वतःचा प्रयत्न या चारही गोष्टींची सम्रुायपूर्वक आत्मसिद्धीस अत्यंत आवश्यकता आहे. हें **उपदेशांतील प्रधान तत्त्व** आहे.

**'एतदेवहि दयालुलक्षणम् ।**
**यद्विनेये००० जनबुद्धिविवर्धनम् ।'**

हे श्रीमहाराजांच्या परोपकारबुद्धीचें ध्येय होतें, व तदनुसार झटून आपली योगशक्ति, विद्या, सुकृतसर्वस्व व शेवटी शरीरही खर्ची घालण्यांत त्यांनी बिलकुल कसूर केली नाही. **'माझे शंभर जन्म खर्ची पडो, पण एका जीवाचा उद्धार होवो'** असें ते म्हणत.

कोणात्याही शास्त्रांतील तत्त्वज्ञानविषयक प्रश्न कोणत्याही भाषेंत कोणी त्यांना विचारला असतां, ते त्याचे समाधान त्याच भाषेंतील अनेक ग्रंथांची मुद्देसूद प्रमाणे देऊन करीत असत.

समाजस्थिती सुधारण्याविषयीही श्रीमहाराजांनी वर्तमानपत्रांत लेख वगैरे लिहून होईल तेवढा प्रयत्न केला.

गुरुसंप्रदायदृष्टीनेंही हल्ली गुरुभक्तिपरायण श्रीयुत नारायणराव पंडित (श्रीबाबाजी महाराज) हे श्रीमहाराजांचे गुरुपुत्र आहेत. ह्यांनी श्रीमहाराजांचे नित्य सहवासांत राहून त्यांची अत्यंत एकनिष्ठ अंतःकरणानें सेवा केली आहे हे निराळे सांगावयास नको. तशीच श्रीमहाराजांच्या नित्यसहवासांतील इतर. रा. रा. नानाजी कविमंडण, हरिभाऊ केवले, आदि अनुयायी मंडळी श्रीमहाराजांच्या संप्रदायानुसार नित्यनैमित्तिक कर्मे व श्रीकृष्णजन्माष्टमी, कात्यायनीव्रत वगैरे प्रतिवार्षिकोत्सव मोठ्या प्रेमानें करून, रा. रा. श्रीनिवासशास्त्री हरदास, पाध्ये, खापरे प्रभृति फणिपुरस्थ (नागपूर) मंडळी त्यांच्या ग्रंथप्रकाशनाचे काम करीत आहेत.

प्रेमाचा जिव्हाळा धरून आलेला कोणतेही जातीपातीचा, पतित मनुष्य यांना खपत असे. परंतु अहंकार आपले बरोबर घेऊन आलेला आग्रही मनुष्य हे चटकन् ओळखीत व तो इतर बाबतीत कितीही चांगला असला तरी, त्याचा



आपल्या मंडळीला संसर्ग होऊं नये म्हणून ते त्याला खड्यासारखा निवडून बाहेर काढीत. यात त्यांना यत्किंचितही खंत वाटत नसे. आम्हांला जरी सकृत् दर्शनी वाईट वाटे तथापि याचा प्रत्यय आम्हांला मागाहून येत असे, व मग महाराजांचा दूरदर्शीपणा लक्षांत येऊन आमचें मन चमत्कारसागरात बुडून जाई; व अशा काळजी घेणाऱ्या माउलीबद्दल धन्यता वाटे ! मग तेच आम्हांला लहान अर्भकाप्रमाणें मागाहून विचारीत –

'काय मुळे मास्तर! मी अमक्या अमक्याबद्दल असे बोललों ते खरे आहे की नाही !'

काय हा प्रेमा, काय ही काळजी !

महाराज प्रेमाने, लडिवाळपणानें, विनोदानें, बालांप्रमाणें बोबड्या भाषणानें, अचकट विचकट शब्दानें- पुढील स्थितीचे असे कांही वर्णन करीत की त्यांच्या त्या शब्दांवर आमची कित्येकांची नजरही बसत नसे; व हे कांही तर गमतीने- बाल लीलेनें वाटेल ते बोलत आहेत असे वाटे. परंतु त्यांच्या त्या वर निर्दिष्ट केलेल्या बालभाषणानुरूप सर्व गोष्टी यथार्थ रीतीनें घडून आल्या व त्या तशाच अजूनही घडून येत आहेत, असा पूर्वी त्यांच्याजवळ असलेल्या (त्यापैकी मी एक आहे) प्रत्येकाचा हल्ली अनुभव आहे. आतां त्याची हळहळ वाटते. आता त्यांचा अलौकिकपणा पूर्ण निदर्शनास येतो ! परंतु आतां त्याचा उपयोग काय? झाले तें झालें ते नेहमी म्हणत –

'मुळे मास्तर! (माझें नांव 'वासुदेव' असल्यामुळे ते ह्या नांवाने मला कधीच हांका मारीत नसत), तुम्ही माझ्या सारखे व्हा, म्हणजे मी कोण आहे, काय आहे, हें सर्व तुम्हांस कळेल' !

*`It is distance that lends each moment to the view.'*

याचा खराखरा अनुभव आतां येतो. आज जी समज उमज आहे, ती त्यावेळेस असायला पाहिजे होती असे मनाला (उगीच) वाटतें.

ते नेहमी गमतीनें म्हणत – **''मी नसलो म्हणजे मग तुम्हांला व इतर लोकांना खरा खरा पश्चात्ताप होईल; पण पुनः मी तुम्हांला भेटल्या शिवाय राहणार नाही.''**

मी म्हणावें – 'लोकांना काय म्हणून पश्चाताप होईल? पश्चाताप होईल तो आम्हाला, आम्ही तुम्हांला पाहिले आहे, देखीले आहे म्हणून.'

गोष्ट खरी झाली. आम्हालां गोपीसारखा विरह झाला खरा, परंतु गोपी इतकें प्रेम आमच्यांत आहे कोठें की त्यांनी पुनः आम्हांला लगेच येऊन भेटावे !

किंवा एखादा 'उद्धव'ही आमचें शांतवन करण्याकरिता अजून आला नाही ! परंतु आळशावर जशी गंगा एकदां आली, तशी पुनः ती एकदा येणार नाही हे कशावरून ! आशा सुटत नाही. ती अमर आहे, हेच खरें !

श्रीमहाराजांची मूर्तीच चमत्कृतिमय होती.अगदीं साध्या रीतीनें जरी ते वागत, तथापि ते एकदा बोलूं लागले की मंडळी चित्रासारखी तटस्थ होऊन जाई. नुसत्या भाषणानेंच, मंडळीत बसलेल्या कित्येकांच्या मनांत ज्या अनेक शंका घोळत असत त्या सर्व शंकांचे सहज निरसन होत असे.हाच त्यांचा नित्य दृष्ट चमत्कार होता.**'अलौकिक नोहावे लोकांप्रति'** याची जरी ते खबरदारी घेत, तथापि त्यांच्या ऊह शक्तीचा जोर इतका प्रबल असे की खरा जिज्ञासु व प्रेमी भेटला की त्यांची ती पवित्र अमृतमय वाणी सुसरी प्रमाणें घों घों करीत बाहेर पडे. बिचाऱ्या प्रेमळ भक्तांना लुट्टू होऊन त्यांच्या पायीं लोळण्याशिवाय कांहीच सुचत नसे. ते जरी चमत्कारांचा निषेध करीत तथापि त्यांचे चमत्कार जागृती व स्वप्नी पदोपदीं दृष्टीस पडत व परमार्थाकडे वळविण्याकरिता इतरांना ते चमत्कार हल्लीही दृष्टीस पडत आहेत. महाराजांच्या आठवणी, म्हणी, व त्यांचे सर्व चमत्कार नुसते लिहून काढले तर एक मोठा प्रचंड ग्रंथच होईल. कांही त्यांचे चमत्कार त्यांच्या मोठ्या चरित्रांत दिले आहेत.

त्यांचे अलौकिक दृश्य विभूतीचा तिरोभाव झाल्यानंतर, ४।६ महिन्याच्या आंतच त्यांच्या संबंधाने श्रीयुत त्रिंबकराव देहनकर बी.ए.एल.एल.बी.वकील, बिलासपूर यांना जो महाराजांचा मोठा चमत्कार घडला व जो बेळगांव येथील १९२३ नोवेंबरच्या 'लोकमित्रा' मध्यें छापला गेला, तो जसाचा तसाच नमूद करून, जेथें बुद्धीचा लाग लागत नाही अशा महाराजांच्या लोकोत्तर भक्तिज्ञानयोगैश्वर्याच्या चमत्कारसमुद्रांतच वाचकांस सोडून देऊन त्यांच्या ह्या मनोहर, मोहक, पण विषयमदिरेनें घारलेल्या बुद्धीला पालट देणाऱ्या अल्प चरित्राला विराम देतो.

०००



# ज्ञानेश्वरकन्या श्री गुलाबरावमहाराजांचे विभूतिमत्व

**: लेखक :**

**हरिभक्तिपरायण आदरणीय कै. श्री. केशवराव देशमुख बी.ए. पुणे**

(इ.स.१८७६ ते १९४२)

: ग्रंथसंदर्भ :

श्रीनारदभक्तिसूत्रे यावरील ओवीबद्ध विवरणाची प्रस्तावना *(प्रत १-१-१९४५)*

**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥**गीता२।२९

**या भगवदुक्तीचे प्रत्यंतर। मजलागी लाधले साचार।**
**वऱ्हाडप्रांतीय सत्पुरुष थोर। गुलाबरावासी देखता।।१।।**
**प्रथम भेटीसरसे। प्रेम उपजले अपैसे।**
**''ज्ञानेश्वर माउली'' ऐसे पिसे। जडले देखतां वाचेसी।।२।।**
**ज्ञानोबावरी माझे प्रेम अति। आणि तेचि कानी ऐकता उक्ति।**
**प्रेम वाढले सहजस्थिति। उपासनेच्या ऐक्याने।।३।।**
**पाहो तरी जन्मांध स्थिति। शूद्रयोनि जन्मजाति।**
**ग्रामवस्ति असंस्कृत मति। अशिक्षितांसी व्यवहार।।४।।**
**ऐसी प्रतिकूल परिस्थिति। ज्ञानाचे साधन ना संपत्ति।**
**घडली नाही संतसंगति। नारदांप्रमाणे बाळपणी।।५।।**
**परि घडघडा मुखांतूनि। सकल शास्त्रे ओसंडोनि।**
**येता नवल वाटे मनीं। केव्हढे तरी आश्चर्य।।६।।**
**तैसेचि ज्ञानेश्वरी प्रवचन। ओवीबद्ध निरूपण।**
**अस्खलित प्रवाह चालला पाहून। थक्क झाले मन माझे।।७।।**
**मग मी पुसिले तयासी। ज्ञानसंपत्ति लाधली कैसी।**
**ज्ञानेश्वरीचे अध्ययना सरसी। कार्य सिद्धी झाली म्हणताती।।८।।**
**इये जन्मी अंधपण। म्हणता ज्ञानेश्वरीचे अध्ययन।**
**केले कैसे सत्य वचन। आम्ही मानावे निर्धारे।।९।।**
**तंव बोलती हांसून। पूर्व जन्मीचे तपाचरण।**
**ये जन्मी फळले आम्हालागून। ज्ञानेश्वरकृपाप्रसादे।।१०।।**
**त्यांची कन्या मी होईन। कृष्ण परमात्म्यासी वरीन।**

अखंड ऐक्यासी पावेन। नित्य कान्ता-भजनाने॥११॥
ऐसा वृत्तांत ऐकिला। मनी नवलावो वाटला।
सहवासावरी हेत जडला। कैशा परी साधेल॥१२॥
महाराज राहती उमरावतीस। माझी वस्ती नित्य पुण्यास।
दोघांचा नित्य सहवास। अशक्य वाटो लागला ॥१३॥
परी आळंदीयात्रे निमित्त। सालोसाल पुण्यास येत।
ते संधी साधोनि नित्य। भेटी घेऊ लागलो ॥१४॥
फडके यांचे शिवमंदीर। लोणार आळी, पेठ रविवार।
वस्ती केली ऐकोनि साचार। भेटी लागी निघालो॥१५॥
जोग महाराज वर्णन करिती। खात्री झाली ऐसे म्हणती।
प्रत्यक्ष ज्ञानेश्वर विभूती। प्रकटली म्हणती जगांत ॥१६॥
अत्यंत विस्मित झाले मन। कै भेटतील मजलागून।
ऐसी चिंता लागता क्षण। आले म्हणोनि ऐकिले॥१७॥
जोगमहाराजा समवेत। पानवलकर नानासाहेबादि समस्त।
मंडळी निघाली त्वरीत। दर्शनालागी उल्हास॥१८॥
वेळ होती सकाळची। सूर्योदय समयाची।
प्रसन्न अंतःकरणे सर्वांची । भेटीलागी उतावीळ॥१९॥
तंव देखिले तयांसी। -------- ००००००
पांघरूण घेऊन डोईसी। सभा मंडपा भीतरी ॥२०॥
शिष्यमंडळी आसपास। वावरत होती सावकाश।
म्हणति निद्रा लागली खास। रात्री जाहले जागरण॥२१॥
शिवरामपंत परांजप्यांनी। बोलाविले भेटी लागोनिं।
म्हणोनि गेलो त्यांचिया स्थळी। रात्र फार जाहली॥२२॥
कांही काल थांबाल। तरी अवश्य भेटी होईल।
जाग लवकरी येईल। हेतू पुरेल मनीचा॥२३॥
तव आप आपसात। बैसलो आम्ही कुजबुजत।
तर्कवितर्क करीत। नाना परीचे मानसी॥२४॥
इतुक्यांत झाले जागृत। उंचस्वरे हाका मारीत।
शिष्य मंडळी आली धावत। लगबगीने सन्मुख॥२५॥
मुखावरूनि वस्त्र काढिले। दर्शन आम्हालागी झाले।
दर्शन घेण्यास सरसावले। पानवलकर सर्वांपुढे ॥२६॥
मग झिडकारिती तयासी। स्पर्श करू नका पायासी।



तुम्ही ब्राह्मण, शूद्रासी। चरणस्पर्श करू नये ॥२७॥
ऐसे दरडावूनि सांगितले। पानवलकर दूर बैसले।
नानासाहेब पुढे झाले। केली सुरवात बोलाया॥२८॥
रात्रीची हकीगत सांगितली। परांजप्या समवेत जी घडली।
देशभक्ती त्यांची मानवली। परि म्हणति बहिर्मुख॥२९॥
रात्रसरे तों संभाषण। नाना शंकांचे निरसन।
बहुत विषयांचे विवेचन। वादविवाद बहुसाल॥३०॥
तेणे शीण झाला फार। झोप डोळ्यावरी अनिवार।
पुन्हा भेटूं म्हणोनि सत्वर। डोईवर पाघरूण घेतले॥३१॥
काही काळ वाट पाहून। आम्ही निघालो परतून।
शिवरामपंतांचे भेटी लागून। दोन प्रहरी निघालो॥३२॥
भेटी त्यांची जाहली। म्हणती खात्री माझी पटली।
अंध असोनि विद्वत्ता येतुली। कैसी आली न कळे॥३३॥
पुन्हा रात्री भेटीसी आले। राजकारण बोलूं लागले।
म्हणती "शक्तिवीण वाया गेले। प्रयत्न आजवरीचे॥३४॥
पूर्वकाली धुनर्विद्या। अस्त्र मंत्र शस्त्र साध्या।
भारतभू झाली वंद्या। घातले विश्व पायातळी॥३५॥
सांप्रत गेले सर्व लया। कांही करता न ये उपाया।
म्हणाल तरी आणीन ठाया। प्राचीन विद्या सकळ"॥३६॥
शिवरामपंती ऐकून घेतले। परी अंतरी नाही मानवले।
हो हो ऐसे म्हणत राहिले। काळ गेला सरूनि॥३७॥
मग तैशा अपरात्री। आम्ही नेले आमुच्या घरी।
रात्र सरे तोंवरी। बोलणे चालले अव्याहत॥३८॥
अनेक विषयांची चर्चा घाली। सर्व मंडळी निरूत्तर केली।
पाठी पाहांट होता भली। शिवमंदिरा निघाले॥३९॥
सायंकाळी गावासी जाणार। म्हणोनि ऐकतांचि सत्वर।
मीही गेलो स्टेशनावर। दर्शनालागी तयांच्या॥४०॥
छकड्यांत बैसलो असता। मी विचारीले भीतभीतां।
"ज्ञानेश्वर कृपा त्वरीता। कैसी होईल ते सांगा"॥४१॥
मग हळुच सांगति। "सांगो नका कोणाप्रति।
ज्ञानेश्वरकृपा तुम्हांवरती। मूळापासोनि आहेचि॥४२॥
परि ते न कळे तुम्हासी। सेवा करा अहर्निशी।

ज्ञानेश्वरीच्या अध्ययनासरसी। प्रचीति येईल कालांतरे"॥४३॥
गाडी गेली निघोनि। मी घरा आलो परतोनि।
दृढ झाला विश्वास मनी। ज्ञानेश्वरकृपेचा॥४४॥
पानवलकर गेले उमरावतीसी। जाऊन राहिले समीपेसी।
पादुका मागितल्या त्यांचे पाशी। पालखी माजी मिरवाया॥४५॥
दर गुरुवारी पालखी सोहळा। काढावा ऐसा मनी लळा।
"चला मीही येतो पुण्याला। जाऊ सवे आळंदीसी"॥४६॥
पानवलकरां समवेत। पुण्यासी आले त्वरीत।
पादुका चांदीच्या घालोनि पेटीत। गेले आळंदीस पूजाया॥४७॥
आळंदीसी पूजा करून। पादुका आले घेऊन।
"उमरावतीस शीघ्र जाऊन। म्हणति काढूं पालखी"॥४८॥
ते वेळी पुन्हा भेटी झाली। भाषण चर्चा बहुत केली।
बरीच मंडळी भेटून गेली। सर्व आश्चर्यचकित झाले॥४९॥
सर्वांसी नवल वाटले। जन्मांधासी ज्ञान येतूले।
कैसे नेणो हाता आले। वस्ति करूनि कुग्रामी॥५०॥
ग्रंथांतरीचे दाखले। कोण ग्रंथी काय लिहिले।
ते अचुक सांगति वहिले। खरे खोटे निवडिती॥५१॥
ग्रंथावरी बहुत हव्यास। ग्रंथ मिळविण्याचा सायास।
ग्रंथ घेऊन बसती सावकाश। संग्रहामाजी ठेविती॥५२॥
सहज पुसिले एकवेळ। "ग्रंथ संपादणी कायसी तळमळ।
स्वतः दृष्टि नसता केवळ। जवळ घेऊन कां बैसता" ॥५३॥
म्हणति "लोकांस प्रमाण दावावया। ग्रंथ जवळी लागती असावया।
ग्रंथी लिहिले समजावया। वेळ नलगे अणुमात्र"॥५४॥
"परि ग्रंथांतरी जे लिहिले। त्याचे तुम्हासी कैसे ज्ञान जाहले।
दृष्टि नसता कैसे आले। सर्वज्ञपण तुम्हासी?"॥५५॥
ऐसे विचारिता बोलिले। "ते माझे मज काही न कळे।
सहजासहजी सुचो लागले। ऐसे झाले मज लागी॥५६॥
गनोरकर माझा सहाध्यायी। संस्कृत भाषाभिज्ञ तोही।
शांकरभाष्याचा प्रत्यही। अभ्यास करी परीक्षेसाठी॥५७॥
एके दिवशी मज भेटला। नवल सांगो लागला।
म्हणे "बाळपणापासोनि पाहतो याला। हा आमचे गावचा पाटील पुत्र॥५८॥
मूळचा जन्मांध असोनी। अलौकिक बुद्धि येते दिसोनि।


भाष्यांतील कठीण प्रकर्णी। अर्थ सांगतो बिनचूक॥५९॥
यासी नाही कोणी शिकविले। स्वतः नाही अभ्यासिले।
आपोआप ज्ञान झाले। कैसे न कळे मजलागी॥६०॥
परि बुद्धिमत्ता अलौकिक। मज दिसोनि आली स्वाभाविक।
म्हणोनि सुटी होताचि गावी देख। जाऊनि राहतो तयाच्या॥६१॥
असो काही काळ लोटता। पुनः पुण्यास आले देखता।
मी आमुचे घरी त्वरीता। आलो घेऊन मुक्कामासी॥६२॥
सायंकाळीची वेळ होती। स्नान करू म्हणति त्वरिती।
स्नान करूनि केश विंचरिती। कुंकुम लाविले कपाळी॥६३॥
पाटावरी बैसले। ध्यानपूर्वक डोळे मिटले।
"काढा ज्ञानेश्वरी" म्हणोनि सांगितले। "पान उघडा समोरी॥६४॥
एक ओवी वाचा" म्हणोनि। मज सांगता पोथी उघडोनि।
मी वाचिली तो तत्क्षणी। व्याख्यान आपुले सुरु केले॥६५॥
"आत्मप्रभा नित्य नवी । तेचि करूनि ठाणदिवी ।
जो इंद्रियाते चोरूनि जेवी । तयासीच फावे ॥६६॥"
या ओवीवर अस्खलित। ओवीबद्ध व्याख्यान करित।
चकित झालो आम्ही समस्त। प्रवचन ऐकता तासभर॥६७॥
नंतर सर्व शिष्या समवेत। भोजन केले मनमुराद।
रात्रभर चालिला वादविवाद। येईल त्याचे बरोबर॥६८॥
अगाध ज्ञानाची खूण। सर्वांसी पटवून देऊन।
सकाळी निघाले "जातो" म्हणून। "आळंदीस दर्शना"॥६९॥
आळंदीहून आल्यावरी। एक दिवस राहिले घरी।
"उमरावतीस जातो सत्वरी। कात्यायनी व्रतानिमित्त॥७०॥
तुम्हीही जरूर यावे। एकवेळ पाहून जावे।
मन मानेल तो राहावे। परतोनि यावे स्वगृही"॥७१॥
ऐसे आग्रहपूर्वक सांगितले। मजलागीही मानवले।
एकवेळ जाऊन येता भले। सकळ चरित्र येईल दिसो॥७२॥
मार्गशीर्ष मासी कात्यायनी। व्रत करिती ऐसे जाणोनि।
मीही निश्चय केला मनी। सत्वर तेथे जावया॥७३॥
उमरावतीस गेलो। तेथील मंडळीसी भेटलो।
"कात्यायनी व्रतासाठी आलो"। म्हणोनि सांगितले तयासी॥७४॥
ते म्हणती "चला वाठोड्यास। उमरावतीहून सहा कोस।

तेथे महिनाभर रहिवास। महाराजांचा व्रतानिमित्त॥७५॥
थोडेचि दिवस आता उरले। परि आम्हासवे येता भले।
आम्ही दाऊं तुम्हा सगळे। व्रताचरणी कार्यक्रम''॥७६॥
मग निघालो त्या समवेत। वाठोड्यास पोचलो त्वरीत।
महाराजांसी देखतां त्वरीत। नमस्कार करूनि बैसलो॥७७॥
महाराजांनी आज्ञा केली। ''यांची सरबराई राखा भली''।
संतोषली शिष्यमंडळी। ओळख होती पूर्वीची॥७८॥
वालुकेचि मूर्ति करोनि। पूजिती देवी कात्यायनी।
महाराज स्वये पूजा करोनी। खेळ खेळती नदी तीरी॥७९॥
सर्व शिष्य मंडळी सहित। उभे राहूनि नदीपात्रांत।
विनोद थट्टा मस्करी चालत। मध्यान्हकाळ होय तंव॥८०॥
पूजा झालियानंतर। प्रवचन करिती ज्ञानेश्वरीवर।
ओवीबद्ध साहित्यप्रचूर। ओघ चाले घडघडीत॥८१॥
सायंकाळ होय तोंवर। हाचि क्रम निरंतर।
पाठी बिऱ्हाडा आलियावर। भोजन होतां रात्र पडे॥८२॥
भोजन चालता चालता। कवित्व करिती अखंडिता।
भाषणाची मधुरता। परामर्श घेती सकाळांचा॥८३॥
ऐसे भोजन झालिया वरी। मध्यान्हरात्र होय तोवरी।
तैसाची विनोद थट्टा मस्करी। मनमोकळेपणे चालतसे॥८४॥
नंतर काही काळ विश्रांती। घेऊन सूर्योदय होताप्रति।
तैसेचि दिवसभरी ते चालति। कार्यक्रम नेहमीप्रमाणे॥८५॥
साधुसमागम नदीतीर। शिष्य एकनिष्ठ सहचर।
श्रवणासी प्रवचन मधुर। नित्य कानी पडतसे॥८६॥
मार्गशीर्षमास सरला। व्रताचा समारोप झाला।
मीही परतलो उमरावतीला। महाराजांसमवेत॥८७॥
मग परवानगी मागितली। पुण्यास जातो गोष्ट काढली।
संतोषाने अनुमति दिली। म्हणती पुन्हा भेटू पुण्यास॥८८॥
पानवलकरांची इच्छा होती। मुंबईस न्यावे महाराजांप्रति।
म्हणोनि गेले उमरावती। शिष्यांसहित आणावया॥८९॥
घेऊन आले पुण्यपत्तना। आळंदीस नेले दर्शना।
परत मुंबईस जातांना। आमुचे घरी उतरले॥९०॥
दोन दिवस सहवास झाला। नित्याप्रमाणे लाभ घडला।



पुराण प्रवचन वादविवादाला। बहर येऊनि राहिला॥९१॥
मग मुंबईस जावया निघाले। मजही चला म्हणती भले।
तंव माझे मन लाचावले। मुंबईतील प्रकार पहावया॥९२॥
मी 'हो-ना' करीत होतो। ''वडिल बंधुसी विचारतो।
मग काय ते सांगतो''। ऐसे म्हणीतले तयासी॥९३॥
मग म्हणती ''कल्याणापर्यंत। तरी तुम्ही असावे समीपगत।
पुनः मागुति यावे परत। अवकाश तुम्हा नसलिया''॥९४॥
ऐसे आग्रहपूर्वक भले। कल्याणापर्यंत चला म्हणतिले।
मीही त्यांसी विनविले। भक्ति श्रद्धापूर्वक॥९५॥
''काही तरी कल्याण कराल। मज ज्ञानेश्वर भेटवाल।
तरीच मन समाधान पावेल। व्यर्थ हिंडणे कासया॥९६॥
आपण कृतार्थ सत्पुरुष। आम्ही हीनदीन रंक।
आमुचे मना नव्हे सुख। कांही अद्‌भूत देखिल्यावीण॥९७॥
कांही करणार असाल। तरीच माझे येणे घडेल''।
''तुमची श्रद्धा दृढ असेल। तरी घडेल'' म्हणाले ते॥९८॥
ऐसी प्रश्नोत्तरे झाली। मीही निघण्याची तयारी केली।
रात्रीची गाडी धरली। मुंबईस जावया॥९९॥
निघताना पुनः सांगितले। ''काय होईल पहा वहिले।
झोपू नका'' म्हणोनि बजावले। गाडी चालू झालिया वरी॥१००॥
हळू हळू सर्वजण। निद्रेमाजी झाले मग्न।
मी एकला जागा राहून। वाट पाहात राहिलो ॥१०१॥
सेकंड क्लास मध्ये जागा प्रशस्त। असूनही मन अस्वस्थ।
क्षणक्षणी उत्कंठीत। काय होते ते पहावया॥१०२॥
स्टेशनापुढे स्टेशने। जाऊ लागली क्रमाने।
जागा राहून शुद्धमने। नामस्मरण करीत होतो॥१०३॥
पाहांटेची वेळ झाली। कल्याणा जवळ गाडी आली।
महाराजांची स्वारी उठली। पाणी मागती पियावया॥१०४॥
सत्वर पुढे होता क्षणी। मज बोललेती मंद वाणी।
''नामस्मरण करीत रजनी। तुम्ही घालविली जागेपणे॥१०५॥
तरी सांगतो ते ऐका। तुमचा आचार शुद्ध निका।
आमचे नादी लागू नका। अश्रद्धा उपजेल अंतरी॥१०६॥
आम्ही तरी प्रसंगोपात्त। जैसे तैसे वर्ततो अनिश्चित।

आमचे वर्तन तुम्हांप्रत। रूचणार नाही सर्वकाळ॥१०७॥
आम्ही नसो आमुचे अधीन। अवशिष्ट प्रारब्ध कर्म भोगून।
अवतार कार्य संपवून। जाऊ आपले निजस्थळा॥१०८॥
तुमची श्रद्धा आम्हावरी। राहणार नाही निर्धारी।
तुमचे लक्ष आचारावरी। जडून राहिले दिसतसे॥१०९॥
क्वचित् प्रसंगी न रुचेल। ऐसे आम्हा हातून घडेल।
तेणे तुमची श्रद्धा डळमळेल। पश्चातापासी पावाल॥११०॥
म्हणोनि श्रद्धा आम्हावरती। न राहिली तरी न राहो परती।
परी काही देतो तुम्हाप्रति। सेवा करा तयाची"॥१११॥
म्हणोनि पिशवीतून काढिले। नारदभक्तिसूत्रां मज दिधले ।
"यावरी विश्वासूनि आचरता भले। कल्याण तुमचे करितील॥११२॥
या ग्रंथावरी पूज्यबुद्धि। सर्वकाळ निरवधि।
ठेविता होइल कार्य सिद्धि। मनोवांछित पुरेल"॥११३॥
ऐसे म्हणोनि पुस्तक दिधले। मीही अत्यादरे स्वीकारिले।
खिडकीतून बाहेर पाहिले। तंव आले स्टेशन कल्याण॥११४॥
गडबड सुरूं झाली। मंडळी जागी होऊं लागली।
महाराजांकडे पाहो लागली। तंव महाराज अपुले निद्रिस्थ॥११५॥
पुढे अल्पावकाशांत। पाणी भरून घेतले भांड्यांत।
मुख प्रक्षालूनि त्वरित। सावध झाले सर्वही॥११६॥
कोणी प्रातःस्मरण करिती। माळ घेऊनि जप करिती।
कोणी पुनः झोपी जाती। थंड वारे लागता॥११७॥
इतक्यांत आले दादर। पुढे भायखळा बोरीबंदर।
महाराज उठोनि सत्वर। डब्याबाहेर उतरले॥११८॥
सामान सुमान इतर मंडळी। बिऱ्हाडाकडे रवाना केली।
पुस्तकांचे दुकानाकडे वळली। स्वये स्वारी महाराजांची॥११९॥
गीतेची वल्लभी टीका। पहावयासी मिळेल का।
म्हणोनि काळबादेवी रामवाडी नाका। ज्येष्ठा रामजीकडे गेलो॥१२०॥
पुस्तक घेऊन सत्वर। गांठले *नानासाहेबांचे घर।
तेथे सर्व दिवसभर। महाराज झोपूनि राहिले॥१२१॥
सायंकाळी स्नान झाले। नित्यनैमित्यिक आटोपले।
भोजन सर्वांचे झाले। तंव लोक जमले पहावया॥१२२॥
सर्वांशी संभाषणविनोद। अनेक शास्त्रांवरी चर्चा अमर्याद।



चालू होता वादविवाद। प्रसन्न मने अवधियांची॥१२३॥
संगीतशास्त्र न्यायशास्त्र। वैद्यक आणि वेदान्तशास्त्र।
राजकारण नीतिशास्त्र। मंथन झाले सर्वांचे॥१२४॥
त्या त्या विषयांतील पूर्ण तज्ज्ञ। प्रश्न करूं लागली मर्मज्ञ।
उत्तरे बिनचूक समयज्ञ-। पणे मिळता सुखावती॥१२५॥
ग्रंथांतरीचे पुरवे। पान पुस्तकांसहित द्यावे।
पडताळून पाहता व्हावे। क्षणभरी चकित सर्वांनी॥१२६॥
ऐसा नित्य महोत्सव। चालिला थोर अभिनव।
नित्य नवा श्रोतृ-समुदाव। जुळूं लागला प्रत्यही॥१२७॥
गर्दी फार होऊ लागली। अलौकिकत्वाची साक्ष पटली।
महाराजांची वृत्ति उठली। म्हणति "गावां जाऊ आता"॥१२८॥
दहा दिवस मुक्काम पडला। सर्वांचा श्रम फिटला।
अद्‌भूत दर्शनाचा सोहळा। मनमुराद भोगिला॥१२९॥
जन्मांध असून एवढे ज्ञान। कैसे उपजले म्हणोन।
आश्चर्य करिती सकल जन। म्हणति नवल देखिले॥१३०॥
मग जाऊनि उमरावतीस। पुढील वर्षी आले पुण्यास।
दर्शन घेऊन आळंदीस। जाणार होते सत्वरी॥१३१॥
परी मंडळीच्या आग्रहास्तव। मुक्कामासी दिला वाव।
दोन दिवसांत मंडळी सर्व। भेटूनि गेली प्रेमाची॥१३२॥
ऐसे कित्येकवेळा तरी। येता जाता येर झारी।
सर्वांसी दावितां नवल परी। ऐसे झाले एकदा॥१३३॥
बाबासाहेब पेंडसे आले। व्याकरणशास्त्री निष्णात भले।
एक पाठी म्हणोनि ऐकिले। नांव त्यांनी महाराजांचे॥१३४॥
कौमुदीतील कठीण कठीण। भाग काढले वेचून।
म्हणती "एकवार दावितो वाचून । पाठ म्हणून दाखवा"॥१३५॥
तैसेचि उद्योगपर्वातील काही स्थळे। हातात काढून बैसले।
म्हणती "दावा आता मज वाहिले। एकपाठीपण तुमचे"॥१३६॥
कांही चुकले काही बरोबर आले। समग्र पाठ म्हणता न आले।
मग थट्टा करूं लागले। अलौकिकपणाची॥१३७॥
परी म्यां त्यासी विचारिले। "जरी समग्र नाही साधले।
तरी जन्मांधाचे कौतुक केले। पाहिजे इतुलेही देखतां"॥१३८॥
मग तिही ते मानिले। अलौकिकत्व कबूल केले।

म्हणति ''काय थोडे देखिले। साक्ष पटाया आम्हासी॥१३९॥
प्रत्यक्ष नव्हे जरी ईश्वरू। तरी ईश्वरांशाचा भाग थोरू।
जवळी बाळगोनि असे हा नरू''। ऐसे केले कबूल॥१४०॥
परी माझे मन दुश्चित। महाराजासी मी सांगत।
''आपण सर्वज्ञ ऐसी मात। जगामाजी न बोलावी॥१४१॥
आपणासी दाविता येईल। तेतुलेचि सांगता शोभेल।
नाही तरी फजिती करतील। सकल लोक तुमची॥१४२॥
तुमच्या बरोबर आमची। शोभा होईल साची''।
तरी ऐसे न करण्याची। म्यां केली विनंती॥१४३॥
परी ते त्यासी मानवेना। ''मान अपमान सारखाच जाणा।
अति मानाचे तिरस्करणा। लागी करावे लागे ऐसेचि''॥१४४॥
ऐसा वाद वाढू लागला। मनामध्ये विकल्प आला।
तिही केले प्रयाणाला। मजवरी रूष्ट होऊनि॥१४५॥
तेव्हा पासूनि आमचे घरी। नाही उतरले निर्धारी।
आळंदीस जाऊन परस्परी। वाट धरिती उमरावतीची॥१४६॥
परी मजसी खबर कळतां। मी भेटत होतो निरूता।
परी अंतरीची दुश्चित्तता। तैसीच कायम राहिली॥१४७॥
माझे मन उद्विग्न झाले। शिष्य मंडळीसी म्यां सांगितले।
''कोप नसावा'' म्हणोनि विनविले। परी घडी मोडली बसेना॥१४८॥
तेही मज म्हणो लागले। ''मान टाळावया ऐसे केले''।
अपमान करूनि घेती बळे। जनसंपर्क चुकवाया॥१४९॥
परि मजलागी ते पटेना। त्यांची अपकीर्ति सोसवेना।
म्हणोनि मज राहवेना। महाराजांसी कथिल्याविण॥१५०॥
असो ऐसे घडून आले। तिही बोलिले तें खरे झाले।
श्रद्धेसि माझ्या विरजण पडले। प्रेम राहिले अंतरी॥१५१॥
ऐसा काही काळ लोटला। कधी भेटती न भेटती मला।
जाती येती आळंदीला। विकल्प राहिला तैसाचि॥१५२॥
उद्वेग उपजला मनासी। माझे न पटे कोणासी।
दैवगति आपुली ऐसी। म्हणोनि स्वस्थ राहिलो॥१५३॥
पुढे कांही दिवसांनी। खबर लागली मज लागूनि।
महाराज आजारी होऊनि। आले असती पुण्यासी॥१५४॥
शीघ्र तपास काढोनिया। मी गेलो भेटावया।



दृष्टि देखतां आसवे डोळिया। आली माझ्या सहज॥१५५॥
कृश झाली पाहिली मूर्ति। भाषण अतिमंद गति।
अंथरूणावरी पडोनि राहति। बोलू न शकति कोणासवे॥१५६॥
शंकरशेट रस्त्यावरील बंगला। भाड्याने होता घेतला।
भोवताली शिष्यमेळा। बैसला होता सचिंत॥१५७॥
मज पाहता सर्वांनी। वृत्तांत सांगितला मजलागुनि।
महाराजांसी क्षयरोगानी। व्याप्त केले म्हणताती॥१५८॥
परी तुमची आठवण काढिती। मधुन मधुन पाचारिती।
तुम्हांसवे निश्चिती। काही तरी बोलतील॥१५९॥
मग अंतर्गृही गेलो। जवळी जाऊनि उभा राहिलो।
भीत भीत उद्गारलो। ''मी आलो'' म्हणोनि॥१६०॥
चाहूल लागताचि ओळखिले। शब्द ऐकतांचि बोलिले।
''तुम्ही आला बरे केले। आता माझा नाही भरंवसा॥१६१॥
व्याधि थोर शरीरासी। जडली म्हणती निश्चयेसी।
राजयक्ष्मा म्हणती यासी। कोणासीही नाटोपे॥१६२॥
औषधाचा लाग नाही। दुखणे बरे होणार नाही।
परी औषध घेतल्यावीण पाही। सुटका नव्हे कोणाची॥१६३॥
म्हणोनि औषध कांही घ्यावया। आलो सत्वरी या ठाया।
आळंदी नजीक राहवया। पुण्यपत्तन गांठिले॥१६४॥
अण्णासाहेब पटवर्धनांचे । मज औषध घेणे त्यांचे।
थोर भिषग्वर्य पुण्याईचे। नाडी ज्ञानी निपुण॥१६५॥
त्या वांचुनि इतरांचे। मज औषध घेणे न रुचे।
मरण येवो परि त्यांचे । हस्ते पुनीत होईन''॥१६६॥
बोलतांही श्रम होती। मंडळी बोलूं नका म्हणती।
परि बोलिल्यावीण न राहती। येतां जातां जनां सवे॥१६७॥
माझे घरापासून फार। दूर होते तयांचे बिढार।
परी मी जाऊन समाचार। वेळोवेळी घेतसे॥१६८॥
एके दिवशी म्यां विनविले। ''मजकडून फार चुकले।
आपणांसी ज्ञान सांगितले। मर्जीविरुद्ध आपुल्या॥१६९॥
तरी क्षमा केली पाहिजे। कोप मनी नाणिजे।
मी कांही बोलिलो जे। ते निष्कपटपणे सहज''॥१७०॥
मग म्हणितले तिही। ''माझे मनी विकल्प नाही।

परी मना विरुद्ध घडता कांही। सर्वांसीच अरोचक॥१७१॥
ज्याचे धोरण तयासी। इतरा नये कामासी।
बुद्धीचा प्रेरक ईश्वर त्यासी। शरण जातां सकल सांग॥१७२॥
माझे मन झाले शुद्ध। राखा अंतरी प्रबोध।
तेणे कदापि नोहे बाध। परस्पर प्रेमासी॥१७३॥
क्षमा मागण्याचे कारण नाही। तुम्ही कांहीच केले नाही।
कर्ता करविता सर्वदेही। ईश्वर नांदे प्रत्यक्ष॥१७४॥
तयासी अनन्यभावे शरण। होता सर्व कार्य पूर्ण।
सांडूनिया मी-तूंपण। नित्य आठवा तयासी"॥१७५॥
ऐसे मनमोकळेपणे। झालियावरी बोलणे।
मीही निवालो अंतःकरणे। श्रद्धा मनीची दुणावली॥१७६॥
ऐसे कांही दिवस गेले। दुखणे बळावत चालले।
मी जाणे येणे नित्य ठेविले। परी बोलणे झाले अशक्य॥१७७॥
अशक्तता वाढो लागली। वाचाही बंद झाली।
एकचि तंद्री आंत लागली। बाह्य व्यवहार संपले॥१७८॥
नंतर पुढे एके दिवशी। तैसेचि सांडिले शरीरासी।
अकस्मात् न कळता कोणासी। ब्रह्मरूप जाहले॥१७९॥
होणार ते जाहली गती। आयुष्य भानु अस्ताप्रति।
जातां सकल शोक करिती। म्हणति हिरा हरपला॥१८०
लकडी पुलावरील स्मशानात। ००००००
मंडळी परतली गृहाप्रत । संध्याकाळचे समयी॥१८१॥
तेचि दिवशी आवराआवर। सामानाची करोनि सत्वर।
सांडोनिया तेथील बिढार। उमरावतीस कुच केले॥१८२॥
मी आलो आपुले गृहासी। थोर उद्वेग वाटला मनासी।
सत्पुरुष दर्शनासी। मुकलो म्हणोनि दुःखित॥१८३॥
ऐसे चरित्र संपले। परी संस्कार मनावरी उमटले।
ते कधी न जाती पुसले। आश्चर्य थोर वाटले॥१८४॥
आश्चर्यवत् दर्शन। आश्चर्यवत् संभाषण।
आश्चर्यवत् घडले श्रवण। सकल आश्चर्य होऊनि गेले॥१८५॥
आश्चर्य त्यांचे तयासी। ते कळो नये कवणासी।
आश्चर्यचि आश्चर्यासी। पावोनि थकित जाहले॥१८६॥
स्थूल देह सांडोनि गेले। परि भक्ति-सूत्र मज दिधले।



तेणे मनी समाधान राहिले। ठेविली कायम आठवण॥१८७॥
त्या नारदीय सूत्रांचा। मज छंद लागला साचा।
अभ्यास नित्य करितां त्यांचा। पूर्ण विश्रांति पावलो॥१८८॥
परी मनी धरिली एक इच्छा। या नारदभक्तिसूत्रांचा।
विवरणात्मक ग्रंथ साचा। लिहून व्हावे उतराई॥१८९॥
नित्य पठण करावे। इतरासी पाठ करवावे।
ओवीबद्ध व्याख्यान करावे। हाती द्यावे सकळांच्या॥१९०॥
तो हेत मनीचा पुरला। त्यांचे कृपे सिद्धीस गेला।
म्हणोनि त्यांसीच हा ग्रंथ अर्पिला। प्रेमभावे करोनि॥१९१॥
सद्गुरू ज्ञानेश्वर माउली। प्रेम पान्हा पाजूनि ओळली।
भक्ती रसाची पुष्टी आली। ओसंडून सर्वांगी॥१९२॥
तेणे तात्काळ निवालो। त्यांचे चरणी स्थिर झालो।
भवभयापासून मुक्त केलो। उद्धार पावलो निःसंदेह॥१९३॥
श्री ज्ञानेश्वर कृपा थोर। मी तव रंक पामर।
तिही धरून माझा कर। जे लिहविले ते लिहिले॥१९४॥
देवऋषि नारदमुनि। त्यांसी साष्टांग नमुनि।
ज्यांचा संचार त्रिभुवनी। त्यांसी विनवणी करीतसे॥१९५॥
संतांचे उच्छिष्ट सेवोनि। कृतकृत्य झाली जनी ।
तेचि उच्छिष्ट मज लागोनि। परंपरा प्राप्त झाले॥१९६॥
त्यांच्या सेवेने आजवरी। तृप्ति पावलो निर्धारी।
दर्शन देवोनि झडकरी। कृतार्थ करा दिनासी॥१९७॥
संचार आपुला त्रिभुवनात। भक्तजन तारणार्थ।
चरण दावुनिया हेत। आता पुरवा मनिंचा॥१९८॥
सद्गुरु माउली ज्ञानेश्वर। त्यांचे ठायी दृढ निर्धार।
माझी बुद्धि राहे स्थिर।ऐसे करा काही एक ॥१९९॥
आता असो बहु बोलणे । न बोलणे तेचि बोलणे।
बोली बोलता अबोलणे । ऐसे बोलणे बोलवा॥२००॥

*डॉ. नानासाहेब देशमुख व.०.व.S. मुंबई,*
*केशवराव देशमुखांचे काका*
*लेखक – वै. केशवराव देशमुख महाराज ˉ.०. पुणे*
*वै. विष्णुबुवा जोग महाराजांचे समकालीन व ल. रा. पांगारकराचे मित्र*

* * *

# श्री गुलाबराव महाराज यांचे गुणगौरव

**आर्या**

**जय जय श्रीज्ञानेश्वरतनये, विनयान्विते अये सदये ।**
**करितां प्रणाम तुजला मजसम रंकाहि शरण निजपद ये ॥१॥**
**करि कंकण शिरिं वेणी गळिं भाल कुंकुमे शोभे ।**
**या श्रीनटेश्वरीतें, कमलिनिसी भृंगसा, हरी लोभे ॥२॥**
**जी ज्ञानेश-हिमनगीं जन्मुनी श्रीकृष्णसिंधुसंगातें ।**
**गेली जनमल वारित मग मी म्हणुं कां न हेचि गंगा ते ॥३॥**
**त्वां माधुर्यप्रेमें मूर्त-स्वानंदकंद हरि वरिला ।**
**याहुनि म्हणती गोपी ''प्रेमा अमुचाहि मंद हरिवरिला''॥४॥**
**चंद्रासि चंद्रिका तसि प्रेमें अनुसरूनि जे सदा हरिला ।**
**शरणागत सुजन-कुजन-ताप जिनें तो समग्रही हरिला ॥५॥**
**अंधांतूनि अनंधा मुक्त करी किति विचित्र अंधा, ते ।**
**जे ज्ञानदिवटि निवटी सत्वर अति निबिड मोह अंधाते ॥६॥**
**विषयांध अंध खचिताचि, नच तूं, कीं देशि दृढ करीं यष्टी[1]।**
**अवलंबित्या न होऊं देइल भवपथिं कदापि जी कष्टी ॥७॥**
**श्रीसद्‌गुरुपदरज तुज, चातकिसी नित्य घन तसा मान्य ।**
**त्यापुढति गमति सुरतरु, सुरभी, अपवर्ग तुच्छ सामान्य ॥८॥**
**तुज शिवपदवसतीचा *तिजे न ज्ञानेशकन्यके! लाहो।** (* गंगेला .)
**'श्रीभक्तिसौरभीं' हरि वरुनी संसार धन्य केला, हो ॥९॥**
**स्वानंदनंदनीं तव 'प्रेमनिकुंजांत' तुजसवें रमला ।**
**भ्रमला भ्रमरहित हरी, न असा वैकुंठिं देखुनी कमला ॥१०॥**
**अनुभविक प्रामाणिक भाविक * पिकवाणिनेंचि खुलवीला।** (× कोकिलेप्रमाणे गोड.)
**'प्रेमनिकुंजांत' सखा, कोणी न असा कवींहि भुलवीला॥११॥**
**'प्रियपाहुणेर' दिधला निजप्रिया खचित उचित जो कांही।**
**तो वाणिजेल वाटे शुकसनकादिक विमुक्त लोकांही॥१२॥**
**'प्रीतिनिवर्तन' संसृतिकर्तन हें मन सदेव अवलोकी।**
**उन्मतज्ञानेश्वरकन्याकृत लोकबाह्य या लोकीं॥१३॥**
**अनुभूतिश्रुतियुक्ति व्याखानाचि 'सांप्रदयसुरतरू' चें।**
**नित्य रुचे साधूंना जवें की कामुकांसि सुरत रुचे॥१४॥**
**'प्रियलीलाउत्सव' हा मूर्त महोत्सव मनास भासतसे।**

श्रीरंग अंग विसरूनि होउनि की दंग यांत नाचतसे॥१५॥
गंभीर गद्यपद्यें यांतिल त्या सागरासि वांकवल्या।
दाखविल्या गांभीर्ये फलदानी अमृतवल्लि वांकविल्या॥१६॥
देवी! 'अभंगगया' 'पदगाथा' हे भवव्यया हरिते।
अश्विनिकुमार लोकीं, अणिलें तूं काय प्रार्थुनी हरितें॥१७॥
अद्वैतहृदय रक्षुनि मुमुक्षुजन भक्तिमार्ग वळवीले।
'सिद्धांततुषारानें' सकल दुरितदैन्य दूर पळवीले॥१८॥
जनसंशयजालांचे [१] निजयूथें करुनि [२] पत्रिके तुकडे।
भवभयभुजंगभंगा, नेशी त्या शीघ्र [३]पत्रिकेतुकडे॥१९॥
(१-*आपल्या समुदायाने.* २.*श्रीमहाराजांनी सांप्रदायिकांस पाठविलेल्या पत्रांस उद्देशून* ३. *गरुडध्वज देवाकडे.*)
क्षीर श्रीपातंजलिकृतिपरि 'योगप्रभाव' हे क्षिप्रा।
[१]भाष्यादिक नवनीताहुनि वाटे मधुरसाधिका विप्रा॥२०॥(१. *व्यास भाष्यादि*)
*'सुखवरसुधा' वुधा तूं उपासुनी यांचि देशिका वाच।
( * *आपले ग्रंथ कसे वाचावेत इत्यादि इशारा यांत श्रीमहाराजांनी केला आहे.*)
कीं उपकारी वन्ही वालें विनियोग परि शिकावाच॥२१॥
भक्त्याचार्य पुरातन नारद शांडिल्य जेविं लौकरि ते।
देऊनि भक्ति जीवां, तेवीं तूं धन्य या कलौ करिते॥२२॥
झाले, आहेत, पुढें होतिल सद्भक्त भक्तिसुरसिक ते।
परि त्वद्रसिकपणातें पाहुनि होतील तेहि सुर सिकते॥२३॥
[१] जीचे [२] वणिहि परिसुनि अमृतमधुर खोल बोल कानांहीं।
(१. *ज्या ज्ञानेशकन्येचे (श्रीगुलाबरावांचे)* २. सरस्वतीदेखील.)
म्हणते 'धन्ये! कन्ये!' [१]सुरगुरु त्वत्तुल्य बोलका नाहीं॥२४॥(१. *बृस्पति.*)
*श्रीशंकर मधुसूदनयतिसम मधे अकुंठ वाटतसे।(* *श्रीमच्छंकराचार्य : 'दसुरा शंकरयति' (बाबा गर्दे)*)
गुणवति! गावें तुजला, या मंदे कितिक सांग भाट तसे॥२५॥
दीक्षा माधुर्याची [१]याची भिक्षा सदैव हे माते!। (१. *याचना करिता*)
दे मातें इच्छीना, मग मी ब्रह्माण्डवर्ति हेमातें॥२६॥
दे हरिपदिं रति धन्ये श्रीमज्ज्ञानेशसद्‌गुरूकन्ये।
या ''वासुदेव'' बाला न छळावें चित्तवानरें *वन्ये॥२७॥ (* *रानटी*)
मी समकालिन जरि तरि दैवें दरुशन न माउले झालें।
श्रीवाङ्मयमूर्ती परि अवलोकुनि चित बहुत हें [१]धालें॥२८॥(१. *तृप्त झालें*)



शतशः प्रणति असो या पुनरपि ज्ञानेशकन्यकेला हो।
कीं या सतिनें निजजन पुण्यबळें धन्य धन्य केला हो॥२९॥
हा सत्व तव नवनवरुचिदायी हो, अर्पिला तुला भावें।
येणें वळेंचि श्रपतिपदरज मज [१]अमृतहेतु लाभावें॥३०॥(१. *मोक्षाला कारण*)

० ० ०

( १. *गुलाबराव महाराजांच्या ग्रंथांतील विभागास ''यष्टि'' असें नांव आहे.*)

कविता : बाबा गर्देकृत

पद - चाल :- ''भला जन्म हा तुला लाधला''

गुलाबराया तुला बघाया इच्छा होती मनीं।
होय ती पूर्ण तुझ्या दर्शनीं॥धृ॥
कीति ऐकुनी मूर्ति रेखिली हृदयी तव म्यां जशी।
हुबेहुब दिसली नयनां तशी॥
धन्य माय ती अशी विभूती जन्मे जीच्या कुशीं।
विरळा भूवरि रत्नें अशी॥चाल॥
मम बहुत जन्मकृत पुण्योदय जाहला।
त्यामुळेंचि हें तव दर्शन झालें मला।
ज्ञानेश्वर मम तात असा जो दर्शविशी भाषणीं।
वाटे सत्यचि मज तो ध्वनी ॥गुलाबराया॥१॥
तात म्हणसि तूं अळंदिनाथा तेवीं जो श्रीपती।
मनिसी त्यातें माझ पती।
हेंहि वावगें दिसे न मजला पाहतां गोपीमती।
जडल्या भगवंती ज्या अती। चाल।
पडे विसर कदाचित स्वामीचा सेवका।
अंकुरही होइल सख्यभक्तिचा सुका।
परी क्षणहि पतिविरह न साहे पतिव्रता कामिनी।
नचही प्रीति व्यभिचारिणी॥ गुलाबराया॥२॥
ग्रंथविमर्शन सज्जनदर्शन छंद हाचि लागला।
बहुत दिवसांपासुनि मला।
अक्कलकोटस्वामीप्रभृति जो जो यति ऐकिला।
तो तो साक्षेपें देखिला।चाल।
कुणि वसे मुक्यापरि खुळ्यावाणि बडबडे।
कुधि शैशवलीला दावी लोकांपुढे।

अशा विभूती वंद्य होति जरि लोकपापवारणी।
न मिळे मोक्ष तयांपासुनी॥गुलाबराया॥३॥
अंध म्हणति मतिमंद तुला जे अंध तेचि तस्वतां।
नसती ज्ञानचक्षु ज्यां स्वतां।
मुनी जागतो तींत असे जी निशाचि सर्वांभुतां।
असें हरि सांगे कुंतीसुता।चाल।
निष्णात असे जो शाब्दी परि तो गुरू।
उद्धवासि ऐसें बदे भक्तसुरतरू।
अशा लक्षणें युक्त दिसे जो त्याच्या पदवंदनी।
व्हावें तत्पर साधकजनीं॥ गुलाबराया॥४॥
सर्व शास्त्रि तव विचित्र पाहुनि शिक्षणरहिता गती।
गमसी केवळ शंकरयती।
प्रकृत कविता तुझी स्मरवि मज खचित अळंदपती।
बापा तव गुण वानूं किती। चाल।
वा कृपा असावी तव ह्या दीनावरी।
मज करी नुपेक्षा भक्त अडाणी जरी।
द्यावी मज शेवटची जागा भक्तिसुधाभोजनीं।
प्रार्थी कृष्णसूनु वंदुनी॥ गुलाबराया॥५॥

*चरणरज – बाबा गर्दे.*

हे आंगल विद्याविभूषित व सरकारी शिक्षण विभागात नोकरीला होते. हे अध्यात्माचे व वेदान्ताचे अभ्यासक होते. त्यांना सत्पुरुष दर्शनाचा छंद होता. ते श्री महाराजांचे भेटीस व सहवासास आले होते. त्यांनी विद्यारण्याचे संस्कृत पंचदशी ग्रंथाचे पद्यमय मराठी रूपांतर केले होते. प्रथम भेटीतच श्री चे ठिकाणी त्यांचा प्रेमजुळला व त्यांचा पत्रव्यवहार झाला.